# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

# संशोधन पद्धती

**(Research Methodology)**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सुधारित अभ्यासक्रम
शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून

**एम. ए. भाग-१ : सत्र-१**

**समाजशास्त्र**

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०२३
**द्वितीय आवृत्ती :** २०२४
एम. ए. भाग १ (सत्र १ : संशोधन पद्धती) करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : ५००**

■

**प्रकाशक**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर : ४१६ ००४

■

**मुद्रक**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर : ४१६ ००४

■

ISBN- 978-93-89345-62-9

★ दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर–४१६ ००४ (भारत)

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
## शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### सल्लागार समिती


**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) प्रकाश पवार**
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. विद्याशंकर**
कुलगुरू, केएसओयू,
मुक्तगंगोत्री, म्हैसूर, कर्नाटक-५७० ००६

**डॉ. राजेंद्र कांकरिया**
जी-२/१२१, इंदिरा पार्क,
चिंचवडगांव, पुणे-४११ ०३३

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**डॉ. संजय रत्नपारखी**
डी-१६, शिक्षक वसाहत, विद्यानगरी, मुंबई विद्यापीठ,
सांताक्रुझ (पु.) मुंबई-४०० ०९८

**प्रा. (डॉ.) कविता ओझा**
संगणकशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) चेतन आवटी**
तंत्रज्ञान अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एस. देशमुख**
अधिष्ठाता, मानव्य विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) श्रीमती एस. एच. ठकार**
प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. ए. एन. जाधव**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्रीमती सुहासिनी सरदार पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. के. मोरे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


**■ समाजशास्त्र अभ्यासमंडळ ■**

अध्यक्ष – **डॉ. अर्चना राजकुमार कांबळे**
द न्यू कॉलेज, १०६२, ए वॉर्ड, शिवाजी पेठ, कोल्हापूर

- **डॉ. श्रीमती प्रतिमा एस. पवार**
समाजशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. प्रल्हाद एम. माने**
समाजशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. आनंद लक्ष्मण गाडीवड्ड**
देवचंद कॉलेज, अर्जुननगर,
ता. कालग, जि. कोल्हापूर

- **डॉ. श्रीमती भाग्यश्री मल्लिकार्जुन पाटील**
यशवंतराव चव्हाण कॉलेज, (केएमसी) कोल्हापूर

- **डॉ. श्रीमती सविता माधवराव गिरे**
दादासाहेब जोतिराम गोडसे आर्टस, कॉमर्स, सायन्स कॉलेज,
वडूज, ता. खटाव, जि. सातारा

- **डॉ. वसंत कृष्णा मोरे**
मोहनराव पतंगराव पाटील महाविद्यालय, बोरगांव,
ता. वाळवा, जि. सांगली

- **डॉ. कृष्णाजी मारूती देसाई**
श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, २९६८, 'सी',
दसरा चौक, कोल्हापूर

- **डॉ. अर्जुन पांडुरंग जाधव**
दत्ताजीराव कदम आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज,
इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

- **डॉ. संदिप मुरलीधर चौधरी**
समाजशास्त्र अधिविभाग,
एसबीइएस कॉलेज ऑफ आर्टस ॲण्ड कॉमर्स,
छत्रपती संभाजी नगर

- **डॉ. सुगत शेशराव बनसोडे**
श्री. शिव-शाहू कॉलेज सरूड,
ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर

- **डॉ. मधुकर गंगाराम धतूरे**
विठ्ठलराव पाटील महाविद्यालय, कळे,
ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर

- **डॉ. रमेश हिंदुराव पाटील**
श्रीमती कुसुमताई राजारामबापू पाटील कन्या महाविद्यालय,
इस्लामपूर, जि. सांगली

- **डॉ. अभिजित पाटील**
७ए-३०१, अशोक नगर, दादलानी पार्क जवळ,
बाळकुम, ठाणे (वेस्ट)-४००६०८

# प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण विभागांतर्गत पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी समाजशास्त्र विषयाची निवड केलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे हार्दिक स्वागत. या अभ्यासक्रमात तुम्ही समाजशास्त्राचे सत्र पद्धतीनुसार एकूण आठ पेपर्स अभ्यासणार आहात. त्यापैकी सत्र १ साठी संशोधन पद्धती असा आहे. या पेपरमध्ये एकूण चार अध्ययन घटक समाविष्ट असून त्यांचे लेखन अत्यंत सुलभपणे व पद्धतशीरपणे केलेले आहे. त्यामुळे तुम्हा विद्यार्थ्यांना संशोधन पद्धतीचे यथार्थ आकलन होईल याची मला खात्री आहे.

या पुस्तकाच्या निर्मितीमध्ये शिवाजी विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू मा. डॉ. पी. एस. पाटील, समाजशास्त्र अभ्यास मंडळाच्या अध्यक्षा डॉ. अर्चना कांबळे व अभ्यास मंडळाचे सर्व सदस्य, या पेपरसाठी लेखन करणारे सर्व सहकारी प्राध्यापक आणि दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातील सर्व प्रशासकीय सेवकांचे मोलाचे सहकार्य मिळाले. त्याबद्दल वरील सर्वांचे मी मनपूर्वक आभार मानतो.

■ **संपादक** ■

**डॉ. विजय बिराप्पा मुसाई**
तुकाराम कृष्णाजी कोलेकर आर्टस अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेज,
नेसरी, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर

**अभ्यास घटकांचे लेखक**

| **लेखन सहभाग** | **सत्र–१<br>घटक क्रमांक** |
|---|---|
| **प्रा. अर्चना जगतकर**<br>न्यू कॉलेज, कोल्हापूर | १ |
| **प्रा. डॉ. एम. एस. शिंदे**<br>छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा | २ |
| **प्रा. बबन रणजित पाटोळे**<br>सहाय्यक प्राध्यापक, दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | २, ३, ४ |

**■ संपादक ■**

**डॉ. विजय बिराप्पा मुसाई**
तुकाराम कृष्णाजी कोलेकर आर्टस ॲण्ड कॉमर्स कॉलेज,
नेसरी, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| १. | वैज्ञानिक संशोधन | १ |
| २. | सामाजिक वैज्ञानिक संशोधन | १५ |
| ३. | संशोधन आराखडा | ६९ |
| ४. | नमुना निवड | ९९ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२३-२४ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

# सत्र–१ : घटक १

# वैज्ञानिक संशोधन

# (Scientific Research)

१.० घटक संरचना

१.१ उद्दिष्ट्ये

१.२ प्रस्तावना

१.३ विषय विवेचन

१.३.१ वैज्ञानिक संशोधनाचे स्वरुप आणि प्रकार

स्वयं – अध्ययनासाठीचे प्रश्न – १

१.३.२ वैज्ञानिक पध्दती आणि पध्दतीशास्त्रातील फरक

स्वयं – अध्ययनासाठीचे प्रश्न – २

१.३.३ नैसर्गिक आणि सामाजिक शास्त्रज्ञातील दृष्टीकोणातील फरक

स्वयं – अध्ययनासाठीचे प्रश्न – ३

१.४ सारांश

१.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.६ सरावासाठीचे प्रश्न

१.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## १.१ उद्दिष्टये : (Objectives)

सामाजिक संशोधनाचा अभ्यास करत असताना त्यामध्ये वैज्ञानिक पध्दतीने संशोधन करणे अत्यंत महत्वाचे असते. वैज्ञानिक पध्दतीने संशोधन हे पध्दतशीरपणे केले जाते. सत्याचा शोध घेण्यासाठी अखंडपणे संशोधक प्रयत्नशील असतो. या घटकामध्ये वैज्ञानिक पध्दत जाणून घेत असताना

अ) वैज्ञानिक संशोधन पध्दतीचा अर्थ, वैज्ञानिक पध्दतीचे विविध टप्पे यांचे स्वरुप सविस्तरपणे अभ्यासता येईल. तसेच शुध्द संशोधन आणि व्यावहारिक संशोधनाचा अर्थही जाणून घेता येईल. त्याचप्रमाणे संख्यात्मक व गुणात्मक संशोधनाचे स्वरुप अभ्यासता येईल त्याचबरोबर तुलनात्मक अध्ययन सविस्तरपणे करता येईल.

ब) वैज्ञानिक पध्दतीचे स्वरुप अभ्यासल्यानंतर वैज्ञानिक पध्दत आणि पध्दतीशास्त्राचे अध्ययन करता येईल तसेच वैज्ञानिक पध्दत आणि पध्दतीशास्त्रातील फरकाचा अभ्यास करता येईल.

क) वैज्ञानिक संशोधनाचे स्वरुप जाणून घेताना सामाजिक शास्त्रज्ञ आणि नैसर्गिक शास्त्रज्ञांच्या संशोधन विषयक दृष्टिकोनातील फरकाचेही अध्ययन करता येईल.

## १.२ प्रस्तावना :

''कोणत्याही विषयाचा पध्दतशीर अभ्यास करणे म्हणजे शास्त्र होय.'' अशी शास्त्राची सर्वसाधारण व्याख्या केली जाते. शास्त्राचे प्रामुख्याने दोन गटात वर्गीकरण केले जाते. नैसर्गिक शास्त्रे आणि सामाजिक शास्त्रे. नैसर्गिक शास्त्रामध्ये निसर्गातील घटकाचा व वस्तूचा अभ्यास केला जातो. उदाहरणार्थ, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र, खगोलशास्त्र तर सामाजिक शास्त्रात मानवाच्या सामाजिक जीवनाचा विविध दृष्टीकोनातून अभ्यास केला जातो. उदाहरणार्थ, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, मानसशास्त्र, इतिहास, तत्वज्ञान इ. चा समावेश याठिकाणी होत असतो. कोणत्याही विषयाला शास्त्र म्हणून जी मान्यता प्राप्त होते ती मान्यता विषयामध्ये अभ्यासाचे घटक कोणते यावर तो अवलंबून नसते तर ते अभ्यासाचे घटक आपण ज्या विशिष्ट अभ्यासपध्दतीने म्हणजेच शास्त्रीय अभ्यास पध्दतीने हाताळतो. तेव्हा त्या विषयाला शास्त्रीय स्वरुप प्राप्त होते. एकूणच कोणत्याही विषयाला शास्त्र म्हणून मान्यता मिळवण्यासाठी शास्त्रीय अभ्यासपध्दतीचा वापर हा करावाच लागतो. शास्त्र कोणतेही असो सार्वत्रिक सत्याचा शोध घेणे हा त्याचा प्रमुख हेतू व उद्दिष्ठ्ये आहेत. ''शास्त्र म्हणजे सत्याचा शोध घेण्यासाठी अखंडपणे चालू असणारा तो एक प्रदीर्घ प्रवास आहे.''

कोणत्याही मानवी समाजात सत्याचा शोध घेताना त्यासंबंधी व्यावहारिक सत्य आणि शास्त्रीय सत्य या दोहोंच्यामधील भिन्नता लक्षात घेणे आवश्यक असते. पारंपारिक सत्य हे प्रामुख्याने लोकरुढी व परंपरा याचप्रमाणे त्या-त्या समाजातील वयोवृध्द व बुध्दीमान व्यक्ती यांच्याकडून प्रस्थापित झालेले असते. पारंपारिक सत्याचा सामान्य माणूस कोणत्याही प्रकारचे प्रश्न, शंका उपस्थित न करता स्विकार करतो. अशा प्रकारचे सत्य हे श्रध्देशी निगडीत असते. तर या उलट शास्त्रीय सत्य हे कोणत्याही व्यक्तीकडून स्विकारले जात असताना त्याची काळजीपूर्वक चौकशी केली जाते, ते तपासून घेतले जाते, त्याचे परीक्षण केले जाते व त्या-त्या ठिकाणी प्रयोग व निरीक्षणाचा वापर करुन प्रत्यक्ष अनुभव घेतला जातो. विशेष म्हणजे आंधळेपणाने कोणत्याही गोष्टींचा स्विकार केला जात नाही.

शास्त्रीय सत्य म्हणजे घटना-घटनांच्या परस्परसंबंधाबाबत अनुभवजन्य अशा प्रकारचे ठामपणाने केलेले सार्वजनिक स्वरुपाचे ते विधान असते. अशा प्रकारचे विधान करणे म्हणजेच सामान्यीकरण होय, आणि सिध्दांताची मांडणी करणे होय. म्हणूनच शास्त्र म्हणजे विविध सिध्दांताच्या आधारे त्य विशिष्ट घटकांबाबत ज्ञानाचे केलेले सारांशीकरण असते. शास्त्राच्या निर्मितीसाठी मानवाची अनुभवजन्य इंद्रिये मानवाच्या ठिकाणची जिज्ञासा, सर्वांच्या मते एकमत होणे हे तीन घटक जबाबदार असतात.

मानवाच्या इतिहासाइतकाच मानवाचा ज्ञान मिळविण्याचा प्रयत्न जुना आहे. कारण ज्ञान संपादन करणे ही मानवाची स्वभावप्रवृत्तीच असल्यामुळे प्राचीन काळापासूनच ज्ञान प्राप्तीसाठी विविध साधनांचा वापर करुन ज्ञान मिळविण्याचा तो सातत्याने प्रयत्न करीत आहे. हा अभ्यास सामान्य नियमांच्या आधारे करुन त्याने नियमांची मांडणीही केली व या नियमांच्या आधारे तो आपले वर्तमानकालीन व भविष्यकालीन जीवन सुसह्य करण्यासाठी प्रयत्न करु लागला. आधुनिक काळातील शोधामागे एक प्रकारची शास्त्रोक्त प्रवृत्ती असलेली दिसून येते. विज्ञानाच्या प्रगतीचे मूळ हे याच प्रवृत्तीत आहे या शास्त्रीय वृत्तीतूनच आज सर्वदूर प्रसिध्द असणारी वैज्ञानिक पध्दती अस्तित्वात आली आहे. वैज्ञानिक संशोधनामुळे एखाद्या सामाजिक घटनेसंदर्भातील कारणमीमांसा स्पष्टपणे दाखविता येते. शास्त्रीय-संशोधन पध्दतीच्या मागे जी तार्कीक सुसंगती आहे ती सुध्दा टप्प्याने विकसित झाली आहे.

## १.३ विषय विवेचन :

या घटकामध्ये वैज्ञानिक संशोधनाचे स्वरुप काय आहे तसेच त्याचे विविध प्रकारे कोणते आहेत या संदर्भातले अध्ययन केले जाणार आहे. तसेच वैज्ञानिक पध्दती आणि पध्दतीशास्त्रातील फरकाचाही अभ्यास केला जाणार आहे. याशिवाय या प्रकरणाच्या शेवटच्या घटकामध्ये नैसर्गिक शास्त्रज्ञ आणि सामाजिक शास्त्रज्ञाच्या दृष्टीकोनातील फरकावर प्रकाश टाकण्यात येणार आहे. याचेही अध्ययन या घटकात आपण करणार आहोत.

### १.३.१ वैज्ञानिक संशोधनाचे स्वरुप :

एकूणच शास्त्रीय सत्य शोधून काढण्यासाठी संशोधकाला विशिष्ट अभ्यासपध्दतीचा वापर करावा लागतो. या विशिष्ट अभ्यास पध्दतीलाच वैज्ञानिक अभ्यास पध्दत म्हणतात. कार्लपिअर्सन यांनी यासंदर्भात पुढील अर्थाचे विधान केले आहे.

‘‘शास्त्राला सत्य शोधून काढण्यासाठी वैज्ञानिक अभ्यास पध्दती इतका दूसरा कोणताही जवळचा मार्ग नाही.’’

वैज्ञानिक संशोधनाची व्याख्या आणि त्यासंदर्भात काही महत्वाच्या बाबी वरील माहितीच्या आधारे समजून घेता येतील.

वैज्ञानिक संशोधन पध्दतीचे विविध टप्पे सांगितले जातात, ते खालील प्रमाणे.

१) **ऑगस्त कॉम :** प्रत्यक्षवादाच्या विवेचनामध्ये खालील मुद्दे मांडले आहेत.

विषयाची निवड

निरीक्षणातून तथ्याचे संकलन

तथ्याचे वर्गीकरण

तथ्याची पडताळणी

सिध्दांताचे प्रतिपादन

२) **जे. ए. थॉमसन** यांनी 'Introduction to Science' या ग्रंथात वैज्ञानिक संशोधनाचे सहा टप्पे सांगितले आहेत.

१. निरीक्षणातून माहिती संकलन

२. सामग्रीचे मापन

३. वर्गीकरण व सारणीकरण

४. विश्लेषण

५. गृहीतकांची निर्मिती

६. सामान्य नियमाचे प्रतिपादन

लुण्डबर्ग यांनी वैज्ञानिक संशोधनाचे चार टप्पे 'Social Research' या पुस्तकात वर्णन केले आहेत

**संशोधनाचे टप्पे :**

१. गृहीतकांची निर्मिती

२. तथ्यांचे निरीक्षण व लेखन

३. तथ्यांचे वर्गीकरण

४. सामान्यीकरण

वैज्ञानिक संशोधनाच्या टप्प्यांच्या संदर्भात विचार वेगवेगळे असतील तरी यातील प्रमुख टप्पे कमीत कमी चार असणे आवश्यक आहे. वैज्ञानिक संशोधनात सामान्यत: किती टप्पे असावयास हवे या संदर्भात Social Science Research Council, New York सल्लागार समितीने काही अनिवार्यता स्पष्ट केल्या आहेत त्या पुढील प्रमाणे,

१) समस्येची तर्कसंगत व्याख्या केलेली असावी.

२) शब्द, विचार, संकल्पना तसेच साधने यांची स्पष्ट असंदिग्ध व्याख्या विश्लेषण दिलेले असावे.

३) सामग्रीचे संकलन व वर्गीकरण योग्य पध्दतीचा वापर केला जावा.

४) निश्चित स्पष्ट शब्दात निष्कर्षाची मांडणी केली जावी.

५) संपूर्ण संशोधन हे वस्तुनिष्ठ, पक्षपात विरहित असावी.

वरील बाबींचा संशोधनांतर्गत अवलंब केला जातो.

वैज्ञानिक संशोधनात खालील संशोधनाच्या टप्प्यांचा वापर आवश्यक नाही तर अनिवार्य ठरतो.

### १) समस्यासूत्रण :

वैज्ञानिक अभ्यासपध्दतीमधील समस्या सूत्रीकरण ही पहिली पायरी असते. यामध्ये अभ्यासक आपल्या समोर उभ्या असणाऱ्या समस्येचे एका विशिष्ठ पध्दतीने मांडणी करत असतो. वैज्ञानिक समस्येचे सूत्रण करणे ही वैज्ञानिक अध्ययनाची आधारशिला आहे व वैज्ञानिक समस्येच्या सूत्रणांकरिता वैज्ञानिक अध्ययनाची आवश्यकता आहे. कोणत्याही संशोधनात संशोधन समस्येची निवड ही महत्वाची ठरते कारण संशोधन समस्येच्या निश्‍चिती वरच पुढील संशोधन अवलंबून असते. त्यासाठी योग्य अशा समस्येची निश्‍चिती करणे गरजेचे असते.

समस्या सूत्रीकरणामध्ये पुढील गोष्टी महत्वाच्या ठरतात.

१) अभ्यासकाने हाती घेतलेल्या समस्येमधील विविध संकल्पना आणि शब्द यांचे अर्थ निश्‍चित करणे.

२) समस्येतील संकल्पनेच्या अनुरोधाने आपल्या संशोधन विषयाची स्पष्ट शब्दामध्ये मांडणी करणे.

३) आपल्या संशोधन विषयाची व्याप्ती आणि कालावधी निश्‍चित करणे.

४) संशोधन विषयाला हव्या असणाऱ्या तथ्यांचे संकलन कोणत्या पध्दतीने करायचे हे निश्‍चित करणे. प्रामुख्याने निरीक्षण तंत्राच्या साहाय्याने संकलन केले जाते आणि निरीक्षण तंत्राला मुलाखत, प्रश्‍नावली, नमुना निवड इत्यादीचा आधार घेतला जातो.

५) संकलित तथ्यांचे विश्‍लेषण करताना अभ्यासाच्या कोणत्या पध्दती उपयोगात आणावयाच्या आहेत यासंबंधी निर्णय आधीच घ्यावे लागतात.

थोडक्यात संशोधकाला समस्यासूत्रीकरण करताना वरील सर्व गोष्टी विचारात घेऊन समस्येची मांडणी करावी लागते. संशोधकाने आपल्या विषयाची निवड अतिशय काळजीपूर्वक केली पाहिजे. विषयाची किंवा त्याच्या विवक्षित पैलूंची निवड म्हणजे समस्यासूत्रण होय.

### २) गृहीतकृत्याची निर्मिती :

संशोधक आपण हाती घेतलेल्या संशोधन समस्येचे एक संभाव्य उत्तर तयार करतो. या उत्तरालाच किंवा संभाव्य अशा विधानालाच गृहीत कृत्य असे म्हणतात. गृहीतकृत्यामुळे संशोधनाला दिशा मिळते. संशोधन विषयाच्या पूर्वज्ञान आणि माहिती यांच्या आधारे गृहीतकृत्यांची निर्मिती केली जाते. गृहीतकृत्यांमुळे संशोधकाला आपल्या अध्ययन विषयावर लक्ष केंद्रीत करण्यास मदत होते.

गृहीतकृत्य हे सैध्दांतिकदृष्ट्या सोपे, स्पष्ट, विशिष्ट, संशोधन समस्येच्या संदर्भात अनुकूल आणि निरीक्षणक्षम असणे आवश्यक असते. संशोधनकर्त्याने अत्यंत काळजीपूर्वक गृहीतकृत्यांची निर्मिती केली पाहिजे. गृहीतकृत्य हे संभाव्य उत्तर असले तरी ते खरेच ठरेल असे नाही. काही वेळा ते खोटे ठरण्याचीही शक्यता असते. संशोधनकर्त्याने गृहीतकृत्य खरे ठरविण्याचा आग्रह धरण्याचे कारण नाही. गुड आणि हॅट यांनी आपल्या 'Methods in Social Research' या प्रसिध्द ग्रंथात गृहीततत्वांचे वर्णन पुढील प्रमाणे

केले आहे. 'गृहीततत्व म्हणजे संशोधकाने केलेले अशा प्रकारचे विधान की ज्या विधानांचा खरे-खोटेपणा तपासून घ्यावयाचा असतो.' गृहीतकृत्यामुळे संशोधन प्रक्रिया एका विशिष्ट दिशेने व अधिक वेगाने पुढे जाऊ शकते. संशोधकाने जर अभ्युपगमाची / गृहितकृत्याची मांडणी केली नाही तर त्याची अवस्था एखाद्या अंधाऱ्या खोलीत एखाद्या आंधळ्या व्यक्तीने धडपडत राहाण्यासारखी होईल. म्हणून योग्य गृहितकाची मांडणी करणे हे संशोधनाच्या दृष्टीने महत्वाचे असते.

**३) संशोधन आराखडा :**

गृहीतकृत्यांच्या मांडणीनंतर संशोधकाला संशोधनाचा आराखडा तयार करावा लागतो. वेळ, पैसा, श्रम यांचा अपव्यय न करता कमीत कमी खर्च, वेळ आणि श्रमात संशोधन प्रक्रिया योग्य दिशेने पूर्ण करावयाची असते. तथ्यसंकलन, नमुना निवड, निरीक्षण, संख्याशास्त्रीय योजना इ. बाबत येणाऱ्या कार्यपध्दतीबाबतच्या निर्णयांचा अंतर्भाव करुन बनविण्यात आलेली योजना म्हणजे संशोधन आराखडा होय.

**४) नमुना निवड :**

संशोधनकर्त्याला आपल्या संशोधन विषयाचे समग्र निश्चित करुन त्या समग्रातील प्रातिनिधिक नमुना निवडावा लागतो. नमुना निवड करताना संभाव्यता आणि असंभाव्यता अशा दोन पध्दती आहेत. कोणत्या नमुना निवड पध्दतीचा वापर करावयाचा याचा निर्णय संशोधकाला घ्यावा लागतो. नमुना हा योग्य आणि प्रातिनिधीक स्वरुपाचा असणे आवश्यक असते. कारण अशा नमुन्याच्या आधारावर काढलेले निष्कर्ष हे समग्र समाजाला लागु पडणारे असतात.

**५) तथ्य संकलन आणि तथ्यांचे वर्गीकरण :**

तथ्यांचे प्राथमिक आणि व्दितीयक असे दोन स्त्रोत आहेत. संशोधन विषयाच्या अनुषंगाने संशोधनकर्ता प्राथमिक किंवा व्दितीयक स्त्रोतांव्दारे तथ्यांचे वर्गीकरण करणे आवश्यक असते कारण संकलित केलेली तथ्ये माहिती व आकडेवारी ही अस्ताव्यस्त आणि विखुरलेली असते म्हणून तथ्यांना व्यवस्थित करणे महत्वाचे असते. वर्गीकरणामुळे विस्कळीत तथ्यांना शिस्त लागते. तसेच घटना घटनांच्या कार्यकारण संबंधाबाबत अभ्यासकाला काही स्पष्टीकरण सुचू लागते व अभ्यासकाची वाटचाल निष्कर्षाच्या दिशेने होवु लागते. थोडक्यात तथ्य संकलन व वर्गीकरण करणे संशोधकासाठी महत्वाचे असते.

**६) तथ्यांचे विश्लेषण व निष्कर्ष :**

विश्लेषण ही एक अत्यंत व्यापक अशी प्रक्रिया आहे संशोधन प्रक्रियेत तथ्यांच्या संकलनानंतर तथ्यविश्लेषण करणे महत्वाचे असते संकलित केलेल्या तथ्यांचे परीक्षण, वर्गीकरण, संकेतीकरण, कोष्टके तयार संख्याशास्त्रीय निष्कर्षाचे प्रतिपादन करणे यांचा समावेश होतो. विश्लेषणानंतर त्या विषयाच्या संदर्भात निष्कर्ष मांडले जातात.

**७) निष्कर्षाचे निर्वचन आणि अहवाल लेखन :**

संशोधनातून मांडलेल्या निष्कर्षांच्या व्यापक अर्थाचा शोध घेणे म्हणजेच निर्वचन होय. यानंतर संशोधनाचे निष्कर्ष लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी त्या संशोधनाचा अहवाल तयार करणे आवश्यक आहे. अहवालासोबत आवश्यक असणारी परिशिष्टेही जोडली पाहिजेत.

या सर्व टप्प्यांचा वापर केल्यानंतर संशोधन प्रक्रिया पूर्ण होते.

संशोधन प्रक्रियेच्या विविध टप्प्यांच्या अध्ययनानंतर संशोधनाच्या विविध प्रकारांचा अभ्यास महत्वाचा ठरतो. संशोधनाचे विविध प्रकार खालील मुद्दयांच्या आधारे मांडता येतील.

**संशोधनाचे प्रकार :**

**१) शुध्द/मुलभूत संशोधन :** (Pure Research)

कोणत्याही शास्त्रात शुध्द/मुलभूत संशोधन हे नेहमीच केले जात असते. किंबहुना याच प्रकारचे संशोधन प्रत्यक्ष शास्त्रात आकाराला येत असते. शुध्द संशोधनात संशोधकाला सतत घडणाऱ्या एखाद्या प्रश्नाचे/समस्येचे उत्तर शोधून काढण्यामध्ये सर्वच प्रकारचा आनंद प्राप्त होत असतो. केवळ ज्ञानप्राप्ती करणे हाच या संशोधनाचे कार्य ज्ञानासाठी ज्ञान ह्याच उद्देशातून वैज्ञानिक शोध घेणे हेच असून ज्यातून मानवाच्या बौध्दीक प्रश्नांचे, शंकांचे निराकरण करुन पारंपारिक सिध्दांताला शुध्द स्वरुप देणे हा उद्देश असतो. याकरिता संशोधनात वस्तुनिष्ठता व तटस्थततेवर भर दिला जातो. या संशोधनातून जे निष्कर्ष पुढे येतील त्याचा प्रत्यक्ष व्यवहारात कोणता उपयोग होईल यासंबंधी तो कोणत्याही प्रकारची चिंता करत नाही.

शुध्द संशोधनाचे समर्थन अनेक अभ्यासकांनी केले आहे. त्यापैकी हक्सले या विचारवंताने या संशोधनाचे जोरदार समर्थन केले आहे. शुध्द संशोधन हे संशोधकाला सर्वोच्च आनंद देणारे असते. हे संशोधन सातत्याने नवीन ज्ञान प्राप्त करते. जुने सिध्दांत प्रचलित परिस्थिती योग्य आहेत किंवा नाहीत याचा वेध घेऊन त्यात सुधारणा केली जाते.

मुलभूत संशोधनात एखाद्या समस्यांचे मूळ कारण शोधून काढले जाते. परंतु समस्येच्या निराकरणासाठी उपाय सुचविले जात नाहीत. यावरुन ही पध्दती सैध्दांतिक स्वरुपाची आहे असे म्हणता येते.

गुड आणि हॅट यांनी मुलभूत संशोधनाची काही उद्दिष्ट्ये सांगितली आहेत. त्यात अभ्यासाची दिशा निर्धारित करणे, तथ्यांचे वर्गीकरण करणे, संक्षिप्तीकरण करणे, ज्ञानार्जनाची तृप्ती यांचा समावेश होतो.

थोडक्यात मुलभूत किंवा शुध्द संशोधन हे केवळ शुध्द ज्ञान प्राप्ती व विकास करण्यासाठी केले जाते.

**२) उपयोजित संशोधन :** (Applied Research)

रॉबर्ट एस. लिंड यांनी उपयोजित संशोधन पध्दतीचा पुरस्कार केला आहे. जेव्हा तथ्यांचे संकलन उद्योग किंवा प्रशासन यांच्या संदर्भात उपयोगीता वादी दृष्टिकोनातून केले जाते. तसेच ज्याची नीती मूल्ये निर्मात्यांना आवश्यक असतात. तेव्हा अशा संशोधनास उपयोजित संशोधन असे म्हटले जाते. या

संशोधनाच्या माध्यमातून मिळविलेल्या ज्ञानाचा समाज जीवनाच्या सौख्यासाठी उपयोग करणे हे या पध्दतीचे उद्दिष्ट आहे. या संशोधनात ज्ञानाचे मूल्यमापन सैध्दांतिक तत्वावर न करता सर्वसाधारणत: हे मूल्यमापन व्यावहारिक उपयुक्ततेवर आधारित असते.

उपयोजित संशोधनात सामाजिक समस्यांवर उपाययोजना सूचविणे या बाबींवर भर दिला जातो. उदाहरणार्थ, महाराष्ट्रात एच आय व्ही बाधित लोक किती आहेत? ही समस्या सोडविण्यासाठी कोणते उपाय करता येऊ शकतात. याबाबतीत विचार करता येतो. उपायोजित संशोधनात त्याव्दारे निष्कर्ष काढण्यासाठी सांख्यिकीचा उपयोगही केला जातो. सध्याच्या स्थितीत समाजाच्या कल्याणासाठी व नियोजनात्मक बाबींच्या संदर्भात अनेक योजनांची आखणी करण्यात येत असते. या संदर्भात मार्गदर्शक तत्वे सुचविण्याचे कार्य उपयोजित संशोधनाच्या माध्यमातून करता येऊ शकते.

**३) गुणात्मक संशोधन पध्दती : (**Qualitative Research Method**)**

सामाजिक संशोधनाचा मुलभूत उद्देश हा सामाजिक विश्व आणि त्याच्या विविध घटकांचे आकलन करणे हा आहे. संख्यात्मक आणि गुणात्मक पध्दती हे सामाजिक संशोधनाचे दोन प्रकार आहेत.

त्यापैकी प्रथम आपण गुणात्मक संशोधन पध्दतीचा विचार करणार आहोत. गुणात्मक संशोधनात अनेक पध्दतीचे शास्त्रीय दृष्टीकोन आहेत. तसेच त्यांची सैध्दांतिक तत्वेदेखील निरनिराळी आहेत. यामध्ये सामाजिक वास्तवतेचे वर्णन उत्तरदात्यांच्या अनुभवावर आधारित असून सामाजिक संबंधाच्या अन्वेषणाचा हा उद्देश अ- संख्यात्मक असून त्यामध्ये तथ्यसंकलनाच्या पध्दतींचा अंतर्भाव केला जातो.

गुणात्मक संशोधनाबाबतीत असे म्हणता येते की संशोधक आंतरक्रिया आणि अन्वयार्थामार्फत वास्तवतेचा अनुभव येतो त्यामुळे या संशोधनात वस्तुनिष्ठता शक्य असत नाही.

गुणात्मक संशोधना संदर्भात बारटन आणि पॉल लाझारस्फेड यांनी तीन बाबी नमूद केल्या आहेत. यामध्ये १) गुणात्मक संशोधन हे अन्वेषणाला मदत करीत असून संशोधनाची उद्दिष्ट्ये, निर्देशकांची निश्‍चिती आणि वर्गीकरण करते.

२) गुणात्मक संशोधन हे सामाजिक संबंधातील निश्‍चित घटकाबाबत चल, तुलना, निष्कर्षामधील संबंधाचा शोध घेते.

३) गुणात्मक संशोधन हे एकात्मिक रचनेची पूर्व मान्यता आणि गृहीतकृत्याला परीक्षणक्षेत्र बनविते.

गुणात्मक संशोधन पध्दतीमध्ये सामाजिक विश्वासंदर्भातील माहिती उत्तरदात्यांचा अनुभव व त्यांचा दृष्टीकोन जो वास्तवात आहे ते त्याला प्राप्त करण्याचा प्रयत्न केला जातो. तसेच संख्येने कमी उत्तरदात्यांचा अभ्यास केला जातो. यामध्ये संख्यात्मक विश्लषण केले जात नाही तर विस्तृत व सविस्तर शाब्दिक तथ्य व पूर्ण स्वरुपाची माहिती संकलित करण्याचा प्रयत्न केला जातो. उत्तरदात्यांनी स्वत: दिलेला अर्थ व अनुभविक दृष्टीकोनावर भर दिला जातो. तसेच दैनंदिन मानवी सामाजिक क्रियेचा अर्थ प्राप्त करण्यात येतो. कारण कर्ता व इतर लोक स्वत:च घटनेला अर्थ देतात आणि अर्थपूर्ण मानवी क्रिया करतात.

गुणात्मक संशोधन पध्दती ही अनेक अर्थाने लवचिक आहे. तसेच ती एक खुली पध्दती आहे, की ज्यात अभ्यासविषय, संशोधन स्थिती, संशोधन पध्दतीच्या बाबतीत अनेक अंगाने अनुभव घेण्यास मुक्त अशा स्वरुपाची असते. गुणात्मक संशोधन हे प्रत्येक प्रतीकाचा वा घटनेचा अर्थ संदर्भातून आकलन करण्याचा प्रयत्न करते. व्यक्तीगत संपर्कातून आकलन करण्याची तटस्थता तसेच सखोल आकलन म्हणून खुले मूल्यमापन केले जाते. संमिश्र व्यवस्था म्हणून एका भागाचा अभ्यास न करता समष्टी घटनेला आकलन करण्याचा प्रयत्न केला जातो. समाज एक गतिशील व्यवस्था म्हणून, गतिशील दृष्टीकोनाचा अवलंब लवचिकपणे केला जातो.

एकूणच ही पध्दती उत्तरदात्यावर आधारित सर्व अंगाने मुक्त व लवचिक दृष्टीकोन, सिंध्दांत बांधणीचा उद्देश, सैध्दांतिक नमुना निवडीचा अवलंब यामध्ये केला जातो.

गुणात्मक संशोधन पध्दतीची तंत्रे खालील प्रमाणे विशद करता येतील.

**१) सहभागी निरीक्षण :**

निरीक्षण ही तंत्र पध्दती आहे. ज्यात संशोधक समूहात सहभागी होऊन समुहाचा आंतरिक सदस्य होऊन जातो. सहभागी निरीक्षण या गुणात्मक संशोधन पध्दतीचे मूळ हे परंपरागत संस्कृतिवर्णन संशोधनात आहे. आंतरिक भूमिकेतून संशोधक सामाजिक विश्वाला वा समुदायाला आकलन करतो. सहभागी निरीक्षणाच्या चार भूमिका आहेत. त्या गटाच्या कार्यात पूर्णपणे सहभागी निरीक्षक म्हणून सहभागी, सहभागी म्हणून निरीक्षण आणि पूर्णपणे निरीक्षण अशा आहेत. सहभागी निरीक्षणात वेळ, स्थान, सामाजिक स्थिती, भाषा आणि सामाजिक जाणीव या तत्वांचा समावेश होतो.

**२) संस्कृतिवर्णन :**

संस्कृतिवर्णन या शब्दाचा शब्दश: अर्थ हा जीवन जगण्याच्या पध्दतीबाबत लिहिणे होय. या संशोधनात संशोधन प्रक्रियेत माहिती मिळविण्याचे दोन स्त्रोत संशोधकाला तथ्य संकलनासाठी उपयुक्त ठरतात. प्राथमिक व दुय्यम स्त्रोत असे म्हटले जाते. प्रश्नावली, मुलाखत, अनुसूची, निरीक्षण याव्दारे संशोधनकर्त्याला विषयाशी संबंधित असे साहित्य वाचून त्याचे चिंतन, मनन करावे लागते. सखोल ज्ञान मिळवावे लागतो. आपल्यापेक्षा जेष्ठ व अनुभवी व्यक्तींना विचारांचे आदान-प्रदान करुन माहिती घ्यावी लागते. या देवाण-घेवाणीतून संशोधनकर्त्याला आपल्याकडील त्रुटी, दोष काढून टाकून दोषविरहित संशोधन बनविता येते. कधी-कधी एकापेक्षा अधिक साधनांचा वापर करुन संशोधन केले जाते.

तथ्यांचे संकलन करणे व त्याचे वर्गीकरण करणे आवश्यक असते. संकलित केलेल्या माहितीच्या आधारे तक्ते, आलेख तयार केले जातात. वर्गीकरण करुन तक्ते तयार केले जातात. विखुरलेल्या तथ्यांना एकत्रित करणे. आवश्यक त्या तथ्यांचे वर्गीकरण करुन त्यातून साम्य व भेद दर्शविणे हे करावे लागते. त्यामुळे संशोधनात तथ्य संकलन करुन त्यांचे यथायोग्य वर्गीकरण करुन उत्तम संशोधन करणे व योग्य निष्कर्ष काढणे हे संशोधकाचे कामच असते. स्वाभाविक स्थितीतून दैनंदिन व्यवहाराचे निरीक्षण किंवा सहभागी होऊन सामाजिक गटाच्या अस्तित्वाचा शोध घेण्याचा प्रयत्न असतो. या पध्दतीत औपचारिक

मुलाखत, केंद्रित गट, दैनंदिनी अभ्यास, अनौपचारिक मुलाखत, कर्मचारी मूल्यांकन निरीक्षण, शासन सभेचे निरीक्षण, कागदपत्रे विश्लेषण इ. स्त्रोत अंतर्भूत आहेत. संस्कृतिवर्णन पध्दतीने संस्कृतीला आकलन केले जाते. समष्टीवादी अध्ययन केले जाते. सखोल अभ्यास पध्दतीचा अवलंब केला जातो.

**३) पायाभूत सिध्दांत :**

वर्तनात्मक विज्ञानासाठी सामान्य संशोधनपध्दती विकसित केली असून पॉल लाझारस्फेल्ड यांच्याकडून प्रशिक्षण घेतलेले ग्लेसर बी, आणि हर्बर्ट ब्लुमर यांचे विद्यार्थी स्ट्रॉस यांनी गुणात्मक संशोधनाचा हा दृष्टीकोन विकसित केला. गुणात्मक तथ्यविश्लेषणाचा अवलंब केला जातो. संकल्पनात्मक विचारावर आधारित गृहीतकृत्याची निर्मिती करणे हा एक उद्देश आहे.

**४) व्यष्टी अध्ययन पध्दती :**

व्यष्टी अध्ययन म्हणजे काही सामाजिक घटनेच्या एका व्यष्टीचे सखोल परीक्षण करणे उदाहरणार्थ, एक व्यक्ती, एक कुटुंब, एक गाव. वर्णनात्मक दृष्टीकोनातून अध्ययन केले जाते. सामाजिक व्यष्टीचे सखोल अंतर्दृष्टीने अन्वेषण करण्यावर व्यष्टी अध्ययनात भर दिला जातो.

**५) आशय विश्लेषण :**

या पध्दतीत कागदोपत्री नोंद असलेल्या मानवी संप्रेषणाचा अभ्यास केला जातो. संप्रेषण माध्यमाच्या आशयाला शोधण्याचा प्रयत्न केला जातो. आशय विश्लेषणातून वर्तन आकृतिबंधाचे स्वरुप प्रस्तुत करण्याला मदत होते. विविध विषयांचे विश्लेषण केले जाते.

वरील प्रमाणे गुणात्मक संशोधन स्पष्ट करता येईल. यानंतर संख्यात्मक संशोधनासंदर्भात विवेचन करता येईल.

**४) संख्यात्मक संशोधन : (Quantitative Research)**

सदर संशोधनामध्ये आकडेवारी किंवा सांख्यिकीय विरहीत विश्लेषण असते. यथार्थ किंवा वास्तव गोष्टींचे वर्णन जे एखाद्या समूहाने समुदायाने किंवा वैयक्तिक व्यक्तीने अनुभवलेले असते. उदाहरणार्थ, भिंती विरहीत तुरुंगाची संरचना व संघटना (कमी सुरक्षितता तुरुंग) ही केंद्रीय किंवा जिल्हा निहाय तुरुंगाशी (सुरक्षित तुरुंग) केली जाते. व कैद्याची कशा प्रकारे सुधारणा व समाजीकरण केले जाते यांचा अभ्यास या संशोधनाव्दारे केला जातो. तसेच महिला आरक्षण संदर्भात विधानसभा आणि लोकसभामध्ये राजकीय पक्षांचा पाठिंबा अभ्यासणे इत्यादी.

**५) तुलनात्मक संशोधन : (Comparative Research)**

फरक आणि साम्य यांची तुलना करण्यासाठी ह्या संशोधनाचा वापर होतो. दोन घटक, सांस्कृतिक किंवा सामाजिक समूहाचा अभ्यास तुलनात्मक पध्दतीने करता येतो. उदाहरणार्थ, हिंदू आणि मुस्लीम

यांच्यातील विवाह पध्दतीचा तुलनात्मक अभ्यास, कला आणि संस्कृती, दोन जाती किंवा जमाती, शहरी आणि ग्रामीण लोकातील रुढी, चालीरिती, अशा अनेक विषयांची तुलना करुन संशोधन करता येते.

६) **अनुलंब संशोधन : (Longitudinal Research)**

एखाद्या विशिष्ट कालावधीचा अभ्यास करण्यासाठी अनुलंब संशोधनाचा वापर करतात. उदाहरणार्थ, १९७९-१९८९ आणि १९९९ सालातील भारतीय स्त्री-पुरुषातील एड्सचे लक्षण.

या संशोधनात एक ठराविक कालावधी अभ्यासला जातो. यामध्ये संभाव्य आणि असंभाव्य संशोधनाचा समावेश होतो.

वरील पध्दतीने संशोधनाचे विविध प्रकार अभ्यासता येतील.

यानंतरच्या भागात आपण वैज्ञानिक पध्दती आणि पध्दती शास्त्र यातील फरकाचा अभ्यास करणार आहोत.

### १.३.२ वैज्ञानिक पध्दत आणि पध्दतीशास्त्र यातील फरक :

संशोधन ही गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. 'वैज्ञानिक पध्दत' आणि 'पध्दतीशास्त्र' यातील फरक अभ्यासणे अत्यंत गरजेचे आहे. संशोधनाशी संबंधित माहिती गोळा करण्यासाठी ज्या साधनांचा किंवा तंत्राचा वापर केला जातो त्याला 'पध्दत' असे म्हणतात. ज्ञान मिळवण्याची प्रक्रिया जे शास्त्रीय निरीक्षणावर आणि तार्कीकतेवर अवलंबून असते त्याला पध्दत असे म्हणतात. तार्कीक आणि वैज्ञानिक अनुशीलन म्हणजे 'पध्दती' होय. वर्णन, स्पष्टीकरण आणि वर्गीकरण म्हणजे पध्दती होय. उदाहरणार्थ, समजा एखाद्या सामाजिक शास्त्राचा किंवा समाजशास्त्राच्या पध्दतीविषयी अभ्यास करण्यासाठी आपल्याला अनेक समाजशास्त्रज्ञांनी मांडलेल्या 'पध्दती' चा अभ्यास करावा लागतो. उदाहरणार्थ, सर्वेक्षण पध्दत, प्रायोगिक पध्दत, सांख्यकिय पध्दत, व्यक्तिगत पध्दत इ. एखाद्या विज्ञान शाखेच्या अभ्यासासाठी तंत्राचा वापर केला जातो. जनमत सर्वेक्षण तंत्र, मुलाखत तंत्र, निरीक्षण तंत्र इ. अनेक तंत्राचा वापर करुन विज्ञानाचा उलगडा करता येतो. तंत्र आणि पध्दती यामध्ये सहसंबंध आढळतो. संशोधनाला चालना देण्यासाठी वैज्ञानिक पध्दतीचा वापर करतात. अनुभवजन्य घटना आकलन होण्यासाठी पध्दतीचा वापर होतो. पध्दती म्हणजे वैज्ञानिक अनुशीलन प्रक्रिया होय. ज्ञानाची कक्षा वाढविणे, तथ्याची जुळवाजुळव, स्पष्टीकरण आणि विश्लेषण ह्या गोष्टी वैज्ञानिक पध्दतीत येतात.

वरील पध्दतीने वैज्ञानिक पध्दत आणि पध्दतीशास्त्रातील फरक विशद करता येईल.

या नंतरच्या भागात आपण नैसर्गिक शास्त्रज्ञ आणि सामाजिक शास्त्रज्ञांच्या दृष्टीकोनातील फरक अभ्यासणार आहोत.

### १.३.३ नैसर्गिक आणि सामाजिक शास्त्रज्ञाच्या दृष्टीकोनातील फरक :

सामाजिक शास्त्रज्ञ आणि नैसर्गिक शास्त्रज्ञ यांचा दृष्टीकोन हा नेहमीच भिन्न असतो. निसर्ग शास्त्रज्ञ

१) अनुभवजन्य अभ्यास किंवा घटना यामध्ये सहभागी होत नाही.

२) घटकांची मुलाखत घेत नाहीत.

३) प्रयोग करण्यासाठी प्रयोगशाळेचा वापर करतो.

४) प्रायोगिक साधने व रसायनांचा वापर केला जातो.

५) चलांवर पूर्णपणे नियंत्रण असते.

उलटपक्षी

सामाजिक शास्त्रज्ञ :

१) अनुभवजन्य घटना, प्रसंग यामध्ये सहभाग असतो.

२) माहिती गोळा करण्यासाठी मुलाखत तंत्राचा वापर करतो.

३) प्रयोगशाळा नसते तर संपूर्ण समाज हीच एक प्रयोगशाळा असते

४) परिस्थितीवर नियंत्रण ठेवणे शक्य नसते.

दोन वैज्ञानिकांच्या दृष्टीकोनातील बदल ही 'पध्दती' होय. याला 'पध्दत' लागू पडत नाही. 'पध्दती' ही संशोधनावर अवलंबून असलेल्या तत्वज्ञानाशी निगडीत असते. नैसर्गिक शास्त्रात वैज्ञानिक पध्दतीचा वापर हा केलाच जातो.

सामाजिक शास्त्रापेक्षा भौतिक शास्त्रामध्ये संशोधन तंत्राचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जातो. सर्वच शास्त्रात वैज्ञानिक पध्दतीचा वापर करतात पण हे त्या शास्त्राशी निगडीत असते. सामाजिक शास्त्रात वैज्ञानिकता कमी प्रमाणात असते. कारण ती भौतिक तंत्राचा वापर करत नाहीत.

वरील मुद्यांच्या आधारे नैसर्गिक आणि सामाजिक शास्त्रज्ञांच्या दृष्टीकोनातील फरक लक्षात येतो.

**स्वयंअध्ययन प्रश्न : १**

प्रश्न - रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.

१) शास्त्राला सत्य शोधून काढण्यासाठी ............. पध्दती इतका जवळचा मार्ग नाही.

२) लुंडबर्ग यांनी वैज्ञानिक संशोधनाचे ........... इतके टप्पे वर्णन केले आहेत.

३) ............ ही वैज्ञानिक अभ्यास पध्दतीतील पहिली पायरी आहे.

४) ............ म्हणजे संशोधन समस्येचे संभाव्य उत्तर होय.

५) ............ मुळे विस्कळीत तथ्यांना शिस्त लागते.

**स्वयंअध्ययन प्रश्न : २**

प्रश्न – एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) संशोधनातील वैज्ञानिक पध्दत म्हणजे काय?

२) 'पध्दतीशास्त्र' म्हणजे काय?

३) वैज्ञानिक पध्दतीचा वापर का केला जातो?

४) समाजशास्त्रज्ञांनी मांडलेल्या पध्दती कोणकोणत्या आहेत?

## १.४ सारांश :

कोणत्याही विषयाचा पध्दतशीर अभ्यास करणे म्हणजे शास्त्र होय. अशी शास्त्राची व्याख्या केली जाते. शास्त्राला सत्य शोधून काढण्यासाठी वैज्ञानिक अभ्यास पध्दतीचा उपयोग करावा लागतो. वैज्ञानिक संशोधनामध्ये विषयाची निवड, निरीक्षण, तथ्यांचे संकलन, तथ्यांचे वर्गीकरण पडताळणी, सिध्दांताचे प्रतिपादन करणे अशा टप्प्यातून संशोधनाचा प्रवास होतो. तर समस्या सूत्रण, गृहीतकृत्याची निर्मिती, उद्देशांची मांडणी, संशोधन आराखडा, नमुना निवड, तथ्यांचे संकलन, वर्गीकरण, विश्लेषण आणि निष्कर्ष काढणे इ. अनेक टप्प्यातून संशोधनाची प्रक्रिया पूर्ण करावी लागते. या नंतरच्या भागात आपण शुध्द, व्यावहारिक, गुणात्मक, संख्यात्मक, तुलनात्मक आणि अनुलंब असे संशोधनाचे विविध प्रकारांचा अभ्यास केला आहे. त्यानंतरच्या भागामध्ये वैज्ञानिक पध्दत आणि पध्दती शास्त्र यातील फरक अभ्यासला आहे आणि शेवटच्या भागामध्ये सामाजिक शास्त्रज्ञ आणि नैसर्गिक शास्त्रज्ञांच्या दृष्टीकोनातील फरकाचा अभ्यास केला आहे.

## १.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे :

स्वयंअध्ययन प्रश्न – १ ची उत्तरे

१) वैज्ञानिक पध्दती

२) चार टप्पे

३) समस्यासूत्रण

४) गृहीतकृत्ये

५) वर्गीकरण

स्वयंअध्ययन प्रश्न – २ ची उत्तरे

१) संशोधनाशी संबंधित माहिती गोळा करण्यासाठी ज्या साधनांचा किंवा तंत्राचा वापर केला जातो त्याला 'पध्दत' असे म्हणतात.

२) तार्कीक आणि वैज्ञानिक अनुशीलन करणे तसेच वर्णन, स्पष्टीकरण आणि वर्गीकरण म्हणजे पध्दती होय.

३) संशोधनाला चालना देण्यासाठी वैज्ञानिक पध्दतीचा वापर केला जातो.

४) सर्वेक्षण, प्रायोगिक, सांख्यिकीय, वैयक्तिक या विविध पध्दती.

## १.६ सरावासाठीचे प्रश्न :

टीपा लिहा

१) शुध्द संशोधन

२) उपयोजित संशोधन

३) गुणात्मक संशोधन

४) संख्यात्मक संशोधन

५) तुलनात्मक संशोधन

६) अनुलंब संशोधन

**खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१) वैज्ञानिक संशोधनाचे स्वरुप विशद करा.

२) 'वैज्ञानिक पध्दत' आणि 'पध्दतीशास्त्र' यातील फरक विशद करा.

३) नैसर्गिक आणि सामाजिक शास्त्रज्ञाच्या दृष्टीकोनातील फरक विशद करा.

## १.७ अधिक वाचनासाठी पुस्तके :


१) भांडारकर पु. ल. ''सामाजिक संशोधन पध्दती'' महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, नागपूर

२) डॉ. दिलीप खैरनार, प्रगत सामाजिक संशोधन पध्दती व सांख्यिकी.

३) प्रा. घाटोळे रा. ना. समाजशास्त्रीय संशोधन तत्वे व पध्दती, मंगेश प्रकाशन नागपूर.

४) डॉ. गुरुनाथ नाडगोंडे, 'सामाजिक संशोधन पध्दती', फडके प्रकाशन कोल्हापूर.


❑❑❑

# सत्र–१ : घटक २

# सामाजिक विज्ञान संशोधन

# (Social Science Research)

**घटक संरचना**

२.० उद्दिष्टे

२.१ प्रस्तावना

२.२ विषय विवेचन

२.२.१ सामाजिक विज्ञान प्रतिमान

२.२.२ प्रतिकात्मक आंतर क्रियावाद, प्रघटन शास्त्र, संरचनात्म कार्यात्मवाद, संरचना

२.२.३ सामाजिक संशोधनातील पायऱ्या / टप्पे

२.३ सारांश

२.४ सरावासाठी प्रश्न

२.५ चिंतन आणि कार्य

२.६ अधिक वाचनासाठी पुस्तके

## २.० उद्दिष्टये :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास,

* सामाजिक विज्ञान प्रतिमान समजून घेता येईल.
* प्रतिकात्मक आंतरक्रियावान, प्रघटनशास्त्र, संरचनात्मक कार्यात्मवाद, संरचना समजून घेता येईल.
* सामाजिक संशोधनातील पायऱ्या / टप्पे समजून घेता येतील.

## २.१ प्रस्तावना :

मानव आणि मानवेतर प्राणी यामध्ये भेद आहे. मानवाजवळ बुध्दी असल्यामुळे त्याने निसर्गातील घटनांचा अर्थ लावण्याचा प्रयत्न केला आहे व या बुध्दीच्या जोरावरच त्याने आकाशातील ग्रहगोलांचे कोडे उलगडण्याचा प्रयत्न केला आहे. मानवाजवळ असलेल्या जिज्ञासूवृत्ती व ज्ञानसाधनेमुळे देखील त्याने निसर्गातील घटनांचा अर्थ लावण्याचा प्रयत्न केला आहे. जिज्ञासूवृत्तीमुळेच मानवाला ज्ञानाची प्राप्ती झाली आहे. पण मानवाची खरी प्रगती होण्याचे कारण म्हणजे त्याचे घटनेकडे शास्त्रीय किंवा चिकित्सक दृष्टीने पाहणे होय.

मानवाच्या बुध्दीचा / ज्ञानाचा विकास हा टप्प्याटप्प्याने झाला. सुरवातीच्या कालखंडामध्ये निसर्गातील घटना घडण्यामागे ईश्वरी शक्ती, अलौलिक शक्ती आहे असे तो मानत असे. पूर्वी मानव हा त्याच्याजवळ असलेल्या सामान्य ज्ञानाच्या आधारावर म्हणजेच, श्रध्दा विश्वास व प्रचलित ज्ञानावर निसर्गातील घटनांचा गुंता सोडविण्याचा प्रयत्न करत असे. यामधील मर्यादा मानवाच्या लक्षात आल्यानंतर ज्ञानाची प्रगती होण्यासाठी चिकित्सेची, सूक्ष्म विचाराची, विश्वसनीय विचाराची आवश्यकता असते याची मानवाला प्रचिती आली. केवळ विश्वास, श्रध्दा, प्रचलित व्यवहारज्ञान याच्याआधारे ज्ञानाच्या कक्षा रुदावत नाहीत तर त्यासाठी कोणत्याही घटनेची शास्त्रीय चिकित्सा करण्याची गरज असते. घटना घडण्यामागे काही नियम, कारणे असतात याचा जेव्हा मानवाला साक्षात्कार झाला तेव्हा मानवाला वैज्ञानिक प्रगती साधणे शक्य झाले.

शास्त्रीय संशोधनातून ज्ञानाचा शोध घेतल्यास, खऱ्या अर्थाने ते ज्ञान वस्तुनिष्ठ राहील. शास्त्रीय संशोधनाची दोन आवश्यक तत्वे आहेत. यामध्ये पहिले तत्व म्हणजे निरीक्षण होय. निरीक्षणाव्दारे प्रत्यक्ष निरीक्षण करुन आपण विशिष्ट विषयाच्या संदर्भात ज्ञान प्राप्त करु शकतो. आणि दुसरे तत्व म्हणजे कार्यकारण भाव होय. कार्यकारणभावामुळे या तथ्याचा अर्थ, त्यांचा पारस्पारिक संबंध आणि विद्यमान वैज्ञानिक ज्ञानाशी त्याचा संबंध निश्चित केला जातो. शास्त्रीय संशोधनाची ही दोन आवश्यक तत्वे जर सामाजिक तथ्यांच्या संबंधित संशोधनात असतील आणि वैज्ञानिक पध्दतीच्या आधारे हे संशोधन करण्यात आले असेल तर त्यास सामाजिक संशोधन म्हटले जाते. सामाजिक संशोधन ही ज्ञानप्राप्तीची अशी एक पध्दती आहे की, जी निरीक्षण वर्गीकरण, प्रयोग आणि निष्कर्षाच्या सामान्य शास्त्रीय पध्दतीवर आधारित असते आणि या पध्दतीव्दारा अज्ञात सामाजिक घटनांचा शोध घेतला जातो. त्याचप्रमाणे ज्ञात सामाजिक घटनांचे विवेचन आणि विश्लेषण देखील केले जाते. अशा प्रकारे सामाजिक संशोधन ही सामाजिक जीवनाच्या संबंधामध्ये सत्याचा शोध घेणारी एक शास्त्रीय पध्दती आहे.

## २.२ विषय – विवेचन :

या घटकामध्ये आपण विज्ञान आणि सामान्य ज्ञान यातील फरक अभ्यासणार आहोत. यानंतर सामाजिक संशोधनाची ध्येये जाणून घेणार आहोत तसेच सामाजिक संशोधनातील पायऱ्या / टप्पे कोणते आहेत हे अभ्यासणार आहोत.

### २.२.१ सामाजिक विज्ञान नमुना/प्रतिमान (Social Science Paradigm)

समाजशास्त्र हे एक सामाजिक विज्ञान आहे. सामाजिक संशोधन पद्धती मध्ये समाजातील घटनांचे तटस्थ विश्लेषण केले जाते. हे विश्लेषण वस्तुनिष्ठ माहितीच्या आधारे केले जाते. सामाजिक संशोधन हे पूर्णपणे तार्किक माहितीवर अवलंबून असते. सामाजिक संशोधनात वैज्ञानिक पद्धतीने शोध घेतला जातो. म्हणून समाजातील घटणाचे सविस्तर अभ्यास करण्याचे काय सामाजिक संशोधन करते. ''शास्त्राला सत्य शोधून काढण्यासाठी वैज्ञानिक अभ्यास पद्धती इतका दुसरा जवळचा मार्ग नाही.''

सामाजिक वैज्ञानिक किंवा विज्ञान नमुना हा एक दृष्टीकोण आहे. म्हणजेच आपण ज्या नजरेणे समाजातील घटणाचे विवेचन करतो त्याच पद्धतीने तशा घटना दिसतात. उदा. एखाद्या संशोधकाने झोपडपट्टीतील युवकाचे निरीक्षण केले आहे. तटस्थ नजरेने न पाहता वरवरचे पाहून फक्त व्यसनाधीनता, बेकारी, दारिद्र्य यांचे स्पष्टीकरण झोपडपट्टीमुळे ह्या समस्या उत्पन्न होतात. तर हे त्याचे व्यक्तीगत मत झाले. थोडक्यात प्रतिमान / नमुना आपण ज्या नजरेने एखादी घटना पाहतो त्याच पद्धतीने त्याचे विश्लेषण करतो म्हणून नमुना एक दृष्टीकोण आहे.

- **बृहत किंवा दिर्घलक्षी व सूक्ष्मलक्षी सिद्धांत** (Macro and Micro Theory)

अभ्यास विषयाचा व्याप्तीवर व दृष्टिकोणावर (Macro) बृहत व सूक्ष्मलक्षी (Micro) सिद्धांताचे स्वरुप आधारलेले आहे. सामाजिक घडामोडींचा आशय यथार्थ बनविण्याच्या उद्देशातून बृहत व सूक्ष्म सिद्धांत यांचा सर्वत्र सामाजिक शास्त्रात आजकाल अवलंब केला जात आहे.

**बृहत किंवा दिर्घलक्षी सिद्धांत** (Macro Theory)

समाजशास्त्रात बृहत (Macro) सिद्धांताचा पुरस्कार इमाईल डरखीम यांनी केलेला आहे. याच बृहत सिद्धांताला काही समाजशास्त्रज्ञानी समिष्टवादी (Moral Theory) सिद्धांत अशीही संज्ञा वापरलेली आहे. या सिद्धांताचा अभ्यास विषयाकडे पाहण्याचा दृष्टिकोण अत्यंत व्यापक व विशाल स्वरुपाचा असतो. समग्र समाजाचे अध्ययन करुन समग्र समाजाला लागू पडणाऱ्या नियमांची मांडणी या सिद्धांतात केली जाते. परंपरावादी समाजशास्त्रज्ञांचे अभ्यासविषय संपूर्ण समाज व्यवस्थेशी निगडीत असत. मानव समाज, संस्कृती, सामाजिक संस्था इ. सर्वस्पर्शी विषयाबाबतचे सिद्धांत बृहत (Macro) किंवा समिष्टवादी (Moral) सिद्धांतात अंतर्भूत होतात. एखादी व्यक्ती किंवा समाजातील एखादा घटक हा बृहत सिद्धांताचा अभ्यास विषय ठरत नाही. याउलट सामाजिक घडामोडीचा सामाजिक स्तरावर कोणता परिणाम होतो याचे या सिद्धांतात विवेचन केले जाते. संपूर्ण समाज हा बृहत सिद्धांताचा प्रमुख विषय मानला जात असल्याने या सिद्धांताचे स्वरुप व्यापक व सामान्य स्वरुपाचे ठरतात. परस्परावलंबी स्वरुपाच्या घटकांतून घडणाऱ्या घडामोडींचे स्थान अत्यंत जटील असल्याने बृहत सिद्धांत स्थूल स्वरुपाचे असतात. समाजातील लहान लहान घटकांचे अध्ययन करण्याकडे बृहत सिद्धांत भर देत नाहीत. सामान्य समाजशास्त्राचे निष्कर्ष हे बृहत सिद्धांताशी निगडीत असतात. परंतु आधुनिक काळात विशिष्ट समाजशास्त्र या नात्याने जसजसे विकसित पावू लागले तसतसे बृहत सिद्धांताचे स्वरुप कमी होऊ लागले.

टॉलकॉट पारसन्स यांचा सामान्य व्यवस्थेविषयक सिद्धांत (General System Theory) हे बृहत सिद्धांताचे उदाहरण म्हणून सांगता येईल. समाजशास्त्रीय सिद्धांताचा विकास हा बृहत सिद्धांताच्या आधारावर होऊ लागला, असे काही समाजशास्त्रज्ञांचे मत आहे. एखाद्या प्रादेशिक

समाजाच्या सामाजिक जीवन पद्धतीचा बृहत सिद्धांताच्या आधारावर अनेक समाजशास्त्रज्ञांनी विकास केलेला आहे. परंतु या बृहत सिद्धांतास समलक्षी सिद्धांत या संज्ञेने त्यांनी संबोधिलेले आहे.

**सूक्ष्मलक्षी किंवा व्यष्टिवादी सिद्धांत** (Micro Theory or Molecular Theory)

समाजशास्त्रात सूक्ष्मलक्षी सिद्धांताचा पुरस्कार जॉर्ज सिमेल व मॅक्स वेबर यांनी केलेला आहे. लहानातल्या लहान घटकाचे अतिसूक्ष्मपणे अध्ययन करुन ज्या सिद्धांताची निर्मिती केली जाते त्यास सूक्ष्म किंवा व्यष्टिवादी सिद्धांत (Micro Theory or Molecular Theory) अशी संज्ञा वापरली जाते. जरी अध्ययनाचे कार्यक्षेत्र अत्यंत मर्यादित असले तरी सूक्ष्म अध्ययनावर विशेष भर दिला जातो. सामाजिक आंतरक्रियेतील अथवा समाज व्यवस्थेतील अणूचे अध्ययन करुन सूक्ष्म सिद्धांताची निर्मिती केली जाते. एखाद्या घटनेचे अथवा समस्येचे चिकित्सक पद्धतीने अध्ययन करावयाचे झाल्यास सूक्ष्मसिद्धांत उपयोगी पडतात. व्यक्ती अथवा व्यक्तीसमूहाचे वर्तन, प्रवृत्ती, दृष्टिकोण इ. चा सामाजिक जीवन पद्धतीतील प्रभाव पडताळून पहावयाचे झाल्यास सूक्ष्म सिद्धांताचा अवलंब करावा लागतो. समाजशास्त्र हे विशिष्ट शास्त्र म्हणून जसजसे विकसित पावू लागले तसतशा समाजशास्त्राच्या अनेक शाखा उदयास येऊ लागल्या. सामान्य निष्कर्षापेक्षा विशिष्ट निष्कर्षामुळे सामाजिक वास्तवता अधिक स्पष्ट होत असते. संधोधनात्मक अध्ययन तंत्रात अमूलाग्र स्वरुपाचा जसजसा बदल होऊ लागला तसतसे सूक्ष्मलक्षी सिद्धांताची निर्मिती करण्याकडे समाजशास्त्रज्ञांचे लक्ष विशेष आकर्षिक होऊ लागले. सिद्धांताचा नेमकेपणा सूक्ष्मलक्षी अध्ययनात जितका जास्त प्रदर्शित होतो तितका दिर्घलक्षी सिद्धांतात आढळून येत नाही. उदा. उद्योग / कारखाने एक समाज व्यवस्थेचा घटक या नात्याने प्रस्थापित झालेले सिद्धांत हे दिर्घलक्षी किंवा समलक्षी किंवा समष्टिवादी स्वरुपाचे असतात. तर याउलट औद्योगिक व्यवस्थापनातील कामगारांचे वर्तन, त्यांची भूमिका, त्यांच्या मनावर पडलेले तणाव याबाबतचे सिद्धांत सूक्ष्मलक्षी, व्यष्टिवादी स्वरुपाचे असतात. संरचनात्मक कार्यवादी दृष्टिकोणातून विविध सामाजिक संस्थाचा व घडामोडींचा अभ्यास केला जाऊ लागल्याने सूक्ष्मलक्षी सिद्धातांच्या आधारावर समग्र सामाजिक घडामोडींचा वास्तवता जाणून घेणे अत्यंत कठीण जाते. कारण सामाजिक घडामोडीला कारणीभूत असणाऱ्या अनेक घटकांपैकी एक घटक वेगळा करुन त्याचे विशेष व सर्वसाकल्याने अभ्यास करावयाचा झाल्यास सूक्ष्मलक्षी सिद्धांत निरुपयोगी ठरतो.

जॉर्ज होमान्स यांचा विनिमय सिद्धांत (Exchange Theory) हे सूक्ष्मलक्षी सिद्धांताचे उदाहरण देता येईल.

रॉबर्ट मर्टन यांनी Social Theory and Social Structure या ग्रंथात बृहत (Macro) व सूक्ष्मलक्षी (Micro) सिद्धांतात समन्वय साधणारा मध्यस्तरीय सिद्धांत (Middle Range Theory) मांडला. मध्यस्तरीय सिद्धांताचा अधिक वापर अनुभवाधिष्ठित संशोधनात्मक अध्ययनात होऊ

शकतो. एका बाजूला विशिष्ट स्तरावरील समाजिक वर्तन, सामाजिक संघटन व सामाजिक परिवर्तन इ. संबंधित घटकांबद्दल सिद्धांत मांडण्याचा व दुसऱ्या बाजूला असामान्यीकृत घटनांचे क्रमवार विवेचन करण्याचा प्रयत्न मध्यस्तरीय सिद्धांतात केला जातो. साध्या संकल्पनेतून विशिष्ट संकल्पना अथवा सिद्धांत मांडण्याच्या प्रक्रियेत अनुभवाधिष्ठित निरिक्षणास प्राधान्य दिले जाते.

**बृहत सिद्धांत** (Macro Theory) **व सूक्ष्मलक्षी सिद्धांत** (Micro Theory) **यातील फरक**

| | **बृहत सिद्धांत** Macro Theory) | **सूक्ष्म सिद्धांत** (Micro Theory) |
|---|---|---|
| १ | या सिद्धांताची व्याप्ती विशाल असते. | या सिद्धांताची व्याप्ती मर्यादित असते. |
| २ | याचे अध्ययन क्षेत्र व्यापक असते. | याचे अध्ययन क्षेत्र लहान असते. |
| ३ | या सिद्धांताचे स्वरुप सामान्य (General) असते. | या सिद्धांताचे स्वरुप विशिष्ठ (Specific) असते. |
| ४ | विशाल समाज हे या सिद्धांताचे अध्ययन क्षेत्र असते. | समाजातील लहानातला लहान घटक किंवा अणू हे या सिद्धांताचे अध्ययन क्षेत्र असते. |
| ५ | हा सिद्धांत समाजरचनेवर भर देत नाही. | हा सिद्धांत समाजरचनेवर व आंतरिक संबधावर भर देतो. |
| ६ | सामान्य शास्त्रीय पद्धतीचा पुरस्कार या सिद्धांतात केला जातो. | चिकित्सक शास्त्रीय अध्ययन पद्धतीचा पुरस्कार या सिद्धांतात केला जातो. |
| ७ | या सिद्धांतामुळे संपूर्ण समाज व्यवस्थेचे विश्लेषण करतो येते. | या सिद्धांतामुळे एखाद्या घटनेची शास्त्रीय मीमांसा करता येते. |
| ८ | या सिद्धांतात पूर्वकथांची क्षमता अत्यंत कमी असते. | या सिद्धांतात पूर्व कथनाची क्षमता सर्वाधिक असते. |
| ९ | इमाईल डरखीम यांनी या सिद्धांताचा पुरस्कार केला. | जॉर्ज सिमेल व मॅक्सवेबर यांनी या सिद्धांताचा पुरस्कार केला. |
| १० | उदा. पार्सन्सचा सामान्य समाज व्यवस्थेविषयकचा सिद्धांत. | उदा. जॉर्ज होमान्सचा सामाजिक विनिमय सिद्धांत. |
| ११ | उदा. कारखाना हे समाज व्यवस्थेचे अंग म्हणून या सिद्धांताद्वारे अध्ययन केले जाते. | उदा. कारखान्यातील कामगांराच्या वर्तनाचे, महत्वकाक्षेचे, त्याच्या मनावर पडलेल्या तणावांचे सूक्ष्म अध्ययन या सिद्धांताद्वारे केले जाते. |

**प्रारंभिक विज्ञानवाद / प्रत्यक्षवाद** Early Positivism

ऑगस्त कॉम्तने जे अनेक समाजशास्त्रीय विचार मांडले त्यामध्ये त्याची विज्ञानवाद अथवा प्रत्यक्षवाद ही संकल्पना सर्वात महत्वाची विचारसरणी समजली जाते. कॉम्तने या विचारसरणीकडे मानवी बौद्धिक विकासातील शेवटची अवस्था म्हणून पाहिले.

समाजशास्त्रीय विचारांना समाजशास्त्रीय विचारांना वैज्ञानिक स्वरुप प्राप्त करून देण्यामध्ये अनेक विचारवंतांचा हातभार लागला त्यामध्ये ऑगस्त कॉम्त या फ्रेंच विचारवंतांचे योगदान फार महत्वाचे आहे. कॉम्तने प्रथम Sociology हा शब्द प्रयोग अस्तित्वात आणला. त्यामुळे त्याला समाजशास्त्राचा जनक (Father of Sociology) असे संबोधले जाते. कॉम्तने इ.स. १९३९ मध्ये एक सामजिक विज्ञान म्हणून समाजशास्त्राची निर्मिती केली. इंग्रजी मधील Sociology हा शब्द लॅटीन भाषेतील Socius आणि ग्रीक भाषेतील Logos या दोन शब्दापासून तयार झाला. Sociology या शब्दाचा अर्थ 'समाज' आणि Logos या शब्दाचा अर्थ 'शास्त्र' अथवा विज्ञान असा आढळतो. यावरुन समाजाचा सर्वाणपूर्ण अभ्यास करणारे जे शास्त्र ते समाजशास्त्र होय अशी धारणा कॉम्तने स्पष्ट केली.

**ग्रंथसंपदा**

१) कॉम्तने १८२२ "A plan for scientific world necessary to re-organize society" मध्ये हे आपले पहिले पुस्तक प्रसिद्ध केले.

२) १८२६ मध्ये "Consideration on spiritual power" हे पुस्तक प्रसिद्ध केले.

३) १८३० मध्ये "Course of positive philosophy" या महत्वपूर्ण ग्रंथाच्या लिखाणास सुरुवात केली. या पुस्तकाचे एकूण सहा खंड असून प्रथम खंड हा १८३० मध्ये प्रसिद्ध झाला तर सहावा खंड १८४२ मध्ये प्रसिद्ध झाला.

४) १८५२ मध्ये "The catechism of positive Religion" हा कॉम्तचा शेवटचा ग्रंथ प्रसिद्ध झाला.

वरील ग्रंथाशिवाय १८४४ मध्ये Positive Society ची स्थापना केली.

**समाजशास्त्र एक नवीन विज्ञान (समाजशास्त्र – एक संकल्पना)** (Concept of Sociology)

कॉम्तने जे विविध समाजशास्त्रीय विचार प्रतिपादन केले त्यामध्ये समाजशास्त्र एक नवीन विज्ञान हा अतिशय महत्वपूर्ण विचार मानला जातो. ''समाजशास्त्र हे सामाजिक व्यवस्था व प्रगती यांचे शास्त्र आहे.'' Sociology is a science of social order and progress असे प्रतिपादन केले. १८

व्या शतकापर्यंत समाजाविषयी मांडले जाणारे विचार काल्पनिक तसेच धर्माच्या आधारे मांडले जात असत. कॉम्त हा विज्ञानवादी असल्याने त्याला वरील विचारसरणी मान्य नव्हती. त्याच्यामते, समाजाचा वस्तुनिष्ठ व सर्वागपूर्ण अभ्यास करावयाचा असेल तर तो काल्पनिक दृष्टिकोणातून न करता वैज्ञानिक पद्धतीने करावा. समाजशास्त्र हे एक सामान्य सामाजिक शास्त्र (General Social Science) अथवा एक नवीन विज्ञान असल्याने अशा अभ्यासामध्ये वैज्ञानिक पद्धतीचा वापर करुन निष्कर्ष काढणे आवश्यक आहे.

**ऑगस्त कॉम्तचा विज्ञानवाद किंवा प्रत्यक्षवाद** (Comte's Positivism)

ऑगस्त कॉम्तने जे अनेक समाजशास्त्रीय विचार मांडले त्यामध्ये त्याची विज्ञानवाद अथवा प्रत्यक्षवाद ही संकल्पना सर्वात महत्वाची मानली जाते. कॉम्तने या विचारसरणीकडे 'मानवी बौद्धिक विकासातील शेवटची अवस्था' म्हणून पाहिले. याचा अर्थ विज्ञानवादाला शास्त्रीय दृष्टिकोण असेही संबोधले जाते. कॉम्तने विज्ञानाबद्दलचे आपले मत पुढीलप्रमाणे व्यक्त केले. त्याच्यामते, ''जगातील सर्व घडामोडी नैसर्गिक नियमानुसार घडून येत असतात. त्यामुळे हे नियम समजावून घेताना काल्पनिक अथवा तात्विक विचारांचा उपयोग होत नाही तर त्यासाठी वैज्ञानिक पद्धतीचा अवलंब केला पाहिजे. जागतिक घटना अथवा घडामोडीकडे पाहण्याचा हा दृष्टिकोण आणि त्यातून मिळणारे ज्ञान यालाच विज्ञानवाद म्हणावे'' असे प्रतिपादन केले.

**कॉम्तचा विज्ञानवादाची (प्रत्यक्षवाद) वैशिष्टे** (Characteristics of Comte's Positivism)

कॉम्तचा विज्ञानवाद हा धार्मिक विचारापासून वेगळा असून तो अधिक यथार्थ व वास्तववादी असल्याने त्याची ठळक वैशिष्टे पुढीलप्रमाणे-

१) विज्ञानवादामध्ये घटनांचा कार्यकारणसंबंध जाणून घेण्याचा प्रयत्न केला जातो.

२) अनुभवनिष्ठता हे विज्ञानवादाचे प्रमुख अंग असल्याने सामाजिक घटनांच्या अभ्यासासाठी आपणास निरिक्षण, परिक्षण, वर्गीकरण, सैद्धांतिकता इ. चा अवलंब करणे गरजेचे ठरते.

३) विज्ञानवादामध्ये धार्मिक व तात्विक विचारांना महत्व न देता भूतकालीन अनुभवाच्या आधारे वर्तमानकालीन घटनांचे विश्लेषण केले जात असल्याने त्याचा विज्ञानवाद आदर्शवादाशी संबंधित नसून तो वास्तवतेशी निगडीत असल्याने दिसून येते.

४) आधुनिक जगामध्ये विज्ञानवादाला विरोध केला जात नसल्याने तो सर्वसमावेशक समजला जातो.

५) विज्ञानवादामध्ये कल्पनावादाला स्थान नाही.

६) विज्ञानवादामध्ये सत्य एक आहे.

७) व्यक्तिनिष्ठतेपेक्षा वस्तूनिष्ठतेला प्राधान्य देते.

८) ज्याप्रमाणे सामाजिक घटना, कोणाच्याही इच्छा अपेक्षेनुसार घडत नाहीत तर त्या नैसर्गिक बदलाप्रमाणे स्वाभाविक असतात. त्याप्रमाणे विज्ञानवाद कोणत्याही अमर्याद अथवा अर्निबंध विचाराचा स्वीकार करीत नाही.

९) विज्ञानवाद हा अनावश्यक ज्ञानाशी संबंध ठेवत नाही, म्हणजेच अनावश्यक ज्ञान वैज्ञानिक मार्गाने मिळवण्याशी तो निगडीत आहे.

१०) सामाजिक पुनःरचनेचे एक प्रभावी साधन म्हणून विज्ञानवाद अतिशय उपयुक्ततावादी मानला जातो.

कॉम्तच्या विज्ञानवादाच्या वरील वैशिष्ट्यावरुन असे स्पष्ट होते की, विज्ञानवादाने सामाजिक संशोधनासाठी मानवी विचारांना धार्मिक व तात्विक अवश्यांपासून बाजूला करून वैज्ञानिक स्तरावर आणण्याचा प्रयत्न केला. बौद्धिक विकासाशिवाय सामाजिक प्रगती अशक्य असते. मात्र त्यासाठी घटनांचे वास्तव किंवा प्रत्यक्ष ज्ञान असणे गरजेचे असते.

**कॉम्तचा विज्ञानवाद आणि सामाजिक पुनर्रचना** (Positivistic Plan of Social Reconstruction)

फ्रेंच राज्यक्रांती होऊन गेल्यावर औद्योगिक क्रांतीचे विविध परिणाम दिसू लागले. प्रचलित समाजव्यवस्था विस्कळीत होऊन नवीन समाजव्यवस्थेचा उदय होऊ लागला होता. सरंजामशाहीची जागा भांडवलशाही व्यवस्थेने घेतली. भांडवलदारांशी कामगारांची पिळवणूक करून संपत्तीचे केंद्रीकरण करण्यास सुरूवात केली. भांडवलशाही व्यवस्थेमधील ही फार चिंतेची बाब होती. अशावेळी समाजात मूलभूत बदल झाले पाहिजेत या दृष्टिने कॉम्तच्या समाजाच्या पुर्नरचनेची योजना तयार केली.

विज्ञानवाद आणि सामाजिक पुर्नरचना यासंदर्भात कॉम्तने असे विचार मांडले आहेत की, समाजात नवीन औद्योगिक मूल्यांचा स्वीकार करावयाचा असेल तर त्यासाठी व्यक्तीच्या नितिमत्तेत बदल होण आवश्यक आहे. उदा. भांडवलदारांनी आपल्या हातामध्ये असणारी संपत्ती ही केवळ स्वतःच्या मालकीची आहे असे न मानता ती पूर्णपणे समाजाची आहे. तसेच तिचा विनियोग समाजाच्या कल्याणासाठी केला पाहिजे याची जाणीव ठेवून वर्तन केले तर भांडवलशाहीतील दोष दूर होतील व एक नवीन समाज निर्माण होईल.

**विज्ञानवाद एक धर्म** (Positivism as a Religion)

ऑगस्त कॉम्तच्या मते, विज्ञानवादातून जे ज्ञान मिळते ते वास्तव असते. अशा ज्ञानाच्या आधारे संपूर्ण मानवता एकत्र आणणे शक्य होते. विज्ञानवाद (प्रत्यक्षवाद) हे केवळ एक विज्ञान नाही तर ते मानवतेचा एक धर्म आहे.

विज्ञानवाद एक धर्म म्हणून विवेचन करताना, कॉम्तने विज्ञानवादाचे खालीलप्रकारे विभाजन केले आहे.

अ) वैज्ञानिक तत्वज्ञान

ब) वैज्ञानिक धर्म व नितीशास्त्र

क) प्रत्यक्ष राजकारण

**अ) वैज्ञानिक तत्वज्ञान** (Philosophy of the science)

समाजातील प्रत्येक मनुष्याचा आपल्या प्रयत्नावर दृढ विश्वास असला पाहिजे. त्याने आपला सर्वागिण विकास साधण्यासाठी स्वतःचे प्रयत्न महत्वाचे मानले पाहिजेत. त्याच्या वैज्ञानिक तत्वज्ञानाचे असे सांगितले की, मानवाने स्वतःची प्रगती स्व-बळातून घडवून आणावी. गणित, खगोलशास्त्र, पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र, सामाजशास्त्र, नितीशास्त्र यासारख्या विज्ञानवादी तत्वज्ञानातून ते शक्य आहे असे कॉम्तला वाटते.

**ब) वैज्ञानिक धर्म व नितिशास्त्र** (Scientific Religion and Ethics)

स्वतःचे सामर्थ्य इतरांच्या कल्याणासाठी वापरावे अथवा 'दुसऱ्यासाठी जगा' असे विज्ञानवादाचे नितिशास्त्र आहे. कॉम्तच्या मते धर्माचा संबंध प्रत्यक्षपणे कोणत्याही अलौकिक शक्तीशी असत नाही तर विज्ञानवाद हा स्वतःच आधुनिक समाजाचा धर्म आहे.

**क) प्रत्यक्ष राजकारण** (Positive Politics)

कॉम्तच्या मते, वैज्ञानिक अवस्थेतील समाजात राजकारण हे युद्ध टाळण्यासाठी असावे. तसेच युरोपियन देशांसाठी एक राष्ट्रकूल स्थापन करण्यासाठी प्रयत्न केले जावेत.

'विज्ञान आणि धर्म' यांच्या नैतिक एकत्रिकरणातून मानव जातीचे भले आहे यावर त्याचा दृढ विश्वास होता. मानवजातीच्या कल्याणासाठी धर्म व विज्ञान यांचे सामजस्य अधिक गरजेचे असते.

**तीन अवस्थाचा नियम** (Law of Three Stages)

फ्रेंच विचारवंत ऑगस्त कॉम्त यांनी १८२२ मध्ये 'तीन अवस्थांचा नियम अथवा' 'मानवी बौद्धिक विकासाच्या अवस्था' हा महत्वपूर्ण नियम प्रतिपादन केला. त्या तीन अवस्था म्हणजे-

१) काल्पनिक किंवा धर्मशास्त्रीय अवस्था

२) आध्यात्मिक किंवा तात्विक अवस्था

३) वैज्ञानिक किंवा प्रत्यक्ष अवस्था

१) **काल्पनिक किंवा धर्मशास्त्रीय अवस्था** (Theological or Theological  Stage)

धर्मशास्त्रीय अवस्था म्हणून या अवस्थेचा उल्लेख केला जातो. या प्रथम अवस्थेत व्यक्ती प्रत्येक गोष्टीचा विचार अलौकिक शक्तीच्या संदर्भात म्हणजेच ईश्वर प्रणीत शक्तीशी करीत असते. अशा विचारानंतर मानवप्राणी इतर विश्वातील प्राण्यांपेक्षा वेगळा बनला. या अवस्थेत मानव निसर्गात घडणाऱ्या उदा. पाऊस, वारा, वादळ, दुष्काळ यासारख्या घटनांची कारणे स्वतःच्या बुद्धिनुसार स्पष्ट करतो. हे सर्व दैवी शक्तीमुळे घडतात असे मानले जाऊ लागले. याचाच अर्थ विश्वातील प्रत्येक घटना व हालचाल ईश्वरप्रणीत असते असे मानले गेले.

२) **अध्यात्मिक किंवा तात्विक अवस्था** (Metaphysical Stage)

कॉम्तने मानवी विचारांच्या उत्क्रांतीमधील ही दुसरी महत्वाची अवस्था पुढीलप्रमाणे स्पष्ट केली. त्याच्यामते, कोणत्याही घटनेमागे ईश्वरी संकेत असतो हे खरे नाही तर अमूर्त अशा शक्तीचे अस्तित्व मात्र असते. अशा अमूर्त शक्तीमूळेच विश्वामध्ये अनेक प्रकारच्या घडामोडी घडून येतात. अध्यात्मिक अवस्थेत मानवाने 'परमेश्वर' ही संकल्पना महत्वाची न मानता त्याऐवजी एक 'अमूर्त शक्ती' संकल्पना ग्राह्य मानली. त्यावरून मानवी विचारांचा अथवा मानवी बौद्धिक प्रगतीचा विकास अमूर्त शक्तीमुळेच झाला हेच कॉम्तला सूचित करावयाचे आहे. थोडक्यात, काल्पनिक अवस्थेत, मानवाने ईश्वराचा शोध लावला तर अध्यात्मिक अथवा तात्विक अवस्थेमध्ये ईश्वर न मानता एका अमूर्त किंवा गूढ शक्तीला ईश्वराच्या जागी मानले.

३) **वैज्ञानिक अथवा प्रत्यक्ष अवस्था** (Scientific or Positivistic Stage)

कॉम्तच्या मते, मानवी विचारांची आधूनिक अवस्था म्हणून वैज्ञानिक किंवा प्रत्यक्ष अवस्थेकडे पाहिले जाते. या अवस्थेत कार्यकारण संबंधाना अधिक महत्व असून समाजात घडणाऱ्या घटनांनी कारणे शोधण्यापेक्षा नियम शोधण्यावर अधिक भर देण्यात आला. त्यासाठी घटनांचे निरिक्षण, परिक्षण, विश्लेषण आणि तथ्यांच्या आधारे सामान्यीकरण करून नियम मांडले जाऊ लागले. थोडक्यात या अवस्थेत जे वास्तव अथवा प्रत्यक्षात आहे त्याचाच विचार होत असल्याने मानवी बुद्धिमतेच्या विकासातील ही अखेरचीच अवस्था समजली जाते.

**सामाजिक डार्विनवाद** (Social Darvinism)

डार्विनला जैव विकासवादाचा जनक मानले जाते. डार्विनच्या सिद्धांताला नैसर्गिक वर्णवाद असे ही मानले जाते. डार्विनने त्याचा सिद्धांत १८५९ मध्ये त्याच्या Origine of Species  या ग्रंथात मांडला. एकंदरीत डार्विनवाद सजीवाच्या अस्तित्वाचा संघर्ष Strugle for Existence दिसतो.

**सजीवामध्ये प्रजोत्पादनाची क्षमता** (Reproduction Capabilities among organism)

प्रत्येक सजीवामध्ये स्वतःचे अस्तित्व टिकवण्यासाठी प्रजोत्पादनाची भरपूर क्षमता असते. या प्रजोत्पादनात प्रत्येक सजीवाची प्रजोत्पादनाची मर्यादा ठरलेली असते. त्यामुळे पृथ्वीवर त्याचे अस्तित्व संतुलीत राहते. काही सजीव वयस्कर होईपर्यंत नष्ट होतात. जर प्रजोत्पादनाला मर्यादा नसती तर पृथ्वीवर अतिरिक्त सजीवाची संख्या झाली असती.

**जीवन संघर्ष** (Life Strugle)

सर्व सजीव स्वतःच्या अस्तित्वासाठी संघर्ष करत असतात. अन्न, वस्त्र, निवारा याचा समावेश होतो त्याच बरोबर योग्य वातावरण याचेहि समावेश होत असतो. सजीवाच्या अस्तित्वाच्या संघर्षात काही जीव आपले आस्तित्व टिकवतात तर काही नष्ट होतात. कारण सृष्टी मध्ये दोन जीव समान आसत नाहीत त्याच्येमध्ये असामान्यता असू शकते. अशा विभिन्न जीवाच्या एकत्रीकरणातून संघर्ष होणे स्वाभाविक असते. म्हणून स्पेन्सर Survival of the Fittest म्हणतात.

**विभिन्नता आणि वंश** (Raceand Varieties)

डार्विनच्या मते जुळे सोडून एकाच जोडी पासून उत्पन्न प्रजातीचे सदस्य समान नसतात. त्यांच्यात भिन्नता आवस्थ असते. ही भिन्नता लाभकारी, बेकार किंवा हानिकारक असू शकते. लाभकारी सजीव जीवन संघर्षात यशस्वी होतात. लाभदायक विभिन्न प्रजातीमध्ये वांशिक सकारात्मक गुण येऊ शकतात.

**योग्य जबाबदारी किंवा नैसर्गिक निवड** (Survival of the fittest and natural selection)

काही जीव यशस्वी जीवन व्यतीत करतात. त्याच बरोबर स्वतःचे वंश सातत्य टिकवतात ते योग्य आहेत. असे डार्विन म्हणतो. डार्विन अशा योगय जीवाची निवड करतात.

**वातावरणात सातत्याने परिवर्तन (**Everchanging Environment)

सजीव नेहमी वातावरणात प्रभावी राहतात. कारण सजीवात असणारी भिन्नता होय. वातावरणामुळे सजीव त्या त्या परिस्थितीमध्ये अनुकूलन करत असतात. जे वातावरणाशी समायोजन करत नाहीत ते सजीव नष्ट होतात.

**नव्या सजीवाची निर्मिती** (Creation of New Organism)

सजीवाच्या सर्वजाती नैसर्गिकरित्या उत्पन्न झाल्या आहेत. कोणत्याही जीव जातीमध्ये पीढी दर पीढी परिवर्तन होत असते हे परिवर्तन त्यांच्या पूर्वजापेक्षा भिन्न असू शकते असे डार्विन म्हणतो. एक

वेळ अशी येते जेव्हा तो सजीव पूर्वजापासून आसमान होतो. अशा सजीव पून्हा नव्या सजीवाचे स्थान प्राप्त करतो.

**थोडक्यात**- डार्विनवाद जैव विकासातला प्रसिद्ध सिद्धांत आहे या सिद्धांता नुसार प्रत्येकाला किंवा प्रत्येक सजीवाला आपल्या आस्तित्वासाठी संघर्ष करावा लागतो. त्याच बरोबर एक सजीव दुसऱ्या सजीवाशी भिन्न असतो. भिन्नतेच्या संघर्षात कमजोर नष्ट होतात. तर सक्षम यशस्वी होतात. गुणवत्ता हि पीढी दर पीढी एका समुहातून किंवा एक सजीवातून दुसऱ्या सजीवात मार्ग क्रमन करीत असते. एखादी पीढी त्याच्या पूर्वजापेक्षा ही भिन्न असू शकते वातावरणानुसार सजीवामध्ये अनुकूलनाची प्रक्रिया सुरू असते. सजीवाच्या भिन्नतेमुळे परस्पर संघर्षातून नवी पीढी जन्मास येते.

**संघर्ष प्रतिमान (नमुना) (**Critical Research Paradigm)

औद्योगिक क्रांतीने समाजात भांडवलदारी उत्पादन पद्धतीचा पाया घातला. या पद्धतीने श्रमिक व धनिक असे दोन वर्ग उदयास आले. धनिक वर्गाकडून श्रमिकांचे अधिक प्रमाणात आर्थिक शोषण केले जावू लागले. अर्थातच, भांडवलशाहीमुळे समाजात अन्यायकारक वातावरण निर्माण झाले. अशा या भांडवलशाही विरुद्ध ज्या अनेक विचारवंतांनी संघटित आवाज उठविला त्यामध्ये जर्मन विचारवंत कार्ल मार्क्सचा अग्रक्रम लागतो व त्यांच्याच विचारधारेच्या अभ्यासकांनी फ्रॅंकफर्ट स्कूल (जर्मन) मध्ये Critical Paradigm हे संशोधनातील नवा तत्त्वज्ञानात्मक दृष्टीकोन विकसीत केला.

संघर्ष चिकित्सक (टिकात्मक) प्रतिमान - हा फ्रॅंकफर्ट स्कूल (संप्रदाय) मधून सुरवात - प्रेरणा - कार्लमार्क्स

संघर्ष चिकित्सक प्रतिमान - हा मिक्स्ड मेथडॉलॉजीचा पुरस्कार करते. (गुणात्मक पद्धत व संख्यात्मक पद्धत यांचा मेळ घालून)

व्यवस्थेच्या विरोधातील व वंचितांची बाजू घेवून संशोधनाचे कार्य करते.

**कार्ल माक्सची ग्रंथसंपदा**

१) १८४१ मध्ये "On the difference between the Natural Philosophy of Deonocritus and Epicurus" हा Ph.d चा प्रबंध लिहला.

२) १८४५ मध्ये मार्क्स व एंजल्स यांच्या संयुक्त प्रयत्नातून 'Holy Family' हा ग्रंथ प्रकाशित झाला.

३) १८४८ मध्ये एंजल्सच्या सहाय्याने 'Communitst Menifesto' (साम्यवादी जाहिरनामा) प्रसिद्ध केला.

४) १८४७ मध्ये "The Poverty of Philosophy" हा ग्रंथ लिहिला.

५) १८५९ मध्ये "A Critique of Political Economy" हा ग्रंथ लिहिला.

६) १८६७ मध्ये 'दास कॅपिटल' (Das Capitas) या ग्रंथाचा पहिला खंड प्रकाशित झाला.

७) १८७५ मध्ये "The Critique of Gotha Programme" हा मार्क्सचा समीक्षणवजा ग्रंथ प्रकाशित झाला.

८) Economic and Philosophical Manuscripts, The German idealogy हे ग्रंथ मार्क्सच्या मृत्यूनंतर प्रकाशित करण्यात आले.

**मार्क्सचा वर्गसंघर्ष सिद्धांत** (Class Conflict Theory of Marx)

कार्ल मार्क्सचा वर्गसंघर्षाचा सिद्धांत म्हणजे त्याच्या अविश्रांत परिश्रमाचा दाखला आहे. मार्क्सचा वर्गसंघर्ष सिद्धांत हा उत्पादन पद्धतीशी अथवा व्यवस्थेशी निगडीत असून फ्रान्सची राज्यक्रांती आणि वर्गसंघर्ष यांचा संबंध जोडून त्याने आपली वर्गसंघर्षाची भूमिका स्पष्ट केली. मानवी इतिहास हा संघर्षरुपी आहे. आर्थिक कारणानुसार मानव समाजात मालक गुलाम, सरंजामदार, शेतमजूर आणि भांडवलदार कामगार हे प्रत्येक वर्ग एकमेकांविरुद्ध संघर्षाची भूमिका स्विकारतात. या प्रत्येक वर्गात नेहमी संघर्ष असतो. आधुनिक समाजात संपत्तीच्या जोरावर वर्गरचना आधारित असते. यातून धनिक व श्रमिक असे दोन वर्ग निर्माण झाले. यालाच मार्क्सने भांडवलदार व कामगार असे नाव दिले. यातील भांडवलदार वर्गाच्या हातामध्ये संपूर्ण उत्पादनाची साधने केंद्रित झालेली असतात. त्यामुळे हा वर्ग दुसऱ्या वर्गाचे आर्थिक शोषण करण्याचा प्रयत्न करतो. दुसरा वर्ग म्हणजे कामगार वर्ग हा वर्ग प्रत्यक्षात वस्तूंचे उत्पादन करीत असतो. परंतु, त्याची उत्पादित मालावर मालकी नसते. श्रम हाच केवळ त्याचा अधिकार असतो. याचा गंभीर परिणाम म्हणजे या शोषित वर्गामध्ये असंतोष निर्माण होऊन तोच पुढे वर्गसंघर्षाच्या रुपाने प्रकट होतो. अशा या वर्ग संघर्षात धनाच्या रुपाने भांडवल हेच श्रमिकांचे शोषण करते आणि शोषणामुळेच वर्गसंघर्षामध्ये वाढ होते.

मार्क्सच्या मते, भांडवलशाही समाजात उत्पादन आणि वितरणात एक प्रकारची 'बळी तो कान पिळी' अशी मक्तेदारी निर्माण होते. यातूनच वर्ग जाणीव (Class Consciousness) उदयास येते. अधिकाधिक मजूर अथवा कामगार एकत्र येतात आणि आपल्यावर जाणीवपूर्वक केल्या जाणाऱ्या अन्यायाविरुद्ध लढा देण्यास सज्ज होतात. भांडवलशाही व्यवस्थाच अशा वर्गसंघर्षाच्या निर्मितीचे आणि स्वतःच्या विनाशाचे साधन असते. शेवटी या वर्गसंघर्षाची परिणिती क्रांतिकारी परिवर्तनात होत असते. मार्क्सला परिवर्तनासाठी क्रांतीच आवश्यक वाटते. अशा क्रांतीमधून शोषक वर्गाचा विनाश होतो आणि शोषित वर्गाची हुकुमशाही प्रस्थापित होते. जोपर्यंत भांडवलशाही समाजव्यवस्था अस्तित्वात राहिल तोपर्यंत वर्गसंघर्ष राहणारच.

**मार्क्सच्या वर्गसंघर्षातील महत्वपूर्ण बाबी:**

१) **कामगार वर्गाचा उदय** (Emergence of Workers Class)

भांडवलशाहीत अनेक व्यक्तीना एका ठिकाणी कामगार म्हणून काम करावे लागते. त्यामुळे त्यांना परस्परांच्या परिस्थितीची जाणीव होते. त्यांच्यात एकोपा आणि संघटितपणाची भावना निर्माण होते. यातूनच कामगारांच्या मनात वर्ग-जाणीव निर्माण होऊन भांडवलशाही विरुद्ध संघर्ष करण्याची भावना वाढत जाते.

२) **संपत्तीचे महत्व** (Importance of Capital)

भांडवलशाही समाजव्यवस्थेत व्यक्तीचे वर्तन हे तिच्या संपत्तीशी असलेल्या संबंधावरुन ठरते. त्यामुळे व्यक्ती कोणता व्यवसाय करते ही बाब महत्वाची नसून उत्पादन साधनांच्या संदर्भातील तिचे स्थान महत्वाचे असते. वर्ग जाणीवेची वाढ आणि उत्पादन सांधन मालकी यातील विषमता यामुळे भांडवलदार व कामगार यांच्यात संघर्ष निर्माण होतात.

३) **दारिद्र्यात वाढ** (Increase poverty)

भांडवलशाही समाजव्यवस्थेत भांडवलदाराकडून कामगारांची जी आर्थिक पिळवणूक केली जाते, त्यामुळे त्यांच्या दारिद्र्यात सतत वाढ होत जाते.

४) **दुरावा किंवा अलगता** (Alinatior or Estrangment)

आर्थिक पिळवणूक आणि कामाच्या ठिकाणची अयोग्य परिस्थिती इ. मुळे कामगाराला त्याचे काम, निर्माण होणाऱ्या वस्तू आणि त्यांचे सहकारी याविषयी वाटणारी आपूलकी कमी होते. त्यांना एकूणच उत्पादन प्रक्रियेविषयी आत्मियता वाटत नाही. याउलट कामाची जागा, त्यांचे सहकारी आणि समाज यांच्याविषयी दुरावा अथवा अलगतेची भावना वाढत जाते.

५) **आर्थिक व राजकीय सत्ता आणि अधिकार यांचे केंद्रीकरण** (Centralization of economic athority and right)

ज्यांच्या हातात आर्थिक सत्ता असते त्यांना राजकीय सत्ता मिळविणे अवघड नसते. भांडवलदारांकडून राजकीय सत्तेचा वापर स्वतःचे हितसंबंध सुरक्षित ठेवणे, कामगार वर्गावर सत्ता गाजविणे अथवा त्यांची पिळवणूक करणे यासाठी केला जातो. भांडवलशाहीत केवळ भांडवलदार वर्गाकडेच आर्थिक व राजकीय सत्ता आणि अधिकार यांचे केंद्रीकरण झालेले असते. अशा अधिकार व सत्तेपासून कामगार वर्ग वंचित होतो. परिणामतः कामगार वर्गामध्ये भांडवलदार वर्गाविरुद्ध वर्गसंघर्ष भावना वाढीस लागते.

**६) क्रांती** (Revolution)

मार्क्सच्या मते, आधुनिक उत्पादन प्रक्रियेत भांडवलदार आणि कामगार यांच्यामध्ये वारंवार उद्भवणाऱ्या संघर्षाची परिणती ही शेवटी क्रांतीत होते. त्यामुळे भांडवलशाही रचना नष्ट होते.

**७) साम्यवादाचा उदय** (Rise of Communilaism)

मार्क्सच्या मते, जेव्हा उत्पादन प्रक्रियेत कामगारांची सत्ता प्रस्थापित होईल तेव्हा मालमत्ता ही समाजाच्या मालकीची होईल. संपत्तीच्या खाजगी मालकी हक्कातील विषमतेमुळे निर्माण होणारी वर्गव्यवस्था नष्ट होईल आणि वर्गहीन अथवा संघर्षरहित समाज उदयास येईल. यालाच मार्क्सने समाजवाद असे नाव दिले.

**मार्क्सच्या वर्गसंघर्ष सिद्धांताचे मूल्यमापन** (Evaluation of Marxian Theory of Class Conflict)

कार्ल मार्क्सने आपला जो उत्पादन प्रक्रियेशी निगडीत वर्गसंघर्ष सिद्धांत मांडला त्याचे सखोल विवेचन केल्यानंतर असे निदर्शनास येते की, त्याचा हा सिद्धांत स्तरीकरणाचा सिद्धांत नसून तो सामाजिक परिवर्तनाचा एक व्यापक सिद्धांत आहे. तसेच हा सिद्धांत म्हणजे समग्र परिवर्तनाचे एक साधन आहे. मार्क्सचा वर्गसंघर्ष सिद्धांत हा वस्तुस्थिती निदर्शक होता.

अतिप्रचीन समाजापासून ते आजच्या आधुनिक युगापर्यंत असे दिसून येते की, समाजात दोन परस्परविरोधी वर्ग अस्तित्वात असतात. यातील एका वर्गाकडे पैसा, सत्ता अथवा मालमत्तेचा मालकी हक्क असतो. तर दुसरा वर्ग या सर्वापासून वंचित असतो. पहिला वर्ग (भांडवलदार) दुसऱ्या वर्गाचे (कामगार) शोषण करतो. जेव्हा शोषण क्रियेचा अतिरेक होतो तेव्हा श्रमिक वर्ग धनिक वर्गाविरुद्ध क्रांती निशाण उभारतो. ही क्रांती म्हणजेच वर्गसंघर्ष होय. जेव्हा समाजातून धनिक वर्ग नाहिसा होतो तेव्हा वर्गविरहित अथवा संघर्षरहित समाज उदयास येतो. अशा समाजाला मार्क्सने साम्यवाद हे नाव दिले.

**२.२.२ प्रतिकात्मक किंवा सांकेतिक आंतरक्रियावाद** (Symbolic Interactionalism)

अनेकवादी वर्तन संप्रदायव सामाजिक क्रियावादी संप्रदाय या दोन मानसशास्त्रीय मूल्यावर आधारलेल्या संप्रदायाच्या व्यतिरिक्त प्रतिकात्मक किंवा सांकेतिक आंतरक्रियावादी विचारवंतांनी मानवी वर्तन व्यवहाराचे, सामाजिक संबंधाचे व सामाजिक जीवन पद्धतीचे विवेचन सामाजिक मानसशास्त्राच्या आधारावर करण्याचा विशेष प्रयत्न केलेला आहे. जी. एच. मीड यांचा प्रतिकात्मक आंतरक्रियावादाचा जनक म्हणून उल्लेख केला जातो. सी. एच्. कूले, जॉन ड्यूई, विल्यम जेन्स, जे. बी. बाल्डवीन व डब्ल्यू. आय. थॉमस या समाजशास्त्रज्ञांनी प्रतिकात्मक आंतरक्रियेचे अनेक पॅलू

विशद करण्याचा प्रयत्न केलेला आहे. भारतीय समाजशास्त्रज्ञ डॉ. राधा कलम मूखर्जींचे योगदान या क्षेत्रात उल्लेखनीय आहे.

शिकागो विद्यापीठात श्री.जी.एच.मीड यांनी प्रतिकात्मक आंतरक्रियेच्या संदर्भात संशोधनात्मक अध्ययनास प्रारंभ केला व त्यांनी 'परत्वाच्या सामान्यीकरणाचा' किंवा 'सामान्यीकृत अन्य' सिद्धांत मांडला. मीड यांचा परत्वाचा सिद्धांत हा सी. एच्. कूले यांच्या प्रतिबिंबित स्वत्वाच्या (Looking Glass Self) संकल्पनेशी जुळणारा आहे. मीड यांना आपल्या ह्यातीत प्रतिकात्मक आंतरक्रियेबाबतचे विचार ग्रंथ रुपातून प्रकाशित करण्याचे भाग्य लाभले नसले तरी त्यांच्या विद्यार्थ्यांना त्यांनी लिहलेले अनेक लेख एकत्रित करुन १९३४ साली 'Mind, Self and Society' नावाचा ग्रंथ त्यांच्या नावे प्रकाशित केला.

आंतरक्रियेची प्रक्रिया ही फक्त मानव समाजातच आढळते असे नाही, तर ती सर्व समाजशील प्राण्यांतही आढळते. मानव व मानवेत्तर प्राणी यातील फरक समाजशीलतेवर अथवा फक्त शरिर रचनेवर आधारलेला नसून तो प्रामुख्याने संस्कृतिशिलतेवर आधारलेला आहे. प्रत्येक सजीव प्राण्याचा आवाज वैशिष्ट्यपूर्ण व वेगळा आहे. आवाजाच्या माध्यमातून आपआपल्या प्राणीवर्गातील प्राण्यांना एकत्रित करण्याचा सदैव प्रयत्न करीत असतात. मात्र विशिष्ट प्रसंगी अथवा विशिष्ठ परिस्थितीत प्राण्याने काढलेल्या विशिष्ठ आवाजाला खास अर्थ असतो.

**प्रतिकात्मक आंतरक्रियावादाचा आशय व अर्थ** (Meaning of Symbolic Interactionalism)

जेव्हा आंतरक्रियेची प्रक्रिया ही प्रतिकांच्यावर आधारलेली असते, अशा आंतरक्रियेला प्रतिकात्मक किंवा सांकेतिक आंतरक्रिया अशी संज्ञा वापरली जाते. एकमेकांच्या प्रतिक्रिया, आचार-विचार, मूल्ये अथवा श्रद्धा जाणून घेण्यासाछी समाज व्यवस्थेत प्रतिकात्मक घटकांचा वापर करण्यात येत असतो. विचार, मूल्ये मूर्त स्वरुपातून प्रकट करण्यासाठी प्रतिकांचा वापर केला जातो. या प्रतिकांना सांस्कृतिक महत्व प्राप्त झालेले असल्याने संदेश व्यवहाराचे साधन म्हणून प्रतिकांचा (Symbols) अवलंब केला जातो. विचारांचे किंवा संदेशाचे आदान-प्रदान व सांस्कृतिक समाजाचे भावनिक ऐक्य कायम टिकविण्याच्या प्रक्रियेत प्रतिकांचा अवलंब केला जात असल्याने सामाजिक आंतरक्रियेच्या प्रक्रियेत या प्रतिकांना विशेष महत्व प्राप्त झालेले असते. मात्र प्रतिके (Symbols) व चिन्ह (Sign) हे समानार्थी स्वरुपात वापरले जात नाहीत.

**सामाजिक व सांस्कृतिक महत्व** (Social and cultural importance)

**१) प्रतिके ही समाजमान्य असतात** (Symbols are Socially Sanctioned)

समाज व्यवस्थेचे निर्धारण करतेवळी समाज मूल्यांचे पालन व्यक्तीकडून व्हावे अशी अपेक्षा समाज व्यक्त करीत असतो. जीवनाकडे पाहण्याचा व्यक्तीचा दृष्टिकोण कोणता असावा याबाबत

समाज काही आदर्शवादी मूल्यांची जोपासना करण्याचा प्रयत्न करतो. विशेषतः व्यक्तीचे वर्तन हे सामाजिक मूल्य व्यवस्थेला पोषक ठरणारे असावे लागते. मात्र जेव्हा व्यक्ती या मूल्य व्यवस्थेचे उल्लंघन करण्याचा प्रयत्न करते तेव्हा ती समाज व्यवस्था अस्थिरतेकडे किंवा अशांततेकडे वाटचाल सुरु करते. मानवाच्या अंतर्गत व बहिर्गत स्वरुपाच्या वर्तन व्यवहारावर नियंत्रण टाकण्याच्या उद्देशातून ज्या प्रतिकात्मक घटकांचा वापर सामूहिक स्वरुपातून समाज टाकण्याचा प्रयत्न करतो त्या प्रतिकांच्याबद्दल पावित्र्याची भावना त्या समाजात पिढ्यान पिढ्या निर्माण झालेली असते. म्हणून प्रतिकांना व्यापक स्तरावर जोपर्यंत सामाजिक मान्यता प्राप्त होत नाही तोपर्यंत ती प्रतिके फक्त व्यक्तीपूरती मर्यादित ठरतात.

२) **प्रतिके ही मानवनिर्मित असतात** (Symbols are man made)

प्रतिकांच्या माध्यमातून वैचारिक व मूल्यात्मक देवाण-घेवाणाची प्रक्रिया ही फक्त मानव समाजात आढळते. श्रद्धा किंवा भावना व्यक्त करण्यासाठी प्रतिकांचा वापर करण्याची क्षमता ही फक्त मानव प्राण्यात आढळते. समाज जीवनाच्या वेगवेगळ्या क्षेत्रात वेगवेगळ्या प्रतिकांचा वापर मानवाकडून झालेला आहे. उदा. ख्रिश्चन धर्माचा जीवनविषयक दृष्टिकोन क्रूस (+) या प्रतिकाद्वारे स्पष्ट होतो. तर (+) हे प्रतिक गणितीशास्त्रात बेरजेचे चिन्ह म्हणून वापरले जाते. एखाद्या चिन्हाला जेव्हा विशिष्ट आशय प्राप्त होतो तेव्हाच त्याचा प्रतिकात अंतर्भाव होतो. मानवेत्तर प्राण्यातही भावना अथवा श्रद्धा आढळून येत असल्या तरी त्या प्राण्यात भावना व्यक्त करण्यासाठी प्रतिकात्मक घटकांचा वापर केला जात नाही. म्हणून प्रतिके ही मानव निर्मित असतात.

३) **प्रतिके सामाजिक ऐक्य निर्माण करतात** (Symbols creat social harmaony)

आपआपल्या धार्मिक, भाषिक, सांस्कृतिक समाजातील लोकांत भावनिक ऐक्य निर्माण करण्यासाठी प्रतिकांचा खास करुन अवलंब केला जातो. समाजाचे संघटन हे भावनिक ऐक्यावर अवलंबलेले असल्याने संबंधित समाजाने सामूहिक स्वरुपातून जे प्रतिक पवित्र मानलेले आहे त्याचा सामाजिक ऐक्यासाठी वापर केला जातो. प्रत्येक राष्ट्राचा राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत, राष्ट्रभाषा ही राष्ट्रीय एकात्मतेची प्रतिके म्हणूनच अंगिकारली जातात. भावनिक ऐक्य हे समाजाचे व राष्ट्राचे नैतिक सामर्थ्य म्हणून ओळखले जाते. आपापल्या समाजातील लोकांना एकत्रित करण्यासाठी, त्यांच्यात भावनिक ऐक्य निर्माण करण्यासाठी व पवित्र बाबींचे पावित्र्य टिकविण्यासाठी प्रतिकांचा वापर नहेमीच केला जातो. समुदाय भावना वाढीस लावणे, कर्तव्य तत्परतेची जाणीव लोकांना करुन देणे व सामूहिक जबाबदारीची जाणीव करुन देणे या उदार हेतूतून प्रतिकांचा वापर केला जातो.

**४) प्रतिके ही संदेश व्यवहाराची साधने असतात** (Symbols are means of communication)

सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक व राष्ट्रीय जीवनातील मूल्यांचे नियमकांचे, तत्वप्रणालीचे व जीवनतविषयक दृष्टिकोनाचे प्रकट स्वरुप प्रतिकांच्या माध्यमातून व्यक्त केले जाते. जीवनविषयक मूल्यांचा प्रचार व प्रसार करतेवळी प्रतिकांचा अवलंब केला जातो. जनसंपर्क माध्यमाचे एक साधन म्हणून प्रतिके ही महत्वाची भूमिका व वठवितात  विशिष्ट क्षेत्रात वापरल्या जाणाऱ्या प्रतिकांना अर्थपूर्णता प्राप्त झालेली असल्याने त्या प्रतिकांचा आशय कोणता आहे, त्याचे जीवनात कोणते महत्व आहे हे लोकांना पटवून देण्यासाठी प्रतिकांचा वापर केला जातो. वेगवेगळ्या संस्था व संघटना बोध वाक्यांला अनुसरून काही प्रतिकांचा वापर करतात. उदा. हिंदू समाजात ॐ, मूस्लिम समाजात '७८६' इ. अशी उदाहरणे देता येतील. ही जीवनमूल्ये वैयक्तिक, सामाजिक, सांस्कृतिक व राष्ट्रीय जीवनात महत्वाची भूमिका वढवीत असल्याने त्यांचा प्रचार, प्रसार व स्वीकार प्रत्येक व्यक्तीकडून व्हावा या जाणीवेतून प्रतिकांचा वापर केला जातो.

**५) प्रतिकांचा उदय सामाजिक मनातून होत असतो** (Symbols arise in ones social mind)

प्रतिकांची होणारी निर्मिती ही जरी सामाजिक स्वरुपाची असली तरी त्या प्रतिकाबद्दल वाटणारा आदरभाव व पावित्र्यभाव हा संस्काराच्या माध्यमातून विकसित होत असतो. सामाजिक स्वास्थ सामाजिक संरक्षण व समाज विकास साध्य करण्याच्या प्रक्रियेत प्रत्येक व्यक्तीचा सहभाग असणे जरुरीचे असते. समाजिकरण ही व्यक्तीमत्वाच्या विकासाची जरी प्रक्रिया असली तरी ती एक संस्कराची व मानवीकरणाची सामाजिक प्रक्रिया आहे. समाज व्यवस्थेने ज्या बाबी निशिद्ध मानलेल्या आहेत त्याचा व्यक्तीने पुरस्कार करु नये, अशा पद्धतीने संस्कार सामाजिक मनावर करावे लागतात. समाजाने सामूहिक स्वरुपातून सामाजिक स्वास्थासाठी जी मूल्ये स्वीकारलेली आहेत त्याचा आदर व पावित्र्य टिकविण्याची क्षमता संस्काराच्या माध्यमातून निर्माण करण्याची जबाबदारी ही समाजातील प्रत्येक संस्थेवर व संघटनेवर पडलेली असते. आदरयुक्त प्रतिकांचे पावित्र्य हे व्यक्तीच्या सामाजिक मनातून विकसित होत असते.

**जॉर्ज हर्बट मीड** (George Herbert Mead)

जॉर्ज मीड यांना प्रतिकात्मक आंतरक्रियावादाचा जनक म्हणून ओळखले जाते. प्रतिकात्मक सामाजिक आंतरक्रियेच्या संदर्भात अमेरिकेतील शिकागो विद्यापीठात प्रायोगिक दृष्ट्या १९३० या सुमारास अध्ययन करीत असतातना त्यांनी अध्ययनात वेगवेगळ्या विषयावर संशोधन करुन शोध निबंध लिहून ठेवले. परंतु, दुर्देवाने त्यांना आपल्या हयातीत ग्रंथरुपातून ते निबंध प्रकाशित करता आले नाहीत. मात्र त्यांच्या विद्यार्थ्यानी ते शोध निबंध एकत्र करुन त्यांची पद्धतशीर मांडणी करुन मीड यांच्या नावे, १९३२ 'Philosophy of the present;' साली १९३४ साली Mind, Self and

Society; १९३६ साली Movements of thought in the 19th Century आणि १९३८ साली 'The Philosophy of the Act' इ. पुस्तके प्रकाशित केली. प्रतिकात्मक आंतरक्रियेच्या संदर्भातील त्यांचे महत्वाचे पुस्तक म्हणजे 'Mind, Self and Society' होय.

जॉर्ज मीड यांच्या प्रतिकात्मक आंतरक्रियावादी विचारसरणीवर सी. एच्. कूले यांच्या प्रतिबिंबित स्वत्वाच्या संकल्पनेचा (Concept of looking glass self) विशेष प्रभाव पडलेला दिसून येतो. बाह्य सामाजिक विश्वाचा मानवी मनावर सातत्याने प्रभाव पडत असल्याने व्यक्ती व समाज किंवा 'स्व' आणि 'पर' हे दोन्ही एकमेकांशी इतके कटिबद्ध झालेले असतात की ते एकमेकापासून अलग करता येत नाहीत. व्यक्तिगत निरिक्षण व अनुभव यांच्याद्वारे 'स्व' आणि 'पर' या संकल्पना उदयास येत असल्याने मानवाच्या अंतर्गत व बहिर्गत वर्तन पद्धतीचे अध्ययन समाजिक मानसशास्त्रीय मूल्यावर करण्याचा मीड यांनी अटोकाट प्रयत्न केलेला आहे.

**प्रतिकात्मक आंतरक्रिया** (Symbolic Interaction)

आंतरक्रिया हा समाज जीवनाचा मूलभूत पाया मानून त्याचे मानसशास्त्रीयदृष्ट्या विवेचन करण्याचा प्रयत्न मीड यांनी केला. निसर्गातील प्रत्येक प्राण्यांच्यात क्रिया व प्रतिक्रियांचे परस्परसंबंध आढळून येतात. एका प्राण्याची कृती दुसऱ्या प्राण्याला विशिष्ट कृती करण्यास भाग पाडते. परंतु, क्रिया व प्रतिक्रिया या शारीरिक हावभावावरून व्यक्त करण्याचा प्रयत्न मानवत्तेर प्राण्यात दिसून येतो. तर मानव समाजात शारिरीक हावभावाव्यतिरिक्त वेगवेगळ्या प्रतिकांचा, साधनांचा, शब्दांचा वापर करण्यासाठी प्रवृत्ती मानव समाजात आढळते. विशिष्ट शारीरिक हावभाव अथवा प्रतिकांस विशिष्ठ अर्थ किंवा आशय प्राप्त झालेला असतो. म्हणून कोणतीही आंतरक्रिया अर्थपूर्ण किंवा आशय प्रधान स्वरुपाची असते असे मत मीड यांनी व्यक्त केलेले आहे. प्रतिकात्मक आंतरक्रियेची प्रक्रिया ही हळूहळू मानवी समाजात विकसित होवू लागली. एवढेच नव्हे तर ती प्रक्रिया सामाजिक कौशल्याचे घातक मानले जाते असे मीडचे मत आहे.

प्रतिकात्मक आंतरक्रियेच्या प्रक्रियेत भाषेचे स्थान हे वैशिष्ट्यपूर्ण आहे. भाषेचा उदय ही एक प्रमुख सामाजिक घटना असली तरी मानवाच्या रानटी अवस्थेत भाषेचा उदय झालेला नव्हता. शारीरिक हावभावावरून एकमेकांच्यात वैचारिक आदान-प्रदान होत असे. प्रत्येक शारीरिक स्वरुपाच्या इशाऱ्याला विशिष्ट अर्थ प्राप्त करून देण्याीच पद्धत प्राचीन काळात अस्तित्वात होती. असंस्कृत समाज व्यवस्थेकडून सुसंस्कृत समाज व्यवस्थेकडे मानव समाजाची प्रगती जसजशी होऊ लागली तसतसे विशिष्ट शारीरिक स्वरुपाच्या इशाऱ्याला विशिष्ट शब्दाने उच्चटले जाऊ लागले व त्यातूनच भाषेचा हळूहळू विकास होवू लागला. सुसुस्कृत समाज व्यवस्थेत भाषा हे एक विनिमयाचे प्रमुख म्हणून ओळखले जावू लागले. परंतु, मीड यांनी भाषाशास्त्राच्या उदयाचा इतिहास स्पष्ट

करतेवळी प्रतिकात्मक स्वरुपाची शारीरिक हालचाल, आशयप्रधान असल्यामुळे प्रत्येक व्यक्तीची क्रिया व प्रतिक्रिया शारीरिक हावभावावरून व्यक्त केली जात असे व त्या आशय प्रधान क्रिया-प्रतिकात्मक (Symbolic) स्वरुपाच्या असतात असे मत स्पष्ट केले.

मीड यांच्यामते, मानव हा बुद्धिजीवी, विचारकडून कृती करणारा, व जिज्ञासूवृत्ती धारण करणारा चतुर प्राणी आहे. त्याचबरोबर मानवास कल्पनाशक्तीही प्राप्त झालेली आहे. व्यक्ती हा समाजातला लहान अणू जरी असला तरी समाजापासून अलिप्त राहून तो स्वतःचा सर्वांगिण विकास साध्य करू शकत नाही.

कॉलिन्स व मॅकोस्की या विचारवंतांनी 'The Discovery of Society' या ग्रंथात असे म्हटले आहे कि प्रत्येक व्यक्तीच्या मनात 'स्वत्वाची' (Self) संकल्पना बाल्यावस्थेपासून अस्तीत्वात असते. मूल समाज व्यवस्थेत राहून लहानाचे मोठे बनत जाते तसतसे स्वत्वाची संकल्पना स्वत्वाशी तर 'तू, तुला, तुझे' या संकल्पना परत्वाशी निगडीत असतात. मात्र स्वत्व व परत्व या संकल्पना विकसित होण्यास व्यक्ती व समाज कितपत कारणीभूत आहेत याचे मानसशास्त्रीय दृष्ट्या विवेचन केल्यामुळेच सिद्ध होणार आहे असे मत कॉलिन्स व मॅकोस्की यांनी व्यक्त केले आहे. मीड यांनी स्वत्वाची व परत्वाची संकल्पना बुद्धि प्रामाण्यतेच्या तत्वावर स्वीकारलेली नसून ती कल्पनातीत स्वरुपातून स्वीकारलेली आहे. व्यक्तीनिष्ठ व वस्तुनिष्ठ स्वरुपाच्या आंतरक्रियेतून स्वत्वाची व परत्वाची संकल्पना विकसित होत असते. प्रतिकात्मक आंतरक्रियेची संकल्पना विशद करतेवेळी मीड यांनी संलग्न सिद्धांताची (Coherent Theory) मांडणी केलेली आहे.

**मीड यांचा संलग्नसिद्धांत** (Mead's Coherent Theory)

प्रतिकात्मक आंतरक्रियावादाचे विवेचन करतेवेळी मीड यांनी मन (Mind) स्वत्व (Self) व समाज (Society) या तीन आधारभूत घटकातील परस्पर संबंधाचा सामाजिक मानसशास्त्रीयदृष्ट्या अभ्यास केलेला आहे. 'क्रियाशील मना' चे विश्लेषण करतेवळी विल्यम जेम्स, सी. एच्. कूले व जेम्स बाल्डविन यांच्या विचारांचा प्रभाव मीड यांच्या विश्लेषणावर पडलेला दिसून येतो.

मन, स्वत्व आणि समाज या तीन घटकांच्या आधारावर कोणत्याही मानवाची खरी ओळख होत असते, असे मीड यांचे मत आहे. यापैकी वैयक्तिक (Individual Mind) मन वैयक्तीक स्वत्वाची (Individual Self) व सामाजिक मन सामाजिक स्वत्वाची निर्मिती करते. शरीर व मन यांचे स्वरुप अनुक्रमे मूर्त व अमूर्त जरी असले तरी ते एकमेकांशी कटिबद्ध असतात की ते एकमेकापासून वेगळे करता येत नाहीत. व्यक्तीमत्वावर मानवी मनाचा सातत्याने प्रभाव पडत असतो. मानवी मन, स्वत्व आणि समाज या तीन संकल्पनांच्या आधारावर प्रतिकात्मक आंतरक्रियेचे स्वरुप मीड यांनी आपल्या संलग्न सिद्धांतात विशद केलेले आहे.

**मन** (Mind)

मीडने आपल्या त्रिसूत्री संलग्न सिद्धांतात पहिले स्थान मानवी मनास दिलेले आहे. मानवी मनाची घडण ही शारीरिक विकासाबरोबरच होत असल्याने बालक स्वतःहून कुटुंबात अथवा आपल्या अवतीभोवती वावरण्याचा जसजसे प्रयत्न करते तसतसे भाषेच्या उच्चारातून आपल्या क्रिया-प्रतिक्रिया करण्याचा प्रयत्न करते. कुटुंबातील प्रौढ व्यक्ती कशा वागतात याचे बारकाईने निरिक्षण करून त्यांची प्रसंगी नक्कल करण्याचा प्रयत्न लहान मूले करतात. जसजसे किशोरावस्थेकडून बालकाचा विकास होत जातो, तसतसे स्वतंत्रपणे विचार करण्यास, स्वतंत्रपणे कृती करण्यास व स्वतंत्रपणे निर्णय घेण्यास ते बालक तयार होते. मीड यांनी मानवी विकासाचे टप्पे पाडताना पुढील तीन अवस्था महत्वाच्या मानलेल्या आहेत. १) शारीरिक हावभावाद्वारे आपला प्रतिसाद व्यक्त करणे. २) अनुकरणाच्या माध्यमातून इतरांची भूमिका वाढविणे. ३) बौद्धिक प्रगतावस्थेतून कल्पनाशक्तीला उजाळा देणे.

शारीरिक हावभावावरून आपला प्रतिसाद व्यक्त करण्याचा प्रयत्न बालक बाल्यावस्थेत करीत असले तरी किशोरावस्थेत व कुमारावस्थेत ते बालक भाषेच्या, उच्चाराच्या माध्यमातून व कृतीच्या माध्यमातून आपली प्रतिक्रिया व्यक्त करते. एवढेच नव्हे तर काही प्रतिकांचा वापर करून आपल्या प्रतिक्रिया व्यक्त करण्याचा प्रयत्न करते व त्या प्रतिकांचा निश्चित आशय जाणू घेण्याची क्षमता मूलांच्यात विकसित होत जाते. मनाची प्रौढावस्था ही शारीरिक प्रौढावस्थेबरोबरच विकसित होते. स्वतंत्र निर्णय घेण्याची क्षमता मूलांच्यात जसजशी विकसित होत जाते तसतशी कल्पनाशक्ती विकसित होण्यास सुरुवात होते.

**२) स्वत्व** (Self)

जेव्हा स्वतःबद्दलची जाणीव बालकास होत जाते तेव्हा स्वत्व व परात्वाच्या संकल्पना त्या बालकात निर्माण होतात. मीड यांनी मानवी मन हा समाजाचाच अविभाज्य घटक आहे असे संबोधले आहे. समाज जीवनातील अनेक बरे-वाईट अनुभव घेवून मानवी मनाची जडण-घडण होत असते. मानवी मन हे सामाजिक आंतरक्रियेचे प्रतिकात्मक रुप मानून त्याचा अभ्यास समाज मानसशास्त्रीयदृष्ट्या मीड यांनी केला.

मानव समाजात वापरली जाणारी प्रतिके ही संदेश व्यवहाराची साधने म्हणून ओळखली जातात. प्रतिकांना सांस्कृतिक व सामाजिकदृष्ट्या विशेष महत्व प्राप्त झालेले असते. मानव समाजात प्रचलित असणारी प्रतिके ही फक्त मानव निर्मित स्वरुपाची कृती नसून ती सामाजिक आंतरक्रियेची प्रतिकात्मक साधने आहेत.

स्वतःबद्दलची जाणीव लहान मूलांच्यात जेव्हा विकसित होते तेव्हा पासून 'मी, मला व माझे' याबाबतच्या संकल्पना उदयास येतात. परंतु त्याचबरोबर 'तु, तुला व तुझे' या परत्वाच्या संकल्पनाही

विकसित होत जातात. दुसऱ्यापेक्षा स्वतःचा विचार करण्याच्या प्रवृत्तीतून स्वत्वाची संकल्पना मानवी मनात उदयास येत जाते. त्यामुळे स्वत्व ही एक मानसिक प्रक्रिया आहे.

प्रौढावस्थेत अनुकरणाप्रिय वर्तन व्यक्तीच्या जीवनाचा व त्याच्या स्वभावाचा एक अविभाज्य घटक ओळक्षला जातो. मन, बुद्धी, शरीर यांचा संपूर्ण विकास झालेला असल्याने अनुकरणाप्रियता कमी झालेली असते.

स्वतत्वाची संकल्पना विशद करताना मीड यांनी वैयक्तीक व सामाजिक मनाचे विवेचन केलेले आहे. वैयक्तिक मनात स्वतःबद्दलची प्रतिमा, स्वत्वाची जाणीव, स्वाभिमान, आत्मकिंद्रीतपणा इ. संकल्पनाचा उदय होतो. तर सामाजिक मनात इतरांच्या दृष्टिने आपले वर्तन, आपली भूमिका, आपली कृती, आपला दर्जा व आपली जबाबदारी इ. अंतर्भाव होतो. वैयक्तिक मन स्वत्वाच्या जाणीवेला तर सामाजिक मन सामाजिक जाणीवेला प्रेरणादायी ठरते.

३) **समाज** (Society)

आपल्या संलग्न सिद्धांतापैकी तिसरा महत्वाचा घटक म्हणून मीड यांनी मानवी समाजास विशेष स्थान दिले आहे. मीड यांच्यामते व्यक्तीच्या सामाजिक मनातून व सामाजिक स्वत्वातून या संस्थांचा व संघटनांचा उदय झालेला आहे. या संस्थांच्या व संघटनांच्या माध्यमातून समाज व्यवस्था उदयास आलेली आहे. समाज व्यवस्थेतील अनेक संस्थाशी व्यक्तीचा संपर्क येतो. विविध लोकांच्या सानिध्यात राहून व्यक्तीला जीवन काढावे लागते. तेव्हाच समाजिक आंतरक्रियेच्या प्रक्रियेत प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे नेहमीच सहभागी होत असते. सामाजिक परिस्थितीनुसार आपले वर्तन, स्वभाव आचार व विचार कसे आहेत इतरांच्याकडून जाणून घेण्याचा व आवश्यकतेनुसार वर्तनात बद्दल करण्याचा व्यक्ती अटोकाट प्रयत्न करीत असते.

व्यक्तीचे वैयक्तिक मन हे वैयक्तीक स्वत्वाला, वैयक्तीक स्वत्व हे स्वहिताला व स्वहित हे वैयक्तीक जाणिवेला जशी चालना देते त्याचप्रमाणे त्या व्यक्तीचे सामजिक मन सामाजिक स्वत्वाला, सामाजिक स्वत्व हे समाज हिताला व समाजहित हे सामाजिक जाणिवेला प्रेरणा देत असते. मनाच्या या दोन पर्यायापैकी कोणता पर्याय निवडावा याबाबत व्यक्तीच्या मनात द्विधा परिस्थिती निर्माण झालेली असते. इतरांच्या मनात आपल्या विषयी चांगली प्रतिमा निर्माण करावयाची झाल्यास सामाजिक मतानुसार वागण्याचा प्रयत्न व्यक्ती करते. अशा वर्तन व्यवहारामुळे स्वहिताच्या संकल्पनेवर, आचार-विचारावर व आपल्या वर्तन पद्धतीवर मर्यादा टाकून समाजहित, सामाजिक संरक्षण साध्य करण्याकडे व्यक्ती प्रयत्न करते. म्हणजेच समाजहिताच्या जाणिवेतून वैयक्तिक हिताच्या संकल्पनाचा त्याग करण्याकडे त्याचे मनोवृत्ती विकसित होत जाते.

आपल्या त्रिसूत्री संलग्न सिद्धांतात मीड यांनी मानवाच्या सामाजिक विश्वाचे समाजशास्त्रीयदृष्ट्या अध्ययन करतेवेळी वर्तनात्मक मानसशास्त्राचा आधार घेतलेला आहे. मानवी आंतरक्रिया ही दोन किंवा दोनपेक्षा आधिक व्यक्तीमधील एकप्रकारचे दळणवळण होय. या दळणवळणातूनच समाज आकार घेत असल्याने त्याचे स्वरुप नेहमीच गतिमान असते. मानवी वर्तनातील भिन्नता, सामाजिक परिस्थितीकडे त्याचा पाहण्याचा दृष्टिकोन मानवात प्रचलित असलेल्या जाणीव यांच्या आधारावरच सामाजिक आंतरक्रियेचा आशय विषद करण्याचे कार्य प्रतिकात्मक आंतरक्रियावाद करीत असते.

**श्री. सी. एच्. कुले यांची प्रतिबिंबित स्वत्वाची संकल्पना** (C.H.Cooley's concept of Looking Glass Self)

प्रतिकात्मक सामाजिक आंतरक्रियेच्या संदर्भात श्री. सी. एच्. कुले यांनी प्रतिबिंबित स्वत्वाच्या संकल्पनेचे विवेचन 'Human Nature and the social order' या ग्रंथात केलेले आहे. या ग्रंथाव्यतिरिक्त 'Social Process', Social Organisation', Sociological Theory and Social Research, व 'Life and the Student' या अनेक ग्रंथातून समाजशास्त्रीय विचारांची मांडणी केलेली आहे.

कूले यांच्या समाजशास्त्रीय विचारावर स्पेन्सर यांच्या सामाजिक उत्क्रांतीवादाचा प्रभाव पडलेला आहे. मानवी समाजाचे अध्ययन करणे म्हणजे मानवाच्या क्रिया-प्रतिक्रियांचे अध्ययन करणे होय. समाजापासून कोणत्याही व्यक्तीला स्वतंत्र स्थान प्राप्त होत नाही. मानवी समाज हा सजीव घटकांनी मिळून बनलेला असल्याने प्रत्येक व्यक्तीच्या जाणिवा, भावना, श्रद्धा, मूल्ये व आचार-विचार इ.नी मिळून समाज बनत असतो. दोन किंवा दोन पेक्षा अधिक व्यक्तीमधील परस्पर संबंधात प्रत्येक व्यक्तींच्या भावनांचा, मूल्यांचा व आचार-विचारांचा एकमेकांशी संबंध येत असतो. क्रिया व प्रतिक्रियांचा, मानवाच्या स्वभावांचा एकमेकावर आघात होत असतो. त्यामुळे सामाजिक आंतरक्रिया, सामाजिक संबंध, मानवाचे सामाजिकवर्तन, वर्तन व्यवहाराची पद्धत, मानवी वर्तनावर पडणारी बंधने, वर्तनात होणारे बदल इ. अनेक घटकांचा अभ्यास केल्याशिवाय समाजाचे आंतरिक स्वरुप स्पष्ट होत नाही.

प्रतिकात्मक आंतरक्रियेच्या संदर्भात कूले यांनी मांडलेली प्रतिबिंबित स्वत्वाची संकल्पना ही जॉर्ज मीड यांच्या त्रिसूत्री संलग्न सिद्धांताशी व परत्वाच्या संकल्पनेशी जुळणारी आहे.

समाजातील प्रत्येक व्यक्ती हा समाजाचा अविभाज्य घटक या नात्याने आपले वैयक्तिक व सामाजिक जीवन कंठित असतो, अनेक व्यक्तीच्या समजिक वर्तन व्यवहारातून सामाजिक

आंतरक्रियेचा उदय होत असल्याने त्या आंतरक्रियेत व्यक्तीचा स्वभाव. आचारविचार व त्याची मूल्ये यांचा विशेष प्रभाव पडत असतो.

व्यक्तीमत्वाच्या विकासाच्या प्रक्रियेत मानवी मनाच्या विकासावर विशेष भर दिला जातो. कुलेच्या मते मानवी मनाची जडण-घडण ही अनेक सामाजिक संस्थाच्याद्वारे साध्य होत असते. समाजातील विविध संस्था मानवी गरजेतून व समाजाच्या सामूहिक मनातून उदयास आलेल्या असतात. मानवी वर्तनाचा संबंध हा त्या व्यक्तीच्या मनोव्यापाराशी निगडीत असतो. व या मानवी मनातील सर्वात महत्वाची बाब म्हणजेच त्या व्यक्तीचे स्वत्व होय. स्वतःची ओळख व्यक्तीला स्वत्वाच्या जाणिवेतून होत असते. परंतु, ही स्वत्वाची जाणीव इतरांच्या संपर्कातून उदयास येत असते. कूलेच्या मते, 'मी कसा आहे' हे ठरविण्याचा अधिकार व्यक्तीला नसून संपर्कात येणाऱ्या इतर लोकांना प्राप्त झालेला असतो. इतरांचे मन किंवा नजर ही माझ्या दृष्टीने माझे प्रतिबिंब पाहण्याचा एक काल्पनिक आरसा आहे, अशी त्या व्यक्तीची धारणा झालेली असते. संपर्कात येणाऱ्या अनेक लोकांच्या नजरा एखाद्या व्यक्तीच्या वर्तनाकडे, स्वभावाकडे, क्रिया-प्रतिक्रियाकडे भिडलेल्या असतात. व त्याच्या आधारावर संबंधित व्यक्तीबद्दल एक विशिष्ट मत बनत असते. सामाजिक आंतरक्रियेत सहभागी होणाऱ्या लोकांच्या प्रतिक्रियेतून व्यक्तीच्या सामाजिक स्वत्वाचा विकास साध्य होत असतो. म्हणून स्वत्व ही वैयक्तिक बाब नसून ती एक सामाजिक बाब आहे.

स्व-अनुभवातून सामाजिक स्वत्वाचा विकास होत असतो. सामाजिक आंतरक्रियेच्या प्रक्रियेत सहभागी झालेल्या भिन्न मनोवृत्तीच्या लोकांशी संपर्क येत असल्याने प्रत्येक व्यक्तीला अनेक बरे-वाईट अनुभव येत असतात. व त्या अनुभवाच्या आधारावर सामाजिक विश्वाबद्दलची एक विशिष्ट मनोधारणा व्यकीच्या मनात निर्माण झालेली असते. ही मनोधारणा व्यक्तीला विशिष्ट वर्तन ठेवण्यस भाग पाडते व त्यातून सामाजिक स्वत्वाची जडणघडण होत असते. समाजापासून स्वत्व वेगळे करणे हे अत्यंत कठीण आहे. व्यक्तीच्या मनात सामाजिक जाणिवा निर्माण करण्यास सामाजिक परिस्थितीबऱ्याच अंशी कारणीभूत असते.

**हर्बट ब्लूमर** (Herbert Blumer)

जॉर्ज मीड यांच्या मार्गदर्शनाखाली शिकागो विद्यापीठात शिक्षण घेतल्यानंतर १९५२ साली बर्कले येथील कॅलिफोर्निया विद्यापीठात अध्ययनाचे कार्य सुरू केले. आपले समाजशास्त्रीय विचार त्यांनी 'Human Behavious and Social Process' या ग्रंथात मांडले. या व्यतिरिक्त ब्लूमर यांचे प्रतिकात्मक आंतरक्रियासंबंधीचे विचार संपादित स्वरुपातून ॲरनॉल्ड रोज यांनी 'Society as Symbolic Interaction' या ग्रंथात विशद केले आहेत. सामाजिक मानसशास्त्राच्या आधारावर

प्रतिकात्मक आंतरक्रियासंबंधी ब्लूमर यांनी पुरस्कारलेल्या वैचारिक संप्रदायाला शिकागो संप्रदाय (Chicago School) या संज्ञेने ओळखले जाते.

प्रतिकात्मक आंतरक्रियेच्या संदर्भात ब्लमर यांनी प्रमुख तीन घटकावर विशेष भर दिलेला आहे.

१) मानव समाज स्वत्व असलेल्या अनेक व्यक्तीतून बनलेला असून त्या स्वत्वाच्या जाणीवतेतून व्यक्ती परिस्थिती, वस्तू, घटना, क्रिया, प्रतिक्रिया इ. चा आशय जाणून घेऊन आपली वर्तन क्रिया निश्चित करण्याचा प्रयत्न करीत असते. एखादी व्यक्ती आपल्याबरोबर कशी वागते कोणत्या प्रकारचे संबंध प्रस्थापित करते त्यानुसार आपले वर्तन अथवा कृती निर्धारित करण्याचा प्रत्येक व्यक्ती प्रयत्न करीत असते. म्हणून एखाद्याची कृती ही दुसऱ्या व्यक्तीची प्रतिक्रिया असते.

२) कोणत्याही व्यक्तीची कृती टप्याटप्याने विकसित होत असते. स्वत्वाच्या जाणिवेतून परिस्थितीचा आशय लक्षात घेऊन व परिस्थितीचा अंदाज घेऊन विशिष्ट प्रकारची अपेक्षित कृती करण्याचा प्रयत्न व्यक्ती करीत असते.

३) एखाद्या सामूहिक कृतीत संबंधित व्यक्तीची कृती अंतभूत झालेली असते. परंतु अशा सामूहिक कृतीत समाविष्ट झालेल्या दुसऱ्या व्यक्तीच्या कृतीचा हेतू लक्षात घेऊन किंवा त्या कृतीचा आशय लक्षात घेवून आपली वर्तनात्मक भूमिका स्वीकारण्याचा व्यक्ती प्रयत्न करीत असते. म्हणजेच आपली कृती इतरांच्या दृष्टिने कशी असावी याचे निर्धारण करून ती कृती करण्याचा व्यक्ती प्रयत्न करते.

सामाजिक आंतरक्रिया ही अनेक व्यक्तींच्या क्रिया व प्रतिक्रिया यांच्यातून जरी उदयास येत असली तरी त्या मागची विशिष्ट संकल्पना लक्षात घ्यावी लागते. सामाजिक आंतरक्रियेचा आशय जाणून घेण्यासाठी गुणात्मक पद्धतीशास्त्राचा पुरस्कार करण्यावर ब्लूमर यांनी भर दिलेला आहे. सामाजिक आंतरक्रियेमधील वास्तवता ही आशय व्यक्त करण्याच्या प्रक्रियेवर अवलंबलेली आहे असे ब्लूमर यांचे मत आहे.

**मॅनफोर्ड कुहन** (Manford Kuhn)

कुहन व त्यांच्या अनुयायांनी आयोवा विद्यापीठात प्रतिकात्मक आंतरक्रियावादाच्या संदर्भात जे अध्ययन केले त्यास आयोवा संप्रदाय (Lowa School) या संज्ञेने ओळखले जाते. शिकागो संप्रदायात ब्लमूर यांनी ज्या गुणात्मक पद्धती शास्त्राचा पुरस्कार केला ती पद्धत कुहन यांना मान्य नव्हती. म्हणून त्यांनी शिकागो संप्रदायावर प्रखर टिका केली. प्रतिकात्मक आंतरक्रियेची वास्तवता

जाणून घेण्यासाठी शास्त्रीय उपकरणांचा अवलंब केल्यास त्याची विश्वसनीयता अधिक उंचावू शकेल असे मत कुहन यांनी व्यक्त केली.

स्वत्व, सामाजिक कृती, व परत्वाचे सामान्यीकरण या प्रतिकात्मक आंतरक्रियेच्या प्रक्रियेतील घटकांचे मापन करण्यासाठी संरचित प्रश्नावली तंत्राचा व साधनाचा कुहन यांनी पुरस्कार केला. कुहन यांनी प्रतिकात्मक आंतरक्रियेतील मूलभूत संकल्पनांची, विशेषतः स्वत्वाची विश्वसनीयता पडताळून पाहण्यासाठी वीस विधानाची चाचणी (Twenty Statment Test) पत्रिका तयार केली. या चाचणी पत्रिकेत 'मी कोण आहे?' या संदर्भात वीस वस्तुनिष्ठ प्रश्नांची यादी तयार करून उत्तरदात्याकडून ती प्रश्नावली वीस विधानातून भरून घेतली व त्या उत्तरांच्या आधारावर स्वत्वा संबंधीचे आपले विचार कुहन यांनी मांडले.

स्वत्वाची संकल्पना हा मानवाच्या अभिवृत्तीचा अविभाज्य घटक असून तो एक अर्थाचा संच आहे अशी प्रतिक्रिया कुहनने व्यक्त केलेली आहे. मानवाच्या वर्तनात सातत्य व संभाव्यता आढळून येत असल्याने त्याचे व्यक्तीमत्व संरचित व तुलनात्मकदृष्ट्या स्थिर स्वरुपाचे असते. मानवाची कृती ही प्रामुख्याने सामूहिक कृतीच्या प्रीाावाखाली जरी असली तरी तिचे स्वरूप मुक्त असते. मानवाच्या स्वत्वावर नियंत्रण टाकण्याची क्षमता सामजिक संघटनेच्या रचनात्मक घटकांना प्राप्त झालेली असल्याने गार्थित सत्य हे स्थिर असते, अशी कुहनने प्रतिक्रिया व्यक्त केलेली आहे.

**इरविंग गॉफमन** (Erving Golfman)

प्रतिकात्मक आंतरक्रियेचे विवेचन अभियात्मक दृष्टिकोणातून विशद करण्याचा प्रयत्न इरविंग गॉफमन यांनी केला. 'The presentation of self in everyday life (1959), Ayylums (1961), Interaction Rital (1967), Frame Analysis An essay on the organization of experience (1974)' इ. अनेक ग्रंथातून गॉफमन यांनी आपल्या विचारांची मांडणी केलेली आहे.

गॉफमनच्या मते, संपूर्ण समाज किंवा समाजव्यवस्था ही प्रत्येक व्यक्तीच्या दृष्टिने नाटकाची एक रंगभूमी असून व्यक्तीला आपल्या अभिनयाच्या माध्यमातून समाजरूपी प्रेक्षकांच्यात विशिष्ट छाप किंवा विशिष्ट प्रतिमा निर्माण करण्याचा प्रयत्न करावा लागतो. या प्रयत्नात रंगभूषा, संवाद, हावभाव आवाजातील चढ-उतार, संगीत, पेहराव, केशभूषा इ. बाबतीत सुयोग्य पद्धतीने कलाकाराला जसा बदल करावा लागतो त्याचप्रमाणे समाज व्यवस्थेत आपल्या वर्तन पद्धतीत सोईस्करपणे बदल करून समाजाकडून वाहवा मिळविण्याचा प्रयत्न करावा लागतो. म्हणून गॉफमन यांनी सामाजिक आंतरक्रियेच्या प्रक्रियेला नाय्यीकरणाची किंवा अभिनयाची उपमा दिलेली आहे.

सामाजिक आंतरक्रियेची प्रतिक्रिया ही सामाजिक दर्जा प्राप्त करून देण्यास उपयुक्त प्रक्रिया ठरणारी प्रक्रिया म्हणून ओळखली जाते. मिळालेला किंवा मिळविलेला सामाजिक दर्जा हा त्या

व्यक्तीच्या भूमिकेवर खास करून अवलंबिलेला असतो. आपल्या वर्तन क्रियेत अनुकूल स्वरूपाचा बदल करतेवेळी पूर्वानुभवाकडे लक्षकेंद्रीत करावे लागते.

अपेक्षित वर्तमात्मक बदल व्यक्तीकडून व्हावयाचा असेल तर समाज व्यवस्थेला बहिर्गत चेतकाची भूमिका वाढविणे जरुरीचे आहे. व त्यासाठी समाज व्यवस्थेत, सामाजिक वातावरणात, सामाजिक मूल्यात सामूहिक स्वरुपातून बदल करण्याची आवश्यकता त्यांनी विशद केलेली आहे.

समाज व्यवस्था व मानवाचे विशिष्ट वर्तन यातील परस्पर संबंध विशद करतेवेळी गॉफमन यांनी असे म्हटले आहे की समाज व्यवस्था ही स्वयं संक्रमित नसते. समाज व्यवस्थेतील मानवाच्या विशिष्ट वर्तनाचा आशय जाणून घेतल्याशिवाय समाजिक आंतरक्रियेचे स्वरुप स्पष्ट होत नसते. कारण त्या विशिष्ट वर्तनाला त्या समाजातील लोक विशेष महत्व प्राप्त करून देतात. म्हणून समाज व्यवस्था ही रंगभूमी असून मानवाचे वर्तन हा एक अभिनयाचा प्रकार आहे आणि आपल्या वर्तनक्रियेचा कौशल्यातून आंतरक्रियेला नाट्यीकरणाचे रुप देण्याचा व्यक्ती प्रयत्न करते.

**प्रतिकात्मक आंतरक्रियेचे महत्व** (Importance of Symbolic Interaction)

प्रतिकात्मक आंतरक्रियावादी विचारसणीमुळे समाजशास्त्राच्या प्रगतीला विशेष चालना मिळाली. समाज शास्त्र व मानसशास्त्र यांच्यातील घनिष्ठ संबंध विशद करण्यात प्रतिकात्मक आंतरक्रियावादाने महत्वाची भूमिका वठवलेली आहे. सामाजिक मानसशास्त्र ही नवीन शाखा विकसित होण्यास आंतरक्रियावादामुळे बरीच मदत झाली. मानवाच्या सामाजिक वर्तनाचा अभ्यास हा फक्त समाजशास्त्राच्या मूलभूत चौकटीत न बसविता त्याला मानसशास्त्राची जोड देण्यास आंतरक्रियावादाचे स्थान महत्वाचे मानले जाते.

समाजीकरणाच्या प्रक्रियेत प्रतिकात्मक आंतरक्रियावादाचे स्थान सर्वात महत्वाचे आहे. कारण व्यक्तीमत्वाच्या विकासाच्या प्रक्रियेत मन, स्वत्वव जाणिवा यांचे मूल्यमापन सामाजिकदृष्ट्या विशद करण्याचा प्रयत्न सी. एच्. कूले, व जॉर्ज मीड यांनी केलेला आहे.

याच समाजीकरणाच्या प्रक्रियेतील संस्कार व संस्कृती या मूलभूत घटकांच्या अन्ययार्थ विशद करण्यात प्रतिकात्मक आंतरक्रियावाद उपयुक्त ठरणारा सिद्धांत म्हणून ओळखला जातो. मानवाच्या सभोवतालच्या सामाजिक विश्वात ज्या सांस्कृतिक घटना सातत्याने घडत असतात. त्याचा आशय जाणून घेण्याकडे आंतरक्रियावादाने भर दिलेला आहे.

प्रतिकात्मक आंतरक्रियेच्या प्रक्रियेत विचारवंतांनी प्रतिकात्मक घटकावर जो विशेष भर दिलेला आहे. त्यामुळे समाजाचे अस्तित्व कायम टिकविण्यास मदत होणार आहे. कारण प्रतिकांच्याबद्दल जी

आत्मीयता व पावित्र्य समाजात निर्माण झालेले असते त्यामुळे सामाजिक ऐक्य दृढभूल होण्यास मदत होते.

**लोकान्वय पद्धत** (Ethnomethdology)

सामाजिक घडामोडीमधील वास्तवता जाणून घेण्यासाठी समाजशास्त्रात अनेक पारंपारिक अभ्यास पद्धतीचा अवलंब विविध समाजशास्त्रज्ञांनी केलेला आहे. नव्या अभ्यास पद्धतीची गरज लक्षात घेऊन हेरॉल्ड गार्न फिंकेल या अमेरिकन समाजशास्त्रज्ञाने एक नवी अभ्यास पद्धत शोधून काढली. त्यालाच त्यांनी Ethnomethdology अशी संज्ञा वापरली.

येल विद्यापीठीत सामान्य लोक संस्कृतीच्या संकराचा अभ्यास करीत 'Ethnomethdology' असताना हा शब्द प्रथमतःगार्न फिंकेल यांनी वापरला. 'Ethno' या शब्दाचा अर्थ म्हणजे व्यक्तीला आपल्या समाजविषयी प्राप्त झालेले व्यावहारिक ज्ञान होय व 'Methdology' हा शब्द लोक (Folk) अभ्यासाच्या व्यावहारिक पद्धती (Commonsense Method) या संदर्भात गार्न फिंकेल यांनी वापरलेला आहे. या व्युत्पत्तीवरून व्यावहारिक अभ्यास पद्धतीचा वापर करून व्यावहारिक ज्ञानाच्या आधारे सामाजिक वास्तवता (Social Reality) शोधून काढण्याची जी पद्धत त्यालाच लोकान्वय पद्धत (Ethnomethdology) असे संबोधले जाते.

**लोकान्वय पद्धतीचे स्वरुप** (Nature of Ethnomethdology)

ज्ञानात्मक समाजशास्त्राचा जसजसा विकास होऊ लागला तसतसा घटनाप्रधान समाजशास्त्र व लोकान्वय पद्धत या नवीन शाखंचा समाजशास्त्रात उदय होऊ लागला. घटनाप्रधान समाजशास्त्राचे जनकत्व एडमंड हसरेल यांच्याकडे तर लोकान्वय पद्धतीचे जनकत्व हेरॉल्ड गार्न फिंकेल यांना जाते.

समाजशास्त्राच्या व्याप्तीच्या अनुषंगाने काही मूलभूत प्रश्न ज्ञानात्य समाजशास्त्राने (Sociology of Knowledge) उपस्थित केलेले आहेत. त्यापैकी सर्वात महत्वाचा प्रश्न म्हणजे कोणत्या आधारावर समाजशास्त्रज्ञ असे गृहित धरतात की, सामाजिक विश्व ही एक वास्तव अनुभूती आहे. त्यामुळे समाजशास्त्रातल्या पारंपारिक विचार प्रणालीना आव्हान देण्याचा प्रयत्न लोकान्वय पद्धतीने केलेला आहे. समाजशास्त्रात द्वंद्वात्मक दृष्टिकोण, समन्वयात्मक दृष्टिकोन, संरचनात्मक कार्यवादी दृष्टिकोण इ. अवलंब करून सामाजिक सत्य शोधण्याचा अनेक समाजशास्त्रज्ञांनी प्रयत्न केलेला आहे. परंतु, या प्रत्येक दृष्टिकोणाच्या अशा काही विशिष्ट मर्यादा आहेत की, त्या मर्यादांना छेद देऊन सामाजिक घडामोडीतील वास्तवता जाणून घेण्याचा प्रयत्न लोकान्वय पद्धत करीत आहे.

लोकान्वय पद्धतीत अनुभवाधिष्ठित विश्लेषणाच्या आधारावर निष्कर्ष काढण्याचा प्रयत्न केला जात असला तरी सूक्ष्मलक्षी (Micro) व दिर्घलक्षी (Macro) अभ्यासाबाबत अन्वय पद्धतीत भिन्नता

आढळते. स्थूलमानाने लोकान्वय पद्धत असे गृहित धरते की, सूक्ष्म अभ्यासाच्या सोयीसाठी लहान समूह हा अधिक उपयुक्त ठरत असतो. दैनंदिन जीवनातील आंतरक्रियेमधील व्यवहारधिष्ठित वास्तवता जाणून घ्यावयाची झाल्यास लोकान्वय पद्धत ही अधिक उपयुक्त ठरते. संरचनात्मक कार्यवादी विचारवंताच्या समाजशास्त्रीय विचारावर जो पगडा दिसून येत होता त्याच्या प्रतिक्रियेतून घटनाप्रधान समाजशास्त्र व लोकान्वयपद्धत यांचा उदय झाला.

**लोकान्वय पद्धतीचे मूलाधार / संकल्पना** (Basic Concept of the Ethnomethodology)

सामाजिक वास्तवता जाणून घेण्यासाठी अन्वयवादी विचारवंत प्रामुख्याने पाच तत्वांचा अवलंब करतात. एखाद्या सामाजिक घटनेचे स्वरुप कसे आहे, ती केव्हा व कशी घडली याचे मूल्यमापन अन्वय पद्धतीत केले जात नसून व्यक्तीकडून उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे त्या घटनेचा अन्वयार्थ विशद करण्याचा प्रयत्न अन्वय पद्धतीत केला जातो. एकाच घटनेकडे प्रत्येक व्यक्तीचा पाहण्याचा दृष्टिकोन भिन्न-भिन असल्यामुळे त्याचा अन्वयार्थ व्यक्तीनुसार बदलत जात असतो. व्यवहारिक ज्ञानाच्या आधारावर अन्वार्थात जी मतभिन्नता आढळून येते, तोच संदर्भ गृहीत धरून सामाजिक वास्तवता जाणून घेण्याचा प्रयत्न लोकान्वय पद्धतीत केला जातो.

**१) निर्देशांकता** (Indexicality)

एखाद्या सामाजिक घडामोडीमधील सामाजिक वास्वता जाणून घ्यावयाची झाल्यास भाषेचे माध्यम हे नेहमीच अवलंबावे लागते. सामाजिक वास्तवतेचा अन्वयार्थ हा भाषेच्या माध्यमातूनच प्रकट होत असतो. एवढेच नव्हे तर सामाजिक आंतरक्रियेचे जाळे भाषेमुळेच विस्तारीत होत असते. म्हणून भाषेची वाक्यरचना, त्यात वापरले जाणारे शब्द प्रयोग यांचे जोपर्यंत आकलन होत नाही तोपर्यंत दोन किंवा दोनपेक्षा अधिक व्यक्तीमधील संवांदाचा अन्वयार्थ विशद करणे अत्यंत कठीण आहे. म्हणून सामाजिक वास्तवता ही भाषेशिवाय जशी समजून घेता येत नाही तशीच ती व्यक्तही करता येत नाही. गार्न फिंकेल यांना लोकान्वय पद्धती शास्त्राचे जनक म्हणतात.

गार्न फिंकेल यांनी लोकान्वय पद्धतीत भाषिक व व्यावहारिक संदर्भावर विशेष भर दिलेला आहे. विशिष्ट संदर्भाशी निगडित असणाऱ्या विशिष्ट घटनांचा अन्वयार्थ विशद केल्याशिवाय घटनेमधील वास्तवता जाणून घेता येत नाही. व त्यासाठी भाषेचे आकलन होणे अत्यंत जरुरीचे आहे. घटनेकडे पाहण्याचा व्यक्तीचा दृष्टिकोण जरी भिन्न असला तरी विशिष्ट शब्द अथवा वाक्य प्रयोगांचा अवलंब करुन विशिष्ट अर्थ भाषेच्या माध्यमातून प्रकट होत असतो. म्हणून लोकान्वय पद्धतीत भाषेचे संपूर्ण ज्ञान माहित असणे जरुरीचे आहे.

भाषेच्या संदर्भाबरोबरच व्यावहारिक संदर्भही अभ्यासकाला जाणून घ्यावे लागते. विशिष्ट स्थल, काल व प्रदेशानुसार घटनेचा संदर्भ बदलत जात असतो. त्यामुळे समाजाला व त्या समाजातील

दैनंदिन व्यवहार पद्धतीला समजून घेणे हे आवश्यक असते. एखादी किरकोळ स्वरुपाची घटना देखील व्यापकरुप धारण करू शकते. व्यावहारिक ज्ञानाच्या आधारावर गंभार अथवा किरकोळ स्वरुपाच्या घटनेचा अन्वयार्थ जसजसा स्पष्ट केला जातो, तसतसे ज्ञानाची कार्यक्षेत्रे विकसित होत जातात.

**२) व्यावहारिक तर्कसंगतता** (Practical Reasoning)

गार्न फिंकेल यांनी लोकान्वय पद्धतीचा दूसरा मूलाधार म्हणून व्यावहारिक तर्कसंगतता मानलेली आहे. या ग्रंथात गार्न फिंकेल म्हणतात की, समाजातील प्रत्येक व्यक्ती ही समाजशास्त्रज्ञ असते. सामाजिक परिस्थितीचे आकलन दैनंदिन जीवनात व्यक्तीला जितके होत असते त्या परिस्थितीला अनुसरून व्यावहारिक ज्ञानाच्या आधारावर परिस्थितीशी समाजोजन करण्याचा प्रत्येक व्यक्ती प्रयत्न करीत असते. व्यक्तीचे व्यवहारिक ज्ञान हे पुस्तक स्वरुपाचे नसून ते दैनंदिन जीवनातल्या अनुभवावर आधारलेले असते.

गार्न फिंकेल यांच्यामते, समाजशास्त्राच्या अध्ययन पद्धतीत व्यावहारिक तर्कसंगततेला कोणतेच स्थान प्राप्त करून दिलेले नसल्याने सामाजिक घडामोडीमधील वास्तवता जाणून घेण्यास अडथळा निर्माण होतात. संशोधनात्मक अध्ययन पद्धतीच्या विशिष्ट चाकोरित राहून कार्यकारणविषयक संबंध जाणून घेण्याचा समाजशास्त्रात विशेष प्रयत्न केला जातो. परंतु समाजातील काही घटना अशा काही पद्धतीने घडत जातात की जेथे संशोधनात्मक अध्ययन पद्धत लागू पडत नाही. अशा परिस्थितीत अनुभ-प्रामाण्यतेवर आधारलेल्या व्यावहारिक ज्ञानाचा वापर करून सामाजिक सत्य शोधण्याचा प्रयत्न करणे उचित ठरते. म्हणून लोकान्वय पद्धत व्यावहारिक ज्ञानावर विशेष भर देवून सत्याचा शोध घेण्याचा प्रयत्न करते.

**३) व्यावहारिक शब्द संग्रहाला अन्वयार्थ प्राप्त करून देण्याची पद्धत** (Glossing Practices)

दैनंदिन जीवनात वापरल्या जाणाऱ्या व्यावहारिक शब्द प्रयोगांना विशिष्ट अर्थ प्राप्त होत असल्याने व्यावहारिक शब्द प्रयोगांचा संग्रह अन्वयार्थासह ग्रंथीत करण्यावर अन्वय पद्धत भर देते. वैयक्तिक व सामाजिक व्यवहारात अनेक म्हणींचा व वाक्यप्रचारांचा अवलंब केला जात असल्याने त्यांना एक विशिष्ट गार्भितार्थ प्राप्त झालेला असतो. म्हणी व वाक्यप्रचार हे दैनंदिन व्यवहारातून उदयास येत असल्याने त्यांना विशिष्ट संदर्भ प्राप्त झालेले असतात. संक्षिप्त स्वरुपातून टीकात्मक अथवा विडंबनात्मक स्वरुपातून सामाजिक सत्याचा मतितार्थ, म्हणी, वाक्प्रचार, व्यावहारिक शब्द प्रयोगात समाविष्ट झालेला असतो. विशेषतः पारंपारिक समाज व्यवस्थेत या शब्द प्रयोगांचा दैनंदिन जीवनात अवलंब केला जातो. सामाजिक व्यवहारात वापरल्या जाणाऱ्या शब्द प्रयोगांच्या संकलनावर लोकान्वय पद्धतीत भर दिला जातो.

**४) पुनर्चिंतन** (Reflexivity)

लोकान्वय पद्धतीत सामाजिक घडामोडीबाबत अथवा परिस्थितीबाबत कोणताही लिखित पुरावा अपेक्षित धरला जात नाही. परंतु, घटनेबाबत सातत्याने पुनर्चिंतन अथवा पुर्नविचार करण्यावर भर दिला जातो. परिस्थितीची जाणीव व्यक्तीला जितकी अधिकाधिक होत जाते तितक्या अधिकाधिक प्रमाणात त्या परिस्थितीचे अत्यंत बारकाईने तो मनन किंवा चिंतन करीत राहतो. व त्यातून व्यक्तीची टिकात्मक परिक्षण करण्याची क्षमता वाढत जाते. अन्वय पद्धतीत वैचारिक पुनर्चिंतनास जे विशेष स्थान प्राप्त करून दिले त्यातून नव्या विचारांची जाणीव होऊ शकते. पारंपारिक समाजशास्त्रज्ञ पुनर्चिंतनावर फारसा भर देत नाहीत. एखादी घटना घटना पाहिल्याने, काही माहिती ऐकल्याने मानवी मनात त्या घटनेबाबत विचारमंथन सुरु होते व त्यातून काही नवीन विचारांची देवाण-घेवाण सुरु होत जाते. समाजशास्त्र हे चिंतनशील मानव्यशास्त्र असल्यामुळे बदलत्या काळानुसार, परिस्थितीनुसार घडणाऱ्या घडामोडीचे चिंतन, मनन करून सामाजिक वास्तवतेचा शोध घेण्याचा सतत प्रयत्न करीत असते. सामाजिक यथार्थता ही पुनर्चिंतनातून स्पष्ट होत असल्याने लोकान्वय पद्धतीत पुनचिंतनाला अग्रक्रम दिला जातो.

**५) विवेकशील जबाबदारीत्व** (Rational Accountability)

जोपर्यत सामाजिक घडामोडीचे वैज्ञानिक मूल्यांच्या आधारावर क्रमबद्धपणे विश्लेषण केले जात नाही तोपर्यंत समाजिक सत्याचा शोध घेणे अत्यंत कठीण जाते. सर्व सामजिक शास्त्रे मानव निर्मित स्वरुपाच्या सामाजिक घडामोडीशी निगडीत असल्याने व अशा घटनांत प्रत्येक व्यक्ती प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष सहभागी होत असल्याने आपल्या विवेकशीलतेतून त्या घटनांचा अन्वयार्थ विशिष्ट शब्दप्रयोगांचा अवलंब करून आपल्या भाषेतून प्रकट करीत असते. विवेकशीलता हे मानवाचे प्रमुख लक्षण असल्याने तो अत्यंत जबाबदारीने घटनेच्या संदर्भात भाषेच्या माध्यमातून आपले मत प्रकट करीत असतो. घटनेकडे व्यक्तीचा पाहण्याचा दृष्टिकोन वैशिष्ट्यपूर्ण व वेगळा असल्यामुळे विशिष्ट अर्थ प्राप्त करून देण्याचा प्रयत्न मानवाकडूनच घडत असतो. म्हणून लोकान्वय पद्धतीत लोकांच्या जबाबदार व विवेकशील विधानांना विशेष महत्व प्राप्त करून दिले आहे.

**लोकान्वयपद्धतीची वैशिष्टे** (Characterstics of Ethnomethodology)

लोकान्वय पद्धतीची वैशिष्टे स्थूलमानाने पुढीलप्रमाणे विशद करता येतील.

१) अन्वय पद्धत सूक्ष्मलक्षी अध्ययनावर भर देते. एखाद्या घटनेची सत्यता आजमावते वेळी अध्ययनाचे कार्यक्षेत्र लहान ठेवण्याचा प्रयत्न केला जातो.

२) दैनंदिन जीवनात घडणाऱ्या सामान्य अथवा असामान्य, किरकोळ अथवा गंभीर स्वरुपाच्या घटनांचे अध्ययन करण्याकडे अन्वय पद्धतीत भर दिला जातो.

३) सामाजिक वास्तवता परिवर्तनशील स्वरुपाची असते. कारण सामाजिक वास्वतेचा आशय मानव निर्मित स्वरुपाचा असतो.

४) विविध प्रकारच्या सामाजिक घडामोडींचा परिणाम सामाजिक मूल्यावर, सामाजिक आदर्शावार व समाज रचनेवर सातत्याने होत असतो. अशा सामाजिक घडामोडींचा अभ्यास त्याच समाजातील व्यक्तीनी अथवा संस्थानी करावा अशी अपेक्षा अन्वय पद्धत व्यक्त करते.

५) लोकान्वयवादी विचारवंतांचा भर सामाजिक गतिशीलतेवर अधिक दिसून येतो. गतिशीलता हा निसर्गाचाच नियम असल्याने सामाजिक प्रगतीच्या अथवा समाज विकासाच्या प्रक्रियेला गतिशील घटक हेच विशेष कारणीभूत ठरत असतात.

६) सामाजिक घडामोडींचे अन्वय पद्धतीने अध्ययन करतेवेळी स्थल, काल, परिस्थिती भाषा इ. घटकांच्याकडे विशेष भर दिला जातो. त्यामुळे संदर्भासहित आवश्यक असणारी माहिती गोळा करण्यावर लोकान्वय पद्धतीत भर दिला जातो.

७) अभ्यासकाचा सामाजिक घडामोडीकडे पाहण्याचा दृष्टिकोण कोणता आहे, त्याचा अध्ययनाचा हेतू कोणता आहे यावर अन्वय पद्धत भर देते. म्हणून दृष्टिकोण व हेतू यांना प्राधान्य देऊन सामाजिक घडामोडींचे अध्ययन लोकान्वय पद्धतीत केले जाते.

८) भाषिक व शाब्दीक स्वरुपातून दैनंदिन मानवी व्यवहार घडत असल्याने लोकांचे सामान्य ज्ञान आणि व्यावहारिक शहाणपण यांच्या आधारावर सामाजिक वास्तवतेचा शोध घेण्याचा प्रयत्न लोकान्वय पद्धतीत केला जातो.

९) लोकान्वय पद्धत ही काही गृहितांवर आधारलेली आहे. व त्यात प्रामुख्याने व्यक्तीने वर्तनविषयक जाणिवांबद्दलची गृहित संकल्पना यांचा अंतर्भाव होतो.

१०) व्यक्तिनिष्ठ वास्तवता म्हणजे व्यक्तीने स्वीकारलेल्या श्रद्धा, तिला आलेले अनुभव, तिच्या आकांक्षा मधून तयार झालेल्या संकल्पनांचा अतर्भाव होतो. म्हणून स्वानुभव हीच व्यक्तिनिष्ठ वास्तवतेची खरी कसोटी आहे.

११) लोकान्वय पद्धतीत निगमवात्मक तंत्राचा विशेष अवलंब केला जातो. मात्र वैज्ञानिक कसोट्या मानव समूहाच्या अभ्यासाला, मानवाच्या सामाजिक वर्तन प्रक्रियेला लागू करता येणे अत्यंत कठीण आहे. तरीसुद्धा विज्ञान व तत्वज्ञान यांच्याजवळ आधुनिक समाजशास्त्राला नेण्याचा प्रयत्न अन्वयवादी समाजशास्त्रज्ञांनी केलेला आहे.

**संरचनात्मक– कार्यवाद** (Structural Functionalism)

वेगवेगळ्या काळातील समाज जीवनाचे, सामाजिक घडामोडीचे व सामाजिक समस्यांचे वैज्ञानिक पद्धतीने अध्ययन करण्याचे कार्यक्षेत्र समाजशास्त्रज्ञाने निवडलेले आहे. परंतु त्यासाठी अभ्यासक अनेक अभ्यास पद्धतीचा व अध्ययन तंत्रांचा सुयोग्य पद्धतीने अवलंब करून सामाजिक वास्तवतेचा शोध घेण्याचा प्रयत्न करतात. या अनेक अभ्यास पद्धतीपैकी संरचनात्मक कार्यपद्धत ही एक महत्वाची अध्ययन पद्धत म्हणून समाज शास्त्रात ओळखली जाते.

संरचनात्मक कार्यवादी दृष्टिकोणात प्रामुख्याने दोन मूलभूत संकल्पना अंतर्भूत झालेल्या आहेत. यापैकी संरचनात्मक घटकांत एखाद्या घडामोडीला जबाबदार असणाऱ्या घटकांचा शोध घेवून त्यातील परस्पर संबंध जाणून घेण्याचा प्रयत्न केला जातो. तर कार्यात्मक घटकात संबंधित घटकाचे अस्तित्व कायम टिकवून परस्परातील आंतरक्रियेचा क्रियात्मक स्वरुपातून अभ्यास केला जातो. रचना व कार्य या दोन मूलभूत संकल्पना परस्परावलंबी स्परुपाचा आहेत.

मानव समाजाचे अध्ययन करतेवेळी काही समाजशास्त्रज्ञांनी फक्त संरचनात्मक (Structural approach) दृष्टिकोणाचा अवलंब केला. तर काही समाजशास्त्रज्ञांनी फक्त कार्यात्मक दृष्टिकोणाचा (Functional approach) पुरस्कार केला. परंतु, या सर्व समाजशास्त्रज्ञांना असे आढळून आले की, सामाजिक घडामोडीचा व समाज व्यवस्थेचा अभ्यास फक्त रचनात्मक अथवा फक्त कार्यात्मक स्वरुपातून करण्याऐवजी रचनात्मक व कार्यात्मक अशा दोन्ही दृष्टिकोणातून केल्यास समाज व्यवस्थेचे आंतरिक स्वरुप स्पष्ट होण्यास मदत होईल या दृष्टिने संरचनात्मक कार्यवादाचा संयुक्तरित्या समाजशास्त्रांत पुरस्कार करण्याकडे समाजशास्त्रज्ञांची प्रवृत्ती विकसित होऊ लागली. त्यात प्रामुख्याने इमाईल डरखीम, मॅलिनोस्की, रॅडक्लीफ ब्राऊन इ. नी समाजशास्त्रात व सामाजिक मानवशास्त्रात संरनात्मक कार्यवादाचा पुरस्कार केला. आधुनिक काळात रॉबर्ट मर्टन व टॉलकॉट पारसन्स या समाजशास्त्रज्ञांनी संरचनात्मक कार्यवादाचा विशेष अवलंब केला.

**संरचनात्मक– कार्यवादी दृष्टिकोणाचा अर्थ** (Meaning of structural functional perspective)

समाज व्यवस्थेतील प्रत्येक घटक अन्य घटकांशी निकटचा संबंध प्रस्थापित करीत असल्याने सुदृढ समाज व्यवस्थेचा उदय होत असतो. समाज ही एक एकात्म व सावयवी अशी सूक्ष्म व व्यापक स्वरुपी व्यवस्था आहे. समाजाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी त्या समाजातील घटक नेहमीच कार्यशील असतात. ज्याप्रमाणे स्पेन्सरनी आपल्या सेंद्रिय सिद्धांत शरीररचनेतील प्रत्येक अववय अथवा इंद्रिय हा शरीररचनेचा अविभाज्य घटक असतो व त्या प्रत्येक घटकांचा अन्य घटकांशी निकटचा संबंध असतो. या प्रत्येक घटकांना शरीर रचनेच्या अस्तीत्वासाठी विशिष्ट प्रकारची कार्ये सातत्याने करावी

लागतात. त्याचप्रमाणे समाजरुपी शरीराचे अस्तीत्व टिकविण्यासाठी त्या समाजातील विविध घटकांना परस्परांच्या संबंधातून ठराविक कार्ये करावी लागतात.

परंतु, संरचना व कार्ये याची निश्चित व्याख्या करणे फार कठीण आहे. स्थूलमानाने अनेक घटकांच्या माध्यमातून संरचना तयार होत असते. या संरचनेत प्रत्येक घटकाला विशिष्ट स्थान प्राप्त झालेले असते. त्यांच्यात विशिष्ट सहसंबंध व निर्माण होत असतात. प्रत्येक घटक विशिष्ट प्रकारची कार्ये करीत असल्याने त्यांच्यात क्रियात्मक स्वरुपाचे संबंध हे त्या संरचनेचे अविभाज्य अंग म्हणून संबोधले जाते. यावरुन संरचनेचा मूलभूत अर्थ विभिन्न परस्परावलंबी घटकातील क्रियाशील सहसंबंधाशी निगडीत असतो. या क्रियाशील संबंधामुळे ती संरचना दिर्घकाळ टिकत असते.

**संरचनात्मक कार्यवादी दृष्टिकोणाची वैशिष्टे** (Characterstics of Structural functional perspective)

१) समाजाच्या अंतर्गत घटकांचे किंवा समाज व्यवस्थेचे सूक्ष्मदृष्ट्या अध्ययन करण्याचा प्रयत्न या दृष्टिकोणात केला जातो. जसे एखाद्या निकामी सुट्या भागाचा संपूर्ण यंत्राचा कार्यपद्धतीवर अनिष्ट परिणाम होतो. त्याचप्रमाणे सामाजिक संतुलन घडविणाऱ्या यंत्ररुपी एखादा सामाजिक सुटा भाग शोधून काढण्याचा प्रयत्न संरचनात्मक कार्यवादी दृष्टिकोणात केला जातो.

२) संरचनात्मक प्रकार्यवादी दृष्टिकोण निरंतर चालणाऱ्या सामाजिक प्रक्रियेचे अध्ययन करीत असतो. समाजव्यवस्थेतील विभिन्न घटकात कितीही परिवर्तन होत असली तरी सामाजिक प्रक्रिया ही अविरतपणे चालू असते.

३) समाज व्यवस्थेच्या प्रक्रियेत आवश्यक असणाऱ्या घटकांच्यामध्ये समतोलत्व असणे जरुरीचे असते. समाजव्यवस्थेत होणारा बिघाड असमान घटकामुळे होत असतो. व त्याचा अनिष्ट परिणाम संपूर्ण समाज व्यवस्थेला भोगावा लागत असल्याने संरचनात्मक कार्यवादी दृष्टिकोण सामाजिक समतोलत्व प्रस्थापित करण्याकडे विशेष भर देतो.

४) संरचनात्मक -कार्यवादी अमर्थकांच्या मते, समाज रचनेची चौकट स्थिर व कायम स्वरुपाची जरी असली तरी त्या समाज व्यवस्थेची कार्ये गतिशील स्वरुपाची असतात. समाज रचनेची चौकट कायम टिकवून कार्यात्मक स्वरुपाचा पोषक बदल त्या समाज रचनेची चौकट कायम टिकवून कार्यात्मक स्वरुपाचा पोषक बदल त्या समाज व्यवस्थेला नेहमीच करावा लागतो. मात्र काही विचारवंतांच्या मते, कार्यात्मक स्वरुपाच्या बदलामुळे संरचनात्मक व संरचनात्मक स्वरुपाच्या बदलामुळे कार्यात्मक स्वरुपाचा बदल सातत्याने होत असल्याने समाज रचनेची चौकट कितपत स्थिर व कायम राहू शकते याबद्दल ते साशंक आहेत.

५) संरचनात्मक प्रकार्यवाद हा प्रकार्यापेक्षा संरचलेला अग्रक्रम देतो, सामाजिक संरचना कायम टिकविणाऱ्या सक्षम घटकांच्या अध्ययनाकडे हा दृष्टिकोण विशेष भर देतो.

६) संरचनात्मक प्रकार्यवादी दृष्टिकोणात लघुस्तरीय व बृहतस्तरीय अशा दोन्ही स्तरावर सामाजिक घडामोडीचे अध्ययन केले.

७) संरचनात्मक प्रकार्यवादी समर्थकांच्या मते, सामजिक संरचना ही स्थिर असल्यामुळे सामाजिक वास्तवता देखील स्थिर स्वरुपाची असते. सामाजिक वास्तवतेचा आशय स्थिर स्वरुपाच्या संराचनेतून विशद करण्याचा प्रयत्न संरचनात्मक प्रकार्यवादी समर्थक करीत असतात.

८) सामाजिक घडामोडीच्या परिणयांची विशालता व तीव्रता लक्षात घेतल्यास बृहत अध्ययनाची पद्धत (Macro Study) हीच उपयुक्त ठरते. परंतु, कोणती ही सामाजिक घटना समाज रचना, सामाजिक आंतरक्रिया, सामाजिक संबंध, व्यक्तीचे सामाजिक वर्तन इ. अनेक घटकांच्या परस्पर संबंधातून घडत असल्याने लघुस्तरीय पातळीवर अध्ययन करण्याची आवश्यकता संरचनात्मक प्रकार्यवादातून व्यक्त होते. म्हणून संरचनेचा अभ्यास लघुस्तरावर व प्रकार्याचा अभ्यास बृहतस्तरावर करण्याचा या दृष्टिकोणात भर दिला जातो.

९) संरचनात्मक प्रकार्यवादी दृष्टिकोण परिवर्तनापेक्षा स्थैर्याला विशेष महत्व देतो. संरचनेच्या चौकटीमुळेच व्यक्तीच्या बहिर्गत वर्तनावर नियंत्रण पडत असल्याने सामाजिक स्थिरता प्राप्त होते. व या स्थैर्यामुळेच सामाजिक संघटनेला बळकटी येते.

१०) व्यक्तीपेक्षा समाजाच्या संरचनेचे विशेष अध्ययन या दृष्टिकोणात केले जाते. व्यक्ती हा जरी समाजाचा अविभाज्य घटक असला तरी व्यक्तीला गौण स्थान देऊन समाज रचनेला अग्रक्रम देण्याचा प्रयत्न संरचनात्मक कार्यवादी दृष्टिकोणात केला जातो.

११) समाज रचना हीच समाजाची क्रियाशील व्यवस्था आहे, असे मानून सामाजिक वास्तवतेचा शोध रचनात्मक व कार्यात्मक अशा दोन्ही स्वरुपातून घेण्याचा प्रयत्न संरचनात्मक प्रकार्यवादाने केलेला आहे.

१२) संरचनात्मक कार्यवादी पद्धत ही वस्तुनिष्ठ अध्ययनाची पद्धत म्हणून मान्यता पावलेली आहे. लघु व बृहत स्तरावर अध्ययन तंत्राचा अवलंब केला जात आहे. प्रशासन, नोकरशाही, जीवशास्त्र, पदार्थविज्ञान इ. अनेक क्षेत्रात रचनात्मक कार्यपद्धतीचा अवलंब केला जाऊ लागल्याने त्याचे कार्यक्षेत्र व्यापक बनत चालेले आहे.

वरील विवेचनावरून असे दिसून येते की संरचना (Structural) व प्रकार्य (Function) या दोन्ही संकल्पना जरी वेगळ्या असल्या तरी त्या परस्परावलंबी व परस्परपूरक आहेत. एवढेच नव्हे तर

संरचना ही एक क्रियाशील व्यवस्था असल्याने सामाजिक घडामोडींचा व सामाजिक समस्यांचा अभ्यास रचनात्मक व कार्यात्मक अशा दोन्ही स्वरुपातून संयुक्तरित्या करण्यावर संरचनात्मक कार्यवादी समर्थकांनी भर दिलेला आहे.

**सरंचनात्मक कार्यवाद्यांचे योगदान** (Contribution of Structural Functionalists)

संरचनात्मक कार्यवादी दृष्टिकोणाची संकल्पना ही आधूनिक काळात विकसित झालेली नसून समाजशास्त्राचा वैज्ञानीक पद्धतीने अभ्यास करण्यास जेव्हा सुधारणा झाली तेव्हापासून रचनात्मक कार्यवादासंबंधीचे विविचेन अनेक समाजशास्त्रज्ञांनी आपआपल्या समाजशास्त्रीय विवारात केलेले आहे.

**चार्लस डार्विन** - यांनी जीवशास्त्राचा विकास विशद करतेवेळी एकपेशीच प्राण्यापासून बहुपेशीच प्राण्यांचा व सस्तन प्राण्यापासून मानव प्राण्यापर्यतचा विकास रचनात्मक व कार्यात्मक पद्धतीतून केलेला आहे. उत्क्रांतीची मूलभूत संकल्पना स्पष्ट करतेवेळी जन्म, वाढ, पुनरुत्पादन व मरण ही जैविक प्रक्रिया कोणत्याही सेंद्रीय घटकाला सार्वत्रिक स्वरुपातून लागू पडते, असे डार्विन यांचे मत आहे. एवढेच नव्हे तर या सेंद्रिय घटकांचा विकास साध्याकडून क्लिष्टतेकडे होत गेलेला आहे.

जीवनशास्त्रीय उत्क्रांतीच्या आधारावर हर्बर्ट स्पेन्सरनी सामाजिक उत्क्रांतीची कल्पना विशद केली. जीवन व समाज यांच्यातील फरक व साम्य लक्षात घेवून त्यांनी सेंद्रीय सिद्धांत विशद केला. मानव समाजाचा विकास हा देखील साध्याकडून क्लिष्टतेकडे होत चालला आहे. अशा या समाजरुपी प्राण्याला आपले अस्तित्व व सातत्य टिकविण्यासाठी विविध इंद्रियांना पोषक स्वरुपाची कार्ये करावी लागतात. मानव समाजाच्या रचनेत व कार्यपद्धतीत होत जाणाऱ्या बदलांचा अभ्यास स्पेन्सरनी केल्यामुळे संरचनात्मक प्रकार्यवादी दृष्टिकोणाला प्रणेता म्हणून स्पेन्सर यांची गणना होऊ लागली.

**ऑगस्त कॉम्त** - यांनी (Positive Philosophy) या ग्रंथात समाजशास्त्राचा अभ्यास विशद करतेवळी सामाजिक स्थितीशास्त्रावर व साामजिक गंतिशास्त्रावर भर दिलेला आहे. सामाजिक गतिशास्त्रात समाज रचनेच्या अध्ययनावर भर देते. सामाजिक गतिशास्त्रात समाज विकासाचा व सामजिक प्रगतीचा अंतर्भाव केलेला आहे. समाजरचनेत स्थिर घटकाबरोबर काही अस्थिर घटकही अस्तीत्वात असतात. परिस्थिती व काळानुसार होणारा बदल हा समाजरचनेच्या अस्थिर घटकात होत असतो. परंतु, त्यामुळे संपूर्ण समाज रचना उलथून पडत नाही. कारण सांस्कृतिक, मूल्यात्मक व काही आदर्शवादी मूल्यावर समाज रचनेच्या स्थिर घटकाची उभारणी झालेली असल्यानेच सामाजिक स्थैर्य प्रस्थापित होण्यास स्थिर घटकाची समाजव्यवस्थेला गरज असते.

कार्ल मार्क्सचा सामाजिक स्तर रचनेकडे पाहण्याचा दृष्टिकोण वर्गीय हितसंबंधावर आधारलेला होता. पिळवणुकीपासून कनिष्ठांनी स्वतःचे संरक्षण करण्यासाठी आत्मिक बल संघटित करून उघड

संघर्ष करण्याचे आवाहन मार्क्सनी केलेले आहे. व त्या संघर्षातून वर्गविहीन समाज व्यवस्था निर्माण करण्याचे स्वप्न त्यांनी निश्चित केले. श्रमाशिवाय कोणत्याही वस्तूंची निर्मिती होत नाही हे सामाजिक सत्यमार्क्सनी विशद केले. परंतु आर्थिक स्थितीवर आधारलेल्या समाजरचनेत श्रमाला योग्य ती आर्थिक व सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याचा प्रयत्न वरीष्ठ वर्ग करून देत नाही व त्यामुळे आर्थिक स्वरुपाचे संघर्ष समाज व्यवस्थेत नेहमीच घडत जातात. समतावादी समाज व्यवस्था निर्माण करण्याच्या महत्वकांक्षेतून समाजशास्त्रीय विचारांची मांडणी मार्क्सनी केली.

संरचनात्मक प्रकार्यवादी विचारसरणीत मोलाची भर ईमाइल उरखीम या विचारवंताने केली. आपल्या श्रमविभाजनाच्या सिद्धांतात प्राचीन काळात लैगिक घटकाच्या आधारावर गरजांची पूर्तता करण्यासाठी, स्त्री-पुरुषांच्यात कामाची वाटणी केली जात असे. परंतु, समाजाची प्रगती क्लिष्टतेकडे जसजशी होऊ लागली तसतसे श्रमविभाजनाच्या तत्वाबरोबरच श्रमाच्या विशेषीकरणाला चालना मिळू लागली. कारण वाढत्या लोकसंख्येमुळे समाजाच्या गरजा वाढू लागल्याने अनेक व्यावसायिक गट विशेषीकरणातून निर्माण झाले. प्रत्येक गटाचे हितसंबंध अन्य गटाच्या हितसंबंधाचा आड येऊ लागल्याने आणि स्पर्धात्मक संबंध विकसित होऊ लागल्याने त्यांच्यात सामाजिक कलह निर्माण होऊ लागले. याचा परिणाम सामाजिक ऐक्यावर व सामाजिक संघटनेवर होऊ लागला.

श्रमविभाजनाचे तत्व हे सामाजिक ऐक्यासाठी आवश्यक असते, श्रमविभाजनाचे स्वरुप विशद करताना डरखीमने असे मत व्यक्त केले आहे की, यांत्रिक एकत्मतेकडून (Machanical Solidarity) जैविक एकात्मता (Organic Solidarity) निर्माण करण्याचे मूलभूत उद्दिष्ट हे श्रमविभाजनाचे असते. यांत्रिक एकात्मता ही समाजाच्या समा मूल्यावर आधारलेली असते. व्यक्तीचे व्यक्तीमत्व हे समाजाच्या सामूहिक व्यक्तीमत्वात समाविष्ट झालेले असल्याने व्यक्तीला स्वतंत्र व्यक्तीमत्व प्राप्त होत नाही. समान भाषा, समान धर्म, समान वंश, समान मूल्ये व समाजाची सामूहिक इच्छा ही यांत्रिक एकात्मतेची वैशिष्टे त्यांनी मांडलेली आहेत. याउलट जैविक एकात्मता ही विविधतेतून एकता निर्माण करण्याच्या तत्वाशी निगडीत आहे. समान स्वरुपाचा वंश अथवा भाषा, अथवा धर्म हे कोणत्याच राष्ट्रात आढळत नाहीत. जसजसा समाजाचा विस्तार वाढू लागला, व्यवसायाच्या विशेषीकरणाला जसजशी चालना मिळू लागली. तसतशी भाषिक, वांशिक, धार्मिक आणि व्यावसायिक वैविध्यता प्रत्येक समाजात आढळून येऊ लागली. व अशा विविधतेतून एकसंघ समाज निर्माण होणाऱ्या समाज व्यवस्थेला डरखीम यांनी जैविक एकात्मता अशी संज्ञा वापरली आहे. म्हणून संरचनात्मक कार्यवादी दृष्टिकोणात डरखीमचा श्रमविभाजनाचा सिद्धांत महत्वाचा मानला जातो.

सामाजिक संरचनेचा व प्रकार्यवादाचा अभ्यास करतेवेळी सामाजिक संबंधाच्या अध्ययनाकडे चार्लस कूनेनी विशेष भर दिलेला आहे. प्राथमिक व दुय्यम स्वरुपाच्या संबंधावर कूलेनी विशेष भर

दिलेला आहे. प्राथमिक व दुय्यम स्वरुपाचे समूह समाज व्यवस्थेत अस्तीत्वात असतात. प्राथमिक स्वरुपांच्या गरजांच्या पूर्ततेसाठी घनिष्ठ स्वरुपाचे प्राथमिक संबंध आवश्यक आहेत.

व्यक्तीमत्वाच्या सर्वांगीण विकासासाठी दुय्यम स्वरुपाच्या समूहांची ही कूलेनी आवश्यकता स्पष्ट केलेली आहे. हे समूह आकाराने मोठे व औपचारीक दुय्यम संबंध असतात. गरजांची वैविध्यता लक्षात घेवून दुय्यम स्वरुपाचे समूह आवश्यक भासत असतात. असे दुय्यम समूह आधुनिक काळात दिवसेदिवस वाढत चालले आहेत. समाजाची संरचना अनेक समूहानी मिळून बनलेली असल्याने या प्रत्येक समूहास कर्तव्यपरत्वेच्या जाणिवेतून विविध प्रकारची समाजपयोगी स्वरुपाची कार्ये करावी लागतात.

सामाजिक संरचनात्मक कार्यवादाचे विवेचन करतेवळी विल्फ्रेडो पॅरेटोनी आंतरक्रियेचे व श्रेष्ट सिद्धांताचे विशेष अध्ययन केलेले आहे. दोन किंवा दोनपेक्षा अधिक व्यक्तीमधील वर्तनविषयक व्यवहारांच्या प्रक्रियेतून आंतरक्रियेचा उदय होत असल्याने मानवी वर्तनामागील प्रेरणांचे अध्ययन करण्यावर पॅरेटोनी भर दिलेला आहे. तर्कसंगत व तर्कविसंगत अशा दोन प्रकारच्या मानवी वर्तनाचे विवेचन पॅरेटोनी केलेली आहे. योग्य साधनांचा विशिष्ट हेतूच्या पूर्ततेसाठी वापर करणे हे तर्कसंगत क्रियेचे वैशिष्ट आहे. याउलट तर्कविसंगत क्रिया मानसिक, भावनिक, विकृत किंवा अर्धविकृत स्वरुपाच्या असल्याने त्याचा अभ्यास मानसशास्त्रीयदृष्ट्या करता येतो. संरचनेचा अभ्यास म्हणजे तर्कसंगत व तर्कविसंगत अशा दोन्ही पद्धतीच्या क्रियेतून निर्माण होणाऱ्या सामाजिक संबंधाचा अभ्यास होय.

कोणतीही समाजरचना ही श्रेष्ठ-कनिष्ठतेच्या तत्वावर विभागलेली असते. श्रेष्ठ श्रेणीतील लोकांचे कनिष्ठ श्रेणीतील लोकांवर नेहमीच वर्चस्व प्रस्थापित झालेले असते. मात्र ही श्रेणी रचना मुक्त व बंदिस्त अशा दोन प्रकारची असते. पैकी आर्थिक घटकांवर आधारलेली श्रेणी रचना मुक्त स्वरुपाची असते. कारण दर्जात्मक स्वरुपाचा बदल हा आर्थिक परिस्थितीत सुधारणा झाल्यानंतर साध्य होऊ शकतो. स्वकतृत्वावर कनिष्ठ स्तरातील व्यक्तीने आपला आर्थिक दर्जा सुधारला की त्याचा अंतर्भाव वरिष्ठ श्रेणीत किंवा वरिष्ठ श्रेणीतील व्यक्तीची आर्थिक परिस्थिती कमकुवत झाली की त्याचा अंतर्भाव कनिष्ठ श्रेणीत होऊ शकतो. यालाच पॅरेटोनी दर्जात्मक गतिशीलता अशी संज्ञा वापरली आहे.

समाज जरी मुक्त अथवा बंदिस्त असला तरी वर्चस्व प्रस्थापित करणारा श्रेष्ठ लोकांचा वर्ग प्रत्येक समाज व्यवस्थेत नेहमीच आढळतो. व त्यास सत्ता, संपत्ती, अधिकार व जातिनिष्ठतेच्या संकल्पना या बऱ्याच अंशी कारणीभूत आहेत. सामाजिक संरचनेचा अभ्यास करतेवेळी सामाजिक संबंधावर प्रभाव टाकणाऱ्या सामाजिक क्रियांच्या अध्ययनाकडे विशेष भर देण्याची आवश्यकता त्यांनी

विशद केली. बंदिस्त स्वरुपाच्या समाज रचनेपेक्षा मुक्त समाज रचनेतील सामाजिक संबंध गतिशील व अधिक कार्याभिमूख असतात. म्हणून समाजाचा रचनात्मक व कार्यात्मकदृष्ट्या अभ्यास करतेवेळी सामाजिक क्रियेतून निर्माण झालेल्या सामाजिक संबंधावर भर देण्याचा प्रयत्न पॅरेटोनी केलेला आहे.

सामाजिक क्रियेच्या संकल्पनेवर मॅक्स वेबरनीही भर दिलेला आहे. बदलत्या सामाजिक व ऐतिहासिक परिस्थितीत मानवी वर्तनात कोणकोणत्या प्रकारचे बदल होतात व ते का होतात याचा अभ्यास समाजशास्त्रास नेहमीच करावा लागतो. सामाजिक क्रिया हीच सामाजिक घडामोडीला विशेष कारणीभूत असल्याने त्याचा आशय जाणून घेणे जरुरीचे असते. मात्र त्यासाठी वैज्ञानिक मूल्यावर आधारलेल्या आदर्श प्रारुपांचा अवलंब केल्यास सामाजिक क्रियेची व घटनेची वास्तवता शोधून काढता येते. आपल्या सामाजिक क्रियेच्या सिद्धांतात वेबरनी असे मत मांडले आहे की, अनेक व्यक्ती एकमेकांच्या संपर्कात जेव्हा येतात तेव्हा त्यांच्या वर्तनात काही बदल होतात. या वर्तनात्मक स्वरुपाच्या बदलातून जी क्रिया अथवा प्रतिक्रिया घडून येते त्यास सामाजिक क्रिया अशी संज्ञा वेबरनी वापरली आहे. प्रत्येक सामाजिक क्रियेमागे विशिष्ट हेतू असतो. तो हेतू साध्य करण्यासाठी प्रत्येक प्रत्येक व्यक्ती सामाजिक संबंधात प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे सहभागी होत असते. तार्किक, मूल्याधिष्ठीत, भावनात्मक व पारंपारिक अशा वेगवेगळ्या सामाजिक क्रिया समाज रचनेच्या चौकटीत राहून सातत्याने मानवी वर्तनातून घडत असतात. परंतु समाज रचनेची चौकट विषयतेवर आधारलेली असल्याने सत्ता किंवा अधिकार संपादन करणारा वर्ग मानवी वर्तनावर, सामाजिक क्रियेवर, सामाजिक संबंधावर आपले वर्चस्व प्रस्थापित करून ते नियंत्रित करण्याचा प्रयत्न करतात. म्हणून मॅक्स वेबरनी सामाजिक संरचनेचा अभ्यास करतेवेळी फक्त सामाजिक क्रिया किंवा सामाजिक संबंध यांच्या अध्ययनापेक्षा त्यावर प्रभाव टाकणाऱ्या असंतुलित घटकांच्या प्रभावांच्या अध्ययनाकडे विशेष भर देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**टॉलकॉट पारसन्स** यांनी समाज रचनेतील घटक हे समाज रचनेच्या अस्तीत्वासाठी कसे आवश्यक आहेत याचे विवेचन 'The Social System' या ग्रंथात विशद केलेले आहेत. दर्जा व भूमिका यांच्यातील परस्पर संबंधावर सामाजिक संरचना अस्तित्वात येत असते. सार्वत्रिक सामाजिक मूल्य, विशिष्ट सामाजिक न्याय, अर्पित सामाजिक मूल्य व अर्जित सामाजिक मूल्य यांच्या प्रतिमानातून सामजिक संरचनेचा उदय होत असतो. व्यक्ती, मूल्ये, नियमनात्मक व्यवस्था, वेगवेगळ्या संस्था, संस्कृती इ. घटक हे सामाजिक संरचनेचे घटक म्हणून ओळखले जातात. अशा या संरचनात्मक चौकटीत प्रत्येक व्यक्तीला विशिष्ट दर्जा प्राप्त झालेला असल्याने विशिष्ट वर्तनाची अथवा कृतीची अपेक्षा असते. या सामाजिक संस्थांचे सभासदत्व स्वीकारून आपल्या कृतीशील भूमिकेद्वारे आपले व अप्रत्यक्षपणे त्या संस्थेचे उद्दिष्ट साध्य करण्याचा प्रयत्न प्रत्येक व्यक्ती करत असते. या क्रियाशील भूमिकेमूळेच समाजाची संरचना कायम टिकत असते. व्यक्तीकडून होणारी

क्रिया ही सामाजिक संरचनेचाच अविभाज्य घटक आहे. म्हणून मानवी क्रियेची एक विशिष्ट व्यवस्था म्हणजेच सामाजिक संरचना अशी संज्ञा पारसन्सनी वापरली आहे. जास्तीत जास्त लोकांच्या जास्तीत जास्त गरजा परिपूर्ण करणे हे समाजरचनेचे उद्दिष्ट असल्याने सामाजिक संरचना, ही समाजास एक आवश्यक बाब म्हणून पारसन्स यांनी संबोधिलेली आहे. परंतु, जर ही समाज व्यवस्था समाजाच्या किमान गरजा परिपूर्ण करण्यात अपयशी ठरल्यास विरोधी, विघटनकारी व विध्वंसक स्वरुपाची प्रवृत्ती लोकांच्यात निर्माण होण्याची शक्यता असते. अशी अस्थिर व विघटनकारी प्रवृत्ती निर्माण होऊ न देणे हे देखील समाज रचनेचे मूलभूत कार्य आहे. व त्यासाठी नियंत्रण टाकणाऱ्या नियमनात्मक संस्थांची, मूल्यांचे रक्षण करण्याऱ्या सांस्कृतिक संस्थांची व दर्जाला अनुसरून विशिष्ट भूमिका पार पाडून घेणाऱ्या संबंधात्मक संस्थांची आवश्यकता पारसन्सनी व्यक्त केलेली आहे.

**रॉबर्ट मर्टन** हा आधुनिक काळातील संरचनात्मक कार्यवादाचा पुरस्कर्ता म्हणून ओळखला जातो. (Social Theory and Social Structure) या ग्रंथात संरचनात्मक कार्यवादाचे सविस्तर विवेचन मर्टन यांनी केलेले आहे. समाज रचना व प्रमाणक शून्यता (anomic) यांच्या आधारावर त्यांनी आपल्या विचारांची मांडणी केलेली आहे. मर्टनने समाजास सेंद्रिय घटक मानलेला आहे. समाजातील परस्परपूरक व परस्परावलंबी स्वरुपाच्या घटकातून समाजरचना अस्तित्वात येत असल्याने त्या प्रत्येक घटकाला रचनात्मक चौकटीत राहून विशिष्ट प्रकारची कार्ये सातत्याने करावी लागतात. अपेक्षित स्वरुपाचे कार्य अथवा वर्तन व्यक्तीकडून साध्य होत नाही तेव्हा समाज संमत मार्गाविरोधी वर्तन अथवा कृती करण्याचा व्यक्ती प्रयत्न करते व त्यातून सामजिक विघटनाच्या प्रक्रियेला प्रारंभ होतो.

सामाजिक विघटनाच्या प्रक्रियेवर प्रतिबंध करण्यासाठी व मानवी वर्तन नियंत्रित करण्यासाठी मर्टनने सामाजिक नियमनाची आवश्यकता स्पष्ट केली. सामाजिक नियमन हे प्रत्येक समाज रचनेचे अंगभूत वैशिष्ट असते. दर्जा व भूमिका यांच्यातील परस्पर संबंधावर समाज रचनेची उभारणी झालेली असल्याने दर्जाला अनुरुप ठरेल अशी क्रियात्मक भूमिका पार पाडण्यासाठी सामाजिक नियमने जरुरीची असतात. सामाजिक नियमनांचे जर व्यक्तीकडून पालन होत नसेल तर ती समाज व्यवस्था संपूर्णतः कोलमडली जाते. जेव्हा व्यक्तीकडून अनिष्ठ प्रकारचे वर्तन घडते तेव्हा त्याचा अनिष्ठ परिणाम संपूर्ण समाज व्यवस्थेवर होत जातो.

सामाजिक प्रकार्यवादाचे स्वरुप विशद करतेवेळी मर्टनने असे मत मांडले आहे की, प्रत्येक समाज व्यवस्था निर्धारित स्वरुपाची होकारात्मक कार्ये आपल्या घटकांच्याकडून करवून घेते. परंतु आधुनिक काळात होकारात्मक कार्यापेक्षा नकारात्मक कार्याचे प्रमाण वाढत चालल्यामुळे सामाजिक अशांतता, अस्थिरता, विघटनात्मकता यासारख्या समस्या निर्माण झालेल्या दिसून येतात.

आपल्या प्रकार्यवादी सिद्धांतात मर्टननी कार्य, अकार्य प्रकट कार्य व अप्रकट कार्य असे कार्याचे प्रकार पाडलेले आहेत. कार्य व अकार्य या दोन प्रकारच्या कार्यापेक्षा प्रकट व अप्रकट कार्य असे जे दोन प्रकार मर्टननी पाडलेले आहेत त्याचा संबंध कार्याच्या निश्चित उद्दिष्टांशी निगडित आहे. सहेतूक पद्धतीने समाज मान्य स्वरुपाच्या कृतीत मर्टननी प्रकट कार्य (Manifest Function) अशी संज्ञा दिली. अशा प्रकट कार्याचे दृश्य परिणाम समाजात दिसून येत असल्याने त्या कार्याला प्रकट कार्य असे संबोधलेले आहे. विशिष्ट उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी प्रकट कार्याची समाज व्यवस्थेला नेहमीच आवश्यकता भासत असते. याउलट अप्रकट कार्य (Latent Function) हे विशिष्ट उद्दिष्टपूर्तीशी निगडीत असतेच असे नाही, तसेच अशा अप्रकट कार्यांना समाजाची मान्यता प्राप्त झालेली असते, असे नाही. मात्र अप्रकट स्वरुपाचे कार्य समाजाच्या दृष्टिने प्रकट किंवा दृश्य स्वरुपाचे असते. त्यामुळे त्याच्या परिणामांची जाणीव समाजाला जितकी होते तितकी संबंधित व्यक्तीला होत नाही. रॉबर्ट मर्टन यांनी दर्जा व भूमिका यांच्या आधारावर सामाजिक संरचनेचे स्वरुप विशद केलेले असले तरी सामाजिक स्थैर्यासाठी व एकसंघ समाज जीवनासाठी दर्जानुसार क्रियाशील स्वरुपाची भूमिका सभासद व्यक्तीने पार पाडावी यासाठी नियमनात्मक स्वरुपातून समाज रचना मानवी वर्तनावर नियंत्रण टाकत असते. परंतु जेव्हा समाज हित व वैयक्तीक हित यांच्यात संघर्षास प्रारंभ होतो किंवा वैयक्तीक हिताच्या आड जेव्हा सामाजिक हिताच्या संकल्पना येत असतात तेव्हा समाजमान्य स्वरुपाच्या मार्गाचा अवलंब न करता अनिष्ठ मार्गाचा अवलंब करण्याचा व्यक्ती प्रयत्न करते. म्हणून अकार्य व अप्रकट कार्य समाजात जसजसे वाढत जाते तसतशी समाजरचना ढासळत जाते. त्यामुळे सामाजिक संरचनेचे स्वरुप समाजातील विविध घटकांच्या क्रियाशिलतेवर अवलंबलेले असते.

**रॅडक्लिफ ब्राऊन** या ब्रिटिश मानवशास्त्रज्ञाने संरचनात्मक प्रकार्यवादाचे विवेचन करताना, समाज रचनेतील प्रत्येक घटक रचनात्मक ऐक्य प्रस्थापित करतेवळी विशिष्ट प्रकारची कार्ये सातत्याने करीत असतो. रचनात्मक घटकांपेक्षा त्या घटकांच्या क्रियाशिलतेवर ब्राऊन यांनी विशेष भर दिला आहे. कोणत्याही समाजाची रचना ही अनेक व्यक्तींच्या परस्पर संबंधातून निर्माण झालेली असते. मानवी संबंधाचे स्वरुप मानवाच्या वर्तनक्रियेवर आधारलेले असल्याने रचनात्मक घटकाशिवाय कोणत्याही प्रकारच्या कार्याला चालना मिळत नाही. प्रत्येक समाजाची रचना सर्व काळात, सर्व परिस्थितीत व सर्व समाजात कधीच सारखी असत नाही. कारण मानवी संबंधात जसजसे बदल होत जातात तसतसे त्या समाजाची संस्कृतिही बदलत जाते. व सांस्कृतिक क्षेत्रात झालेला बदल हा समाज रचनेच्या बदलास कारणीभूत ठरतो.

समाजाच्या अंतर्गत व्यवस्थेचा अभ्यास म्हणजे सामाजिक संबंधाचे स्वरुप जाणून घेणे होय. समाज व्यवस्थेतील अनेक घटकांच्या पारस्पारिक संबंधातून सामाजिक संबंध उदयास येतात. त्यामुळे संरचनात्मक प्रकार्यवादी दृष्टिकोण अशा संबंधाच्या अध्ययनास उपयुक्त ठरत असतो. रचनात्मक

घटकांच्या स्थैर्यावर सामाजिक स्थिरता अवलंबलेली असल्याने समाज रचनेचे अध्ययन करण्याकडे समाजशास्त्र भर देत असते. प्रत्येक व्यक्ती हा रचनेचा अविभाज्य घटक असल्याने समाज व्यवस्थेचा प्रत्येक व्यक्तीवर योग्य अथवा अयोग्य असे दुहेरी परिणाम नेहमीच होत असतात. या परिणामामुळे व्यक्तीकडून अपेक्षित किंवा अनपेक्षित स्वरुपाची कार्ये सातत्याने मानवाकडून होत असतील तर समाजाचे विघटन होण्यास सुरुवात होते. म्हणून समाज रचनेच्या चौकटीत राहून अपेक्षित स्वरुपाचे कार्य अथवा वर्तन मानवाकडून व्हावे अशी समाजाची धारणा असते. व त्यादृष्टिने समाज व्यवस्था नियंत्रणात्मक व्यवस्था औपचारिक स्वरुपातून राबविण्याचा प्रयत्न करते. संरचनात्मक प्रकार्यवादी दृष्टिकोण हा सूक्ष्म अध्ययनावर विशेष भर देतो, असे मत रॅडक्लिफ ब्राऊन 'Structure and Function in Primitive Society' या ग्रंथात व्यक्त केलेले आहे.

**मॅलिनॉस्की** यांनी संरचनात्मक प्रकार्यवादी दृष्टिकोणाचा पुरस्कार तथ्यांच्या आधारावर केलेला आहे. 'Crime and Customs in Savage Society' या ग्रंथात मॅलिनोस्कीनी सांस्कृतिक घटकावर समाज रचनेची उभारणी केलेली असल्याने व्यक्तीला स्वतंत्र व्यक्तिमत्व प्राप्त करून घेण्याच्या प्रक्रियेत समाज रचनेतील सांस्कृतिक घटक कारणीभूत असतात. समाजातील प्रत्येक संस्था संपूर्ण समाज व व्यक्तीच्या गरजा पूर्ण करण्याकडे कार्यशील असतात. परंतु भौतिक गरजांच्यापेक्षा सांस्कृतिक गरजा साध्य करण्याचा समाज प्रयत्न करीत असेल तर तो समाज अधिक संघटित व स्थिर बनू शकतो असा दावा मॅलिनॉस्की करतात. सांस्कृतिक जीवन हा समाज जीवनाचाच अविभाज्य घटक असल्याने सांस्कृतिक लक्षणावर त्या समाजाची वैशिष्टे निर्धारित होत असतात. म्हणून संस्कृती ही सामाजिक संरचनेचा अविभाज्य घटक असली तरी संस्कृतीला विविध प्रकारची कार्ये सातत्याने करावी लागतात. परंतु, एका सांस्कृतिक घटकाचे स्वतंत्रपणे संरचनात्मक प्रकार्यवादातून अध्ययन करणे अत्यंत कठीण आहे. कारण समग्र समाज जीवनाच्या संदर्भात सांस्कृतिक घटकांचा अभ्यास केल्यामुळेच या घटकातील परस्परसंबंध कळू शकतात. म्हणून क्रियाशील स्वरूपाच्या सांस्कृतिक घटकांचे अध्ययन समाज रचनेच्या चौकटीत राहून करण्याचा प्रयत्न मॅलिनॉस्कीनी संरचनात्मक प्रकार्यवादी दृष्टिकोणात केलेला आहे.

**स्त्रीवादी प्रतिमान (नमुना)** (Feminist Paradigm)

**स्त्रीवाद संकल्पना व सिद्धांत**

Feminism (फेमिनिझम) हा मूळ शब्द लॅटिन भाषेतील आहे. Femina या शब्दाचा अर्थ Woman असा आहे. 'Having a quality of females' अर्थात स्त्रियांचे गुण. १८९० च्या दशकात Womanism च्या ऐवजी Feminism हा शब्द पहिल्यांदा वापरला गेला. Woman हा इंग्रजी शब्द Wifman या शब्दापासून बनला आहे. याचा अर्थ 'स्त्री व्यक्ती' असा आहे. Womanism हा शब्द

'Theory of sexual equality and the movement for women's right' म्हणजेच लैंगिक समानतेचा सिद्धांत आणि स्त्रियांची हक्काची चळवळ या अर्थाने वापरला जावू लागला.

एलिस रॉसी (Alice Rossi) हिने २७ एप्रिल १८९५ ला 'The Athenaeum' या नियतकालिकात ग्रंथपरिक्षण लिहीताना प्रथम हा शब्द वापरला व नंतर तो सगळीकडे प्रसारीत झाला. 'लिंगभेद न मानता स्त्री-पुरुष समानतेवर विश्वास ठेवणारा' अशा अर्थाने हा शब्द वापरला जाऊ लागला.

जॅकी स्टेसी (Jackie Stacey) यांनी 'इन्ट्रोड्यूसिंग वूमेन स्टडीज' मध्ये अनटॅगलिंग फेमिनिस्ट थेअरी नावाचा लेख लिहला. त्यामध्ये ''विशेष अनुभवांचे विश्लेषण करून स्त्रियांचे दुयमत्व समजावून घेऊन ते बदलण्याची दिशा दाखविणारे, लिंगभेदातून निर्माण होणाऱ्या विषमतेला छेद देऊन त्याला राजकीय दृष्ट्या संक्रमित करण्यासाठी कोणती व्यूहरचना असावी याविषयी मार्ग सूचविणे, जीवनाच्या सर्व क्षेत्रात होणारे स्त्रियांचे शोषण आणि दुय्यमत्व नष्ट करणे यासाठी प्रयत्न करणे म्हणजे स्त्रीवाद होय.'' ही एक विद्याशाखा आहे.

'न्यू एनसायक्लोपिडिया ऑफ ब्रिटानिका' मध्ये स्त्री चळवळीची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे. ''अनेक छटा असणाऱ्या बहुविध संघटना, व्यक्ती, कल्पना यामधून व्यक्त होणाऱ्या स्त्रियांच्या बदलत्या भूमिकांशी निगडीत असणारी सामाजिक चळवळ होय.''

Ruth Brandwin – Feminism is a perspective, a thought structure, a value belief system that is an alternative way of viewing the world.

याचा अर्थ, 'वैचारिक रचना व मूल्याधारीत विश्वासाची पद्धत असणारा जगाकडे पाहण्याचा पर्यायी दृष्टिकोण म्हणजे स्त्रीवाद होय.'

इतिहासकार **लिंडा गॉर्डन** (Linda Garden) यांच्यामते ''स्त्रियांचे दुय्यमत्व आणि त्यासाठी कराव्या लागणाऱ्या संघर्षाचे विश्लेषण म्हणजे स्त्रीवाद होय.''

**विल्सन** (Wilson) यांच्यामते ''ही केवळ स्त्रियांचे दुय्यमत्व नष्ट करण्यासाठी आलेली जागृती नसून त्यांच्या खऱ्याखुऱ्या श्रेयापर्यंत जाण्याचा मार्ग सुकर करणारी राजकीय बांधीलकी आहे.''

**बॉटमूर आणि इतर** डिक्शनरी ऑफ मार्क्ससिस्ट थॉट (बूकवेल पब्लिशर्स, ऑक्सफर्ड १९८३) मध्ये स्त्रीवादाचा अर्थ व महत्व पुढीलप्रमाणे दिले आहे.

''स्त्रीवाद हा वादग्रस्त विषय आहे. क्रांतिकारी मार्क्सवाद आणि उदारमतवाद यामुळे स्त्रीवाद हा स्त्री-पुरुष समानतेचा विषय आहे. असा युक्तिवाद एका बाजूने करता येतो तर दुसऱ्या बाजूने स्त्रियांचे

शोषण आणि पिळवणूक यांचा नाश केल्याखेरीज मानवी मुक्ती शक्य नाही.'' परंतु, हे सर्व फक्त समाजवादी क्रांतीतूनच प्रस्थापित होऊ शकेल असा विचारही मांडला.

**स्त्री–मुक्तिवाद**

अमेरिका, जपान, व युरोपमध्ये अनेक देशांमध्ये १९६० नंतर आधूनिक काळातील स्त्री–प्रश्नासंबंधी चर्चा व चळवळ सुरु झाली. या विचारांना स्त्री मुक्तीवादी विचार असे मानले जावू लागले. स्त्रियांना पुरुषाप्रमाणेच व्यक्तीस्वातंत्र्य, स्वतःचे आयुष्य स्वायत्तपणे घडविण्याचा आधिकार आहे. हा विचार समाजातील समाजिक, राजकीय व सांस्कृतिक संरचनांना आव्हान देतो.

**स्त्री–मुक्ती विचारांचे केंद्रीकरण**

१) उत्पादन व्यवस्थेतील स्त्रियांचे कार्य

२) पुनरुत्पादन (मानववंश व श्रमशक्तीचे उत्पादन)

३) स्त्री–पुरुष भेद घडविणारी सामाजिक संस्कार प्रक्रिया

४) लैगिकता व स्त्रियांचे प्रश्न (विवाह, बलात्कार, लैगिंक शोषण)

१९७५ नंतर भारतात स्त्रीवादी चळवळ सुरु झाली. त्यास नवीन सामाजिक चळवळ असे नाव दिले. ह्या चळवळी बद्दल अनेक समज–गैरसमज निर्माण झाले. नवी स्त्रीवादी भारतीय चळवळ पाश्चात्यांचे अनुकरण करणारी, व्यक्तिवादी विचारांना प्राधान्य देणारी तसेच विवाह व कुटुंबसंस्था यांना उद्धवस्त करणारी आहे असे आरोप या चळवळीवर केले गेले.

**स्त्रीवादी सिद्धांताचा आढावा**

स्त्रीवादी सैद्धांतिकीकरण हे सत्तरच्या दशकात सुरू झाले. स्त्रीवादी सिद्धांताचा साधारण अर्थ असा की, स्त्रियांचे दुय्यमत्वाचे चिकित्सक स्पष्टीकरण देणारी ज्ञानशाखा होय. उदारमतवादी, जहालवादी, मार्क्सवादी आणि समाजवादी, उत्तर आधुनिकतावादी हे स्त्रीवादी सिद्धांताचे सर्वसामान्य वर्गीकरण केले जाते.

**उदारमतवादी स्त्रीवाद** (Liberal Feminism)

उदारमतवादद्यांनी भौतिक बाबीपेक्षा हक्कांना अग्रक्रम दिला. १८ व्या १९ व्या शतकातील उदारमतवादी स्त्रीवाद्यांनी मुख्यतः स्त्रियांना शिक्षण आणि समान संधी हे मुद्दे हाताळले.

**१) मेरी वुल्स्टोन क्राफ्ट** (Mary Wolstone Craft)

या फ्रेंच स्त्रीला स्त्री मुक्ती चळवळीची आद्यप्रवर्तक मानले जाते. वयाच्या ३० व्या वर्षी १७९२ मध्ये स्त्रियांच्या हक्कांचे समर्थन (The Vendication of Rights for Women) हे पुस्तक लिहले. फ्रेंच राज्यक्रांतीने स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या घोषणा करून 'हक्क' हा शब्द सर्वमान्य

केला. पण हे हक्क पुरुषांबद्दल होते. मरी क्राफ्ट ही बंडखोर वृत्तीची होती. तिने या पुस्तकात संपन्नतेचा बुर्झ्वा (मध्यमवर्गीय) स्त्रियांवर होणारा नकारात्मक परिणाम विशद केला.

स्त्री ही मानव असून इतरांप्रमाणे स्वतःचा विकास करून घेण्याचा तिला हक्क आहे. शिक्षण, राजकारण, अर्थकारण, समाजकारण, विवाहसंस्था अशा सर्व गोष्टीत आणि क्षेत्रात तिला समान हक्क असले पाहिजेत. असे विचार क्राफ्ट ने मांडले. मेरी क्राफ्ट ने पेरलेले स्त्रीवादी विचार आज जगभर परसरे आहेत. त्यामुळेच तिला या चळवळीची आद्यप्रवर्तक मानले जाते.

२) **जॉन स्टुअर्ट मिल** (John Stuart Mill) (१८०६ ते १८७३)

स्त्री वाद्यांच्या इतिहासात स्त्रियांच्या हक्काविषयी 'स्त्रियांची पराधीतता' (The Subjection of women (1869) हे पुस्तक लिहले. तसेच पार्लमेंटमध्ये निवडणूकीसाठी स्त्रियांना बरोबरीचे प्रतिनिधित्व मिळावे या मुद्द्यावर निवडणूक कार्यक्रम मांडला. स्त्रियांना पार्लमेंटमध्ये समान प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे मानणारा तो पहिला इंग्रज ठरला.

१८३२ मध्ये जॉन स्टुअर्ट मिल व हॅरिअट टेलर मिल यांनी 'अर्ली एसेज ऑन मॅरेज ॲन्ड डिव्होंस' विवाह आणि घटस्फोट यासंबंधीचे निबंध ही लेखनमाला प्रसिद्ध केली. त्यात असे म्हटले आहे की, रुढीमूळे स्त्रिया घरात बंदिस्त आहेत. त्यांच्या मते, स्त्रियांना समान शिक्षण, आर्थिक, वैधानिक आणि प्रशासकीय बाबतीत समान सहभाग मिळाला तर स्त्रियाही पुरुशाप्रमाणेच विवेकनिष्ठ आणि सक्षम होतील.

३) **सिमॉ दि बु** (Simone de Beau)

सिमॉ दि बु यांनी १९४९ मध्ये 'The Second Sex' म्हणजेच 'दुय्यम लैगिक्ता' हा ग्रंथ लिहला. १९६० ते १९८० या कालखंडात आधूनिक स्त्रीवादी विचारप्रवाह मांडले गेले. बु यांनी स्त्रियांच्या दुय्यमत्वाची कारणे त्यांनी मांडली. पुरुषांची सेवा करताना स्त्रिया एक वस्तू बनल्या. पुरुषांनी स्वतः 'स्व' व स्त्रियांना 'इतर' घोषित केले. स्वतःमूक्त राहण्यासाठी इतरांवर दुय्यमत्व लादले. त्यांच्यामते, स्त्रियांची दडवणूक दोन कारणामुळे वैशिष्ट्यपूर्ण आहे.

१) पुरुषापेक्षा स्त्री ही कायमच दुय्यम आहे. ही ऐतिहासिक वस्तुस्थिती केवळ योगायोग नाही पण तसे मानले जाते.

२) स्त्रियांची अशी मानसिक धारणा केली गेली की, पुरुष हे आवश्यक व स्त्रिया अनावश्यक असतात. म्हणून स्त्रिया आपल्या दुय्यमत्वाचे आंतरीकरण म्हणजेच समर्थन करू लागतात.

बु यांच्यामते, स्त्रियांच्या पत्नी व माता या भूमिकांमुळे स्वविकास खुंटतो. स्त्रियांचे वस्तुत रुपांतर होते, स्त्री म्हणजे स्वयंपाक करणारी, त्याग करणारी, स्वच्छता ठेवणारी यंत्रे बनली.

२० व्या शतकातील आधुनिक उदारमतवादी स्त्रीवादी लिखाणाच्या लाटेवर १९ व्या शतकातील लिखानाचा परिणाम जाणवतो. बेटी फ्राईडन (Betty Frieden) यांनी 'स्त्रीवादाचे गूढ' 'The Feminine Mistique 1968' हे पुस्तक लिहले. बेटी फ्राईडने अमेरिकेतील मोठ्या संख्येने असलेल्या गृहिणींच्या प्रश्नांचे विश्लेषण केले. घरात सर्व सुख सोई असूनही स्त्रियांना घरात तुरुंगवासाचा प्रत्यय येत होता. म्हणूनच तिने सूचवले की, घराबाहेर येऊन स्त्रियांनी 'सुपरवूमन' बनण्यासाठी काम केले पाहिजे.

१९८० च्या दशकात 'सेकंड सेक्स' हा ग्रंथ लिहिला. त्यात त्या म्हणतात, ''लैगिकतेच्या राजकारणाने स्त्रिया स्त्रीवादी गूढाच्या बळी ठरल्या आहेत. तेव्हा स्त्रीवादी चळवळीने फक्त करीअरच्या पाठीमागे न लागता प्रेम व संगोपन याकडेही लक्ष द्यावे.''

**उदारमतवादी स्त्रीवादावरील टीका** (Criticism of Liberal Feminism)

उदारमतवादी स्त्रीवादावर टिका करताना इमेल्डा व्हेलहन 'मॉडर्न फेमिनिस्ट थॉट फ्रॉम सेकंड वेव्ह टू पोस्ट फेमिनिझम' मध्ये ॲलिसन यागर यांचे मत देऊन म्हणतात, ''बौद्धीक बाबींना शारीरिक बाबींपेक्षा अधिक महत्व मिळाले.'' यातून अनेक प्रश्न निर्माण झाले. स्वतःच्या गरजा आणि हितसंबंध जपणारी प्रत्येक व्यक्ती ही दुसऱ्या व्यक्तीपासून अलग असते. यावर राजकीय अलिप्तावर विशस ठेवतो. मानवी सुखाचा विचार करणारे राजकीय तत्वज्ञानातील मूलभूत प्रश्न आणि हे साध्य करण्यासाठी असणारी साधने त्यांना कोणतेही उत्तर असत नाही असे राजकीय पलायनवाद मानतो.

**मार्क्सवादी स्त्रीवादी** (Marxist Feminism)

स्त्रीवादाच्या विविध विचारप्रवाहात मार्क्सवादी स्त्रीवाद महत्वाचा मानला जातो. हा विचार प्रामुख्याने स्त्रियांचे शोषण, अत्याचार यावर आपले लक्ष केंद्रीत करतो. यात भांडवलशाहीच्या उदयाबरोबर स्त्रीचे अवमूल्यन होत गेले. मार्क्सवाद्यांना भांडवली समाजरचनेतील सर्वाचे शोषण नष्ट करावयाचे असल्याने स्त्रीवाद त्याकडे आकर्षिक झाला.

**मार्क्सवाद्यांनी स्त्रियांचे काम, दर्जा आणि वेतन यासंबंधी मांडलेले विचार**

१) भांडवलशाही कुटुंबव्यवस्थेमध्ये स्त्रियांना घरकामाचा मोबदला मिळत नाही. घरकामाला पूरक असेच काम त्यांना दिले जाते.

२) घरातील कामाची बाजारात विक्री होत नाही. म्हणजे हे श्रम अनुत्पादक असतात असे नाही. जोपर्यंत घरकामाचे समाजीकरण होत नाही तोपर्यंत स्त्रियांच्या श्रमाच्या बाजारपेठांतील प्रवेश म्हणजे स्त्रीमुक्तीच्या संदर्भात मागे टाकलेले पाऊल होय.

३) त्यामुळेच 'डेला कोस्टा (Dalla Costa) व सेल्मा जेम्स (Selma James)' यांनी घरकामाला वेतन मिळावे असे सुचवले.

४) मार्क्सवादी स्त्रीवाद्यांनी पुरुषांच्या कामासाठी त्यांना मिळणारे वेतन व स्त्रियांना त्याच कामासाठी मिळणारे वेतन यातील तफावत दाखवून दिली.

५) भांडवलशाही अर्थव्यवस्थेत स्त्रियांच्या श्रमाची गरज लागते. भांडवलशाहीत उच्चवर्णीय स्त्रिया घरकाम करतील व त्यामुळे त्यांचा दर्जा तोच राहील. मात्र श्रमिक वर्गातील स्त्रियांना सन्मान व चांगला दर्जा प्राप्त होईल.

स्त्रियांच्या घरकामाला मोल नसते व ते भांडवलशाहीच्या पथ्यावर पडते म्हणून सार्वजनिक उद्योगधंद्यात पुरुषांबरोबर समान पातळीवर स्त्रियांना सहभागी करून घेता आले पाहिजे असा आग्रह मार्क्सवादी स्त्रीवाद करतो.

थोडक्यात, मार्क्सवादी स्त्रीवाद स्त्रियांचे काम, वेतन व त्यांची लिंगभेद आधारीत रचना यावर भर देतो. त्यांच्या लिखाणात स्त्रियांचे पुररुत्पादक, श्रम व होणारा छळ यांना नगण्य स्थान होते. पण हे करीत असताना स्त्रियांनी केलेले घरकाम कसे दुर्लक्षित केले जाते व रटाळवाणे काम त्यांना दिले जाते. कुटुंबव्यवस्था भांडवलशाही व्यवस्थेशी कशी निगडीत होती याचाही उलगडा त्यांच्या लिखाणातून झाला.

**मार्क्सवादी स्त्रीवादावरील टीका**

१) ॲलिसन यागर यांच्यामते ''मार्क्सवादी स्त्रीवाद्यांनी वर्गीय शोषणाला महत्व देऊन लिंगभेदाकडे वर्गीय विषमतेचे प्रतीक म्हणून पाहिले. त्यामुळे लिंगभेदामुळे होणाऱ्या शोषणाकडे कधीच महत्वाचा मुद्दा म्हणून पाहिले नाही.''

२) पुनरुत्पादन (वंशसातत्य), स्त्रियांविरुद्ध अत्याचार या संबंधित विषयांकडे मार्क्सवादी स्त्रीवाद दुर्लक्ष करतो.

३) ब्लॅकबर्न व स्टुअर्ड यांच्यामते, प्रस्थापित समाजव्यवस्थेत जास्तीत जास्त स्त्रिया अर्थार्जन करू लागल्यामुळे स्त्री-पुरुष समानता निर्माण न होता त्यांच्या दर्जा आहे तसाच राहिला. स्त्री कामगारांची संख्या वाढली. परंतु स्त्रियाकामगार संघटनेत सहभागी न झाल्याने भांडवलदारांचा फायदा झाला.

४) नोकरी करणाऱ्या स्त्रियांची आई व गृहिणी या भूमिका बदलल्या नाहीत. त्यामुळे नोकरीबरोबर परंपरागत कामे त्यांना करावीच लागतात.

५) स्त्रिया व पुरुष समान पातळीवर काम करु लागली तरी अंतिम निर्णयांचे आधिकार पुरुषाकडेच राहिले. त्यामुळे स्त्रियांना समान अधिकार मिळालाच नाही.

**समाजवादी स्त्रीवाद** (Socialist Feminism)

स्त्री–पुरुष जुलूम सिद्धांतामधील समाजवादी स्त्रीवाद हा महत्वाचा विचार मांडला जातो. स्त्रियांच्या आर्थिक, सामाजिक स्थितिला 'वर्गवाद' जबाबदार आहे असे मार्क्सवादी मानतात तर समाजवादी स्त्रीवाद्यांनी लिंगभेद व वर्गवाद या दोहोंकडे समानरित्या सशक्त असणाऱ्या शोषणांच्या यंत्रणा म्हणून पाहिले व लिंगभेद आणि पुनरुत्पादन यावर प्रकाश टाकला.

समाजवादी स्त्रीवादाने स्त्रियांच्या शोषणाचे स्वरुप वैश्विक करता यावे म्हणून झगडा दिला. व पुरुषशाही या संज्ञेतून ध्वनित होणाऱ्या अमूर्त अनैतिहासिक अर्थावर हल्ला चढविला. समाजवादी विचारप्रवाहाने, मार्क्सवादी सिद्धांत स्त्रीप्रश्नांचे विश्लेषण करताना अपूरा पडतो व समाजवादी क्रांती मांडणी स्त्री–मूक्ती आपोआप घडेल हे गृहित धरतो. समाजवादी स्त्रीवादाची मांडणी करण्याचे प्रयत्न अनेक स्त्री–विचारवंतांनी केले. आजवर झालेली स्त्री–पुरुषांची वेगळी जडणघडण ही नैसर्गिक नसून हे पुरुषशाही व्यवस्थेचे कडवट फळ आहे. त्यामुळे पुढील काळात मुले आणि मुली वाढताना स्त्री आणि पुरुष अशी दुभंगलेली व्यक्तीमत्वे तयार न करता त्यांच्यावर माणूस म्हणून संस्कार झाले पाहिजेत यावर भर दिला. त्यामुळेच स्त्री आणि पुरुष यांचा उत्पादन व्यवस्थेतील सहभाग माणूस या नात्याने असला पाहिजे. वर्गव्यवस्था नष्ट होण्यासाठी सामाजिक क्रांतीची तर पुरुषशाही नष्ट होण्यासाठी मानसिक क्रांतीची गरज आहे असे मिचेल यांनी मांडले.

**समाजवादी स्त्रीवादाने स्त्री–पुरुष समानतेसाठी सुचविलेले उपाय**

१) स्त्रियांनी एकाच वेळी भांडवलशाही व पुरुषसत्ताक पद्धतीविरुद्ध आवाज उठवावा.

२) स्त्रियांच्या विविध प्रश्नांवर स्वतंत्र चळवळी निर्माण व्हाव्यात. त्यामध्ये घातकप्रथा, परंपरा, अधिकार, हक्कांची जाणीव यांचा समावेश असावा.

३) पितृसत्ताक कुटुंबपद्धती नष्ट करावी.

थोडक्यात समाजवादी स्त्रिवाद्यांनी स्त्रियांवरील जुलूम कमी करुन स्त्री–पुरुष समानतेसाठी विविध उपाय सुचविले. भांडवलशाही व पितृसत्ताक पद्धती स्त्रियांचे दमन व शोषण करते हे थांबवण्यासाठी स्त्रियांनी पुरुष वर्गाविरुद्ध उठाव करून स्वतंत्र चळवळी उभाराव्यात असे मत मांडले.

**जहाल स्त्रीवाद** (Radical Feminism)

साठच्या दशकापासून सत्तरच्या मध्यापर्यत स्त्रियांची चळवळ 'आतले' आणि 'बाहेरचे' अशा गटात विभागली गेली. आतल्या गटात मवाळांचा समावेश होता तर बाहेरच्या गटात जहाल स्त्रीवादी यांचा समावेश होता. १९८० च्या दशकाच्या उत्तरार्धात जहाल स्त्रीवादी पुढे आले.

**जहाल स्त्रीवादी तत्वे**

ऐतिहासिकदृष्ट्या स्त्रियांचे शोषण हे सर्वात प्रथम झाले आणि सर्वात जास्त व्याप्ती असणारे शोषण म्हणून त्याकडे पाहता येते. हे शोषण इतर शोषणाला चौकट पूरविते. अशा शोषणाला स्त्रिया बळी पडतात. पण स्वतःमात्र त्या या शोषणाबाबत अनभिज्ञ असतात. पुरुषांच्या मनात स्त्रियांविषयी असणारी वर्चस्वाची, स्वामित्वाची, क्रौर्याची भावना, लैगिक विकृतीने भरलेल्या मानसिकतेतून व त्यांच्या भाषेतून स्पष्ट होते. जहाल स्त्रीवाद्यांच्या मते, ''सर्वत्र स्त्रियांचा एकत्रित दडपलेला वर्ग असतो. कोणत्याही वर्गातील स्त्रियांना आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय स्तरावर पुरुषांव्यतिरिक्त स्थान नसते.''

जर्मेन गिअर हिने 'द विमेन युनक' या पुस्तकात स्त्रियांची लैगिकता खऱ्या अर्थाने कशी नाकारली गेली आहे याचे विवेचन केले आहे. छोट्या व विभक्त कुटबांत स्त्रियांची अधिकच कोंडी व दडपणूक होते. म्हणूनच विभक्त कुटुंबाऐवजी सामूहिक कुटुंबाची संकल्पना तिने मांडली आहे. यासाठी जहाल स्त्रीवाद्यांनी लैगिक क्रांतीची मागणी केली. त्यांच्या मते, जेव्हा स्त्रीवादी क्रांती होईल तेव्हा–

१) स्त्रिया मातृत्वाच्या जबाबदारीतून मोकळ्या होऊन अपत्य संगोपनाचे काम सामूहिकरित्या समाजामार्फत होईल.

२) संपत्तीची समान वाटणी झाल्याने स्त्रियांच्या मूलांच्या आत्मविष्काराला व व्यापक समाजबांधणीला पूर्ण वाव मिळेल.

३) लैगिकतेचा व्यवहार साचेबंदपणातून मुक्त होईल. यासाठी पितृसत्ताक समाजव्यवस्था उलथून टाकली पाहिजे. प्रत्येक स्त्रीने सबला म्हणून स्वतःची स्वतंत्र मानसिक जडणघडण केली पाहिजे.

४) जहाल स्त्रीवाद्यांचे स्त्रीवादाला सर्वात मोठे योगदान म्हणजे त्यांनी विकसित केलेली व अंमलात आणलेली जाणीवजागृतीची संकल्पना होय. त्यांचा उद्देश केवळ स्त्रियांच्या समाजातील दुय्यम भूमिकेमुळे निर्माण होणाऱ्या विषमतेविरुद्ध त्यांच्यात जागरुकता निर्माण करणे एवढाच नव्हता तर त्यामुळे स्त्रियांना स्वतःच्या खाजगी व भावनिक जीवनाचे पुनर्मूल्यांकन करणारी त्यांच्या कुटुंबाशी असणारे, कामाच्या ठिकाणी असणारे संबंध तपासण्यासाठी प्रोत्साहन मिळाले. आपले शोषण होत आहे याची जाणीव जागृती होऊन त्याविरुद्ध असंतोष व्यक्त करणे शक्य झाले.

**जहाल स्त्रीवादावरील टीका**

जहाल स्त्रीवाद अनैतिक आहे. त्याला इतिहासाची जाणीव नाही. तसेच स्त्रिया या पुरुषापेक्षा श्रेष्ठ आहेत हे गृहित धरुनच जहाल स्त्रीवाद्यांनी आपल्या सिद्धांताची रचना केली. व त्यास अनुसरुन

स्त्री-पुरष भेद स्पष्ट केला. त्यामुळे जहाल स्त्रीवाद एकांगी विचार मांडणारा आहे. व पुरुषांनी हा विचार दुय्यम ठरवितो अशी टिका या विचारप्रवाहावर झाली.

**उत्तर आधुनिकतावादी स्त्रीवाद** (Post Modernist Feminism)

उत्तर आधुनिकतावाद म्हणजे आधुनिक काळातील प्रस्थापित रुढी आणि जीवनमार्ग यांना दिलेले आव्हान होय. १९७० च्या दशकात उत्तर आधुनिकवाद ही संज्ञा प्रचारात आली.

**स्त्रीवादी संकल्पना**

उत्तर आधुनिकतावादात वंश, वर्ग, लिंग, राष्ट्रियत्व, भिन्न वंशियता इत्यादींचा समावेश होतो. उत्तर आधूनिकवादी स्त्रिवाद्यांनी परंपरागत पुरुषसत्ताक पद्धतीच्या सत्तासाधनाला म्हणजेच धर्मशास्त्रे व निसर्ग यांना विरोध केला. तसेच त्यांनी अनुभवाच्या सार्वभौमत्वाला स्त्रीज्ञानविषयक सिद्धांतातून विरोध करुन जे जे खाजगी असते ते ते राजकीय मानले.

समाजाच्या स्त्रीविषयक विशिष्ट धारणा, त्यामागील हेतू, त्या धारणांची विचारणा व पूर्व मांडणी करणे, स्त्रियांना मुख्य प्रवाहापासून दूर ठेवू पाहणाऱ्या व्यूहामधून स्त्रियांना सोडविणे हे स्त्रीमूक्ती चळवळीचे व उत्तर आधुनिकतावादी स्त्रीविषयक इतिहास लेखनाचे मूळ उद्दिष्ट आहे.

स्त्री ही एक व्यक्ती आहे स्वतःचे विचार, भावना व्यक्त करु शकणारे ते एक अस्तीत्व आहे. जगाच्या रचनेत व तिच्यावर सोपविण्यात आलेल्या कार्यात ती सहभागी असते. 'स्त्री' हा शब्द काही सामाजिक, राजकीय व जीवशास्त्रीय तथ्यांशी निगडीत आहे. ब्रिटिश कालखंडातील अधिकाऱ्यांकडून आशियाई स्त्रियांना मिळणारी वागणूक किंवा इतर अनेक दुर्लक्षित बाबींमुळे गतकाळाचे परिक्षण करण्याची गरज निर्माण झाली आहे.

### २.२.३ सामाजिक संशोधनातील पायऱ्या : (Steps of Social Research)

सामाजिक संशोधनामध्ये ज्ञान मिळविण्यासाठी विविध पायऱ्यांच्या आधारे ते मिळविले जाते. विश्वसनीय स्वरुपाचे ज्ञान मिळविण्यासाठी शास्त्रज्ञांनी एक विशिष्ट स्वरुपाची पध्दती विकसित केली आहे. या पध्दतीस शास्त्रीय पध्दती असे संबोधले जाते. संशोधन करताना शास्त्रज्ञ ज्या संशोधन रीतीचा अवलंब करतात तिला शास्त्रीय पध्दती असे म्हणतात. एका विशिष्ट प्रकारच्या समस्येविषयी संशोधन करताना जेव्हा शास्त्रीय पध्दतीचा अवलंब केला जातो तेव्हा यामध्ये काही अवस्था किंवा पायऱ्या असल्याचे दिसून येते. आपणास सामाजिक संशोधनामध्ये कोणत्या पायऱ्या असतात याचा परिचय पुढीलप्रमाणे करुन घेता येईल.

**१. समस्येचे सुसूत्रीकरण : (Formulation of the Problem)**

सामाजिक संशोधनामधील ही पहिली पायरी होय. संशोधनाला सर्वप्रथम समस्याप्रधान परिस्थितीची जाणीव होते. त्याला एखादी संशोधनयोग्य अशा प्रकारची समस्या सूचते. संशोधकाने संशोधन समस्येविषयी

केलेले निरीक्षण व त्यासंबंधीच्या त्याच्या विचारशक्तीमुळे किंवा संशोधन समस्येसंबंधी असलेल्या त्याच्या अभ्यासावरुन संशोधकाला अशी समस्या सुचू शकते. संशोधकाला सूचलेल्या समस्येची मांडणी ही त्याला संशोधन करता येऊ शकेल याप्रमाणे करावी लागते. यासाठी संशोधन हा अगोदर झालेल्या संशोधनांच्या निष्कर्षांचे परीक्षण करीत असतो. यामुळे संशोधकास निवडलेल्या समस्येसंबंधीचे ज्ञान प्राप्त होते. यावरुन संशोधकाने निवडलेल्या समस्येसंबंधीची संभाव्य उत्तरे कोणती आहेत याचा विचार संशोधक करु शकतो व या विचारातून त्याला काही अभ्युपगम सुचू शकतात.

**२. अभ्युपगमाची मांडणी : (Formulation of Hypotheses)**

सामाजिक संशोधकातील ही दुसरी महत्वाची पायरी होय. अभ्युपगम म्हणजे संशोधन समस्येचे तात्पुरते गृहीत धरलेले संभाव्य उत्तर होय. घटनांमधील कार्यकारण संबंधाविषयीचे हे विधान असते. हे विधान तात्पुरत्या स्वरुपाचे असते. अभ्युपगमाव्दारे मांडलेल्या या विधानाचा खरेखोटेपणा पुढील संशोधनामध्ये तपासून पहावयाचा असतो. अभ्युपगमाच्या निर्मितीमुळे संशोधनाला पुढील दिशा प्राप्त होते. संशोधन विषयासंबंधी संशोधकाने मांडलेले अभ्युपगम हे खरे व खोटे ठरण्याची देखील शक्यता असते. ज्यांचे प्रत्यक्ष अनुभवात प्रत्यंतरण घेता येऊ शकेल अशा स्वरुपातील अभ्युपगमांची मांडणी ही सामाजिक संशोधनातील अत्यंत महत्वाची पायरी होय.

**३. संशोधन आराखडा विकसित करणे : (Development of Research Design)**

सामाजिक संशोधनामधील ही तिसरी प्रमुख अवस्था होय. संशोधकाने निश्चित केलेल्या संशोधनाच्या उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी तथ्यसंकलनाच्या कार्यपध्दतीसंबंधी घेण्यात आलेल्या निर्णयांचा, नमुना – निवडीच्या बाबतीत घेण्यात आलेल्या निर्णयांचा व तथ्यांच्या विश्लेषणासाठी योजण्यात येणाऱ्या कार्यपध्दतींबाबतच्या निर्णयांचा अंतर्भाव करुन तयार करण्यात आलेली योजना म्हणजे संशोधन आराखडा होय.

**४. माहितीचे संकलन करणे : (Data collection)**

सामाजिक संशोधनातील ही चौथी महत्वाची पायरी होय. संशोधन आराखडा तयार करुन घेतलेल्या निर्णयाप्रमाणे संशोधनाच्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी आवश्यक अशी माहिती अत्यंत काळजीपूर्वक पध्दतीने संशोधक जमा करीत असतो. माहितीच्या संकलनामध्ये संशोधक हा वस्तुनिष्ठ पध्दतीने माहितीचे संकलन करीत असतो.

**५. माहितीचे वर्गीकरण आणि विश्लेषण : (Classification and Analysis of Data)**

सामाजिक संशोधनातील ही पाचवी महत्वाची पायरी होय. संशोधकाने निवडलेल्या अभ्यास विषयासंबंधी मिळविलेल्या माहितीचे वर्गीकरण करणे आवश्यक असते. वर्गीकरणामध्ये संशोधकाने मिळविलेल्या माहितीची विशिष्ट पध्दतीने विभागणी केली जाते. संशोधकाने एकत्रित केलेल्या माहितीच्या वर्गीकरणामुळे माहितीला अर्थ प्राप्त होतो. गोळा केलेली माहितीच्या विश्लेषणाच्या सहाय्याने संशोधक हा माहितीमध्ये लपलेला अर्थ स्पष्ट करित असतो.

## ६. संशोधनाचे निष्कर्ष मांडणे : (A Statement of Conclusions)

सामाजिक संशोधनातील ही सहावी अवस्था होय. संशोधक हा या अवस्थेमध्ये मांडलेले निष्कर्ष हा स्विकारतो किंवा नाकारतो. आधीच्या निष्कर्षांशी हे निष्कर्ष अर्थपूर्णरित्या जोडले जातात. संशोधनाच्या निष्कर्षामुळे आधीच्या संशोधकाला बळकटी प्राप्त होते. किंवा त्यामध्ये बदल सूचविले जावू शकतात संशोधकाने हाती घेतलेल्या संशोधनामुळे नवीन सिध्दान्ताची निर्मिती देखील होऊ शकते. संपूर्ण संशोधन प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर संशोधक हा संपूर्ण संशोधनाविषयीचा अहवाल सर्व तपशीलासह तयार करतो. अहवाल लेखन ही संशोधनप्रक्रियेतील शेवटची अवस्था असते.

**स्वयंः अध्ययनासाठी प्रश्न**

१) समाजशास्त्रात बृहत सिद्धांताचा पुरस्कार कोणत्या विचारवंताने केला आहे.

२) General System Theory हा सिद्धांत कोणी मांडला.

३) मानवी बौद्धीक विकासातील शेटच बौद्धीक अवस्था कोणती.

४) ऑन द ओरिजिन ऑफ स्पिशीज हा ग्रंथ कोणाचा

५) दास कॅपीटल हा ग्रंथ कोणी लिहीला

६) प्रतिबिंबित स्वतःचा सिद्धांत कोणी मांडला.

७) लोकान्वय पद्धतीत भाषिक व व्यावहारीक संदर्भावर विशेष भर कोणी दिला.

८) लोकान्वय पद्धतीशास्त्रांचे जनक कोण.

९) Social Theory and Social Structure हा ग्रंथ कोणाचा.

१०) स्त्री मुक्ती चळवळीची आद्यप्रवर्तक कोण

**स्वयंः अध्ययन प्रश्नांची उत्तरे**

१) इमाईल डुरखेम

२) टॉलकॅट पार्सन

३) प्रत्यक्षवाद / विज्ञानवाद

४) चार्लस डार्वीन

५) कार्लमार्क्स

६) चार्लस कुले

७)  गारफिकेल

८)  गारफिकेल

९)  रॉबर्ट मर्टन

१०) मेरी वुल्स्टोन क्राफ्ट

## २.३ सारांश

या घटकात आपण प्रथम संशोधनातील मूलभूत संकल्पनावर भर दिला आहे. त्या अधिकाधीक समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे. यामध्ये - सामाजिक विज्ञान नमुना, प्रतिमान, सूक्ष्म सिद्धांत, ब्रहत सिद्धांत, प्रत्यक्षवाद (प्रारंभिक) सामाजिड डार्विनवाद, संघर्ष प्रतिमान, प्रतिकात्मक आंतरक्रियावाद, प्रघटनाशास्त्र, संरचनात्मक प्रकार्यवाद, स्त्रीवादी प्रतिमान, तसेच सामाजिक संशोधनाच्या पायऱ्या अथवा टप्पे, या सामाजिक संशोधनातील मुलभूत संकल्पना आपण विस्तृतरित्या समजून घेतल्या आहेत.

## २.४ सरावासाठी प्रश्न

### अ) थोडक्यात उत्तर लिहा.

१)  सूक्ष्म आणि बृहत सिद्धांत स्पष्ट करा.

२)  प्रारंभिक प्रत्यक्षवाद व संघर्ष नमुना चर्चा करा.

३)  सैद्धांतिक आंतरक्रियावाद

४)  प्रघटनाशास्त्र

५)  संरचनात्मक प्रकार्यवाद आणि स्त्रीवादी नमुना

## २.५ चिंतन आणि कार्य

सामाजिक संशोधनातील अनेक महत्त्वाच्या संकल्पनांचे वाचन करणे त्याचबरोबर संशोधन अहवालाचे वाचन करून निष्कर्ष टिपन तयार करणे.

## २.६ अधिक वाचनासाठी पुस्तके

१.  Ram Ahuja - Research Methods

२.  सुनील मायी - सामाजिक संशोधन पध्दती

३.  भांडारकर पु. ल. - सामाजिक संशोधन पध्दती

४. Social Research Method-Ram Ahuja.

५. सामाजिक संशोधन पद्धती–प्रदिप आगलवे

६. Research Methdology - CR Kothari

7. Dooley, David - Social Research Method prentice - Hall of India, New Delhi, 2003.

8. Marvashi Amir B. - Qualitative Research is Sociology, Sage Publication Jaipur, 2005.

❑❑❑

**घटक ३**

# संशोधन आराखडा

(Research Design)


३.० प्रस्तावना

३.१ उद्दिष्टे

३.२ विषय विवेचन

३.२.१ सामाजिक संशोधनाचा अर्थ आणि कार्ये

३.२.२ संशोधन आराखड्याच्या अवस्था अथवा टप्पे

३.२.३ वर्णनात्मक संशोधन आराखडा, विश्लेषणात्मक आणि अन्वेषणात्मक संशोधन आराखडा.

३.२.४ सर्वेक्षण, व्यष्टी अध्ययन, प्रायोगिक आणि ऑनलाईन संशोधन.

३.४ सारांश

३.५ सरावासाठीचे प्रश्न आणि उत्तरे

३.६ अधिक वाचनासाठी पुस्तके


## ३.० प्रस्तावना

संशोधन हे वैज्ञानिक पद्धतीने झाले पाहिजे तरच त्या संशोधनातील निष्कर्ष वैज्ञानिक राहतील. सामाजिक संशोधन हे देखील वैज्ञानिक पद्धतीने केले जाते. संशोधनाचे निश्चित उद्देश असतात आणि त्या उद्देशाची प्राप्ती करण्यासाठी योजनाबद्ध रूपात संशोधन कार्य करणे आवश्यक आहे. याचाच अर्थ संशोधन कशा पद्धतीने केले जाईल या संबंधात आराखडा तयार केला जातो. आराखडा बनवणे म्हणजे कार्ययोजना आखणी होय. ''नियोजित कार्यात उपस्थितीत होण्याची शक्यता असणाऱ्या समस्या व अडचणीचा विचारपूर्वक अंदाज घेऊन त्या समस्या आणि अडचणीच्या निराकरणाची आगाव व्यवस्था करून घेण्याच्या प्रक्रियेला सर्वसामान्य अर्थाने आराखडा असे म्हणतात.'' संशोधन आराखड्याचे प्रत्येक संशोधनासाठी विशेष महत्त्व असते. संशोधन कार्यास आरंभ करण्यापूर्वी येणाऱ्या अनेक अडचणींचा आणि त्यांच्यावर मात करण्यासाठी काय करता येईल यांचा अगोदरच विचार करून ठेवला तर संशोधन प्रक्रियेच्या वेगवेगळ्या पैलूवर आपणास जास्त चांगले नियंत्रण ठेवता येते आणि अपयश आणि शक्य होते. संशोधनाबाबत प्रत्येक बाबीची नोंद ठेवणे संशोधन करताना शक्य नसते म्हणून वैज्ञानिक आणि तांत्रिकबाबी या संशोधनात निवडाव्या लागतात. त्यामुळे संशोधक संकल्पनाच्या आधारे व सिद्धांतांच्या आधारे नोंदी ठेवत असतो. संशोधनकार्याच्या संबंधात घेतलेल्या निर्णयाच्या प्रक्रियेला संशोधन आराखडा असे म्हणतात.

## ३.१ उद्दिष्टे:

१. सामाजिक संशोधनाचा अर्थ आणि कार्ये समजून घेता येईल.

२. संशोधन आराखड्याच्या अवस्था अथवा टप्पे समजून घेता येतील.

३. वर्णनात्मक संशोधन आराखडा, विश्लेषणात्मक आणि अन्वेषणात्मक, संशोधन आराखडा समजून घेता येईल.

४. सर्वेक्षण, व्यष्टी अध्ययन, प्रायोगिक आणि ऑनलाईन संशोधन समजून घेता येईल.

## ३.२ विषय विवेचन

प्रस्तुत घटकात आपण संशोधन आराखडा म्हणजे काय त्याचे विविध प्रकार या संदर्भातले अध्ययन करणार आहोत तसेच संशोधन आराखडा विषयी सविस्तर जाणून घेऊन सर्वेक्षण व्यस्त अध्ययन याविषयी जाणून घेणार आहोत त्याचबरोबर संशोधन आराखड्याचे संशोधनातील महत्त्व यावरही आपण प्रकाश टाकणार आहोत.

### ३.२.१ सामाजिक संशोधनाचा अर्थ आणि कार्ये

**अ) सामाजिक संशोधनाचा अर्थ** (Meaning of Social Research)-

आधुनिक युगात विज्ञान किंवा शास्त्राचे विशेष महत्त्व आहे. व त्याबद्दल चर्चा ही बरीच केली जाते. मानवाचा सर्वांगीण विकास हा विज्ञानामुळे झाला आहे हे अगदी सर्वसामान्य जाणीव लोकांना देखील माहिती आहे. विज्ञानामुळे मानवी जीवन हे अधिक सुखमय झाले आहे विज्ञानामध्ये विविध विषयावर संशोधन होत असतात. अनेक शास्त्रज्ञ संशोधन कार्यात सतत व्यस्त आहेत. वैज्ञानिक पद्धतीचा वापर करुन वेगवेगळ्या विषयात संशोधन केले जाते. त्यावरुन विज्ञान ही एक संशोधन किंवा अध्यायनाची पद्धती आहे हे लक्षात येते. वैज्ञानिक पद्धतीचा अवलंब करून नैसर्गिक शास्त्रात संबोधन केले जाते. त्याचप्रमाणे सामाजिक घटनांच्या संदर्भातही वैज्ञानिक पद्धतीचा वापर अध्ययनाकरता करण्यात येतो. अनेक समाजशास्त्रज्ञांनी या पद्धतीचा वापर करुन अध्ययन केले आहे. समाजसशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, मानसशास्त्र इत्यादी सर्व सामाजिक शास्त्रात वैज्ञानिक पद्धतीचा वापर करुन अध्ययन केले जाते. त्यामुळे त्या विषयांना शास्त्राचा दर्जा प्राप्त झाला आहे. शास्त्राचे मुख्यत: नैसर्गिक शास्त्रे (Natural Sciences) आणी सामाजिक शास्त्रे (Social Sciences) असे दोन प्रकार पडतात. सामाजिक शास्त्रात सामाजिक घटनांच्या संदर्भात अध्ययन केले जाते, वैज्ञानिक पद्धतीचा वापर करुन सामाजिक घटनांचे शास्त्रीयदृष्ट्या अध्ययन केले जाते तसेच नवीन ज्ञान प्राप्त करुन जुन्या ज्ञानाचे परिक्षण केले जाते. तेव्हा त्याला सामाजिक संशोधन (Social Research) असे म्हणतात. सामान्यपणे संशोधन म्हणजे ज्ञानाचा शोध घेणे होय. काही लोकांच्या दृष्टीने संशोधन म्हणजे एका गोष्टीवरुन दुसऱ्या गोष्टीची माहिती घेणे आहे. सामाजिक संशोधन ही एक अज्ञानातून ज्ञानाकडे जाणारी प्रक्रिया आहे. आपल्या समाजात बऱ्याच सामाजिक घटना आणि सामाजिक

समस्या घडत असतात. कोणत्याही सामाजिक घटना किंवा सामाजिक समस्येचा शोध घेणे, त्यावर गृहितके मांडून त्यांचे परिक्षण करणे, वेगवेगळ्या व विशिष्ट घटनांचा संबंध शोधणे व त्याचा विस्तृत अभ्यास करणे आणी त्यासाठी विशिष्ट वैज्ञानिक कार्यपद्धतीचा वापर करणे हा सामाजिक संशोधनाचा अर्थ आहे. सामाजिक संशोधन पद्धतीत अज्ञात सामाजिक घटनांचा शोध घेतला जातो तसेच ज्ञात सामाजिक घटनांचे विश्लेषण व अभ्यासही केला जातो. अशा प्रकारे सामाजिक संशोधन ही सामाजिक जीवनाच्या संबंधांमध्ये सत्याचा शोध घेणारी एक शास्त्रीय पद्धती आहे. सामाजिक संशोधनाच्या विविध व्याख्या विविध संशोधकांनी दिल्या आहेत. त्यापैकी काही खालीलप्रमाणे आहेत–

१) **रेडमन आणि मुरी** (Redman and Murray)– ''सामाजिक संशोधन हा नव ज्ञान प्राप्तीचा एक पद्धतशीर प्रयत्न होय.''

२) **बोगार्डस** (Bogardus) – ''एकत्रित राहणाऱ्या लोकांच्या जीवनातील क्रियाशील अंतर्भूत प्रक्रियांचे संशोधन म्हणजे सामाजिक संशोधन होय.''

३) **व्हिटने** (Whitney) – ''समाजशास्त्रीय संशोधनामध्ये मानव समूहाच्या संबंधांच्या अध्ययनाचा समावेश होतो.''

४) **सी. ए. मोझर** (C. A. Moser) – ''सामाजिक घटना आणि समस्या याबाबत नवीन ज्ञान प्राप्तीकरता करण्यात आलेल्या व्यवस्थित संशोधनाला आपण सामाजिक संशोधन म्हणतो.''

५) **श्रीमती पॉलीन व्ही. यंग** (Smt. Pauline V. Young)– ''सामाजिक संशोधन एक शास्त्रीय योजना असून जिचा उद्देश तार्किक आणि क्रमबद्ध पद्धतीद्वारा नवीन तथ्यांचा शोध घेणे किंवा जुन्या तथ्यांचे पुनर्परीक्षण आणि त्यांच्यात आढळून येणारे अनुक्रम, अत:संबंधी कार्यकारण भाव आणि त्यांना संचलित करणाऱ्या नैसर्गिक नियमांचे विश्लेशण करणे हा आहे. वरील व्याख्यांवरुन हे स्पष्ट होते की, सामाजिक संशोधन ही एक सामाजिक वास्तवतेविषयी ज्ञान मिळवण्याची तसेच विभिन्न पैलूंच्या विभिन्न संदर्भात अभ्यास करण्याची पद्धतशीर प्रक्रिया आहे. यामध्ये अशास्त्रीय विचारांना कोणतेही स्थान नसून ही फक्त वैज्ञानिक पद्धती आहे. त्यामुळे शास्त्रीय पद्धतीनुसाराच अध्ययन केले जाते.

थोडक्यात, कोणत्याही सामाजिक समस्येवर अथवा घटनेवर क्रमबद्ध वैज्ञानिक पद्धतीच्या आधारे तर्क परिक्षण करणे, नवीन गोष्टींचा शोध घेणे, नवीन ज्ञानाची प्राप्ती करणे, विविध परस्पर संबंध मांडणे ईत्यादींचे अद्ययन केले जाते त्यालाच सामाजिक संशोधन म्हटले जाते.

**सामाजिक संशोधनाची कार्ये**

संशोधन कार्यात संशोधक हा अभ्यासापूर्वी किंवा संशोधनापूर्वी आवश्यकते सर्व नियोजन करून आपला संशोधन आराखडा तयार करत असतो. सामाजिक संशोधनात संशोधन आराखड्यास खूप महत्वाचे स्थान आहे. संशोधन आराखड्याशिवाय वस्तुनिष्ठ संशोधन करणे अशक्यप्रय आहे. तथे कोणत्या पद्धतीने एकत्रित केली जातात त्याबाबतचे महत्त्वाचे निर्णय संशोधन करण्यापूर्वी संशोधन आराखड्यात निश्चित केली

जातात. जशी की एखादी इमारत बांधण्यापूर्वी एखाद्या इंजिनीयरला वीट, वाळू, सिमेंट यांचे एकत्रीकरण कामगारांचे नियोजन यंत्रसामुग्री व आवश्यक इतरबाबी यांचा समावेश करणे अत्यावश्यक असते त्याचप्रमाणे संशोधन कार्यात याबाबींची आवश्यकता असते. सामाजिक संशोधन करण्यास संशोधक सज्ज होऊन मनापासून आणि तर्कांने शुद्ध विचाराने आपले कार्य चालू ठेवतो. त्याचप्रमाणे सामाजिक संशोधनात यशस्वी होण्यासाठी काही मूलभूत बाबींची पूर्तता होणे आवश्यक असते. जसे की,

१) विविध सामाजिक घटना, समस्या, तथ्ये यासंदर्भात ज्ञान मिळवणे.

२) सामाजिक घटनांमधील परस्परसंबंधाची मांडणी करणे व त्यांचे विश्लेषण करणे.

३) सामाजिक घटनांना नियंत्रित करणाऱ्या नियमांचा शोध घेणे.

४) नवीन प्रयोग करून तथ्यांच्या आधारवर शास्त्रीय संकल्पनांची निर्मिती करणे.

५) सामाजिक जीवन व घटना यासंदर्भातील समस्या सोडविण्यासाठी व समाजाला प्रगतशील बनविण्यासाठी आवश्यक उपाययोजनांचा अभ्यास करणे.

६) समाजात महत्त्वपूर्ण व अनुकूल परिवर्तन घडवण्यासाठी सामाजिक योजनांची निर्मीती करणे.

७) सामाजिक संघटन आणी विविध संस्थांची माहिती घेऊन संशोधन करणे.

८) तथ्यांच्या आधारावर शास्त्रीय संकल्पनांची निर्मिती करणे हे देखील सामाजिक संशोधनाचे महत्वाचे कार्य आहे.

९) विविध विषयात संशोधन करुन ते प्राप्त केलेले ज्ञान समाजात नियंत्रण ठेवण्यास वापरणे. उदा बालगुन्हेगारीच्या संदर्भातले सामाजिक संशोधन करुन मिळवलेले ज्ञान हे बालगुन्हेगारीच्या समस्या सोडविण्यासाठी किंवा बहुदा त्या समस्या नियंत्रित करण्यासाठी वापरले जाते.

१०) नवीन तथ्यांचा शोध घेणे आणी जुन्या तथ्यांचे परिक्षण करणे. संशोधकाला जुन्या तथ्यांचे परिक्षण करणे आवश्यक असते कारण कार्यकालांतराने घटनांमध्ये परिवर्तन होण्याची शक्यता असते म्हणून बदललेल्या परिस्थितीत जुन्या तथ्यांची किंवा संकल्पनांची समप्रमाणता तपासण्याची गरज पडते. म्हणून सामाजिक संशोधनात नव्या तथ्यांचा शोध घेतला जातो तसेच जुन्या तथ्यांचे परिक्षण केले जाते व जुन्या संकल्पनांमध्ये काही बदल ही करण्यात येतात.

**१. अभ्यास विषय निश्चित करावा**

संशोधन करत असताना संशोधन कार्यासाठी स्वतःचा तटस्थ आणि वैज्ञानिक दृष्टिकोनातून अभ्यासणे आवश्यक असते म्हणजेच संशोधकाला निवडलेले अभ्यास क्षेत्र ठरवून घ्यावे लागते असे केल्यास संशोधन कार्य सुलभ होते. संशोधन करत असताना विविध टप्पे त्यातील महत्त्वपूर्ण बाबी याची व्यवस्थितपणे नियोजन करावे लागते त्यासाठी त्याला कालखंड, मर्यादा, वेळ याचा निश्चित विचार करून नियोजनबद्ध पद्धतीने संशोधन कार्य करणे अपेक्षित असते.

### २. समस्या सूत्रण ठरवणे

संशोधक आणि संशोधन कार्यात समस्या सूत्र निश्चित केली की त्यासंबंधी सर्व आवश्यक ती माहिती काढून कोणत्या पद्धतीने मिळवायची याविषयी संशोधन आराखड्यात ठरवता येते. तथ्य संकलन करताना मिळवायची माहिती वस्तुनिष्ठ कशी मिळवता येईल याबाबतची विचार करून योग्य त्या अभ्यास पद्धतीचा वापर करून त्यांची विश्लेषण करणे संशोधन आराखड्यात अपेक्षित असते म्हणून समाजशास्त्र ठरणे गरजेचे असते.

### ३. वेळेची मर्यादा असली पाहिजे

सामाजिक संशोधनात संशोधन आराखडा बनवत असताना वेळेचे नियोजन करणे अत्यंत गरजेचे असते. वेळेच्या नियोजनामुळे कामाला अथवा नियोजनाला सूत्रबद्धता येते व सामाजिक संशोधन सुलभ गतीने होते. सामाजिक गुंतागुंत असेल तर संशोधकाला वेळेचे नियोजन करावे लागते. पूर्व नियोजनाप्रमाणे तेवढा वेळ त्या कामासाठी दिला पाहिजे.

### ४. तथ्य संकलन करणे

संशोधनाच्या कामात संशोधकांनी कोणती संशोधन पद्धतीत वापरायची व संशोधन कामासाठी किती नमुने निश्चित करायचे हे ठरवावे लागते. प्रस्तुत संशोधनाच्या आधारे माहिती एकत्रित करून संख्याशास्त्राच्याआधारे स्वतंत्र वर्गीकरण करून तक्ते तयार करून त्याचे विश्लेषण करावे लागते यामुळे संशोधन अधिक स्पष्ट होते. म्हणून सामाजिक संशोधनात तथ्य संकलनाला फार महत्व आहे.

### ५. विश्लेषण वस्तुनिष्ठ असावे :

संशोधकाने ज्या समस्या सुत्रानाच्या आधारे एखाद्या समस्येचा अभ्यास केला असेल त्या अभ्यासाच्या तथ्य संकलनाला जसे महत्व आहे. तसे तथ्य संकलनाच्या विश्लेषणालाही तेवढेच महत्व आहे. कारण विश्लेषण हे एकदम अचूक व शास्त्रीय सिद्धांताला अनुसरून असावे म्हणजेच ते वस्तुनिष्ठ असावे.एकूणच सामाजिक संधोधनात व संशोधन आराखड्यात तथ्य विशेल्ष्णाला महत्व असून ते विश्लेषण कसे व कोणत्या तत्वाच्या आधारे केले जाणार आहे या बाबतचा उल्लेख त्यात असतो.अशा प्रकारची अनेक विविध कार्ये सामाजिक संशोधनात प्रक्रियेत संशोधकाला पार पाडावी लागतात. अशी कार्ये पार पाडणे म्हणजे संशोधन सुरु होण्याआधीच प्रतिबिंब तयार होणे होय. किंवा संशोधनाची इमारत प्रत्यक्षात उभी करायची कशी हे योजनाबद्ध रित्या ठरविणे होय.यासाठी हि कार्ये पार पडावी लागतात.

**सामाजिक संशोधनाची वैशिष्ट्ये** (Characteristics of Social Research)-

१) सामाजिक संशोधनात सामाजिक घटनांचा अभ्यास केला जातो. म्हणजेच सामाजिक संशोधन हे सामाजिक घटनांशी संबंधित आहे. व्यक्तींच्या सामाजिक वर्तनाचा, क्रिया-प्रतिक्रिया आणी विविध परिस्थितींच्या संदर्भात अभ्यास या संशोधनात केला जातो.

२) नवीन तथ्यांचा शोध आणी जुन्या तथ्यांचे परिक्षण सामाजिक संशोधनात केले जाते. प्रत्येक शास्त्राचा उद्देश हा नवीन तथ्यांच्या नवीन संबंध व नवीन नियमांचा शोध घेणे हा असतो. तसेच जुन्या तथ्यांचे आणी सिद्धांताचे परिक्षण करणे सुद्धा आवश्यक असते. घटनांमध्ये कालांतराने परिवर्तन होण्याची शक्यता असते म्हणून अशा बदललेल्या परिस्थितीत जुन्या संकल्पनांची समप्रमाणता (validity) तपासण्याची गरज पडते. त्यानुसार जुन्या संकल्पनांमध्ये काही बदल करण्यात येतात.

३) सामाजिक संशोधन हे वैज्ञानिक पद्धतीने केले जाते. वैज्ञानिक पद्धत ही सामाजिक संशोधनाचा आधार आहे. सामाजिक संशोधनात निरिक्षण, तथ्यांचे संकलन, वर्गीकरण, परिक्षण इत्यादी वैज्ञानिक पायऱ्यांचा उपयोग केला जातो. आणी त्या आधारावर निष्कर्ष मांडले जातात. म्हणून वैज्ञानिक पद्धतीचा अवलंब अतिशय महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

**सामाजिक संशोधनाचे उद्देश** (Objects of Social Research)-

**१) ज्ञानाची प्राप्ती करणे-** प्रत्येक संशोधनाचा हेतू हा ज्ञानाची वृद्धी करणे हा असतो. सामाजिक संशोधनाचा उद्देश हा सामाजिक जीवन, घटना, तथ्ये किंवा समस्यांच्या संदर्भात ज्ञान प्राप्ती करणे हा आहे.

**२) सामाजिक घटनांमधील प्रकार्यात्मक संबंधांचा शोध घेणे-** प्रत्येक सामाजिक घटना किंवा तथ्यांचे सामाजिक संरचनेच्या अंतर्गत कोणते ना कोणते प्रकार्य असते. सामाजिक घटनांमधील प्रकार्यात्मक संबंध लक्षात घेतल्याशीवाय सामाजिक घटना किंवा तथ्यांचे खरे स्वरुप स्पष्ट करणे अशक्य असते. म्हणून सामाजिक घटनांमधील प्रकार्यात्मक संबंधांचा शोध घेणे हा सामाजिक संशोधनाचा एक महत्वाचा उद्देश आहे.

**३) स्वाभाविक नियमांचा शोध घेणे-** सामाजिक घटना या अचानकपणे घडून येत नाहीत. ज्याप्रमाणे पृथ्वीची गती, ऋतुमान, पाऊस, भूकंप, ज्वालामुखी इत्यादी. नैसर्गिक घटना या अचानक घडून येत नाहीत. तर काही विशिष्ट नियमांद्वारा या सर्व घटना संचलित आणी नियंत्रित होत असतात. त्याचप्रमाणे मानवी किंवा सामाजिक घटना त्या काही स्वाभाविक किंवा सामाजिक नियमांच्या अंतर्गत येतात. म्हणून सामाजिक घटनांना संचलित आणी नियंत्रित करणाऱ्या नियमांचा शोध घेणे हा सामाजिक संशोधनाचा एक उद्देश आहे.

४) प्रयोगसिद्ध तथ्यांच्या आधारावर शास्त्रीय संकल्पनांची निर्मिती करणे हा सामाजिक संशोधनाचा एक उद्देश आहे.

**५) सामाजिक समस्या सोडवणे-** सामाजिक समस्या सोडविण्याच्या दृष्टीने सामाजिक संशोधनातून मिळवलेले ज्ञान अतिशय उपयुक्त आहे. सामाजिक जीवन आणी त्यासंबंधीच्या समस्या या दिवसेंदिवस जटील बनत चालल्या आहेत. त्या समस्या सोडविण्यासाठी शास्त्रीय ज्ञान मिळवणे आवश्यक आहे. हे ज्ञान सामाजिक संशोधनातून सहज प्राप्त होते.

**६) सामाजिक तणाव दूरकरणे –** अनेकदा सामाजिक घटना किंवा तथ्यांच्या संबंधात आपला चुकीचा समज असतो. अशा गैरसमजूतीमुळे सामाजिक तणाव निर्माण होतो. म्हणून अनेक गैरसमज आणी वाईट चालीरीती दूर करण्याच्या संदर्भात सामाजिक संशोधन अतिशय उपयुक्त आहे.

**७) सामाजिक योजना तयार करण्यासाठी–** सामाजिक संशोधनातून प्राप्त ज्ञानाची सामाजिक योजना तयार करण्यासाठी विशेष मदत होते. सामाजिक योजनांद्वारे समाजात महत्त्वपूर्ण आणी अनुकूल परिवर्तन घडवून आणले जाते. संशोधनामुळे विभिन्न सामाजिक घटनांमध्ये अंतर्भूत नियमांची माहिती मिळते. सामाजिक योजना तयार करण्यासाठी व त्या यशस्वी करण्यासाठी सामाजिक संशोधन महत्त्वपूर्ण आहे.

**८) सामाजिक नियंत्रणास सहाय्यक–** सामाजिक संशोधनातून प्राप्त केलेले ज्ञान सामाजिक नियंत्रण ठेवण्यास सहाय्यक ठरते. एखाद्या घटनेच्या संदर्भात ज्ञान वाढत जाईल त्याप्रमाणात त्यावर नियंत्रण ठेवणे शक्य होईल. उदा. बालगुन्हेगारीच्या संदर्भात सामाजिक संशोधन करुन अधिकाधिक ज्ञान प्राप्त केले असेल तर त्या ज्ञानाचा उपयोग करून बालगुन्हेगारीची समस्या नियंत्रित करता येऊ शकते. यावरून असे स्पष्ट होते की, सामाजिक संशोधन करुन प्राप्त ज्ञानाचा उपयोग करुन नियंत्रण ठेवले जाते.

**सामाजिक संशोधनाचे महत्व** (Importance of Social Research)-

**१) अज्ञानाचा नाश** (Removal of Ignorance) - प्रकाशामुळे अंधार नष्ट होतो. तसेच ज्ञानाच्या प्रकाशामुळे अज्ञानाचा अंधकार नष्ट होतो. सामाजिक संशोधनामुळे विभिन्न सामाजिक घटनांच्या संबंधात वैज्ञानिक ज्ञान प्राप्त होते. त्यामुळे त्या घटनांच्या संबंधात असलेले आपले अज्ञान दूर होते. अनेक सामाजिक समस्या या अज्ञानामुळेच निर्माण होतात. या समस्यांविषयीचे संशोधन करुन त्याबाबतचे अज्ञान दूर करणे शक्य आहे. अशा प्रकारे सामाजिक संशोधनामुळे संबंधित विषयांचे ज्ञान प्राप्त करुन त्या विषयाबाबतचे अज्ञान दूर केले जाते.

**२) सामाजिक कल्याणासाठी सहाय्यकारक** (Helpful in Social Welfare)- सामाजिक संशोधन करुन त्यामधून प्राप्त झालेल्या ज्ञानाचा उपयोग करून अनेक समस्या योग्य पद्धतीने सोडविणे शक्य होते. म्हणून सामाजिक कल्याणाच्या कार्याकरिता सामाजिक संशोधनाचे सहाय्य घेणे आवश्यक आहे.

**३) सामाजिक शास्त्राच्या विकासाला सहाय्यक** (Helpful in the Development of Social Sciences)- समाजशास्त्र, मानसशास्त्र, अर्थशास्त्र, राज्याशास्त्र, मानवशास्त्र ही सर्वच सामाजिकशास्त्रे मानव समाजाशी संबंधित आहेत. ही शास्त्रे स्वतंत्र असली तरी परस्परसंबंधित आहेत. एका शास्त्रात असलेल्या ज्ञानाचा फायदा दुसऱ्या शास्त्राला होत असतो. त्यामुळे सामाजिक संशोधनातून प्राप्त केलेल्या ज्ञानाचा उपयोग इतर सामाजिक शास्त्रांना होतो. सामाजिक संशोधनामध्ये नवनवीन तंत्रांचा शोध लावला जातो. त्यामुळे समाजशास्त्राची प्रगती होते. अशा प्रकारे सामाजिक संशोधन हे सामाजिक शास्त्राच्या विकासामध्ये सहाय्यक ठरते.

**४) सामजिक नियंत्रणास साहाय्यक** (Helpful in Social Control)- समाजात कोणकोणते विघटन घडवून आणणारे घटक क्रियाशील आहेत आणी त्यांचे स्वरूप कसे आहे त्यासंबंधी जर अध्ययन झाले असेल तर ते ज्ञान वापरुन सामजिक नियंत्रण प्रस्थापित करणे शक्य होते.

### ३.२.२ संशोधन आराखड्याच्या अवस्था अथवा टप्पे:

कोणत्याही सामाजिक घटना किंवा समस्यांचे अध्ययन वैज्ञानिक पद्धतीद्वारा केले जाते. भौतिक विज्ञानामध्ये वैज्ञानिक पद्धतीच्या ज्या पायऱ्या आहेत त्याच पायऱ्या सामाजिक शास्त्राच्या देखील आहेत.

**सामाजिक संशोधनाच्या पायऱ्या** (Steps in Social Research) पुढीलप्रमाणे आहेत-

१. **समस्या सूत्रण** (Formulation of the Problem)-

सर्वप्रथम संशोधकाला कोणत्या विषयात संशोधन करायचे आहे ते निश्चीत करावे लागते. व त्यानंतर त्या विषयाचे संशोधन समस्येत रुपांतर करावे लागते. अध्ययनाचे क्षेत्र किंवा विषय व्यापक नसावा कारण अध्ययन करताना विस्तृत क्षेत्र असल्यास संशोधकांना संशोधन करताना काही अडचणींचा सामना करावा लागू शकतो. उपलब्ध वैज्ञानिक पद्धती आणी विविध तंत्राच्या सहाय्याने त्या विषयाचे अध्ययन करणे शक्य आहे काय या गोष्टींचा विचार संशोधकाला करावा लागतो. विशिष्ट पैलूची निवड म्हणजेच समस्या सूत्रण होय. विषयाची निवड करणे ही सामाजिक संशोधनाची अतिशय कठीण पायरी आहे. ऑगबर्न (Ogburn) यांनी संशोधकांना इशारा दिला की, 'संशोधकाने संशोधन कार्यासाठी अशा विषयाची निवड कधीही करु नये की, ज्या संदर्भात प्रमाणसिद्ध तथ्ये उपलब्ध नाहीत. आणी जो पद्धतीशास्त्राच्या दृष्टीने अतिशय कठीण आहे.'

२) **संदर्भ साहित्याचे परिक्षण** (Review of Literature)-

संशोधकाने त्याच्या विषयासंदर्भात आत्तापर्यंत जे जे साहित्य निर्माण झाले आहे त्याची माहिती करून घेणे किंवा त्याचा आढावा घेणे गरजेचे आहे.

संशोधकाने वेगवगळ्या नियतकालिकांमधून, सूची, प्रकाशित शैक्षणिक संदर्भ ग्रंथ सूची, सरकारी रिपोर्ट व पुस्तके ई. मधून संशोधकाच्या विषयाशी निगडीत पुर्वी झालेले अभ्यास जाणिवपूर्वक वाचले पहिजेत. त्यामुळे संशोधकाला एतिहासातील अभ्यासले गेलेले पैलू आणी त्यावर मांडलेले विश्लेशनाचा अभ्यास करता येईल.

३) **गृहीतकृत्याची निर्मिती** (Formation of Hypothesis)

संशोधन समस्येचे संभाव्यउत्तर किंवा स्पष्टीकरण म्हणून वाक्यात मांडण्यात येणाऱ्या विधानाला गृहीतकृत्य म्हणतात. संशोधकाने मांडलेली गृहीतकृत्ये संशोधन क्षेत्र निश्चित करण्यात व संशोधनाची दिशा ठरवण्यास मदत करत असतात. ते संशोधकाला अधिक चौकस व विचारक्षम बनवतात. त्यामूळे संशोधकाला विषयाच्या महत्त्वाच्या घटकांवर लक्ष केंद्रित करण्यास मदत होते.

### ४) **संशोधन आराखडा** (Research Design) -

संशोधन आराखडा निश्चित करणे ही एक महत्त्वाची सामाजिक संशोधनाची पायरी अत्यंत महत्त्वाची आहे. संशोधन आराखड्यामुळे संशोधकाला माहितीचे संकलन करणे सोपे जाते.

संशोधनाच्या उद्धिष्टानुसार संशोधन आराखड्याचे परिचयात्मक, वर्णनात्मक, निदानात्मक आणी प्रयोगात्मक संशोधन असे प्रामुख्याने चार प्रकार पडतात. संशोधक संशोधनाच्या उद्धिष्टानुसार संशोधन आराखड्याचे स्वरुप निश्चित करत असतो. सर्वच प्रकारच्या संशोधनात संशोधन आराखड्याचे स्वरुप एकसारखे नसते.

### ५) **नमुन्याची निश्चिती** (Determining Sample Design)-

संशोधकाला त्याच्या विषयाच्या प्रत्येक गोष्टींचा अभ्यास करणे शक्य नसते. यामध्ये संशोधकला अधिक वेळ, परिश्रम व पैसा लागू शकतो. यासाठी संशोधकाला प्रथम नमुना निवडीच्या पद्धतींचा विचार करावा लागतो. त्यानंतर संशोधक काही नमुन्यांची निवड करतो.

नमुना निवडीच्य पद्धतीत खालील काही पद्धतींचा समावेश केला जातो.

- a) यादृच्छिक नमुना निवड
- b) व्यवस्थाबद्ध नमुना निवड
- c) सहेतूक नमुना निवड
- d) स्तरित यादृच्छिक नमुना निवड
- e) कोटा नमुना निवड
- f) बहुमार्गी नमुना निवड
- g) व्यापक नमुना निवड ईत्यादी.

### ६) **तथ्य संकलन** (Collection of Data) -

तथ्य संकलन करण्याच्या अनेक पद्धती आहेत. संशोधक त्याच्याजवळ उपलब्ध असलेला वेळ, पैसा, संशोधनाचे स्वरुप व इतर साधनसामुग्रीच्या आधारावर तथ्य संकलित करण्याच्या पद्धतीचा वापर करतो. सामान्यपणे खालील मार्गांचा वापर तथ्य संकलित करण्यासाठी करता येतो.

प्राथमिक स्त्रोत व द्वितीयक स्त्रोत असे तथ्य संकलन करण्याचे दोन मार्ग आहेत.

**प्राथमिक स्त्रोत** (Primary Source)-

a) **निरीक्षण** (Observation)- हा एक प्राथमिक स्त्रोत आहे. संशोधक आपल्या विषयाच्या संबंधित घटना, वस्तू ईत्यादिचे स्वत: निरीक्षण करून तथ्यांचे संकलन करत असतो.

b) **व्यक्तिगत मुलाखत** (Personal Interview) - संशोधक आपल्या विषयाच्या संबंधित व्यक्तींना स्वत: भेटून त्यांच्याशी चर्चा करुन अतिशय महत्त्वाची तथ्ये प्राप्त करतो त्याला व्यक्तिगत मुलाखत पद्धत म्हणतात.

c) **टेलिफोनद्वारे मुलाखत** (Telephonic Interview)- या पद्धतीमध्ये संशोधक आपल्या विषयाच्या संबंधित व्यक्तींशी टेलिफोनद्वारे संपर्क करून त्यांच्याशी चर्चा करतो व तथ्यांचे संकलन करतो.

d) **प्रश्नावली** (Questionnaire)- ज्यावेळी अध्ययनक्षेत्र विस्तृत असते त्यावेळी प्रत्यक्ष उत्तरदात्यासोबत संपर्क करुन तथ्ये संकलन करणे शक्य नसते म्हणून संशोधक आपल्या विषयाची प्रश्नावली पोस्टाने उत्तरदात्याला पाठवतो. प्रश्नावलीमधील प्रश्नांची उत्तरे लवकर लिहुन ती प्रश्नावली परत पाठवन्याची विनंती केली जाते.अशा प्रकारे अप्रत्यक्षपणे उत्तरदात्याशी संपर्क साधून महत्त्वाची तथ्ये संकलित केली जातात. म्हणून उत्तरदात्याच्या प्रश्नावली भरुन देण्याच्या सहकार्याच्या या पद्धतीत विशेष महत्त्व आहे.

e) **अनुसूची** (Schedule)- ही पण एक प्रकारची प्रश्नावलीच आहे. परंतु अनुसूची ही पोस्टाद्वारे पाठवली जात नाही तर ती संशोधक उत्तरदात्यांना प्रश्न विचारुन स्वत: उत्तरे लिहतो. लहान अध्ययन क्षेत्रात या पद्धतीचा प्रामुख्याने वापर केला जातो. ही पद्धत वापरुन अशिक्षित उत्तरदात्याकडून पण तथ्ये प्राप्त केली जातात. अशा प्रकारे निरिक्षण, व्यक्तिगत मुलाखत, टेलिफोनद्वारे मुलाखत, प्रश्नावली आणी अनुसूची हे प्राथमिक स्त्रोत आहेत. सामाजिक संशोधनात प्राथमिक स्त्रोतांना विशेष महत्त्व आहे.

**द्वितीयक स्त्रोत** (Secondary Source)-

a) **व्यक्तिगत प्रलेख** (Personal Documents)- व्यक्तिगत प्रलेख स्त्रोतांमध्ये आत्मचरित्र, जीवनचरित्र, दैनंदिनी, पत्रे, पुस्तके ई. चा समावेश होता.

b) **सार्वजनिक प्रलेख** (Public Documents) - सार्वजनिक प्रलेख स्त्रोतांमध्ये प्रकाशित व अप्रकाशित असे दोन प्रकार पडतात. प्रकाशित स्त्रोतांमध्ये विविध आंतरराष्ट्रीय अहवाल, विविध समित्यांचे अहवाल, संशोधन संस्था, पुस्तके, वर्तमानपत्रे, मासिके इत्यादीचा समावेश होतो. अप्रकाशित स्त्रोतांमध्ये संशोधन अहवाल, शासकीय अहवाल, दुर्मिळ प्रलेख इत्यादीचा समावेश होतो. अनेकदा प्राथमिक स्त्रोत व द्वितियक स्त्रोत या दोन्ही स्त्रोतांद्वारे संशोधक तथ्यांचे संकलन करीत असतो.

**७) संशोधन प्रकल्पाची अंमलबजावणी** (Execution of Project)-

ही एक शास्त्रीय संशोधनाची महत्त्वाची पायरी समजली जाते.

संशोधन योग्य दिशेने व वेळेनुसार होते आहे की नाही हे संशोधकाने तपासले पाहिजे. जर तथ्यांबद्दल माहिती घेण्यास मुलाखत पद्धतीचा वापर केला जाणार असेल तर मुलाखत घेणाऱ्याची निवड योग्य प्रकारे करणे व त्यांना मुलाखती संदर्भातील योग्य प्रशिक्षण देणे गरजेचे असते. यासंदर्भातील सर्व माहिती घेऊन संशोधन प्रकल्पाची अंमलबजावणी व्यवस्थितपणे होत आहे का नाही बघणे हेही संशोधकाचे काम आहे.

**८) तथ्यांचे परिक्षण** (Analysis of Data) - संशोधक तथ्यांचे संकलन पूर्ण केल्यानंतर तथ्यांच्या परिक्षणाचे कार्य पार पाडतो. तथ्यांच्या परिक्षणात अनेक पद्धतींचा समावेश होतो. तथ्यांचे सांकेतीकरण, सारणीकरण यासाठी संख्याशास्त्रीय पद्धतींचा वापर केला जातो व तथ्यांमधील सहसंबंध शोधण्याचा समावेश होतो. विश्लेशणानंतर त्या विषयाच्या संदर्भात निष्कर्ष मांडले जातात.

**९) गृहीतकृत्यांची चाचणी** (Hypothesis Testing) - तथ्यांच्या परिक्षणांच्या नंतरच्या टप्प्यात काही गृहीतकृत्यांची मांडणी केली असेल तर त्याची चाचणी घेतली जाते. तथ्ये सुसंगत आहेत की विरोधी यांचे स्पष्टीकरण संशोधकाला द्यावे लागते. गृहीतकृत्य विसंगत असेल तर संशोधकाला त्याचा त्याग करावा लागतो व एखादे गृहीतकृत्य निष्कर्षाच्या कसोटीत उतरले तर ते प्रमाणित ठरते. प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी 'टी टेस्ट', 'एफ टेस्ट', 'झेड टेस्ट', 'काई स्क्वेअर टेस्ट' इत्यादी अशा चाचण्यांचा वापर केला जातो.

**१०) सामान्यीकरण आणी विश्लेशण** (Generalization and Interpretation) संशोधक त्याच्या गृहीतकांच्या चाचणीच्या आधारावर सिद्धांतांची मांडणी करतो. सर्व सिद्धांतांचा व संशोधनाचा अभ्यास करून संशोधक सामान्यीकरणाच्या अवस्थेला पोचतो व त्याच्या संशोधनाचे विश्लेशन करतो.

**११) अहवाल लेखन** (Report Writting) - अहवाल लेखन ही सामाजिक संशोधनाची शेवटची पायरी आहे. यामध्ये संशोधकाला संशोधनाची उद्दिष्टे, अध्ययनासाठी अवलंबण्यात आलेली पद्धत, संशोधनाचे संघटन नेमके कसे केले, त्यासाठी कोणत्या पद्धतीचा वापर केला, संकलित करण्यात आलेल्या तथ्यांचे विश्लेषण कसे केले गेले यासंदर्भात अहवाल देणे गरजेचे असते. संशोधन करत असताना वापरण्यात आलेले संदर्भ कोठून घेतले हे स्पष्ट करणारी यादी द्यावी लागते. संशोधकाने केलेले संशोधन लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी त्या संशोधनाचा अहवाल तयार करणे गरजेचे असते. अन्यथा ते संशोधन ठराविक वेळेपुरते मर्यादित राहील व कालांतराने नाहीसे होईल.

अशा प्रकारे संशोधन ही एक प्रक्रिया असून या प्रक्रियेत अनेक पायऱ्या आहेत. संशोधन प्रक्रियेतील प्रत्येक पायरी ही महत्त्वाची आहे. जर संशोधन प्रक्रियेतील एका पायरीमध्ये चूक झाली तरीही त्याचा परिणाम संपूर्ण संशोधनावर होत असतो. म्हणून त्या पायऱ्यांचा वापर करून संशोधकाने आपले संशोधन काळजीपूर्वक पार पाडायला हवे.

**सामाजिक संशोधनाचे प्रकार** (Types of Social Research)-

संशोधकाचा दृष्टिकोन, उद्देश आणी संशोधनाचे स्वरुप या आधारावर सामाजिक संशोधनाचे प्रामुख्याने मौलिक, शुद्ध किंवा सैद्धांतिक संशोधन आणी व्यावहारिक संशोधन असे दोन प्रकार आहेत. या दोन प्रकाराशिवाय क्रियात्मक संशोधन हा तिसरा प्रकार देखील आहे.

**१) मौलिक, शुद्ध किंवा सैद्धांतिक संशोधन** (Fundamental or Pure Research)-

अशा संशोधनाचा उद्देश ज्ञान प्राप्त करणे, ज्ञानाची वृद्धी आणी जुन्या ज्ञानाची पुनर्परीक्षा करुन त्याचे शुद्धीकरण करणे हा आहे. या प्रकारच्या संशोधनात नवीन तथ्ये आणी घटनांचे अध्ययन केले जाते.

त्याचबरोबर जुने नियम आणी सिद्धांत वर्तमान परिस्थितीच्या संदर्भात योग्य आहे का नाही याची चिकित्सा केली जाते. टी. एच. हक्सले (T. H. Huxley) हे मौलिक संशोधनाचे कट्टर समर्थक होते. शास्त्र आणी व्यवहार यांना एकत्रित आणण्यास चुकीचे आहे. शास्त्रास व्यावहारिक बनवण्यास अनेक धोके आहेत असे हक्सले यांनी स्पष्ट केले आहे.

२) **व्यावहारिक संशोधन** (Applied Research)-

व्यावहारिक उपयोगासाठी ज्ञान हा ज्या संशोधनाचा उद्देश असतो त्यास व्यावहारिक संशोधन असे म्हणतात. रॉबर्ट लिंड (Robert Lind) यांनी व्यावहारिक पुरस्कार केला आहे. व्यावहारिक संशोधनाचा संबंध हा सामाजिक जीवनाच्या व्यावहारिक गोष्टींशी असतो. व्यावहारिक संशोधनाअंतर्गत सामाजिक नियोजन, सामाजिक कायदे, धर्म, शिक्षण, आरोग्य, रक्षणासंबंधीचे नियम इत्यादी विषयांचा समावेश होतो. या विषयांचे तर्कशुद्ध ज्ञान या संशोधनातून मिळवले जाते. व्यावहारिक संशोधनाचे कार्य हे केवळ व्यावहारिक जीवनाशी संबंधित विषय आणी समस्यांबाबत यथार्थ ज्ञान मिळवणे हे आहे.

३) **क्रियात्मक संशोधन** (Action Research)-

क्रियात्मक संशोधन हे अनेक अर्थाने व्यावहारिक संशोधनाशी मिळते जुळते आहे. कारण क्रियात्मक संशोधनाचा संबंध सामाजिक जीवनाच्या अशा समस्या आणी घटनांशी आहे की ज्याचे व्यावहारिक व क्रियात्मक महत्त्व आहे. क्रियात्मक संशोधन हे अशा प्रकारचे संशोधन आहे जे कोणत्याही सामाजिक समस्या किंवा घटनेच्या क्रियात्मक बाजूवर आपले लक्ष केंद्रित करते. क्रियात्मक संशोधनाच्या संदर्भात गुड आणी हॅट (Goode and Hatt) यांनी म्हटले आहे की, ''क्रियात्मक संशोधन अशा कार्यक्रमाचा अंश असते की, ज्याचा उद्देश विद्यमान स्थितीमध्ये परिवर्तन करणे हा असतो.'' उदा. एखाद्या गलिच्छ वस्तीत राहणाऱ्या लोकांच्या जीवनात आणी गलिच्छ वस्तीच्या सामान्य परिस्थितीत परिवर्तन घडवून आणण्याच्या कोणत्याही भावी योजनामध्ये त्या संशोधनातून प्राप्त ज्ञान उपयोगी ठरत असेल तर त्यास क्रियात्मक शोध म्हणता येईल.

### ३.२.३ वर्णनात्मक संशोधन आराखडा, विश्लेषणात्मक आणि अन्वेषणात्मक संशोधन आराखडा.

**A) अन्वेशणात्मक संशोधन आराखडा** (Exploratory Research Design)-

''एखाद्या समस्येचा अथवा सामाजिक घटनेच्या अंतर्भूत कारणांचा शोध घेणे हा उद्देश ठेवून तयार केला जाणारा आराखडा म्हणजेच अन्वेशणात्मक संशोधन आराखडा होय.'' अन्वेशणात्मक संशोधन आराखड्याचा मुख्य उद्देश अज्ञात तथ्यांचा व बाबींचा शोध घेणे व मानवी ज्ञानाची वृद्धी करणे हा आहे. अन्वेशणात्मक अध्ययनाच्या आधारावर सामाजिक संशोधनामध्ये गृहीतकृत्यांची निर्मिती केली जाते. ठराविक अभ्यास विषयाची निवड किंवा सामाजिक समस्येची निवड केल्यानंतर गृहीतकृत्यांची निर्मिती यशस्वीपणे करण्यासाठी अन्वेशणात्मक आराखड्याचे विशेष महत्त्व आहे. या संशोधन आराखड्यात संशोधन कार्याची रुपरेषा अशा प्रकारे प्रस्तुत केली जाते की, ज्यामुळे घटनेचे स्वरुप आणी प्रक्रियांच्या वास्तविकतेचा शोध घेतला जाऊ शकेल. अन्वेशणात्मक संशोधन आराखडा अशा आधारांना प्रस्तुत करतो की जे एका यशस्वी

संशोधन कार्यासाठी विशेष महत्वपूर्ण असतात. सेल्टिज, जहोडा आणि इतरांनी (Selltiz Jahoda and Others) लिहले की, ''अधिक निश्चित अशा संशोधनाच्या हेतूने संबंधित गृहीतकृत्याच्या निर्मितीमध्ये सहाय्यक ठरतील अशा अनुभवांना प्राप्त करण्यासाठी अन्वेशणात्मक संशोधन आवश्यक आहे.''

**१. अन्वेषणात्मक आराखडा म्हणजे काय?**

जेव्हा एखादी समस्या किंवा एखादा विषय संशोधनाच्या दृष्टिकोनातून एकदम नवा असतो म्हणजे संबंधित विषयावर आजपर्यंत विशेष असा कोणताही संशोधनात्मक दृष्टीने अभ्यास झालेला नसतो तो अभ्यास जेव्हा संशोधक आपल्या हाती घेतो व त्यावर वैज्ञानिक दृष्टिकोनातून संशोधन करण्याचा प्रयत्न केला जातो त्याला अन्वेषणात्मक संशोधन असे म्हटले जाते. म्हणजेच, संशोधनाचा हा पहिला टप्पा होय. या संशोधनात शक्य असेल त्या घटकाचा आधार घेऊन हळूहळू संशोधनाच्या मुख्य उद्दिष्टापर्यंत पोहोचण्याचे कार्य या संशोधनात केले जाते, म्हणजे एखाद्या जंगलात हळूहळू पायवाट काढत एका निश्चित स्थळी पोहोचण्यासाठी मार्ग काढला जातो तशा पद्धतीने मुख्य विषयाच्या मुळापर्यंत जाण्याचा प्रयत्न या संशोधनात केला जातो. या संशोधनात कसे एखादा मिस्त्री विविध अस्ताव्यस्त पडलेल्या आणि दूर उपयोगी किंवा दुर्लक्षित असलेल्या वस्तूचा वापर करून एखादी गाडी विकसित करतो तशाच पद्धतीने या ठिकाणी संशोधकास थोडेफार जे काही उपलब्ध, तुटक स्वरूपाच्या माहितीच्या आधारे एखाद्या अभ्यासाला वैज्ञानिक चौकटीत बसून तो अभ्यास शास्त्रीय करण्याचा प्रयत्न या अन्वेषणात्मक संशोधनामध्ये करावा लागतो. त्यामुळे ही संकल्पना नेमक्या योग्य पद्धतीने समजावून घेण्याकरता काही अभ्यासक आणि मांडलेल्या व्याख्यांचा आणि विचारांचा या ठिकाणी आढावा घेणे गरजेचे असते.

टी काटझ असे म्हणतात की, अन्वेषणात्मक अध्ययनाने शास्त्राच्या प्राथमिक स्थितीचे प्रतिनिधित्व करणारी असतात. या अध्ययनामुळे संशोधन समस्येच्या स्वरूपीकररणासाठी आवश्यक लागणारे ज्ञान संशोधनकर्त्यास प्राप्त होऊ शकते. असे ज्ञान पुढे ज्याची चाचणी घेण्यासाठी संशोधन करायचे आहे, अशा गृहितकर्त्याच्या निर्मितीसाठी उपयुक्त ठरते. वरील या अभ्यासकांच्या विवेचनावरून आपणास अन्वेषणात्मक संशोधन हे एखाद्या नव्याविषयावर संशोधन करण्याच्या अनुषंगाने किती महत्त्वाचे आहे? याची प्रचिती येते.

**३. अन्वेषणात्मक संशोधनाच्या आवश्यक असणाऱ्या आवश्यक बाबी व अटी**

**i) साहित्य सर्वेक्षण**

संशोधनामध्ये साहित्य सर्वेक्षण हा महत्त्वाचा मुद्दा आहे आणि अन्वेषणात्मक संशोधनात एखाद्या नव्या विषयाची किंवा प्रश्नांची नेमकी दिशा आणि बाजू काय आहेत? ही बाब समजून घ्यायचे असेल तर संबंधित विषयाबद्दल असणारे जे साहित्य आहे त्याचे वाचन करणे आवश्यक आहे की जेणेकरून त्यामुळे संबंधित विषयाचे नेमके अंकलन होऊ शकते. याद्वारे नवनवीन सिद्धांत कोणते आहेत? याची सुद्धा एक निश्चित कल्पना येते. या सर्वामुळे संशोधकास योग्य पद्धतीने गृहीतकर्त्यांची मांडणी करता येऊ शकते साहजिकच यामुळे संशोधनाचे कार्य एका निश्चित दिशेने कार्यरत राहते. म्हणून संबंधित विषयाच्या अनुषंगाने उपलब्ध

असलेली पुस्तके, वृत्तपत्रे, मासिके, संशोधन पत्रिका, इंटरनेटवर उपलब्ध असलेली विविध माहितीची वेबसाईट, शासकीय रेकॉर्डिंग या सर्व बाबींचा किंवा स्त्रोतांचा अधिकाधिक वापर संशोधकाने केल्यास निश्चित संशोधकास नेमके संशोधन काय करायचे आहे? कशा पद्धतीने गृहीतकर्त्याची तपासणी करायची आहे? याची कल्पना येते म्हणून अन्वेषणात्मक संशोधनात माहिती अथवा सर्वेक्षण करणे गरजेचे असते.

ii) **अनुभव सर्वेक्षण**

अन्वेषणात्मक संशोधनामध्ये गृहीतकृतीची योग्य पद्धतीने मांडणी करण्याच्या अनुषंगाने एक महत्त्वाचे माध्यम आहे ते म्हणजे अनुभव सर्वेक्षण होय. अनुभव सर्वेक्षणामध्ये ज्या विषयाचा आपणास अभ्यास करायचा असतो त्या विषयातील किंवा विषयाशी संबंधित असलेले जे लोक असतात त्या लोकांच्याकडून माहिती घेणे महत्त्वाचे असते. असे संबंधित हे लोक यांनी काही लिखित स्वरूपात संबंधित विषयाचा अभ्यास केलेला नसतो. पण त्यांच्या जवळ असलेल्या अनुभव, प्रत्यक्ष स्वरूपात झालेल्या घटनांचे ते साक्षीदार असतात. घटनांचे प्रत्यक्षात केलेले त्यांचे निरीक्षण हे संशोधकास माहितीचे स्त्रोत म्हणून फार उपयुक्त ठरत असते त्याकरता संशोधक अशा लोकांच्या बरोबर चर्चा करून, त्यांच्या अनुभवाचे कथन समजून घेऊन संबंधित अनुभव संशोधक शोधण्यासाठी उपयोगात आणत असतात. या संशोधनामध्ये संशोधक समूहाचे सदस्य किंवा समूहाद्वारे समूहाचे प्रतिनिधित्व करणारी व्यक्ती, समूहातील सुशिक्षित व्यक्ती किंवा प्रत्यक्षात अनुभव घेतलेल्या व्यक्तींचा तथ्य संकलनासाठी वापर केला जातो. अन्वेषणात्मक संशोधनात या प्रत्यक्षात साक्षीदार बनलेल्या लोकांच्या द्वारे माहिती घेणे हे अभ्यासकाला योग्य आणि निश्चित दिशा देण्याचे कार्य करतात म्हणून अनुभव सर्वेक्षण सुद्धा हा गृहीत कृत्याची मांडणी करण्याकरता महत्त्वाचा घटक बनलेला आहे.

iii) **अंतःदृष्टी**

अन्वेषणात्मक संशोधनात संशोधकाच्या अंगी असणारी जी अंतःदृष्टी असते तीसुद्धा अभ्यासाला दिशा आणि गती देण्याचे कार्य चांगल्या पद्धतीने करीत असते. काही वेळा अंत्यदृष्टी द्वारेच एखाद्या समस्यांचा अभ्यास योग्य होण्यासाठी उपयुक्त असतो. समजा, एखाद्या समाजात हुकूमशाही प्रभावाचा अभ्यास करतेवेळी आपणास इटली तसेच काही भांडवलशाही समाज व्यवस्थेचा अभ्यास करणे हे अभ्यासकास सुचते तेव्हा तो त्याचा अंत्यदृष्टीचाच भाग असतो. वैद्यकीय क्षेत्रात अलीकडच्या काळामध्ये एच. आय. व्ही. एड्स या रोगाचा अभ्यास करतेवेळी संशोधकास आयुर्वेदामध्ये असलेला ओझक्षय हा रोग समोर येतो व त्या अनुषंगाने एड्सचा अभ्यास केला जातो ते अंत्यदृष्टीमुळेच. संशोधक आपल्या विचारशक्तीच्या जोरावर मृतकृत्यांचा विकसित करीत असतात त्यामुळे संशोधनाला एक निश्चित मार्ग मिळवून देण्याचे कार्य संशोधकाच्या अंत्यदृष्टीद्वारे होते.

थोडक्यात अन्वेषणात्मक संशोधनात साहित्य सर्वेक्षण, अनुभव सर्वेक्षण आणि अंत्यदृष्टी या माध्यमाचा आधार घेऊन संशोधन एका निश्चित वैज्ञानिक चौकटीत बसवून एका तारिक वळणावर आणून ठेवण्याचे कार्य

अन्वेषणात्मक संशोधनात मध्ये केले जाते अन्वेषण संशोधन हे एका नव्या विषयाला संशोधनाच्या चौकटीत आणि पद्धतीत बसवण्याचे कार्य करते.

**३) प्रायोगिक संशोधन आणि ऑनलाईन संशोधन** (Experimental Research)-

प्रायोगिक संशोधन पद्धतीमध्ये संशोधक जाणिवपूर्वक दोन वेगवेगळ्या परिस्थितींमध्ये अध्ययनाचे प्रयोग करतो आणी त्यावर विश्लेषण करतो त्याला प्रायोगिक संशोधन म्हटले जाते. या पद्धतीमध्ये बऱ्याचदा एखाद्या समस्येची किंवा घटनेची पूर्वस्थिती व सद्ध्यस्थितींचे विश्लेषण मांडले जाते. या संशोधन पद्धतीत वर्तमान परिस्थिती किंवा भविष्यातील उत्पन्न होणारी परिस्थिती यावर संशोधन केले जाऊ शकते. एखाद्या घटनेवर किंवा समस्येवर उपाययोजना करण्यासाठी किंवा त्या थोड्या अथवा जास्त प्रमाणात नियंत्रित करण्यासाठी प्रायोगिक संशोधन पद्धतीचा वापर होतो.

**प्रयोगात्मक किंवा परीक्षणात्मक संशोधन आराखडा**

भौतिक विज्ञानामध्ये प्रयोगशाळेत प्रयोग करून संशोधन केले जाते. भौतिक विज्ञान प्रमाणेच सामाजिक विज्ञानात देखील संशोधन कार्यात निरीक्षण आणि परीक्षणाचा म्हणजेच प्रयोगाचा उपयोग करून अधिकाधिक यथार्थता आणण्याचा प्रयत्न केला जातो. भौतिक विज्ञानात ज्याप्रमाणे काही निश्चित नियंत्रित अवस्था निर्माण करून विषयाचे अध्ययन केले जाते. त्याचप्रकारे सामाजिक विज्ञानात सुद्धा अध्ययन केले जाते अशा नियंत्रित स्थितीत निरीक्षण परीक्षण द्वारा केल्या जाणाऱ्या सामाजिक घटनांच्या पद्धतीशीर अभ्यासाला प्रयोगात्मक किंवा परीक्षणात्मक संशोधन असे म्हणतात.

**स्टूअर्ट चॅम्पियन**

यांनी लिहिले आहे की, समाजशास्त्रीय संशोधनात प्रयोगात्मक आराखड्याची संकल्पना ही नियंत्रणाच्या अवस्था अंतर्गत निरीक्षणा द्वारा मानवी संबंधाच्या व्यवस्थित अध्ययनाकडे संकेत करते. (The concept experimental design in social research refers to systematic study of human relation by making observation under condition of control-champin).

विज्ञानामध्ये प्रयोग केले जातात. प्रयोग या शब्दाचा अर्थ स्पष्ट करताना वैज्ञानिक असे म्हणतात की, नियंत्रित अवस्थेत केलेले परीक्षण म्हणजे प्रयोगपर्व experiment is an observation under controlled condition. चॅम्पियन यांनी देखील प्रयोग किंवा परीक्षणाच्या संबंधित नियंत्रित अवस्थेचा उल्लेख केला आहे. थोडक्यात असे म्हणता येईल की, प्रयोगशाळा पद्धती द्वारा (नियंत्रित अवस्थेतील निरीक्षण) विषयाचे अध्ययन म्हणजे प्रयोगात्मक संशोधन.

**अन्वेशणात्मक संशोधन आराखड्याचे मुख्य कार्य** (Main Functions of Exploratory Research Design)-

१) पूर्वनिर्धारित गृहीतकृत्याचे तात्कालिक परिस्थितीच्या संदर्भात परीक्षण करणे.

२) सामाजिक दृष्टिकोनातून महत्वपूर्ण असलेल्या समस्यांकडे संशोधनकर्त्याचे लक्ष आकर्षित करणे.

३) विज्ञानाच्या सीमाचा विस्तार करुन त्याचे क्षेत्र विकसित करणे.

४) अधिक महत्वपूर्ण विषयावर लक्ष केंद्रित करण्यासाठी संशोधनकर्त्यास प्रेरीत करणे.

**B) वर्णनात्मक संशोधन आराखडा** (Descriptive Research Design)-

''एखाद्या व्यक्ती, समूह, समाज, घटना किंवा कोणत्याही विषय वा समस्यांच्या वास्तविक तथ्यांचे, वैशिष्ट्यांचे वर्णनात्मक विवेचन प्रस्तुत करणे हा वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा मुख्य उद्देश आहे. अभ्यासविषयाचे वैज्ञानिक विश्लेशन करणे म्हणजेच वर्णनात्मक आराखडा होय.'' वर्णनात्मक संशोधन आराखड्यामध्ये तथ्ये गोळा करण्यासाठी प्रश्नावली, निरिक्षण, मुलाखत व सामुदायिक रिकॉर्ड इत्यादी पद्धतींचा समावेश केला जातो. संशोधकाला पुर्वग्रहदुषित, गैरसमज, पक्षपातीपणा इत्यादी गोष्टींना बाजूला ठेवून संशोधन करणे गरजेचे असते. संशोधनात संतुलन ठेवून सर्व बाबींकडे सारखेच लक्ष देणे संशोधकाला क्रमप्राप्त असते. वर्णनात्मक संशोधन हे विस्तृत प्रकारचे असते. त्यामुळे अभ्यासविषय मर्यादीत ठेवणे गरजेचे असते. तसेच संशोधकाचा अनावश्यक वेळ, पैसा व श्रम याची बचत होते.

वेगवेगळ्या स्वरुपाच्या समस्याकरिता वेगवेगळे संशोधन आराखडे वापरले जातात. कारण संशोधनाच्या उद्धिष्टानुसार संशोधन आराखड्याची निवड केली जाते. ज्या संशोधनाचा उद्देश वर्णन करणे हा आहे. अशा संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन आराखडा वापरला जातो.

आधुनिक काळात देशात अनेक विकासाच्या योजना आणी समाज कल्याणाची धोरणे राबवली जातात. लोकांची वैशिष्ट्ये, समस्या विषयी त्यांचा दृष्टिकोन, त्यांची मते इत्यादी गोष्टींची माहिती शासनाला असेल तर त्यानुसार धोरणांची योग्य प्रकारे अंमलबजावणी होऊन त्याचा लोकांना फायदा मिळेल त्याकरिता वर्णनात्मक अध्ययनातूनच लोकांविषयी माहिती प्राप्त होत असते. म्हणून विकासाच्या योजना व धोरणांची योग्य अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने वर्णनात्मक अध्ययनाचे विशेष महत्त्व आहे.

**१. वर्णनात्मक संशोधन आराखडा म्हणजे काय?**

वर्णनात्मक आराखडा एखाद्या समस्याशी किंवा विषयाशी संबंधित असलेल्या वास्तविक तथ्याचा आधार घेऊन वर्णनात्मक मांडणी करणे हा वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा मुख्य उद्देश आहे. म्हणूनच असे म्हटले जाते की, जेव्हा संशोधन अध्ययनाचा हेतू विशिष्ट व्यक्तीच्या किंवा समूहाच्या वैशिष्ट्याचे किंवा लक्षणाचे वास्तविक तथ्याच्या आधारावर वर्णनात्मक विवेचन करणे हा असतो तेव्हा त्या संशोधन अध्ययनासाठी तयार केलेल्या आराखड्यास वर्णनात्मक संशोधन आराखडा असे म्हणतात. या आराखड्यामुळे संशोधकाला संशोधनासाठी निवडलेल्या समस्या किंवा विषयावर वर्णनात्मक मांडणी करता येते. यातील संशोधन पद्धती गुणात्मक स्वरूपाची असते. उदा. कोरोना या संसर्गामुळे शिक्षण क्षेत्रावर झालेला परिणाम या विषयाचा अभ्यास आपणास वर्णनात्मक संशोधन आराखड्याच्या आधारे संशोधन करता येते.

थोडक्यात, वर्णनात्मक संशोधन म्हणजे जेव्हा अन्वेषणात्मक संशोधनाचे कार्य संपते तेव्हा वर्णनात्मक संशोधनाची सुरुवात होते. पण विश्वनाथ मग संशोधन गृहीत कृत्यांचे मांडणी करण्याकरता प्रयत्न करत असते व शेवटी तेथे गृहीत कर्त्याची मांडणी केली जाते. तर वर्णनात्मक संशोधन हे निश्चितपणे त्याच गृहीत कृत्याचे निश्चित मांडणी करूनच संशोधनाचे कार्य सुरू करते. त्यामुळे अन्वेषणात्मक संशोधन जिथे संपते तिथूननच वर्णनात्मक संशोधनाची सुरुवात होते. वर्णनात्मक संशोधनाचा आराखडा सद्यस्थितीत पूर्ण स्थापित झालेला असून जो विषय किंवा समस्या असते त्याचेच वर्णनाच्या स्वरुपात विवेचन केले जाते. त्यालाच वर्णनात्मक संशोधन म्हटले जाते व त्या अनुषंगानेच त्याचा आराखडा तयार केला जातो.

**२. वर्णनात्मक संशोधनाच्या आराखड्याच्या मुख्य बाबी किंवा अटी.**

वर्णनात्मक संशोधनामध्ये संशोधकांनी अभ्यासाचा विषय अत्यंत काळजीपूर्वक निवडणे आवश्यक असते. विषय निवड करतेवेळी जेणेकरून त्या विषयाशी संबंधित असलेले संपूर्ण सामग्री किंवा तथ्य संकलन करतेवेळी कोणत्याही पद्धतीची समस्या निर्माण होऊ नये किंवा कोणताही तांत्रिक अडथळा निर्माण होता कामा नये. याची काळजी घेणे फार गरजेचे असते. हा सारासार विचार करूनच संशोधकांनी योग्य समस्येची निवड करणे योग्य असते.

i) **वस्तुनिष्ठता**

आराखडा बनवते वेळी तो पूर्ण वस्तुनिष्ठ स्वरूपात असला पाहिजे. यामध्ये कोणत्याही पद्धतीची भावनिकता, पक्षपातीपणा, प्रकारची कथा याचा प्रभाव येता कामा नये. आराखडा हा पूर्णता अभ्यासाची वास्तवता समजून घेऊन त्याला पूरक असेल असा वैज्ञानिक तारखेचा आधार घेऊनच तो बनवणे आवश्यक असते.

ii) **तार्किक व वाजवी दृष्टिकोन**

आराखडा तयार करतेवेळी संशोधकांनी तारखीक विचारांच्या आधारानेच आराखड्याची निर्मिती करणे आवश्यक असते. अभ्यास करतेवेळी सर्व घटकांना समान पद्धती चीच वागणूक देणे आवश्यक असते. स्वतःच्या आवडीनिवडी या बाबींना दूर ठेवूनच एक संशोधक म्हणून स्वतःचा संतुलित दृष्टिकोन विकसित करूनच संशोधनाचे कार्य करावे.

iii) **आवश्यक बाबीवरच भर द्यावा**

आराखडा तयार करतेवेळी आवश्यक बाबीवर भर देणे गरजेचे असते. तथ्य संकलन, त्याचे विश्लेषण यासारख्या बाबीसाठी कोणत्या घटकाचा वापर करावा? योग्य व आवश्यक असलेल्या बाबींचा या ठिकाणी वापर करणे आवश्यक असते. समजा; एखादी मोठी गाव असेल तर त्या ठिकाणी संपूर्ण गावातील लोकांचा माहिती संकलनासाठी वापर न करता काही नमुनन्याचा वापर त्या ठिकाणी करणे योग्य असते. यासारख्या अनेक बाबी संशोधनात येत असतात संशोधकाने आवश्यक बाबींचा विचार करणे आवश्यक असते.

### ३. वर्णनात्मक संशोधनाच्या पायऱ्या

वर्णनात्मक संशोधनाचा आराखडा योग्य पद्धतीने अंमलात आणावयाचा असेल तर संशोधनाच्या ज्या पायऱ्या आहेत त्याची योग्य क्रमाने मांडणी करणे आवश्यक असते. मांडणी व्यवस्थित झाली तरच संशोधनाचे कार्य सुद्धा योग्य सुरुवात पद्धतीने पार पाडले जाऊ शकते, त्याकरता खालील पायऱ्यांचा विशेष आधार घेणे गरजेचे आहे.

#### i) उद्दिष्टांची मांडणी

संशोधनाचे कार्य योग्य पद्धतीने होण्याकरता योग्य उद्दिष्टांची मांडणी करणे गरजेचे असते, उद्दिष्टानुसारच आपणाला तथ्य संकलन करणे गरजेचे असते. त्यामुळे उद्दिष्टे हे संशोधनाच्या मुख्य कार्याचे महत्त्वाची बाब आहे.

#### ii) तथ्य संकलन

संशोधनात एकदा उद्दिष्टे निश्चित झाल्यानंतर त्या उद्दिष्टांना समोर ठेवूनच, उद्दिष्टांशी निगडित आपणाला तथ्य संकलन करावे लागते. त्याकरिता, अभ्यास विषयाचा म्हणजेच ज्याचा अभ्यास करायचा आहे तो समूह कशा पद्धतीचा आहे? याचा विचार करूनच आणि त्यांना समोर ठेवूनच आपणास प्रश्नावली, मुलाखत, निरीक्षण, अनुसूची, इत्यादी पैकी निश्चित पद्धती किंवा तंत्र निवडावे लागतात व त्यानुसार त्यांचे योग्य नियोजन सुद्धा करावे लागते.

#### iii) नमुन्याची निवड

सत्य संकलन करता तंत्र किंवा पद्धतीने निश्चित केल्यानंतर त्या आधारे माहिती संकलित करणे आवश्यक असते. त्याकरिता योग्य उत्तरदात्यांची निवड करणे आवश्यक असते. अभ्यास विषय कोणता आहे? व्यक्ती समूह कोणता आहेत? या सर्व बाबींचा  विचार करूनच, नमुन्याचे जे विविध प्रकार आहेत त्यापैकी कोणता संबंधित आपणास उपयुक्त आहे? याच्या विचार करूनच नमुन्याची निवड करणे गरजेचे असते. त्यामुळे आराखड्यात नमुन्याची निवड हा सुद्धा एक महत्त्वाचा भाग आहे.

#### iv) तथ्य संकलन पडताळा वर्गीकरण

या बाबी सुद्धा महत्त्वाच्या असतात तथ्य संकलन हे अनेक मार्गाने आपण करीत असतो, त्यामध्ये प्राथमिक, दुय्यम, औपचारिक, अनौपचारिक, असे अनेक माध्यमातून ते संकलित केल्यानंतर ती एखाद्या ढीगासारखी अस्तव्यस्त पसरलेले असतात. त्यामुळे, त्यात त्यांची योग्य तपासणी करून त्यातले दोष दूर करून त्या सर्व तथ्यांना एक निश्चित स्वरूपात आणणे आवश्यक असते.

#### v) तथ्य विश्लेषण

माहिती संकलित केल्यानंतर त्या माहितीचे विश्लेषण करणे हा एक महत्त्वाचा भाग संशोधनाच असतो. जेव्हा माहितीचे आपण योग्य विश्लेषण करतो त्याचवेळी आपणास निष्कर्षापर्यंत पोहोचता येते. त्याकरिता

सारणीकरण, तालिका, आकृती, वेगवेगळी संख्यांकीय सूत्रे, इत्यादींचा विश्लेषणासाठी आपणास उपयोग करून घेता येतो.

vi) **अहवाल तयार करणे**

संशोधनातील हा अंतिम भाग असतो. आपण जी संशोधन केलेले असते त्याचा अहवाल शास्त्रीय पद्धतीने करणे आवश्यक असते. अहवाला मधील भाषा ही अलंकारिक असता कामा नये, योग्य व्याकरणाचा वापर करूनच, योग्य क्रमाने, संशोधनाची शास्त्रीय परिभाषेचा वापर करून, योग्य संकल्पना सिद्धांत यांच्या आधाराने आणि योग्य सूत्रे, तालिका, नकाशे परिशिष्ट, इत्यादी या सर्व तांत्रिक बाबींचा वापर करून अहवाल बनवणे आवश्यक असते. अहवालामध्ये वस्तुनिष्ठता आणि शास्त्रीय संस्कृतीची जी काही नैतिकता असते त्याचे प्रतिबिंब या संशोधन अहवालामध्ये प्रतिबिंबित होणे गरजेचे असते. तरच, संशोधन अहवाल खऱ्या अर्थाने शास्त्रीय किंवा वैज्ञानिक स्वरूपाचा आहे याची निश्चित प्रचिती येते. म्हणूनच, वर्णनात्मक संशोधन आराखड्याच्या टप्प्यामध्ये अहवाल हा सुद्धा एक महत्त्वाचा घटक आहे असे विविध अभ्यासकांनी म्हटले आहे.

**C) विश्लेशणात्मक संशोधन आराखडा** (Analytical Research Design)-

संशोधकाने संकलित केलेल्या तथ्यांचे योग्य विश्लेशण मांडणे म्हणजेच विश्लेशणात्मक संशोधन आराखडा होय.या आराखड्यामध्ये घडणारी घटना या मागील करणे शोधण्यासाठी सदरचा आराखडा उपयोगात आणला जातो.हा आराखडा सामाजिक घटकातील परिवर्तन आणि तुलना यांच्याकडे समावेश करत नाही. समाजात घडणाऱ्या अनेक घटना जसे हल्ले,भांडणे,कलह,अपहरण,खून,घरगुती हिंसाचारामुळे होणारे मृत्यू या कारणाचा शोध घेते. दोन पेक्षा अधिक चालामधील सहसंबध विश्लेश्नात्म्क नमुना स्पष्ट करतो. उदा.२०२३ ते २०२४ या कालावधी मधील मतदानाचा विचार करताताना किवा मतदान करताना मतदाते आपला उमेदवार कोणत्या निकषावर निवडतात उदा. जात, धर्म, पंथ, भाषा, राजकीय विचारसरणी, प्रामाणिकपणा किंवा उमेदवाराची झोकून काम करण्याची तयारी इत्यादी बाबतच्या कारणाचा विश्लेषणात्म संशोधन आराखडा कारणाचा शोध घेतो. त्याच बरोबर सर्वसाधारणपणे द्वितीयक तथ्यांची मांडणी करण्यास विश्लेशणात्मक संशोधन आराखड्याचा वापर होतो.

**निदानात्मक संशोधन आराखडा** (Diagnostic Research Design)

संशोधन कार्याचा मूलभूत उद्देश हा ज्ञान प्राप्त करणे असा असतो. असे असले तरी एखाद्या समस्येच्या कारणासंबंधीचे वास्तविक ज्ञान प्राप्त करून त्या समस्येच्या निराकरणासाठी त्याचा उपयोग करणे हा देखील संशोधनाचा मुख्य उद्देश असू शकतो. विशिष्ट सामाजिक समस्येच्या निदानाचा शोध घेण्याच्या संशोधन कार्यास निदानात्मक संशोधन असे म्हणतात. अशा प्रकारच्या संशोधनातून त्या विशिष्ट समस्येचे निराकरण करण्याच्या दृष्टीने उपाय प्रस्तुत केले जातात. ते उपाय लक्षात घेऊन समस्या सोडवण्याचे काम सामाजिक संशोधकाचे नाही. समस्या सोडवण्याचे काम हे सुधारक, प्रशासक आणि नेत्यांचे असते. संशोधन करता

केवळ वैज्ञानिक पद्धतीद्वारे समस्येंच्या कारणांना जाणून घेऊन ती समस्या कोणत्या प्रकारे सोडवता येईल याचा शोध घेतो. निदानात्मक संशोधनामध्ये समस्येचे संपूर्ण आणि विस्तृत अध्ययन वैज्ञानिक पद्धतीने करून समस्येच्या खोलात जाण्याचा प्रयत्न केला जातो. त्यामुळे समस्येच्या प्रत्येक संभाव्य कारणांचा शोध लावता येईल. अशाप्रकारे कोणत्याही समस्येच्या कारणांची ज्ञान महत्त्वाचे आहे. त्यानंतर त्या समस्येच्या निदानाचा शोध घेता येईल. ज्यावेळी एखाद्या समस्येचे त्वरित निराकरण करायचे असते तेव्हा त्या समस्येचा संभाव्य उपाय लक्षात घेऊनच गृहीतकर्त्याची निर्मिती केली जाते. त्यामुळे अध्ययन कार्य हे वैज्ञानिक पद्धतीने केले जाईल. निदानात्मक अध्ययनाच्या संबंधात डॉक्टरचे उदाहरण देता येईल. जेव्हा डॉक्टराजवळ रुग्ण येतो तेव्हा डॉक्टराना त्या पेशंटच्या रोगाविषयी कोणतीच माहिती नसते. डॉक्टर पेशंटला तपासतो आणि त्याला कोणता आजार झाला याचे निदान करतो. जोपर्यंत पेशंटच्या रोगाचे निदान होत नाही तोपर्यंत डॉक्टर पेशंटला योग्य औषध देऊ शकत नाही. म्हणून डॉक्टर सर्वप्रथम रोग्याचे निदान करतो. रोगाचे निदान केल्यानंतर पेशंटचा रोग दूर व्हा म्हणून डॉक्टर काही औषध देतो. निदानात्मक अध्ययनात संशोधन करता समस्येच्या कारणांचा किंवा निदानांचा शोध घेतो. त्याचप्रमाणे डॉक्टर पेशंटच्या रोगाचे निदान करतो.

**निदानात्मक संशोधनाची वैशिष्ट्ये**

१. निदानात्मक संशोधन कार्यात वैज्ञानिक पद्धतीचा निश्चित स्वरूपात अवलंब केला जातो. निदानात्मक संशोधनाची पहिली पायरी गृहीतकृत्याची निर्मिती करणे ही आहे आणि त्यानंतर याच्या आधारावर अध्ययन केले जाते.

२. निदानात्मक संशोधन कार्याचे आवश्यकता सामाजिक व्यवस्था आणि सामाजिक संबंधापासून उत्पन्न सामाजिक समस्याना त्वरित दूर करणे किंवा तथ्याचा शोध घेण्याची संबंधित आहे.

३. निदानात्मक संशोधनात सर्वप्रथम वैज्ञानिक पद्धतीने समस्येच्या कारणांचा योग्य प्रकारे शोध घेण्याचा प्रयत्न केला जातो. कारण वास्तविकारणांच्या संबंधात योग्य ज्ञानाशिवाय आवश्यक उपायांचा शोध घेणे अशक्य असते.

४. निदानात्मक संशोधन एखाद्या विशिष्ट सामाजिक समस्येच्या निदानाच्या शोधाशी संबंधित असते. केवळ शुद्ध ज्ञानच प्राप्त करणे एवढा संशोधनाचा उद्देश नसतो तर समस्येच्या उपाययोजनांचा शोध घेणे हा देखील उद्देश असतो.

५. निदानात्मक अध्ययनात संशोधन करता समस्या विषयीची उपायोजना शोधतो परंतु समस्या सोडवणे हे त्याचे कार्य नाही. संशोधन करता एक वैज्ञानिक या नात्याने समस्येवरील उपाययोजना सांगत असतो. या उपायोजना प्रत्यक्ष अमलात आणण्याचे काम ही सुधारक प्रशासक यांचे असते.

उपरोक्त विवेचनानुसार निदानात्मक संशोधन आराखड्याचे स्वरूप स्पष्ट होते. थोडक्यात सामाजिक समस्यांच्या कारणाचा किंवा निधनांचा शोध घेणे तसेच मिळालेल्या ज्ञानाच्या आधारे एखाद्या विशिष्ट समस्येच्या निराकारणाचे उपाय शोधून काढणे हे या संशोधन आराखड्याचे उद्देश आहेत.

## ३.२.४ सर्वेक्षण, व्यष्टी अध्ययन, प्रायोगिक आणि ऑनलाईन संशोधन.

**A) सर्वेक्षण** (Survey)-

सर्वेक्षण हा एक सर्वप्रचलित शब्द आहे. ज्याद्वारे सामाजिक घटना, व्यवहार, समस्या आणी सामाजिक तथ्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला जातो. सामाजिक सर्वेक्षण ही संकल्पना फ्रेडरिक लेप्ले (Fredrick Le-play) या शास्त्रज्ञाने सर्वप्रथम उपयोगात आणली आणी चार्लस बुथ (Charles Booth) हे सुरुवातीचे महत्वाचे सर्वेक्षणकर्ते होत. कोणत्याही घटनेचे किंवा वस्तूचे निरीक्षण व परीक्षण करणे याला सर्वेक्षण म्हणतात. निरीक्षण व परीक्षण हे सामाजिक घटनांशी किंवा सामाजिक जीवनांशी संबंधित असेल तर त्याला सर्वसाधारणपणे सामाजिक सर्वेक्षण म्हणतात.

''डिक्शनरी ऑफ सोशिओलॉजी''मध्ये स्पष्टपणे नमूद केले आहे की, ''एका समुदायाच्या संपूर्ण जीवन किंवा त्याच्या कोणत्याही एका पैलूबाबत उदा. आरोग्य, शिक्षण, मनोरंजनाच्या संबंधात तथ्यांचे बऱ्याच प्रमाणात व्यवस्थित व विस्तृत संकलन व विश्लेषणालाच ढोबळमानाने सर्वेक्षण म्हणतात.''

**सर्वेक्षणाची व्याख्या–**

**१) ए. फ. वेल्स:** ''साधारणपणे, कोणत्याही क्षेत्रात राहणाऱ्या एका मानव समूहाच्या सामाजिक संस्था व क्रियांच्या अध्ययनाच्या रुपात सामाजिक सर्वेक्षणाची व्याख्या केली जाऊ शकते.''

**२) सिन पाओ लिंग:** ''सामाजिक सर्वेक्षण म्हणजे विशिष्ट लोकसमूहाची रचना, क्रिया राहणीमान ह्या संबंधात केलेली चिकित्सा होय.''

सर्वेक्षण पद्धतीचा उपयोग एका व्यक्तीद्वारे केला जात नाही तर तो सामूहिक पद्धतीने केला जातो. ही एक वैज्ञानिक अध्ययन पद्धती आहे. या पद्धतीत अध्ययनकर्ता प्रत्यक्ष घटनास्थळावर जाऊन उत्तरदात्याच्या संपर्कात येतो. त्यामुळे संशोधक उत्तरदात्याच्या भावना, विचार आणी आवश्यक गोष्टींचे अध्ययन करु शकतो.

**सामाजिक सर्वेक्षणाची वैशिष्ट्ये–**

१) सामाजिक सर्वेक्षणात समुदायाच्या रचना आणी सामाजिक पैलूंचे अध्ययन केले जाते.

२) विविध भौगोलिक क्षेत्राचा आणी स्थानांचा अभ्यास केला जातो.

३) सर्वेक्षणाद्वारे संकलित केलेली तथ्ये, माहिती, आकडेवारी इत्यादी पुढे सामाजिक संशोधन करण्यासाठी उपयोगात आणली जाऊ शकते.

४) वर्तमान स्थितीचे अध्ययन हे सर्वेक्षणाचे प्रमुख क्षेत्र आहे.

५) सामाजिक सर्वेक्षणाचा उपयोग सामाजिक प्रगतीकरता सुद्धा केला जातो.

**इ) व्यष्टी अध्ययन** (Case Study)-

''हर्बट स्पेन्सर या इंग्रज समाजसशास्त्रज्ञाने सर्वप्रथम व्यष्टी अध्ययनाचा उपयोग केला.'' परंतु या पद्धतीचा व्यवस्थित वापर फ्रेडरीक लेप्ले यांनी केला म्हणून त्यांना समाजशास्त्रात व्यष्टी अध्ययन पद्धती आणण्याचे श्रेय दिले जाते.

**व्यष्टी अध्ययनाची व्याख्या-**

**पॉलीन यंग** (Pauline Young) - ''व्यष्टी अध्ययन पद्धती कोणत्यातरी सामाजिक एककाचे मग ती व्यक्ती, कुटुंब, संस्था किंवा जाती असो त्यांच्या जीवनाचे संशोधन आणी त्याचे विवेचन करण्याची एक पद्धत आहे.''

व्यष्टी अध्ययन पद्धती ही एक पद्धती आहे की ज्यामध्ये व्यक्ती, समूह, संस्था इत्यादी सामाजिक एककांच्या सर्व पैलूंवर आणी बाबींवर अध्ययन केले जाते.

व्यष्टी अध्ययन पद्धतीत समस्यांचे सखोल अध्ययन केले जाते, व्यक्तीगत स्तरावर संपूर्ण अध्ययन करण्यात येते तसेच गुणात्मक अध्ययन करुन गुणात्मक तथ्यांचे संकलन केले जाते. व्यष्टी अध्ययनामध्ये बाबींचा सखोल अभ्यास केला जातो. त्यासाठी वेगवगळ्या तंत्राचा व स्त्रोतांचा वापर केला जातो.

**व्यष्टी अध्ययनाची वैशिष्ट्ये-**

१) एक किंवा अधिक सामाजिक एककाचे अध्ययन

२) व्यक्तिगत अध्ययन- व्यक्तिगत अध्ययनात संशोधकाकडून व्यक्ती, कुटुंब, संस्था, समूह किंवा इतर कोणत्याही गोष्टीचे व्यक्तिगत स्तरावर अध्ययन केले जाते.

३) समस्येचा संबंधित एककांचे अधिक सखोल अध्ययन.

४) सामाजिक, मानशास्त्रीय, आर्थिक, धार्मिक, भौगोलिक आणी प्राणीशास्त्रीय या सर्वच दृष्टीकोनातून व्यक्तिगत अध्ययन.

५) ऐतिहासिक अध्ययन केले जाते.

६) वर्णनात्मक विश्लेशण केले जाते.

**व्यष्टी अध्ययनाचे प्रकार** (Types of Case Study)-

व्यक्तीचे व्यष्टी अध्ययन आणी समुदायाचे व्यष्टी अध्ययन हे व्यष्टी अध्ययनाचे दोन प्रकार आहेत.

a) **व्यक्तीचे व्यष्टी अध्ययन** (Case Study of an Individual)-

व्यक्तीच्या व्यष्टी अध्ययनात कोणत्याही एक व्यक्ती किंवा त्याच्या जीवनातील एका विशिष्ट घटनेचे अध्ययन केले जाते. व्यक्तीचे व्यष्टी अध्ययन करताना ती व्यक्ती, त्या व्यक्तीच्या कुटुंबातील सदस्य, मित्र

तसेच त्या व्यक्तीची माहिती असणाऱ्या लोकांकडून माहिती प्राप्त केली जाऊ शकते. त्याचप्रमाणे त्या व्यक्तीच्या संबंधित दैनंदिनी, पुस्तके, लेख, आत्मकथा, जीवन–एतिहास, पत्र, कविता ईत्यादीं द्वारे देखील माहिती मिळवण्यास मदत होते.

b) **समुदायाचे व्यष्टी अध्ययन** (Case Study of Community)-

समुदायाच्या व्यष्टी अध्ययनात एक वर्ग, जात, समूह किंवा समुदायाचे विस्तृत अध्ययन केले जाते. अशा प्रकारच्या अध्ययनात विशेष बुद्धिमत्ता, कौशल्ये, अनुभव, चातुर्य, आणी दक्षता याची आवश्यकता असते.

**व्यष्टी अध्ययनाच्या मर्यादा** (Limitations of Case Study)-

**१) संशोधकाचा पक्षपात**– संशोधक हा बऱ्याच दीर्घ कालावधीपर्यंत सूक्ष्म व सखोल अध्ययन करत असतो. त्यामुळे संशोधकाचा अध्ययन विषयाच्या निगडीत व्यक्तीशी घनिष्ट संबंध प्रस्थापित होऊ शकतो. अशा वेळेस त्या व्यक्तीविषयी आपुलकी व स्नेह निर्माण होऊन संशोधकाकडून नकळत पक्षपात करण्याची शक्यता असते.

**२) अशास्त्रीय पद्धत** (Unscientific Method) – व्यष्टी अध्ययन पद्धती ही एक अशास्त्रीय पद्धती आहे अशी टिका केली जाते. कारण व्यष्टी अध्ययन पद्धतीत माहिती संकलनावर कुणाचेही नियंत्रण नसते. या पद्धतीत शास्त्रीय पद्धतीचे सहाय्य घेतले जात नाही. म्हणून ही पद्धत अशास्त्रीय मानली जाते.

**३) अधिक अशुद्धता** (Most Impurity)– व्यष्टी अध्ययन पद्धतीत माहिती मिळवण्याची दैनंदिनी, पत्रे, ऐतिहासिक लिखित स्वरूपाची माहिती इत्यादीचा वापर केला जातो. परंतु हे सर्व रेकॉर्ड खरे असतीलच असे नाही. त्यामुळे अध्ययनात दोष राहण्याची शक्यता असते.

**४) परिक्षण करणे शक्य नसलेली तथ्ये** (Unverified Facts)– व्यष्टी अध्ययनात संशोधक ज्या तथ्यांचे संकलन करतो त्याचे परीक्षण करणे शक्य नसते. त्यामुळे अध्ययनातील निष्कर्ष देखील चुकीचे असू शकतात.

**५) नमुना निवड पद्धतीचा अभाव** (Lack of Sample Method)- व्यष्टी अध्ययन पद्धतीत नमुना निवड पद्धतीचा अभाव असतो. या पध्दतीत संशोधक आपल्या मतानुसार काही एककाची निवड करुन अध्ययन करतो.

**६) अधिक वेळ आणी अधिक खर्च** (More Time and Expensive)- व्यष्टी अध्ययन हे दीर्घकाळ पर्यंत सुरु असते. या अध्ययनास कमीत कमी तीन वर्ष लागतात. त्यासाठी बराच पैसा पण लागतो. अध्ययनास दिर्घ काळ लागत असल्यामुळे अनेकदा अध्ययन अपूर्ण राहण्याची देखील शक्यता असते.

c) **प्रायोगिक संशोधन आणि ऑनलाईन संशोधन** (Experimental Research and online research)-

प्रायोगिक संशोधन पद्धतीमध्ये संशोधक जाणिवपूर्वक दोन वेगवेगळ्या परिस्थितींमध्ये अध्ययनाचे प्रयोग करतो आणी त्यावर विश्लेषण करतो त्याला प्रायोगिक संशोधन म्हटले जाते. या पद्धतीमध्ये बऱ्याचदा एखाद्या समस्येची किंवा घटनेची पूर्वस्थिती व सद्ध्यस्थितींचे विश्लेषण मांडले जाते. या संशोधन पद्धतीत वर्तमान परिस्थिती किंवा भविष्यातील उत्पन्न होणारी परिस्थिती यावर संशोधन केले जाऊ शकते. एखाद्या घटनेवर किंवा समस्येवर उपाययोजना करण्यासाठी किंवा त्या थोड्या अथवा जास्त प्रमाणात नियंत्रित करण्यासाठी प्रायोगिक संशोधन पद्धतीचा वापर होतो.

प्रयोगात्मक आणि परिक्षणात्मक संशोधन आराखडा.

**प्रायोगिक संशोधन**

संशोधकाने निवडलेल्या संशोधनाची स्वरूप, माहिती संकलनाचे तंत्र, नियंत्रण तंत्र, साधने, क्षेत्र व उद्दिष्ट लक्षात घेऊन उपरोक्त संशोधनात प्रायोगिक पद्धतीचा वापर केला जातो. विशिष्ट घटकांचा उपयोग केला असता विशिष्ट परिणाम दिसतात या परिकल्पनेची निवड परीक्षण अपेक्षित नसून इतर सर्व घटकांना नियंत्रित करून फक्त एका घटकाच्या उपयोगामुळे कोणता बदल घडवून येतो हे पाहण्याकरता केलेला प्रयोग हे प्रायोगिक पद्धतीचे वैशिष्ट्य आहे म्हणून सदर संशोधना संशोधकाने प्रायोगिक पद्धतीचा वापर केला आहे.

प्रायोगिक पद्धती ही एक वैज्ञानिक पद्धती असून शैक्षणिक संशोधनात प्रामुख्याने तिचा उपयोग होतो. प्रायोगिक पद्धती ही वैज्ञानिक असल्याने प्रयोग करणे हे तिचे वैशिष्ट्य आहे. परिकल्पनेचे निव्वळ परीक्षण येथे अपेक्षित नसून इतर सर्व घटकांना नियंत्रित करून फक्त एका घटकाच्या उपयोगाने कोणता बदल घडून येतो हे पाहण्याकरता केलेल्या प्रयोग हे प्रायोगिक पद्धतीचे वैशिष्ट्य आहे. नैसर्गिक घडणाऱ्या घटनांच्या अभ्यासावरून शास्त्रीय सत्य शोधण्याचा प्रयत्न पुरेसा नाही. यात घडणाऱ्या घटना पराधीन असतात. त्यामुळे पर्यंत वाट पाहावी लागते. उलट विशिष्ट परिस्थिती निर्माण करता आली व त्यात घटना कशा घडतात हे पाहता आले तर ते संशोधनकर्त्याच्या दृष्टीने सोयीचे असते. वैज्ञानिक आपल्या प्रयोगशाळेत विशिष्ट परिस्थिती निर्माण करतो व त्या परिस्थितीत अपेक्षित निरीक्षणे मिळतात व किंवा हे पाहून शास्त्रीय सत्यसमोर येते. प्रयोग करता घटनांच्या बाबतीत स्वतः सक्रिय भाग घेत असतो. प्रायोगिक पद्धतीमध्ये संकल्पना मूलभूत आहेत. संशोधक दोन गटापासून सुरुवात करतो.

**१. नियंत्रित गट :**

प्रायोगिक गट या दोन गटाची निवड यादृच्छिक पद्धतीने केली जाते. त्या निवडीमध्ये विवेक्षित जनसंख्या असलेल्या कोणत्याही दुसऱ्या गटाची शक्य तितक्या जास्तीत जास्त गुणवैशिष्ट्यांशी समान राहील याची दक्षता घेतली जाते. त्यामध्ये प्रामुख्याने वय, लिंग, आर्थिक स्थिती हे चटकन समजून येणारे घटक आहेत. प्रायोगिक गट आणि नियंत्रित गट प्रत्यक्ष वस्तू स्थितीमध्ये समतोल्य असणे हे अगदी शक्य आहे

म्हणून संशोधनामध्ये आपण बरोबरीचे वा तुल्यबळ गट असे म्हणतो. काही महत्त्वाच्या वैशिष्ट्या बाबत गट संतुलित केलेले असतात. नियंत्रित गटामध्ये परिस्थिती काटेकोरपणे पूर्णता नियंत्रण नसते. तो गट बाह्य परिणामांच्या प्रभावाला ग्रहणक्षम असतो.

**प्रायोगिक संशोधन पद्धतीच्या पायऱ्या**

१. समस्येची निवड आणि समस्या निश्चित, सुस्पष्ट, सुबोध शब्दात मांडणे,

२. संबंधित साहित्याचे सर्वेक्षण करणे

३. प्रायोगिक अभिकल्प निश्चित करणे

४. जनसंख्या स्पष्ट करणे

५. प्रयोगाची अंमलबजावणी करणे

६. चलांचे मापन करणे

७. चलांचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करणे

८. निष्कर्ष काढणे

९. प्रयोगाचा अहवाल तयार करणे

**प्रायोगिक संशोधन पद्धतीचे गुणधर्म**

१. निदान एक परिकल्पनेचा समावेश प्रायोगिक कार्यरत असतो. संख्याशास्त्रीय पद्धतीने परिकल्पना तपासणी करता येते. त्यामुळे परिकल्पना तपासण्याची क्रिया योग्य पद्धतीने होते.

२. प्रयोगातील गटांची निवड यादृच्छिक पद्धतीने केलेली असते.

३ बाह्यचालावर नियंत्रण ठेवता येते.

४. नियंत्रित गटामुळे चालावर नियंत्रण राहते.

५. योग्य पद्धतीने प्रयोग केल्यानंतर एखाद्या परिणामाचे निश्चित कारण कोणते याची निश्चिती या पद्धतीमधून करता येते.

६. या पद्धतीत जास्तीत जास्त अचूकता सांगण्याचा प्रयत्न केला जातो. कार्यपद्धती अचूक असल्याने त्यातून मिळणाऱ्या निष्कर्ष ही बिनचूक असतात.

७. प्रायोगिक पद्धतीमधील कार्य अत्यंत शास्त्रीय पद्धतीने चालते.

अशाप्रकारे दोन प्रकारची परिस्थिती असते प्रथम आपण दोन्ही गटाची तुलना करण्याच्या उद्देशाने गटाचे परीक्षण प्रायोगिक गटामध्ये एखादा घटक वां चल बदलतो. यामध्ये बाह्य प्रभाव अंतर्भूत करतो. बाह्य प्रभावाचा परिणाम पाहण्यासाठी प्रत्येक स्थित्यंतराचे पुनर्मुल्यांकन करतो आणि झालेल्या बदलाची नोंद

करतो. शेवटी हा बदल झाला तो बाह्यप्रभावामुळे झाला असा आपण निष्कर्ष काढू शकतो. प्रत्येक परिस्थितीला चल असतात. संशोधक जर एखाद्या चलावर पूर्णपणे नियंत्रण करू शकला तर अशा चलांना स्वाश्रयी चलाच्या प्रभावामुळे त्यामध्ये बदल घडून येत असेल अशा प्रकारच्या चलाला स्वाश्रयी चल म्हणतात.

**ऑनलाइन संशोधन:-**

ऑनलाइन संशोधन ही एक संशोधनाची पद्धत आहे ज्याद्वारे इंटरनेटच्या माध्यमातून माहिती चे एकत्रित करून केले जाते. इंटरनेटच्या माध्यमातून पारंपारिक प्रयोग पद्धती बरोबरच ऑनलाइन ब्राउझिंग च्या माध्यमातून माहितीचे एकत्र करून करून अध्ययन केले जाते. या माहितीमध्ये डिजिटल साधने त्याचबरोबर प्रक्रिया द्वारे माहितीचे एकत्रीकरण केले जाते यामध्ये तथ्यात्मक माहिती आणि तज्ञांची मते यांचा समावेश असू शकतो. ऑनलाइन संशोधनामध्ये विशिष्ट परिणाम साध्य करण्यासाठी उपयुक्त पडते स्मृती मधून आलेली मते तथ्ये यांचा समावेश असू शकतो. माहिती मिळवण्याच्या पद्धतीमध्ये एखादी कथा सांगणे, प्रश्नांची उत्तरे देणे, देह भोली अभिव्यक्ती यांचा समावेश असतो. ऑनलाइन संशोधन पद्धतीमध्ये उत्तरदात्यांना आवश्यक असणारी माहिती तात्काळ शोधण्यास मदत होते कारण ऑनलाईन साधने त्वरित माहिती देतात. ऑफलाइन पद्धतीने केलेले संशोधन यामध्ये वेळ लागू शकतो परंतु ऑनलाईन संशोधन पद्धती मिळेल वेळेची बचत होते.

ऑनलाइन संशोधन साधनांचा व्यापक प्रमाणात अवलंब आणि वापर केल्यामुळे गेल्या काही दशकांमध्ये संप्रेषण संशोधन बदलले आहे. माहिती आणि संवाद तंत्रज्ञानाने संशोधनात पद्धतशीर फायदे दिले आहेत, डेटा संकलनातील फायदे, वर्धित डेटा अचूकता आणि अधिक क्षमतेसह स्वारस्य असलेल्या लोकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचण्यासाठी. या आणि संबंधित घडामोडी मोठ्या प्रमाणात संशोधनाच्या कार्यक्षमतेतील सुधारणा घडून आल्या आहेत . ऑनलाइनसंशोधन साधने अनेक बाबतीत विद्यमान पद्धतींची उत्क्रांती म्हणून पाहिली जाऊ लागली आहेत. याउलट, अलीकडील तांत्रिक विकासांमुळे ऑनलाइन लोकसंख्या आणि घटनांचे संशोधन करण्याचे मूलत: नवीन माध्यम या पद्धती मुळे शक्य झाले आहे. माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञानाने मानवी मनोवृत्ती आणि वर्तनांचे निरीक्षण, रेकॉर्डिंग आणि विश्लेषण करण्याचे अभिनव माध्यम या संशोधनामुळे प्रदान केले आहे जे बहुतेक भागांसाठी होते. संशोधकांना अलीकडेपर्यंत, फॉर्ममध्ये आणि सध्या शक्य असलेल्या प्रमाणात उपलब्ध झाले नव्हते. या पद्धतीमुळे संशोधनाच्या कार्यात कार्यक्षमता वाढीस लागली आहे .ऑन-लाइन आणि ऑफलाइन अशा दोन्ही प्रकारच्या मानवी वर्तनांच्या अभ्यासात नवीन पद्धतींचा वापर केला जात असल्याने साधनांना संशोधनाच्या प्रयत्नात परिवर्तनशील म्हणूनही पाहिले जाऊ लागले आहे. संप्रेषण विद्वान जे विद्यमान आणि नवीन परिमाणवाचकांच्या वापरामध्ये रुजलेले आहेत.

**ऑनलाइन संशोधन पद्धतींचे उद्देश:**

ऑनलाइन संशोधन पद्धती लोकांना त्वरीत आवश्यक असलेली माहिती शोधण्यात मदत करते . ऑनलाइन साधने त्वरित माहिती देतात त्याच बरोबर ऑफलाइन संशोधन पद्धती (जसे की लायब्ररीतील पुस्तके शोधणे) वापरून ही माहिती शोधण्यासाठी जास्त वेळ लागेल.

**ऑनलाइन संशोधन पद्धतींची मुख्य रचना**

ऑनलाइन संशोधन करण्यासाठी, आपण प्रथम आपण काय संशोधन करत आहात हे ठरविणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ, समजा तुम्हाला कॉफी पिण्याचे आरोग्य फायदे जाणून घेण्यात रस आहे. खालील प्रमाणे समजून घेऊ :

प्रथम, तुमच्या आवडत्या ब्राउझर किंवा सर्च इंजिनच्या सर्च बॉक्समध्ये (उदाहरणार्थ, इळपस, त्रेस्रश्रश, धरहे) 'कॉफी पिण्याचे आरोग्य फायदे' टाइप करा. तुम्ही शोध बॉक्समध्ये टाइप केलेल्या शब्दांच्या क्रमाची पुनर्रचना करू शकता (किंवा शब्द जोडण्यासाठी किंवा हटवण्यासाठी) आणि दुसरा शोध करू शकता. हे वेबसाइट्सचा एक नवीन संच प्रदर्शित करेल कारण शोध इंजिन शोधलेल्या शब्दांना वेगळे महत्त्व देते. ब्राउझर प्रासंगिकता/लोकप्रियतेच्या क्रमाने अनेक संबंधित वेबसाइट्सच्या लिंक्स प्रदर्शित करेल. यापैकी अनेक साइट उघडा आणि त्या उपयुक्त ठरतील की नाही हे ठरवण्यासाठी स्क्रोल करा. वेबसाइट कोणी पोस्ट केली हे देखील लक्षात ठेवा. शैक्षणिक, व्यवसाय आणि सरकारी वेबसाइट व्यक्तींनी पोस्ट केलेल्या वेबसाइट्सपेक्षा अधिक तथ्यात्मकदृष्ट्या विश्वासार्ह असण्याची शक्यता असते.

ऑनलाइन संशोधन पद्धतींचे विविध प्रकार कोणते आहेत?

**ऑनलाइन संशोधन पद्धतींमध्ये पुढील गोष्टींचा समावेश आहे:**

तुम्ही संशोधन करत असलेल्या विषयावरील लेख वाचण्यासाठी ब्राउझरद्वारे असलेल्या वेबसाइटवर जा. ब्राउझरद्वारे किंवा Youtube सारख्या शोध सुविधा वापरून ऑनलाइन व्हिडिओ पाहणे. CNN किंवा स्थानिक बातम्या प्रोग्रामिंग स्टेशन सारख्या बातम्या वेबसाइटवर जाणे आणि संबंधित विभागांसाठी बातम्यांचे संग्रहण शोधणे. ऑनलाइन पाहिल्या जाऊ शकतील अशा पुस्तके किंवा जर्नल लेखांमध्ये प्रवेश करण्यासाठी विनामूल्य ऑनलाइन लायब्ररी www.thefreelibrary.com, किंवा महाविद्यालय किंवा विद्यापीठातील लायब्ररी वापरणे.

वेगवेगळ्या साइटवरील माहिती कॉपी आणि पेस्ट करून एका रिक्त पानावर आणि ही माहिती नंतरच्या पुनरावलोकनासाठी जतन करा. (वेबसाइट पत्ता कॉपी आणि पेस्ट करायला विसरू नका.)

माहितीची तुलना करण्यासाठी तुमच्या संगणकाच्या स्क्रीनवर एकाच वेळी अनेक वेबसाइट उघडणे. कोणती वेबसाइट सर्वात विश्वासार्ह आणि उपयुक्त असण्याची शक्यता आहे हे ठरवण्यात हे तुम्हाला मदत करेल. (हे मूल्यांकन करण्यात तुम्हाला मदत करण्यासाठी वेबसाइट कोणी लिहिली आणि पोस्ट केली हे लक्षात घ्या.)

## ३.४ सारांश

संशोधन आराखडा तयार करताना संशोधकाला काळजीपूर्वक व नियोजनबद्ध पद्धतीने काम करावे लागते. पूर्व नियोजन करून सामाजिक संशोधनात संशोधनाचे विविध टप्पे पूर्ण करावे लागतात. सामाजिक संशोधन दोषविरहित व्हावे, कमी खर्चात व्हावे, वेळेची बचत व्हावी तसेच संशोधकाला संशोधन करताना कोणत्या प्रकारच्या अडचणींना तोंड द्यावे लागते व त्यातून कसा मार्ग काढू शकतो याचा अभ्यास संशोधन आराखड्यात केला जातो. सामाजिक संशोधनातून नेमका अर्थबोध शोधून संशोधक संशोधन प्रक्रिया पूर्ण करतो व नवीन शोध लावण्याचा आनंद घेत असतो. त्याआधारे सिद्धांत मांडू शकतो. सामाजिक संशोधनाची व्याख्या व वैशिष्ट्ये सामाजिक सुधारण्याची कार्ये, व संशोधन आराखड्याचे टप्पे किंवा पायऱ्या, संशोधन आराखड्याचे प्रकार, सर्वेक्षण, व्यष्टी अध्ययन प्रयोगात्मक संशोधन पद्धती इत्यादीचा अभ्यास केला आहे.

## ३.५ सरावासाठीचे प्रश्न

**अ) सविस्तर उत्तरे द्या**

१. सामाजिक संशोधनाचा अर्थ आणि कार्ये स्पष्ट करा.

२. संशोधन आराखड्याच्या अवस्था अथवा टप्पे विषद करा.

३. वर्णनात्मक संशोधन आराखडा, विश्लेषणात्मक आणि अन्वेषणात्मक संशोधन आराखडा सविस्तर स्पष्टीकरण दया?

४. सर्वेक्षण, व्यष्टी अध्ययन, प्रायोगिक आणि ऑनलाईन संशोधन चर्चा करा.

**ब) टीपा लिहा–**

a) सर्वेक्षण

b) व्यष्टी अध्ययन

c) संशोधनाची वैशिष्ट्ये आणि उद्देश

d) सामाजिक संशोधनाचे महत्त्व

## ३.५ सरावासाठीचे प्रश्न

अ) एका वाक्यात उत्तरे द्या.

१. ''क्रियात्मक संशोधन अशा कार्यक्रमाचा अंश असते की, ज्याचा उद्देश विद्यमान स्थितीमध्ये परिवर्तन करणे हा असतो.'' हे असे कोणी म्हंटले आहे.

२. कोणत्या समाजसशास्त्रज्ञाने सर्वप्रथम व्यष्टी अध्ययनाचा उपयोग केला?

३. –कोणाच्या मते ''एकत्रित राहणाऱ्या लोकांच्या जीवनातील क्रियाशील अंतर्भूत प्रक्रियांचे संशोधन म्हणजे सामाजिक संशोधन होय.''

४. कोणत्या मुलाखत पद्धतीमध्ये या संशोधक आपल्या विषयाच्या संबंधित व्यक्तींशी टेलिफोनद्वारे संपर्क करून त्यांच्याशी चर्चा करतो व तथ्यांचे संकलन करतो.

५. अध्ययनक्षेत्र विस्तृत असते त्यावेळी प्रत्यक्ष उत्तरदात्यासोबत संपर्क करुन तथ्ये संकलन करणे शक्य नसते म्हणून संशोधक कोणती पद्धत वापरतो ?

६. कोण मौलिक संशोधनाचे कट्टर समर्थक होते?

७. कोणी यांनी व्यावहारिक पुरस्कार केला आहे?

८. सामाजिक सर्वेक्षण ही संकल्पना कोणत्या समाजशास्त्रज्ञानी सर्वप्रथम उपयोगात आणली.

९. कोणत्या संशोधन मुख्य उद्देश अज्ञात तथ्यांचा व बाबींचा शोध घेणे व मानवी ज्ञानाची वृद्धी करणे हा आहे.

## ३.६ सरावासाठीच्या प्रश्नाची उत्तरे

१. गुड आणी हॅट (Goode and Hatt)

२. हर्बट स्पेन्सर या इंग्रज समाजसशास्त्रज्ञाने.

३. बोगार्डस (Bogardus)

४. टेलिफोनद्वारे मुलाखत (Telephonic Interview)-

५. प्रश्नावली पद्धत.

६. टी. एच. हक्सले (T. H. Huxley) हे मौलिक संशोधनाचे कट्टर समर्थक होते.

७. रॉबर्ट लिंड (Robert Lind) यांनी व्यावहारिक पुरस्कार केला आहे.

८. फ्रेडरिक लेप्ले (Fredrick Le-play).

९. अन्वेशणात्मक संशोधन आराखड्याचा मुख्य उद्देश अज्ञात तथ्यांचा व बाबींचा शोध घेणे व मानवी ज्ञानाची वृद्धी करणे हा आहे.

## ३.६ अधिक वाचनासाठी पुस्तके

**Readings:**


- Ahuja Ram Research Methods, Rawat Publications, Jaipur, 2003.
- De Vaus ,D.A. Survey in Social Research, Rawat Publications, Jaipur, 2003.

- Das D.K. Practice of Social Research, Rawat Publications, Jaipur, 2004. Dooley,
- David Social Research Methods, Prentice-Hall of India, New Delhi, 2003.
- Gaur, Ajai S. and Gaur Statistical Methods for Practice and Research: A Guide to data Sanjaya S. Analysis using SPSS, Response Book, New Delhi, 2006
- Goode W.J. and Hatt P.K Methods of Social Research, Mc-Graw Hill, 1992.
- Babbie Earl The Practice of Social Research Rawat Publication, New Delhi.5th Indian Reprint Lal Das D.K. Design of Social Research, Rawat Publications, Jaipur, 2005.
- Marvasti Amir B. Qualitative Research in Sociology, Sage Publications, London, 2004.
- Majumdar P.K. Statistics: A Tool for Social Sciences, Rawat Publications, Jaipur, 2002.
- Mukherjee Neela Participatory Rural Appraisal: Methodology and Applications, Concept Publishing Company, New Delhi, 1993.
- Robson Colin Real World Research, Blackwell Publishing Malden, USA, 2002.
- Wilkinson T.S. Methodology and Techniques of Social Research, Himalaya Publishing And Bhandakar P.L. House, Mumbai, 1992.
- Young P.V. Scientific Social Surveys and Research, Prentice-Hall of India, New Delhi, 1988.


❑❑❑

# घटक ४
# नमुना निवड (Sampling)


४.० प्रस्तावना

४.१ उद्दिष्टे

४.२ विषय विवेचन

४.२.१ नमुना निवडीचा अर्थ, उद्देश, तत्वे आणि फायदे

४.२.२ संभाव्यता नमुना निवड (साधा नमुना, लॉटरी पद्धत, टीपेस्ट पद्धत,) स्तरित, व्यवस्थाबद्ध, पुंज नमुना, बहुस्तरीय नमुना निवड, बहुव्यवस्थिय नमुना निवड.

४.२.३ गैरसमभाव्यता नमुना निवड: (उपलब्ध विषयानुसार) सहेतुक नमुना निवड किंवा निर्णयात्मक नमुना, स्नोबॉल नमुना निवड, आणि कोटा नमुना निवड.

४.३ सारांश.

४.४ सरावासाठीचे प्रश्न आणि उत्तरे.

४.५ अधिक वाचनासाठी पुस्तके.


## ४.० प्रस्तावना

समाजशास्त्राच्या अध्ययनात संशोधनाला अतिशय महत्व प्राप्त झालेले आहे. समाजशास्त्र समाजातील घडलेल्या घटना अथवा सामाजिक संबंधाचे अभ्यास करणारे महत्वाचे शास्त्र आहे.समाजशास्त्रामध्ये कोणत्याही घटनेचे वैज्ञानिक आणि चिकित्सक अभ्यास करणे गरजेचे असते म्हणून सदरच्या संशोधनात नमुना निवडी बाबतचे सर्व पैलू आपण या घटकात अभ्यासणार आहोत, त्याच बरोबर दैनंदिन जीवनात नेहमी नमुन्याचा उपयोग केला जातो. नमुन्याच्या आधारे त्या वस्तूविषयी अंदाज काढला जातो.समग्रातून निवडलेल्या एकाकांच्या म्हणजेच नमुन्याच्या पाहणीवरून समष्टी बाबत सामान्य स्वरूपाचे निष्कर्ष काढता येतात. सामाजिक संशोधनात सातत्याने नमुना निवडीचा अवलंब केला जातो.जनगणना आणि नमुना निवड या दोन पद्धतीच्या आधारावर संशोधन कार्य केले जाते आणि त्याच आधारे निष्कर्ष काढले जातात. नमुना पद्धतीच्या मर्यादा म्हणजे वेळ, पैसा, आणि श्रम या दृष्टीकोनातून हि पद्धत महागात पडणारी असते. म्हणून नेहमीच जनगणना पद्धतीचा अवलंब करणे संशोधकाला शक्य नसते.जनगणना पद्धत आणि नमुना पद्धत या दोन पद्धती मध्ये म्हणनून फारसा फरक नसतो. या कारणामुळे संशोधक नमुना निवड पद्धतीचा उपयोग करतात. समाजशास्त्र अभ्यासात सांख्यिकीय नमुना चाचणी पद्धतीचे जनक म्हणून ए एल बाऊले A.L.Bowle हे आहेत त्यांनी १९१२ ते १९१३ च्या दरम्यान ठोबळमानाने २० कुटुंबामध्ये कुटुंब याप्रमाणे

नमुना निवडून नमुन्याच्या अध्यानावरून निष्कर्ष काढले होते. प्रस्तुत घटकांमध्ये आपण नमुना निवडीविषयी सविस्तर माहिती घेणार आहोत यामध्ये नमुना निवडीचे उद्देश, तत्वे, फायदे त्याचबरोबर संभाव्यता नमुना निवड, गैरसंभाव्यता नमुना निवड या सर्व विषयाच्या अनुषंगाने विस्तृत चर्चा करणार आहोत.

## ४.१ उद्दिष्टे

१. नमुना निवडीचा अर्थ, उद्देश, तत्वे आणि फायदे समजून घेता येईल.

२. संभाव्यता नमुना निवडनिवडीचे प्रकार, साधा नमुना, लॉटरी पद्धत, टीपेस्ट पद्धत, स्तरित व्यवस्थाबद्ध, पुंज नमुना, बहुव्यवस्थिय नमुना निवड याविषयी जाणून घेता येईल.

३. गैरसंभाव्यता नमुना निवडीचे प्रकार, सहेतुक नमुना निवड किंवा निर्णयात्मक नमुना, स्नोबॉल नमुना निवड, आणि कोटा नमुना निवड समजून घेता येईल.

## ४.२ विषय विवेचन:

नमुना निवड समाजशास्त्रातील अतिशय महत्वाची पद्धत आहे. प्रस्तुत घटकात आपण नमुना निवडीचे फायदे मर्यादा त्याच बरोबर नमुना निवडीचे प्रकार याचे सविस्तर विश्लेषण करणार आहोत. संशोधक संशोधन करताना माहितीच्या स्रोताचा जो एक लहान संच निश्चित करतो, त्यास नमुना निवड असे म्हणतात. नमुना निवड हे व्यक्ती अथवा लोकसंख्या निवडीबाबतचे तंत्र आहे. नमुना निवड निःपक्षपाती, उद्देशपूर्ण आणि तर्कशुद्ध तसेच पूर्वग्रहविरहित, विश्वसनीय व संदर्भयोग्य व्हावी यासाठी काळजी घ्यावी लागते. काळजी न घेतल्यास नमुना निवडीतून मिळणारी माहिती अचूक आणि परिपूर्ण असण्याची शक्यता कमी राहते संशोधन करत असताना विषय व्यापक असल्यामुळे सगळ्या घटकांचा किंवा लोकसंख्येचा समावेश संशोधन प्रकल्पात करता येत नाही.

### ४.२.१ नमुना निवडीचा अर्थ उद्देश, तत्वे आणि फायदे:

संशोधक संशोधन करीत असताना विश्वसनीय माहितीसाठी संपूर्ण समग्रातून एककाची निवड करत असतात. एक लहान संच असू शकतो किंवा घटक असू शकतो त्याला आपण नमुना निवड म्हणू शकतो. नमुना निवड हे व्यक्ती समुदाय अथवा लोकसंख्या निवडीबाबतचे महत्त्वाचे तंत्र आहे. सामाजिक संशोधनामध्ये संशोधनाची पातळी ही तटस्थ आणि वैज्ञानिक असल्याने संशोधन अहवालामध्ये सर्व घटकांचा समावेश करता येत नाही. म्हणून नमुना निवड करून संशोधित बहुसंख्य किंवा विशिष्ट घटकांचे योग्य प्रतिनिधित्व साकारले जाईल या निकषाच्या आधारावर नमुनेची निवड केली जाते. उदाहरणांमध्ये Sarantokos यांच्या मते मानवी शरीरातील मधुमेहाचे प्रमाण मोजण्यासाठी रक्ताचा एक थेंब याची चाचणी केल्यानंतर संपूर्ण निदान सापडते. नमुन्यामुळे सामाजिक संशोधनांमध्ये विश्वसनीयता व अचूकता प्राप्त होते व वेळ, पैसा, श्रम याची बचत होते.

**अ) नमुना निवडीचा अर्थ** (Meanings of Sample)-

सामाजिक संशोधनात लोकसंख्येचा अभ्यास करत असताना प्रामुख्याने दोन पद्धतींचा विचार करावा लागतो त्यामध्ये नॉन पॅरॅमीट्रिक पद्धती आणि दुसरी म्हणजे पॅरामीट्रिक पद्धती. पॅरामेट्रिक पद्धतीचा अभ्यास करत असताना संपूर्ण समूह अथवा लोकसंख्या यांना परीक्षणाचे क्षेत्र म्हणून संशोधन व सर्वेक्षण केले जाते. नंतर मॅट्रिक पद्धतीमध्ये संपूर्ण लोकसंख्येमधून एका विशिष्ट प्रतिनिधी समूहाची निवड करून त्याचे अध्ययन केले जाते. नॉन पॅरामीट्रिक पद्धती मधून केलेले अध्ययन अथवा अभ्यास सरळ असते त्याचबरोबर विश्वसनीय व कमी खर्चाचे असते. नमुना हा नॉन पॅरामीट्रिक पद्धतीचा आधार आहे. एककामध्ये वस्तू, व्यक्ती,घटना व प्रतिक्रिया समाविष्ट होत असतात म्हणून समग्र, एकक किंवा व्यष्टी म्हणतात.

विश्व किंवा समग्र आतील फक्त काही प्रतिनिधी एककांची निवड करणे म्हणजे नमुना निवड होय. नमुना निवडीचा अर्थ विस्तृत स्पष्ट करण्यासाठी पुढील व्याख्यांचा अर्थ समजून घेणे महत्त्वाचे ठरेल.

**व्याख्या** Definition:

१. गुड आणि हॅट Good and Hatt:

''नमुना त्यातील नावाप्रमाणे एक विस्तृत समूहाचा प्रतिनिधी आहे''

A sample as the name implies, is a smaller representation of a large whole.

२. एक सांख्यिकीय नमुना त्या संपूर्ण समूह किंवा समग्राचे एक लघुचित्र आहे, ज्यामधून नमुना घेतला Amho. smt. pauling Young: statistical sample is a miniature picture or cross section of the entire group or aggregate from which the sample is taken.

३. **समाजशास्त्रीय शब्दकोशानुसार** (Dictionary of sociology)

''एका निश्चित संख्येमध्ये व्यक्ती, व्यष्टी किंवा निरीक्षणास एका विशिष्ट समग्रातून काढण्याची प्रक्रिया केव्हा पद्धती व अध्ययनाच्या हेतूने एका समग्रातून एका भागाची निवड म्हणजे नमुना निवड पद्धती होय.'' ampling method is the process or method of drawing a definite number of individuals, cases or observations from a particular universe, selecting part of the total group for investigation. **Fairchild, Dictionary of Sociology**.

४. **बोगार्डस** Bogardus: ''एका पूर्वनिर्धारित योजनेनुसार एककांच्या एका समूहामधून एक निश्चित प्रतिशत निवडणे म्हणजे नमुना निवड होय.''

Sampling is selection of certain percentage of group of item according to predetermined plan.Bogardus.

उपरोक्त व्याख्या वरून असे स्पष्ट होते की, विश्व किंवा समग्रातील एकूण एकका पैकी काही प्रतिनिधी एककाचे निवड करणे म्हणजे नमुना निवड होय. नमुना निवड ही संशोधनाचे तंत्र आहे. ज्यामध्ये

संशोधन विषयाच्या अंतर्गत समाविष्ट संपूर्ण लोकसंख्या काळजीपूर्वक व वैशिष्ट्यपूर्ण प्रतिनिधित्व करणाऱ्या एककांना निवडले जाते. व्यवहारिक जीवनात व सामाजिक संशोधनात नमुना निवड तंत्राचा खूप उपयोग होत असतो.

**ब. नमुना निवड पद्धतीची तत्वे:**

सामाजिक संशोधन करत असताना संशोधकाने निवडलेला विषय यासंबंधी संपूर्ण समग्राचे अध्ययन करणे शक्य नसते. कारण वेळ, श्रम, पैसा या दृष्टीने ते परवडणारे नसते.

हे सर्व टप्पे करून देखील निष्कर्ष सारखेच येण्याची शक्यता अधिक असते म्हणून संशोधन करताना समग्राचे अध्ययन न करता त्यातून समग्राच्या प्रतिनिधिक एकाची निवड करून त्याचे अध्ययन करणे योग्य ठरते. एकेकाची निवड योग्य असेल तर संशोधनातून येणारे निष्कर्ष विश्वासनीय, पूर्वग्रह दूषित आणि वैज्ञानिक असतात. म्हणून एककांची निवड करत असताना काही आधारभूत तत्त्वांचे विश्लेषण पुढील प्रमाणे केले आहे.

**१. सजातीयता**

अनेक घटकांचे प्रतिनिधित्व करू शकणारे काही घटक निवडून त्याचा सखोल अभ्यास नमुना चाचणीत केला जातो. त्यामुळे अभ्याससाठी निवडलेले घटक व इतर असंख्य यामध्ये काही समान वैशिष्ट्ये असली पाहिजे. एका विशिष्ट ग्रहाचे गुणधर्म गटातील काही घटकाची निवड करताना त्या घटकाजवळ असतील तर त्याची निवड सार्थक ठरेल.

**२. समग्राची एकरूपता** Homoginity of Universe

नमुना निवडीच्या आधारभूत तत्वा मध्ये समग्राची एकरूपता महत्त्वाचा घटक आहे. ज्या समग्रामधून नमुना निवडायचा आहे, तो समग्र एक जीन्सिपणा असणे आवश्यक आहे. कारण समग्राची एकरूपता किंवा सजातीयता येत आहे नमुना निवडीचे महत्त्वाचे आधारभूत तत्त्व मानले जाते. कारण समग्रामध्ये एकरूपता नसेल तर अशा पद्धतीत निवडलेल्या नमुना हा प्रतिनिधी स्वरूपाचा राहणार नाही. त्यामुळे त्या नमुन्याच्या आधारावरून जे निष्कर्ष काढले जातील ते निष्कर्ष संपूर्ण समग्राला लागू पडणार नाहीत. त्यामुळे समग्रामध्ये एकरूपता अर्थात समग्रातील सर्व एककामध्ये समानता असली पाहिजे. जर तथ्यामध्ये अत्याधिक एकरूपता असेल म्हणजे संपूर्ण तथ्याच्या विभिन्न एकेकांमध्ये अंतर फारच कमी असेल तर त्या संपूर्ण एककापैकी काही एकक समग्राचे योग्य प्रतिनिधित्व करतील. जर विविध एककामध्ये अधिक भिन्नत्व असेल तर त्या एककामधून प्रतिनिधी एकक आपल्या अध्ययन्यासाठी निवडणे योग्य राहील. तसेच अध्ययनातून निघणारे निष्कर्ष देखील वास्तव राहतील. परंतु अध्ययन विषयाच्या समग्रातील सर्व एककात एकरूपता असतेच असे म्हणता येत नाही. कारण अनेक बाबतीत भिन्नता दिसून येते म्हणून स्टीफन यांनी म्हटले की, आधुनिक विशाल समाजात विभिन्नता प्रजाती, राष्ट्रधर्म, आर्थिक स्थिती, व्यवसाय, प्रथा, परंपरा, मनोवृत्तीचे लोक इतक्या अधिक प्रमाणात एकमेकांशी मिळून मिसळून वागतात की, त्यांच्यात समानता आढळून येत नाही.

परंतु प्रत्यक्षात जीवनाच्या प्रत्येक पैलू मध्ये इतकी विविधता असते की, एक दुसऱ्यास अलग करणे कठीण जाते. अशाप्रकारे स्पष्ट विभाजन रेषा नसल्यामुळे समग्रातील संपूर्ण विविध त्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या नमुन्याची निवड करणे अतिशय गुस्तागुंतीचे आहे. म्हणून अतिशय सावधानता पूर्वक विविधता मध्ये अंतर्भूत राहणारे एकरूपता शोधून प्रतिनिधिक नमुना निवडला पाहिजे. नमुना निवड तंत्र या मान्यतेवर आधारित आहे की, विविधता मधील समानताचा देखील सामाजिक घटनांच्या अध्ययनामध्ये शोध घेतला जाऊ शकतो.

**प्रतिनिधी निवडण्याची शक्यता:**

संपूर्ण एककांमधून काही एककांची निवड करावी की, जे संपूर्ण एकांची किंवा समग्राचे प्रतिनिधित्व करू शकतील. नमुना निवडी मध्ये समग्र योग्य प्रतिनिधी एककाचा समावेश असणे हे या तंत्राचे दुसरे आधारभूत तत्त्व मानले जाते. संपूर्ण समग्राचे प्रतिनिधी नमुन्यामध्ये निवडले पाहिजे. परंतु त्याकरता काही नियमनाचे पालन करणे गरजेचे आहे. उदा. एका मोठ्या समूहामध्ये केवळ एक किंवा दोन एकक निवडल्यामुळे त्या समूहाचे सर्व प्रतिनिधी निवडले जाणार नाहीत आणि त्यावरून काढलेली निष्कर्ष संपूर्ण समूहाचे प्रतिनिधी स्वरूपाचे असणार नाही. म्हणून नमुन्याची संख्याही समूहाच्या आकारानुसार असली पाहिजे. त्याचप्रमाणे विशिष्ट वैशिष्ट्य व गुणाच्या आधारावर संपूर्ण समूहाला काही निश्चित करत विभाजित करणे आणि त्यानंतर प्रत्येक स्तरातून काही एककांची निवड करावी संपूर्ण समूहाच्या महत्त्वपूर्ण वैशिष्ट्यांचे प्रतिनिधित्व निवडलेले हे एकक करू शकतील.

**जवळपास अचूकता असणे:**

अतिशय काळजीपूर्वक नमुन्याची निवड केली असली तरी कोणताही नमुना हा समग्राचे १००% प्रतिनिधित्व करू शकत नाही. त्यामुळे नमुन्यामध्ये कितीही परिपूर्णता आणण्याचा प्रयत्न केला तरी व्यर्थ आहे. म्हणून त्याकरता असा प्रयत्न केला पाहिजे की, नमुना हा शक्यतोवर प्रतिनिधित्व करणारा वास्तविक परिस्थितीचे जवळपास एक चित्र असेल आणि आपले निष्कर्ष जवळपास योग्य राहतील. सामाजिक घटनांच्या अध्ययनामध्ये जवळपास किंवा शक्यतोवर अशा निकषावरच समाधान मानावे लागते. कारण कोणतेही निष्कर्ष शंभर टक्के सत्य असू शकत नाहीत.

**आदर्श प्रतिनिधीक नमुन्याची आवश्यक वैशिष्ट्ये :**

सामाजिक संशोधनात नमुना जर प्रातिनिधिक आणि यथार्थ असेल तर निष्कर्ष देखील यथार्थ राहतील म्हणून अध्यनाच्या यशस्वी आणि यतार्थे करिता चांगला किवा प्रातिनिधिक नमुन्याची आवशकता आहे. आदर्श प्रतिनिधीक नमुन्याची वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे.

१. **नमुना प्रातिनिधिक असावा:** समग्राचे योग्य प्रतिनिधित्व करणारा नमुना असणे,हे एका चांगल्या नमुन्याचे आवश्यक असे वैशिष्ट्ये आहे. नमुना निवडीचे अनेक प्रकार आहेत तरी देखील प्रत्येक प्रकारचा उद्देश हा प्रातिनिधिक नमुन्याची निवड करणे हा आहे.अध्ययन विषयाच्या तथ्यामध्ये कोणत्या प्रमाणात एकरूपता आढळते. मानून नमुना निवडीसाठी कोणती पद्धती स्वीकारण्यात आली आहे. प्रातिनिधिक नमुना

प्राप्त करण्यासाठी हे आवश्यक आहे कि, संपूर्ण लोकसंखेच्या अंतर्गत आढळणाऱ्या विविध समूहाकडे लक्ष देऊन त्यांना नमुन्यात योग्य प्रतिनिधित्व द्यावे. त्याच बरोबर संशोधनकर्त्याने आपल्या अध्ययन विषयाच्या दृष्टीने उपयुक्त असलेल्या नमुना निवड पद्धतीचा उपयोग करावा.

२. **पर्याप्त आकार :** नमुन्याचा आकार हा प्रातिनिधिक याची खात्री देणे शक्य नाही.तरी देखील आपला नमुना हा खूप लहान किंवा खूप मोठा देखील असता कामा नये .नमुन्याचा आकार खूप लहान असेल तर समग्रातील एककाच्या महत्वाच्या वैशिष्ट्यांनी योग्य प्रतिनिधित्व मिळण्याची शक्यता फारच कमी राहील. समजा, नमुन्याचा आकार मोठा असेल तर संशोधन करताना अनेक अडचणी संधोधनकर्त्याला समोर निर्माण होतील. म्हणून नमुन्याचा आकार इतका पर्याप्त असावा कि, जेणे करून तो नमुना संमग्राचे प्रतिनिधित्व करू शकेल. त्या करिता नमुन्याची निवड हि उपयुक्त अशाच पद्धतीने केली पाहिजे.

**३. पक्षपात व पूर्वग्रहापासून मुक्त :** चांगला नमुना हा सर्व प्रकारच्या पक्षपात व पूर्व ग्रहापासून मुक्त असतो. अनेकदा नमुना निवडताना समग्रातील काही उल्लेखनीय, रोचक व आकर्षक एककाकडे संशोधन करता आपले आदर्श, मूल्य यांना महत्त्व देऊन त्यानुसार तो एककाची निवड करतो. या दोन्ही प्रसंगी पक्षपात आणि पूर्वग्रहाचा प्रभाव असल्याचे आढळून येते. अशाप्रकारे निवडलेले नमुना हा प्रतिनिधी असू शकत नाही. त्याकरता संशोधनकर्त्यांनी कोणत्याही प्रकारचा पूर्वग्रह न ठेवता व पक्षपात न करता नमुन्याची निवड केली पाहिजे तरच तो आदर्श नमुना ठरेल.

**४. नमुना अध्ययन विषयाच्या उद्दिष्टाशी संबंधित असावा :** नमुना हा संशोधन विषयाच्या उद्दिष्टांशी संबंधित असावा. जर नमुना हा संशोधनाच्या उद्दिष्टांशी अनुकूल असेल तर त्या अनुकूलतेच्या आधारावर नमुन्याच्या विश्वसनीतीचे मोजमाप करणे शक्य होते. उदा. विद्यार्थ्यांचे मादक द्रव्याचे सेवन करण्याच्या सवयीचे अध्ययन करायचे असेल तर जे विद्यार्थी मादक पदार्थाचे सेवन करीत नाही त्या विद्यार्थांना नमुन्यामध्ये घेऊ नये. अध्ययन विषयाच्या उदेशाच्या अनुकूल नमुना असेल तर प्राप्त होणारे निष्कर्ष हे यथार्थ असण्याची शक्यता अधिक असते.

**५. सामान्य ज्ञान व तर्कावर आधारित :** नमुना निवड हा सामान्य तर्कावर आधारित असला पाहिजे.केवळ डोळे लावून नियमांचे पालन करून नमुन्याची निवड करणे म्हणजे आदर्श नमुना नव्हे. नमुन्याची निवड योग्य पद्धतीद्वारे केली पाहिजे. परंतु त्याचबरोबर संशोधनकर्त्याने आपल्या सामान्य ज्ञानाचा उपयोग करून समग्राच्या प्रमुख वैशिष्ट्यांच्या संबंधात माहिती मिळवावी आणि त्या आधारावर नमुन्याची योग्य निवड करावी.

**६. व्यावहारिक अनुभवावर आधारित :** नमुना हा व्यावहारिक अनुभवावर आधारित असतो. प्रातिनिधिक नमुना निवडताना संशोधनकर्त्याचे अनुभव अत्यंत महत्वाचे असतात. एकाद्या नवीन संशोधनकर्त्याला यशस्वीपणे प्रतीनिधिक नमुन्याची निवड योग्य अनुभवाआभावी करू शकत नाही. व्यावहारिक अनुभव अध्ययन विषयाच्या स्वरूपासंबंधी अंत:दृष्टीचा विकास करण्यास सहाय्यक असतात.

तर अंतदृष्टी प्रातिनिधिक नमुन्याच्या निवडीत मदत करतात. म्हणून चांगला नमुना हा व्याव्हारीक अनुभवावर आधारित असतो.

**नमुना निवडीच्या प्रमुख पायऱ्या:** Main stpes of sampling

नमुना निवडीच्या पायऱ्या पैकी आपण काही पायऱ्यांची चर्चा करणार आहोत त्या पैकी पुढील प्रमाणे विश्लेषण करू.

**१. समग्र निश्चित करणे :** Determination of the universe

नमुन्याची निवड पद्धती मध्ये संशोधकाला पहिल्यांदा ज्या समग्रातून एककाची निवड करायची असते ते समग्र निश्चित करावे लागते. एखाद्या समुदयात राहणाऱ्या लोकसंख्येचे निर्धारण सहजपणे केले जाते. कारण प्रत्येक समुदायाचे लोक एका निश्चित भौगोलिक क्षेत्रातच वास्तव्य करतात. एखाद्या शहरातील लोकांच्या आर्थिक परिस्थितीचे अध्ययन करायचे असल्यास त्या शहराची संपूर्ण लोकसंख्या लक्षात घेऊन त्या आधारावर नमुना निवड पद्धती निश्चित केली जाते. परंतु अनेकदा समग्र हे लोकसंख्या नसून काही गुण, क्रिया किंवा घटना असतात. अशा अवस्थेत समग्राचे निर्धारण करणे कठीण असते. कारण हे समग्र फारच लवकर कमी किंवा जास्त होण्याची शक्यता असते. म्हणून अशा समग्राचे निर्धारण हे त्याच्या प्रकारावर आधारित असते.

**अ. निश्चित समग्र**

जेव्हा समग्र अंतर्गत येणाऱ्या सर्व एक कारणा पूर्ण निश्चित केले जाते तेव्हा त्या निश्चित समग्र असे म्हणतात. उदाहरणार्थ नगर, शहर, वस्ती, गाव किंवा शाळा महाविद्यालयात शिकणारे विद्यार्थी.

**ब. अनिश्चित समग्र:**

जेव्हा समग्रहातील एकेकाना बरोबर निश्चित करता येत नाही. परिवर्तनशील आणि एक अज्ञात असणे या दोन कारणांमुळे समग्र हे अनिश्चित असतात उदाहरणार्थ. मादक पदार्थाची व्यसन करणाऱ्या लोकांचा शोध घेणे.

**क. वास्तविक समग्र**

जेव्हा समुग्राची संख्या वास्तविकपणे ज्ञात असते किंवा माहित असते तेव्हा त्यास वास्तविक समग्र असे म्हणतात.

उदा. एखाद्या महाविद्यालयात शिकणाऱ्या विद्यार्थी विद्यार्थिनींची संख्या, शिक्षकांची संख्या, कर्मचाऱ्यांची संख्या आदी.

**ड. काल्पनिक समग्र**

या प्रकारामध्ये समग्राची संख्या अज्ञात असते अथवा माहीत नसते. अशा संशोधनात संशोधकाला संशोधन करता केवळ अनुमानाच्या आधारे माहीत करून घ्यावी लागते त्यास काल्पनिक समग्र असे म्हणतात. उदा. एखाद्या शहरातील लोकसंख्या माहीत करून घेतल्यानंतर विभिन्न वयाच्या लोकांचे अनुमान

काढणे, एखाद्या खेड्यातील लोकसंख्या माहीत करून घेतल्यानंतर विभिन्न लोकांचे वयाचे उत्पन्नाचे अनुमान काढणे.

**२. नमुनाच्या एककाचे निर्धारण करणे:**

नमुनाच्या एककाचे निर्धारण केल्यानंतर नमुना प्रक्रियेतील ही दुसरी महत्त्वाची पायरी मानली जाते. नमुना निवडण्यापूर्वी कोणकोणत्या गोष्टीपासून नमुन्याच्या एककांना निवडायचे आहे हे निश्चित करावे लागते. जर एखादा मानव समाजाचे अध्ययन करायचे असल्यास केवळ काही व्यक्तीच नमुन्याचे एकक बनतील असे नाही. व्यक्तीशिवाय ते ज्या वस्तीत राहतात ते जे व्यवसाय करतात, ज्या कुटुंबाचे सदस्य आहेत, ज्या प्रकारच्या घरात ते राहतात, यामधील प्रत्येक काही काही एकक नमुन्या मध्ये असू शकतात. या संबंधात संशोधन करताना असा नेहमीच भ्रम असतो की, जोपर्यंत मानवाच्या संबंधात अध्ययन करीत आहोत तोपर्यंत केवळ व्यक्तीही त्याच्या नमुन्याचे एकक होऊ शकतात. परंतु वास्तिकता ही आहे की, फारच थोडी संशोधन ही व्यक्ती एकक मानून करण्यात आलेली आहेत. यावरून हे स्पष्ट होते की व्यक्ती व्यतिरिक्त वितरण होण्याचे लोक इतर प्रकारचे एकक असतात.

भौगोलिक एकक यामध्ये नगर, गाव, वार्ड, तहसील, जिल्हा, राज्य यादी यांचा समावेश होतो.

**३. उद्गम सूची किंवा साधन सूची उपलब्ध करणे**

एकका संबंधीची माहिती प्राप्त करण्यासाठी उद्गम सूची किंवा साधन सूची उपलब्ध करणे ही नमुना निवड प्रक्रियेतील तिसरी पायरी होय. साधन सूचीमध्ये समग्रहातील संपूर्ण एककाच्या संबंधात सूचना व माहिती असते. साधन सूची शिवाय नमुन्याची निवड केली जाऊ शकत नाही. काही वेळा साधन सूचीमध्ये संशोधनकर्त्याला तयारी करावी लागत नाही. तयार केलेली सूची प्राप्त होते. परंतु काही वेळा संशोधनकर्त्याला स्वतः साधन सूची तयार करावे लागते. उदाहरणार्थ टेलिफोन धारक, आयकर दाते, मतदाते, घर मालक, इत्यादीची सूची आपल्याला तयार मिळते. परंतु मद्यप्राशन करणारे, मादक द्रव्याचे सेवन करणारे इत्यादी बाबतची सूची संशोधन करताना स्वतः करावी लागते.

**साधनसूचीची वैशिष्ट्ये**

सूची परिपूर्ण असावी, अद्यावत असावी, नावामध्ये पुनरावृत्ती नसावी, सूची एककाला अनुकूल असावी, सूचीमध्ये एककासंबंधीचे संपूर्ण विवरण असावे. अशा प्रकारची सूची संशोधन करताना उपलब्ध झाली पाहिजे.

**४. नमुन्याचा आकार निश्चित करणे:** Determination of the size of sample

या पायरीमध्ये नमुन्याचा आकार निश्चित करावा लागतो. नमुनेचा आकार हा किती मोठा आणि किती लहान असावा या संबंधात कोणताही निश्चित नियम नाही. म्हणून नमुन्याचा आकार हा पर्याप्त असावा. नमुनेच्या आकाराची निर्धारण करताना हे लक्षात घेतले पाहिजे की, त्यामध्ये अध्ययन विषयाच्या सर्व

आवश्यक वैशिष्ट्यांचा समावेश व्हावा समग्राचे स्वरूप, एकाकाचे स्वरुप, संशोधन पद्धती, अध्ययन पद्धती, व तंत्र उपलब्ध साधने इत्यादी गोष्टीचा विचार करूनच नमुन्याचा आकार निश्चित केला जातो.

**५. नमुना निवड पद्धती ठरविणे :**

या पायरी मध्ये नमुना निवड केली जाते.आता पर्यंत संमग्राचे स्वरूप, नमुन्याच्या एककाचे स्वरूप, साधन सूचीची उपलब्धता आणि आकार या गोष्टी स्पष्ट होतात. त्या आधारावर संशोधनकर्त्याला हे निश्चीत करावे लागते कि, नमुन्याची कोणती पद्धती हि सर्वात जास्त उपयुक्त राहणार आहे. नमुना हा प्रातिनिधिक स्वरूपाचा राहील, या दृष्टिकोनातून नमुना पद्धतीची निवड काळजीपूर्वक करावी.

**६. नमुना निवड**

नमुना निवडीच्या प्रक्रियेची ही शेवटची पायरी होय. जी नमुना निवड पद्धती संशोधन करता निश्चित करतो, त्या पद्धतीच्या सहाय्याने आवश्यक नमुन्याची निवड केली जाते. उपयुक्त पद्धतीच्या सहाय्याने विश्वसनीय प्रामाणिक आणि प्राथमिक स्वरूपाच्या नमुनेची निवड करणे हाच नमुना निवड प्रक्रियेचा उद्देश आहे. कारण नमुना निवडीवर संपूर्ण अध्ययनाच्या निष्कर्षाची यथार्थ फार मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे.

**नमुना निवड पद्धतीचे फायदे:**

आधुनिक समाजात गुंतागुंत असल्याने त्याचबरोबर आधुनिक समाज विशाल समुदाय असल्याने जनगणना पद्धतीने संपूर्ण समग्राचे अध्ययन करणे ही एक अशक्य बाब आहे. या दृष्टिकोनातून वेळ, पैसा, श्रम खर्च होते. त्याचबरोबर संपूर्ण समुग्राचे अध्ययन केल्यानंतर काढला जाणारा निष्कर्षांमध्ये खूप फरक असतो असे नाही. म्हणून जनगणना पद्धतीपेक्षा नमुना निवड पद्धत ही अधिक लोकप्रिय आहे. नमुना निवड पद्धतीचे काही फायदे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**१. वेळ, श्रम आणि पैसा यांची बचत :** आधुनिक कालखंडातील समाजजीवन गतिशील आणि परिवर्तनशील असल्याने कोणतेही समाजामध्ये संशोधन करत असताना मोठ्यापर्यंत सुरू राहील असेल तर संशोधन विषयाच्या समग्रातील एककात परिवर्तन होण्याची अधीक शक्यता असते. म्हणून नमुना निवड पद्धतीचा अवलंब करणे आवश्यक असते. नमुना निवड पद्धतीचा अवलंब केल्यामुळे संपूर्ण समग्राचे अध्ययन करण्याची आवश्यकता नसते. त्यामुळे वेळ, श्रम आणि पैसा यांची बचत होते हा नमुना निवड पद्धतीचा फार मोठा फायदा आहे.

**२. अधिक सखोल अध्ययनाची शक्यता:** नमुना निवड पद्धतीमध्ये संपूर्ण एककापैकी फक्त प्रतिनिधी एककाची निवड केली जाते. त्यामुळे अध्ययन क्षेत्र हे मर्यादित होते. त्या प्रतिनिधी की एककाची संख्या मर्यादित असल्यामुळे त्याचे अधिक सखोल अध्ययन केले जाते. आधुनिक कालखंडात सामाजिक घटना या गुंतागुंतीचे असल्यामुळे त्या घटनेचे सूक्ष्म अध्ययन करणे आवश्यक असते त्यामुळे नमुना निवड पद्धतीचा लाभ जनगणना पद्धतीमध्ये मिळत नाही.

**३. विश्वसनीय निष्कर्ष :** नमुना निवड पद्धतीमध्ये एककांची संख्या ही मर्यादित असते. त्यामुळे नमुन्यातील एककाकडून मिळालेल्या उत्तराची अचुकता संशोधन करता तपासू शकतो. या उलट जनगणना पद्धतीमध्ये एककाची संख्या ही खूप विस्तृत असते अशा परिस्थितीत संशोधन करता उत्तरदात्याकडून मिळालेल्या उत्तराचची अचूकता तपासून बघू शकत नाही. म्हणून जनगणना पद्धतीच्या तुलनेत नमुना निवड पद्धतीद्वारे निवडलेली तथ्यही अधिक विश्वासनीय असतात आणि विश्वसनीय तथ्याच्या आधारे काढलेले निष्कर्ष देखील विश्वासणीय असतात.

**४. अनुभवाआधारित तथ्य :** नमुना निवड पद्धतीमध्ये एकेकाची संख्या ही मर्यादित असते. म्हणून संशोधनकर्त्यास अनुभव ज्यांनी तथ्य संपादित करणे शक्य होते. जनगणना पद्धतीत अनुभुजन्य तथ्ये संपादित करण्याची सोय नसते. अनुभुजन्य किंवा अनुभव आधारित तत्त्वे नमुना निवड पद्धतीमध्ये प्राप्त करणे शक्य असल्यामुळे या पद्धतीचे महत्त्व वाढले आहे.

**५. सुलभ प्रशासन :** नमुना निवड पद्धतीत संपूर्ण एककांचे अध्ययन करण्याची आवश्यकता नसते. नमुन्यात निवडलेले एककांचे अध्ययन केले जाते त्यामुळे नमुन्यातील मानवी समूहाचे निरीक्षण करणे आणि प्रत्येक एककांशी संपर्क ठेवणे संशोधन करताना सहज शक्य होते. त्याचप्रमाणे नमुन्यातील एककांच्या सर्वेक्षण योजनेचे नियंत्रण करणे कठीण जात नाही. अशाप्रकारे संशोधन करताना उत्तरदात्यांशी संपर्क साधने, तथ्य संकलन करणे इत्यादी गोष्टी सुलभ होते.

**नमुना निवड पद्धतीचे दोष किंवा मर्यादा**

नमुना निवड पद्धतीच्या फायद्याचा विचार केल्यानंतर आपणास नमुना निवडीतील काही दोषांची चर्चा करावी लागेल ती पुढील प्रमाणे.

**१. पक्षपात किंवा पूर्वग्रहाची शक्यता :** नमुना निवड तंत्राचा सर्वात मोठा दोष म्हणजे नमुनांवर पद्धतीमध्ये पक्षपात किंवा पूर्वग्रहापासून अलिप्त राहू शकत नाही. नमुनांची निवड करत असताना कोणत्याना कोणत्या प्रकारे पक्षपात आणि पूर्वग्रह होतोच. त्यामुळे निवडलेले नमुना हा समग्रहाचा प्राथमिक नमुना राहू शकत नाही.

**२. प्रातिनिधिक नमुना निवडण्यात अडचण :** नमुना निवडीतील दोष आणि मर्यादातील अत्यंत महत्त्वाचे बाब म्हणजे नमुना निवड पद्धतीत प्रतिनिधिक नमुना निवडणे अतिशय कठीण आहे. सामाजिक एककामध्ये फार मोठ्या प्रमाणात भिन्नता आढळून येत असते. त्यांच्यात जितक्या अधिक प्रमाणात भिन्नता असेल तितका प्रतिनिधी नमुना निवडणे कठीण आहे. नमुना प्रातिनिधिक असणे किंवा नसणे ही गोष्ट नमना निवडीच्या पद्धतीवर देखील अवलंबून आहे. जर नमुना निवड तंत्राची निवड करताना चूक झाली तर योग्य नमुना देखील प्रातिनिधिक राहणार नाही.

**३. विशेष ज्ञानाची आवश्यकता :** सामाजिक घटनांच्या संदर्भात नमुना निवड पद्धतीचा उपयोग करणे सोपे काम नाही. नमुना निवडण्यासाठी विशेष ज्ञान, समयसूचकता अनुभव आणि आंतरदृष्टीची आवश्यकता

असते. हे सर्व गुण प्रत्येक संशोधनकर्त्याजवळ असेलच असे नाही. ज्या संशोधनकर्त्याजवळ विशेष स्पष्ट आणि अनुभव असेल तोच नमुना निवड पद्धतीचा उपयोग करू शकेल.

**४. नमुन्यावर अवलंबून राहणे कठीण :** नमुना निवड तंत्रनुसार नमुना व त्याच्या एकाच निवड झाली आहे केवळ त्याच एकाचे अध्ययन केले पाहिजे. परंतु व्यावहारिक दृष्ट्या ही गोष्ट शक्य नाही. भौगोलिक परिस्थिती, उच्च सामाजिक व राजकीय परिस्थिती इत्यादी अनेक कारणामुळे निवडलेल्या एककांशी संपर्क स्थापन करणे आणि त्यांच्याकडून सूचना प्राप्त करणे शक्य नसते. त्यामुळे निवडलेल्या नमुन्यातील एककाच्या अध्ययनाच्या दृष्टीने अवलंबून राहणे कठीण जाते. अशा परिस्थितीत त्या एकाशी संपर्क स्थापन होणे अशक्य आहे. आशा एकेकांना अध्ययनातून काढून टाकले जाते किंवा त्यांच्या ऐवजी दुसऱ्या एककांना निवडले जाते. अनेकदा तर असेही घडते की ज्या लोकांची नमन्यामध्ये एकक निवड केली जाते. ते लोक सूचना किंवा माहिती देत नाहीत त्यामुळे त्या लोकाऐवजी दुसरे एकक घेणे अशक्य असते. नमुना निवड पद्धतीचा हा फार मोठा दोष असल्याचा आढळून येते.

**५. नमुना निवड पद्धतीची असंभाव्यता :** काही विषयाच्या अध्ययनात जनगणना पद्धतीचा अवलंब करणे अशक्य असते. त्याचप्रमाणे काही विषयाच्या अध्ययनात नमुना निवड पद्धती ही अनावश्यक असते. जर अध्ययन विषय लहान असेल, तर अशावेळी अध्ययनातील प्रत्येक एककाचे अध्ययन करणे आवश्यक असते. त्याचप्रमाणे अध्ययन विषयाच्या एककाचे अत्याधिक भिन्नता असेल तर नमुना निवड पद्धतीचा उपयोग केल्यास योग्य निष्कर्ष काढता येणार नाही. म्हणून अशा परिस्थितीत जनगणना पद्धतीचा उपयोग करणे अनिवार्य असते.

## ४.२.२ संभाव्यता नमुना निवड (साधा नमुना, लॉटरी पद्धत, टीपेस्ट पद्धत,) स्तरित, व्यवस्थाबद्ध, पुंज नमुना, बहुस्तरीय नमुना निवड, बहुव्यवस्थिय नमुना निवड.

नमुना निवडीच्या पद्धती मध्ये प्रामुख्याने दोन प्रकार पडतात त्यामध्ये **१. संभाव्यता नमुना निवड पद्धती आणि २. गैरसमभाव्यता नमुना निवड पद्धती**

**नमुना निवडीचे प्रकार**

**अ) संभाव्यता नमुना पद्धती:**

समग्रातील सर्व एककामध्ये नमुना निवडीची संभाव्यता ही समान असते. अशा नमुना निवड पद्धतीला संभाव्यता नमुना निवड पद्धती असे म्हणतात. समग्रातील प्रत्येक एककाला नमुना निवड होण्याची संधी असते. या पद्धतीमध्ये पक्षपात होण्याची शक्यता फारच कमी असते. संभाव्यता बाबत आपल्या व्यवहारातील नेहमीच उदाहरण देता येते. उदाहरणार्थ फुटबॉल खेळणारी दोन संघ आहेत यामध्ये प्रथम गोलंदाजी कोण करणार हा प्रश्न असतो. म्हणून दोन्ही टीमचे कॅप्टन एकत्र येतात नाणेफेक करतात नाण्याच्या हेड आणि टेल दोन बाजू असतात. दोन तीन प्रमुखापैकी एकाने हेड आणि दुसऱ्याने टेल घेतले जाते. नाणेफेक करून कुणाला बॅटिंग मिळेल हे ठरवले जाते. यामध्ये दोन्हीही टीम प्रमुखाला प्रथम बॅटिंग करण्याची ५०% शक्यता

असते. या शक्यतेला संभाव्यता नमुना असे म्हणतात. संभाव्यता नमुना पद्धतीत संपूर्ण एककांना नमुन्यात समावेश होण्याची शक्यता वाटते.

**संभाव्यता नमुना निवड आराखड्याची वैशिष्ट्ये**

**१. संभाव्यता :** समग्रांतील प्रत्येक एककाला नमुन्यात समावेश होण्याच्या संभावितेचे प्रमाण सुनिश्चित असते आणि ते संशोधनकर्त्याला माहीत असते. समग्रातील कोणत्याही एककाचा नमुन्यात समावेश होण्याची शक्यता व संभाव्यता किती आहे. हे संख्याशास्त्रीय दृष्ट्या सांगता येते.

**२. प्रतिनिधीक नमुना निवड योजना :** संभाव्यता नमुना निवड पद्धतीमध्ये संपूर्ण समग्राचा प्रतिनिधी नमुना निवडणे शक्य होते. संशोधनाचे निष्कर्ष यथार्थ राहण्यासाठी प्रतिनिधी नमुना आवश्यक असतो. असंभवता नमुना पद्धतीमध्ये नमुना हा प्रतिनिधी राहीलच याची खात्री देता येत नाही. परंतु संभाव्यता नमुना पद्धतीमध्ये मात्र नमुना प्रतिनिधीक असतो.

**३. विभिन्नस्तरातील एककांचा विचार :** जेव्हा समग्रातील एककात विचार विजातीयता किंवा वेगवेगळ्या आधारावर फरक असेल तर अशा वेगवेगळ्या आधारावर एककांना विविध स्तरात विभाजित केले जाते आणि त्या प्रत्येक स्तरातून एककाची निवड नमुन्यामध्ये केली जाते. अशाप्रकारे संभाव्यता नमुना निवड पद्धती विभिन्नस्तरातील एककांचा विचार करून त्यांचा नमुन्यामध्ये समावेश केला जातो. त्यामुळे नमुना हा प्रातिनिधिक स्वरूपाचा असतो.

**४. नमुन्याचा पर्याप्त आकार :** संभाव्यता नमून निवड पद्धतीमध्ये नमुना हा समग्रचा प्रतिनिधिक असावा म्हणून त्या नमुन्यांमध्ये किती एकक असावेत म्हणजेच त्या नमुन्याचा आकार किती असावा हे गणितीय पद्धतीने सांगितले जाते. नमुन्याचा आकार गणितीय सूत्राद्वारे निश्चित केला जातो. त्यामुळे नमुना हा प्रतिनिधी स्वरूपाचा असतो.

**५. विश्वसनीयता :** संभाव्यता नमुना पद्धतीत समग्रातील संपूर्ण एकाकाना नमुन्यात निवडण्याची संभाव्य असते. नमुन्याचा आकार गणितीय पद्धतीने ठरवला जातो. त्यामुळे संशोधन करताना आपल्या मतानुसार कोणत्याही एककाची नमुन्यात निवड करता येत नाही. त्यामुळे संभाव्यता नमुना पद्धतीने निवडलेला नमुना प्रतिनिधी असून त्या अध्ययनातून काढलेले निष्कर्ष हे अधिक विश्वासनीय असतात अशा प्रकारे नमुना विश्वसनीय असतो. तसेच निष्कर्ष देखील विश्वसनीय असतात.

**संभाव्यता नमुना निवडीचे प्रकार**

**१. साधा यादृच्छिक नमुना :** या नमुना पद्धतीमध्ये एककाची निवड करणे संशोधन करता किंवा कोणत्याही व्यक्तीच्या स्वाधीन नसते. संशोधन करता आपल्या इच्छेनुसार कोणत्याही एककाचा नमुन्यामध्ये समावेश करू शकत नाही. त्यामुळे समग्रातील प्रत्येक एककाला नमुन्यात समावेश होण्याची संधी असते म्हणून यादृच्छिक नमुना हा शब्द अशावेळी वापरला जातो की, जेव्हा समग्रांतील प्रत्येक व्यक्ती व तत्वांना निवडण्याची समान संधी प्राप्त होते. प्रत्येक एककाला नमन्यात समाविष्ट होण्याची संधी किती प्रमाणात आहे

हे गणितीय पद्धतीच्या आधारे ठरवले जाते. ही पद्धत वैज्ञानिक आहे म्हणून या पद्धतीत पक्षपात होण्याची शक्यता नसते. साधा यादृच्छिक नमुना निवडण्याच्या पुढील पद्धती आहे.

i) **लॉटरी पद्धती :** या पद्धतीमध्ये सर्वप्रथम एकूण संख्या असणाऱ्या एककाचे नाव आणि क्रमांक वेगवेगळ्या पेपर किंवा कार्डावर लिहिले जातात. त्या सर्व कागदाच्या घड्या पाडून एका मोठ्या भांड्यात किंवा पेटीत टाकतात. त्यानंतर सर्व चिठ्ठ्या एकत्र करून खालीवर करून एकत्र मिसळायला जातात. त्यानंतर डोळे बंद करून आवश्यक तेवढ्या चिट्ट्या काढल्या जातात आणि तेवढ्या एककांची नमुना म्हणून निवड केली जाते या पद्धतीत संपूर्ण एककांना नमुन्यात निवडून येण्याची समान संधी असते.

ii) **कार्ड किंवा तिकीट पद्धती :** नमुना निवडीच्या या पद्धतीत सर्वप्रथम एकाच आकार व चांगल्या रंगाच्या जाड कार्डावर किंवा तिकिटावर समग्रातील सर्व एककांचे नाव व क्रमांक लिहिले जातात. सर्व काड्र्स मिसळून एका गोलड्रमात टाकतात. त्या ड्रमाला पन्नास वेळा हलवून ती कार्ड एकमेकात मिसळून देतात. त्यानंतर त्यातून एक कार्ड काढले जाते त्यावर नाव व क्रमांक लिहिलेल्या एककाची नमुना म्हणून निवड केली जाऊन त्याचेच संबंधित विषयाच्या संदर्भात अध्ययन केले जाते. लॉटरी पद्धत आणि कार्ड पद्धती यामध्ये इतकाच फरक आहे की, लॉटरी पद्धतीत संशोधन करता डोळे बंद करून स्वतः चिठ्ठ्या किंवा कार्ड काढतो तर कार्ड पद्धती दुसरा व्यक्ती डोळे बंद न करता कार्ड काढतो.

iii) **ग्रीड पद्धती :** या पद्धतीचा वापर हा प्रामुख्याने क्षेत्रीय निवडी करता केला जातो. कोणत्याही विशाल भौगोलिक क्षेत्रामध्ये काही विविध क्षेत्राची नमुना निवड म्हणून निवड करण्यासाठी ग्रेड पद्धत अतिशय उपयुक्त आहे. या पद्धतीत सर्वप्रथम त्या विशाल क्षेत्राचा नकाशा तयार केला जातो आणि कुठून मिळवला जातो. किती एकक निवडायचे हे निश्चित ठरवले जाते त्या नकाशावर ग्रीड प्लेट ठेवली जाते ही प्लेट सेल्युलाईड किंवा इतर पारदर्शक पदार्थापासून बनलेली असते. या प्लेटमध्ये खूना असून त्यावर क्रमांक दिलेले असतात. मटका नमुना घ्यायचा असतो तितकेच क्रमांक त्या प्लेटवर लिहिले जातात. नकाशाच्या भागावर निर्धारित क्रमांकाचे वर्ग येतात त्यावर खून करतात आणि त्या क्षेत्राची नमुना म्हणून निवड केली जाते.

**नियमित अंकन पद्धती :** ज्या वेळी समग्राचे सर्व एकक हे काळ, स्थान इत्यादी आधारावर व्यवस्थित असतात. तेव्हा नियमित अंकन पद्धतीद्वारे नमुन्याची निवड केली जाते. या पद्धतीमध्ये सर्वप्रथम समग्रच्या सर्व एककांचे क्रमवार संख्या लिहून एक सूची बनवण्यात येते. हे निश्चित केले जाते की, त्या एकेकांमधून आपणास किती एककांची नमुना निवड करायची आहे. त्यानंतर ती सूची समोर ठेवून त्या सूचित प्रत्येक पाचवी किंवा दहावी किंवा अन्य कोणतीही संख्या घेऊन नमुना निवड केली जाते. संख्या निवडण्याची सुरुवात कोणत्याही संख्येपासून करता येते. समजा ६०० उत्तरदात्यामधून शंभरउत्तरदाते निवडायचे आहेत त्यासाठी ६०० उत्तरदात्याची सूची तयार करावी लागते आणि त्यामधून १०० उत्तरदाते निवडायचे आहेत. त्यासाठी ६०० उत्तरदात्यांची एक सूची तयार करावी ६०० मधून१०० उत्तरदात्यांची निवड करायची आहे

म्हणून प्रत्येक सहाव्या उत्तरदात्याची निवड करावी लागेल. सूचीतील कोणत्याही संख्येपासून सुरुवात करता येईल. उदा.३,९,१५,२१,२९,३३,३९ या नियमित क्रमाने ५० उत्तरदात्यांची निवड करता येईल.

**अनियमित अंकन् पद्धती:**

या पद्धतीमध्ये देखील समग्रहातील संपूर्ण एकाची सूची बनवली जाते आणि त्या सूची मधून पहिला अंक आणि शेवटचा अंक सोडून बाकी अंगावर संशोधन करता अनियमित पद्धतीने जेवढा नमुना ठरवला असेल, तितक्या खुणा करतो. यामध्ये संशोधनकर्त्याकडून ही अपेक्षा केली जाते की, त्यात कोणताही पक्षपात न करता अनियमित पद्धतीने नमुन्याची निवड करावी.

**टीप्पेट पद्धती :** प्रोफेसर टीप्पेट यांनीही पद्धती १९२७ मध्ये गणिती पद्धतीच्या आधारावर तयार केली. त्यांनी चार अंकी १०४० संख्यांची एक सूची तयार केली होती. त्या संख्यांना यादृच्छिक निवड पद्धतीमध्ये उपयोग करण्याच्या उद्देशाने निश्चित केले गेले. या संख्या क्रमांकाशिवाय अनेक पानावर लिहिल्या आहेत. जेव्हा कोणत्या संशोधन करताना आपल्या अध्ययना करता नमुना निवडायचा असेल तेव्हा तो प्रो टीप्पेट द्वारे बनवलेल्या गेलेल्या सूचीच्या कोणत्याही पानावर एकानंतर एक तितकीच संख्या घेतो, जितक्या संख्येचा नमुना आहे. मधली कोणतीही संख्या सोडता कामा नये. त्यांनी दिलेल्या अंकामधील पहिल्या २० संख्या पुढील प्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| २९५२ | ६६४१ | ३३९२ | ९७९२ |
| ४१६७ | ९५२४ | १५४५ | १३९६ |
| २३७० | ७४८३ | ३४०८ | २७६२ |
| ०५६० | ५२४६ | ११११२ | ६१०७ |
| २७५४ | ९१४३ | १४०५ | ९०२५ |

या पद्धतीद्वारे नमुना निवड कशी केली जाते पुढील उदाहरणाद्वारे करता येईल. जर १०० उत्तरदात्यांच्या समग्रहातून १० उत्तरदात्यांना नमुन्यामध्ये निवडण्यापूर्वी प्रथम संपूर्ण समग्राच्या सर्व एककांना कोणत्याही क्रमाने व्यवस्थित करून त्याची एक सूची तयार केली जाते. त्यानंतर टीप्पेटच्या सूचीच्या कोणत्याही स्थानावरून सतत १० संख्या घेऊन त्या क्रमांकाच्या उत्तरदात्यांची नमुना निवड केली जाते .१० उत्तरदात्यांचा नमुना टीप्पेटच्या वरील संख्याच्या आधारावर निवडला तर तो अशा प्रकारचा राहील ५२,६७,७०,५४,४१,२४,८३,४६, आणि ४३ उत्तरदात्यांच्या समग्राच्या सूचीतील ज्या ज्या एककाची संख्या ५२,६७,६०,७० इत्यादी असेल त्याच १० एककांना नमुन्यामध्ये निवडले जाते.

**कोटा नमुना:** या पद्धतीमध्ये सर्वप्रथम समग्राला वेगवेगळ्या वर्गात विभाजित केले जाते. प्रत्येक वर्गामधून किती एक निवडायचे आहे हे निश्चित करूनच नंतर प्रत्येक वर्गांमधून संशोधन करता तितकेच एकक आपल्या इच्छेनुसार निवडतो. अशाप्रकारे निवडल्या गेलेल्या एककांना नमुना मानले जाते. या

पद्धतीमध्ये एककांना निवडण्याचे स्वातंत्र्य संशोधन कर्त्याला दिले जाते. त्यामुळे यात पक्षपात होण्याची शक्यता असते.

**यादृच्छिक नमुना पद्धतीचे गुण:**

यादृच्छिक नमुना पद्धतीचे गुण पुढील प्रमाणे

**१. निष्पक्षता :** यादृच्छिक नमुना पद्धतीमध्ये एककांची निवड निष्पक्षपणे केली जाते. या पद्धतीत कोणत्याही प्रकारचा पक्षपात करणे शक्य नसते. प्रत्येक एककाने नमुन्यामध्ये निवडण्याची सारखी संभाव्यता असते.

**२. प्रतिनिधित्व :** प्रत्येक एककाना नमुन्यात निवडून येण्याची सारखी संधी असते. त्यामुळे या पद्धतीत निवडलेला नमुना हा प्रातिनिधिक स्वरूपाचा असतो.

**३. सोपी पद्धत :** नमुना निवडण्याची ही सर्वात सोपी पद्धत आहे. यामध्ये कोणतीही जटिल प्रक्रिया असते किंवा कोणत्याही गुड नियमांचे पालन करण्याची आवशद्यकता नसते.

**४. मित्व्यता :** या पद्धतीत एककांची संख्या कमी असल्यामुळे कमी वेळ, कमी श्रम आणि कमी खर्चात यथार्थ नमुना निवडता येतो. ही पद्धत इतर पद्धतीच्या तुलनेत कमी खर्चाची आहे.

**५. योग्य मूल्यांकन :** ही पद्धत संभाव्यता सिद्धांतावर आधारित आहे त्यामुळे मध्याचे मानक विचलन सुलभपणे काढता येते.

**यादृच्छिक नमुना पद्धतीचे दोष**

यादृच्छिक नमुना हा प्रतिनिधी व निपक्ष असतो या नमुन्या पद्धतीचे गुण न करता येत नाहीत. असे असले तरी या पद्धतीचे दोष किंवा मर्यादा आहेत.

**१. सूची तयार करणे कठीण :** यादृच्छिक नमुना पद्धतीने सर्वप्रथम समग्रच्या संपूर्ण एककांची सूची तयार करावी लागते. या संपूर्ण एककांची सहज सूची उपलब्ध असते असे नाही. सूची उपलब्ध नसल्यास संशोधकाला सूची तयार करावी लागते. जेव्हा समग्र हे फार मोठे असते तेव्हा सुची तयार करणे सोपे नाही.

**२. संपर्क प्रस्थापित करणे कठीण :** या पद्धतीत नमुन्याची निवड करताना संशोधन करण्याचे कोणतेच नियंत्रण नसते. नमुन्यात निवड झालेले काही एकच खूप दूर असतील तर आणि त्यांच्याशी संपर्क करणे कठीण असते अशा परिस्थितीत संशोधनकर्त्याकडून पक्षपात होण्याची शक्यता असते.

**३. सजातीयता अभाव :** समग्रातील सर्व एकक हे समान असतीलच असे नाही. त्यांच्यात एकरुपतेचा अभाव असतो. त्यामुळे यादृच्छिक निवड पद्धतीद्वारे प्रतिनिधी एकक निवडण्याची शक्यता कमी असते. अशावेळी ही पद्धत उपयुक्त नसते.

**यादृच्छिक नमुना पद्धतीत घ्यावी लागणारी दक्षता**

या पद्धतीद्वारे नमुना निवडताना संशोधन करताना पुढील प्रकारची सावधगिरी अथवा दक्षता घावी लागते.

i) नमुना निवडण्यापूर्वी समग्राची निश्चिती योग्य प्रकारे करून घेतली पाहिजे. संपूर्ण एककांची संपूर्ण सूची तयार करावी.

ii) नमुने देणारे एकक स्वतंत्र असले पाहिजे. एक दुसऱ्यावर अध्ययन करता अवलंबून नसले पाहिजे.

iii) एकच असे असले पाहिजेत की ज्यांच्याशी संपर्क स्थापन करता येऊ शकेल एकदा निवडलेले एकक नंतर बदलता येऊ नये.

**२. स्तरित यादृच्छिक नमुना:**

या प्रकारच्या पद्धतीमध्ये संशोधन करता सर्वप्रथम समग्राच्या सर्व वैशिष्ट्य संदर्भात प्राथमिक माहिती मिळवतो. या माहितीच्या आधारावर तो समग्रांना शिक्षणाचा स्तर, उत्पन्न सामाजिक वर्ग, धर्म, लिंग इत्यादी आधारावर काही वर्गात किंवा नमुन्यात विभाजित करतो. याचाच अर्थ समान वैशिष्ट्ये किंवा गुणाच्या आधारे समग्राच्या एककांना विविध उपविभाग किंवा वर्गात विभाजित करून समग्रात एकरूपता आणण्याचा प्रयत्न केला जातो. समग्राची वैशिष्ट्ये तसेच संशोधनाची समस्या लक्षात घेऊन संशोधन कार्य सहजतेने कोणत्या आधारावर आणि किती वर्गात समग्राचे विभाजन करावे हे ठरावित असतो. अशाप्रकारे समग्राला वेगवेगळ्या वर्गात विभाजित केल्यानंतर यादृच्छिक नमुना निवड पद्धतीच्या सहाय्याने प्रत्येक वर्गातून योग्य त्या संकेत नमुना निवडला प्रत्येक वर्गातून असा नमुना निवडत असताना संशोधन करताना एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, त्याने शक्यतोवर प्रत्येक वर्गातूनतितकेच एकक निवडावे, ज्या प्रमाणात वर्गातील एकक समग्रात आहेत. या पद्धतीत समग्राचे वेगवेगळ्या स्थरात विभाजन केले जाते. म्हणूनच या पद्धतीला स्तरित यादृच्छिक नमुना निवड असे म्हणतात.

उदा. एका समग्रात १२० शिक्षक, ४० वकील, २० डॉक्टर, ६० प्राध्यापक आणि ५० अधिकारी आहेत. जर आपणास प्रत्येक वर्गातून १० टक्के नमुना निवडायचा असेल तर यादृच्छिक नमुना निवड पद्धतीच्या सहाय्याने १२ शिक्षक, ४ वकील, २ डॉक्टर, ६ प्राध्यापक आणि, ५ अधिकारी निवडावे लागतील.

स्तरीत नमुना निवड तीन प्रकार आहेत.

i) **प्रमाणबद्ध स्तरित नमुना**

ज्या प्रमाणात प्रत्येक वर्गाच्या एककाचे प्रमाण समग्रांत असते. त्याच प्रमाणात त्या प्रत्येक वर्गातून एक नमुन्यांमध्ये निवडले म्हणून या प्रकारास प्रमाणबद्ध स्तरित नमुना असे म्हणतात. प्रत्येक वर्गातील एककांच्या प्रमाणातच नमुन्यात एकक निवडले जात असल्यामुळे प्रत्येक वर्गाला सारख्या प्रमाणात नमुन्यात प्रतिनिधित्व मिळते. हा नमुना खऱ्या अर्थाने समग्राचे लघुरूप आहे असे म्हणणे अनुचित ठरणार नाही.

ii) **अप्रमाणबद्ध स्तरित नमुना**

या प्रकारात प्रत्येक वर्गातून समान संख्येत एककाची निवड केली जाते. समग्रात कोणत्या वर्गाची किती एककांची संख्या आहे याचा विचार केला जात नाही.समग्रात एखाद्या वर्गातील एककांच्या संख्येचा विचारन करता सर्व वर्गातून समान एकक नमुन्यात घेतली जातात. परंतु त्यामुळे समग्रातील प्रत्येक वर्गाला त्याच्या प्रमाणात नमुन्यात प्रतिनिधित्व मिळत नाही. म्हणून या नमुना प्रकारास अप्रमाणबद्ध स्तरित नमुना असे म्हणतात.

iii) **भारयुक्त स्तरित यादृच्छिक नमुना**

दोन प्रकाराची एक मिश्रितरूप म्हणजे भारयुक्त स्तरित नमुना होय. या प्रकारात प्रत्येक वर्गातून समान संख्येततून एकक निवडले जातात. परंतु नंतर अधिक संख्या असलेल्या वर्गातील एककांना अधिक भार प्रदान केला जातो. ज्या प्रमाणात वर्गाच्या एककांची समग्रात संख्या असेल त्याच प्रमाणात हा भार वाढविला जातो.

**स्तरित यादृच्छिक नमुना पद्धतीचे गुण**

१. या प्रकारात समग्राच्या प्रत्येक वर्गाच्या एककांना नमुन्यात स्थान प्राप्त होते आणि कोणत्याही महत्वपूर्ण वर्गाकडे दुर्लक्ष होण्याची शक्यता असते.

२. या प्रकारात विभिन्न वर्गाचे थोडे काळजीपूर्वक विभाजन केले तर भिन्न, भिन्न वर्गात मधून थोडे थोडे एकक निवडल्यामुळे हा नमुना समगग्रांचा प्रतिनिधी नमुना ठरतो.

३. यामध्ये आवश्यकता पडल्यास एककाच्या जागी दुसऱ्या एकाची निवड करण्याची सोय असते. समजा नमुन्यात निवडलेले एखाद्यां एकाकांशी संपर्क साधने कठीण असेल तर त्या ऐवजी दुसरा एकक घेतला जातो.

४. वर्गाचे विभाजन भौगोलिक आधारावर देखील होऊ शकते. क्षेत्रीय आधारावर वर्गीकरण केल्यामुळे वेळ आणि पैशाची बचत होते. तसेच एककाशी संपर्क साधने कठीण असेल तर त्याऐवजी दुसरा एक घेतला जातो.

**स्तरित यादृच्छिक नमुना पद्धतीचे दोष**

i) जर विभाजन योग्य प्रकारे केले नाही तर नमुना निवडीत पक्षपात होण्याची शक्यता असते. त्याचप्रमाणे निवडलेल्या नमुन्यात कोणत्या विशिष्ट वर्गातील एककांना अधिक प्रमाणात किंवा कमी प्रमाणात घेतले जाते. त्यामुळे नमुना प्रतिनिधी राहू शकत नाही.

ii) जर वेगवेगळ्या वर्गाच्या आकारात अधिक जास्त अंतर असेल तर सारख्या प्रमाणात एककांची निवड करणे कठीण आहे. एककाची निवड समप्रमाणात झाली नाही तर नमुना हा प्रतिनिधीक स्वरूपात राहणार नाही.

iii) वर्गातील एककांची निवड अप्रमाणबद्ध आधारावर करण्यात आली नंतर अधिक एकक असलेल्या वर्गातील एककांना जास्त भार दिला जातो. अशावेळी संशोधनकर्त्याकडून पक्षपात होण्याची शक्यता असते.

iv) ज्या एककामध्ये मिश्रित गुण आहेत अशा एककांचा कोणत्या वर्गात समावेश करावा याबाबत निश्चित निर्णय घेणे कठीण असते.

**३. व्यवस्थाबद्ध नमुना निवड**

ही नमुना निवडण्याची एक सोपी पद्धत आहे. या पद्धतीत सर्वप्रथम समग्राची विशिष्ट क्रमानुसार एक सूची तयार केली जाते आणि त्या सूचीमधून नियमित अंतरानंतरच्या एकाकाला निवडले जाते. समजा १५०० एकाकाचे समग्र आहे. या समग्रांतून आपणास १०० एककांचा नमुना निवडायचा असेल तर समग्रच्या सूची मधून प्रत्येक पंधराव्या एककाला निवडले जाते. १५०० ला १०० ने भाग दिल्यास भागाकार १५ येतो म्हणजे प्रत्येक १५ संख्येनंतरच्या एककाचा नमुन्यात समावेश केला जातो. पहिली संख्या निवडण्यासाठी आपण यादृच्छिक पद्धतीचा उपयोग करू शकतो. समजा यादृश्चिक पद्धतीने नुसार पहिली संख्या ही पाच असेल तर नमुन्यात निवडल्या जाणाऱ्या एककांची सुरुवात सूचीतील ५व्या एकका पासून होईल. ५, २०, ३५, ५०, ६५, ८० इत्यादी. अशाप्रकारे १०० एकक निवडल्या जाईल. सूचना देशा संख्या असणाऱ्या एककाच्या नमुन्यात समावेश केला जातो. ज्यावेळी समग्राची असते किंवा आपणास मोठा नमुना घ्यायचा असेल तर अशावेळी व्यवस्थापन नमुना पद्धती ही अतिशय सोपी आणि उपयुक्त अशी पद्धत आहे.

**४. बहुस्तरीय, बहुपदी किंवा एक पुंज नमुना निवड**

ज्यावेळी विस्तीर्ण प्रदेशात विखुरलेल्या विशाल लोकसंख्येतून साधा किंवा स्तरीत यादृच्छिक नमुना निवडण्याचे कठीण आणि खर्चाच्या असते तेव्हा या पद्धतीचा उपयोग केला जातो. सर्वप्रथम समग्राचे अनेक समूहामध्ये विभाजन केले जाते. त्यानंतर त्यामधील एक नमुन्यात निवडून त्याचे अध्ययन केले जाते. यालाच बहुपदी किंवा एकूण नमुना असे म्हणतात. जर एखाद्या राज्यात १५० निवडणूक क्षेत्र असतील तर त्यामधून केवळ २० निवडणूक क्षेत्र घेतल्या जाईल आणि त्या २० निवडणूक क्षेत्रातील मतदात्यांचे अध्ययन केले जाईल. या पद्धतीचे वैशिष्ट्य म्हणजे नमुनाची निवड करताना संशोधनकर्त्यास वेगवेगळ्या पद किंवा पायऱ्या मधून जावे लागते. त्यामुळेच या पद्धतीस बहुत स्तरीय किंवा बहुपदी नमुना असे म्हणतात.

**बव्हव्यवस्थिय नमुना निवड**

अनेकदा काही एककांना काही प्रश्न विस्तार पूर्वक विचारले जातात. उरलेली माहिती नमुन्यातील इतर एककाकडून संकलित करण्यात येते. संशोधनाच्या दृष्टीने संशोधन विषयाच्या नमुन्यातील काही एककाकडून सखोल माहिती मिळवणे आवश्यक असते. या माहितीमुळे संशोधन विषयाच्या दृष्टीने काही मूलभूत तथ्ये प्राप्त केली जातात. त्या माहिती व तथ्याची वस्तुनिष्ठता नमुन्यातील इतर एककाकडून मिळणाऱ्या माहितीशी

तपासून बघता येते. त्यामुळे निवडण्यात आलेला नमुना हा प्राथमिक स्वरूपाचा आहे किंवा नाही याचे परीक्षण करणे सहज शक्य होते.

**संभाव्यता नमुना निवड पद्धतीचे गुण दोष**

**१. वैज्ञानिक पद्धती :** संभाव्यता नमुना पद्धती ही वैज्ञानिक स्वरूपाची आहे. नमुन्याचा आकार, समग्रातील प्रत्येक एककांचा नमुन्यात समावेश होण्याची शक्यता, संशोधनातील विश्वसनीयतीतेची पातळी, अचूकतेचे प्रमाण इत्यादी बाबत सांख्यिकीय पद्धतीने निश्चित माहिती या नमुन्यात देणे शक्य आहे.

**२. वस्तुनिष्ठ निष्कर्ष :** या पद्धतीत समग्रतील सर्व एककांना नमुन्यामध्ये निवडण्याची समान संधी असते. नमन्याची निवड वस्तुनिष्ठ असल्यामुळे नमुन्याच्या आधारे काढलेले निष्कर्ष देखील वस्तुनिष्ठ असतात.

**३. पूर्वग्रह नसतो :** या पद्धतीद्वारे नमुना निवडताना कोणताही प्रकारचा पूर्वग्रह किंवा पक्षपात करणे शक्य नसते ही पद्धत इतकी वस्तुनिष्ठ आहे की, अशा गोष्टीना या पद्धतीत कोणतेच स्थान नसते.

**दोष :**

**१. समग्राचे ज्ञान :** संभाव्यता नमुना पद्धतीद्वारे नमुन्याची निवड करायची असल्यास संशोधन करताना आपल्या संशोधनाच्या समग्रांचे विस्तृत ज्ञान असणे आवश्यक आहे. कारण त्याशिवाय या पद्धतीचा उपयोग करू शकत नाही.

**२. संपर्क करणे कठीण :** संभाव्यता नमुना निवड पद्धतीने नमुनेची निवड केली असली तरी भौगोलिक दृष्ट्या दूर अंतरावर असलेल्या नमुन्यातील एकमेकांशी संपर्क साधणे कठीण असते.

**३. वेळ, श्रम व पैशाचा अपव्य :** समग्रातील संपूर्ण एककाची सूची करणे, तसेच नमुन्यात निवडलेल्या सर्व एकाकांसी संपर्क साधने या सर्व गोष्टी संशोधन करताना वेळ,श्रम,पैशाच्या दृष्टीने परवडणाऱ्या नसतात. अनेकदा तर संशोधनकर्त्याचा वेळ, श्रम पैशाचा अपव्य होतो.

### ४.२.३ गैरसंभाव्यता नमुना निवड:(उपलब्ध विषयानुसार)

### सहेतुक नमुना निवड किंवा निर्णयात्मक नमुना, स्नोबॉल नमुना निवड, आणि कोटा नमुना निवड.

संभाव्यता नमुना निवडीच्या पद्धतीची वैशिष्ट्ये गुण आणि मर्यादा लक्षात घेतल्यानंतर आपण गैरसमभाव्यता नमुना निवडीच्या वैशिष्ट्यांची आणि मर्यादांची चर्चा करणार आहोत.

**नमुन्याची प्रातिनिधिकता**

गैरसंभाव्यता नमुना निवड पद्धतीमध्ये नमुन्याची प्रतिनिधीकता कमी आढळते. नमुनेचा आकार संशोधकाच्या इच्छेनुसार ठरतो व तो लहान असण्याची अधिक शक्यता असते. त्यामुळे तो नमुना समग्राचा प्रतिनिधी असण्याची शक्यता कमी असते.

**पक्षपातीपणा**

नमुन्यातील एककांची निवड करताना संशोधक पक्षपात करण्याची शक्यता अधिक असते. परिणामात संशोधन समस्या संबंधी निष्कर्ष वस्तूनिष्ठ व प्रामाणिक राहू शकत नाही.

**असंतुलित नमुना**

समग्रातील सर्व प्रकारच्या एककांचा समावेश नमुन्यातच होईल असे नाही. त्यामुळे नमुना संतुलित स्वरूपात आहे असे म्हणता येत नाही.

**एककाची निवड करण्याचे स्वातंत्र्य**

समग्रातून नमुन्यात समाविष्ट होण्याच्या प्रक्रियेत संशोधक पूर्णता स्वतंत्र असल्याने ही पद्धत शास्त्रीय स्वरूपाची आहे असे म्हणता येत नाही.

**नमुन्याचा आकार**

गैरसंभाव्यता नमुना निवड पद्धतीद्वारे नमुना निवडताना नमुन्याचा आकार कोणता राहील याबाबत कोणतेही शास्त्रीय सूत्र नाही. नमुनेचा आकार सर्वस्वी संशोधकाच्या इच्छेवर अवलंबून असतो. ज्यावेळी समग्रहातील सर्व एककांची नमुन्यामध्ये निवड होण्याची शक्यता किंवा संभाव्यता कमी असते. तेव्हा त्या पद्धतीत गैरसंभाव्यता नमुना निवड पद्धती असे म्हणतात. ही पद्धत संभाव्यता निवड पद्धतीच्या अगदी उलट आहे. या पद्धतीत संशोधन करता आपल्या इच्छेनुसार नमुना निवडत असतो. त्याच्यावर कोणाचेही नियंत्रण नसते. अनेकदा संशोधकाला संशोधनाच्या समग्रातील एककांची पूर्ण माहिती नसल्यामुळे त्या एककाची संभाव्यता नमुना निवड पद्धतीने नमुना म्हणून निवड करणे अशक्य असते. अशावेळी ही पद्धत अतिशय उपयुक्त आहे. ज्या संभाव्यता नमुना पद्धतीची काही प्रकार आहेत त्यांची चर्चा करू.

**गैरसंभाव्यता नमुना निवडीचे प्रकार**

**१. सोयीस्कर किंवा सुविधा जनक नमुना**

या नमुना पद्धतीमध्ये संशोधन करता आपल्या सोयीनुसार नमुनेची निवड करतो. संशोधन करताना नमुन्यासाठी किती एककांच्या आवश्यकता आहे हे लक्षात घेऊन नमुनेची संख्या निश्चित केली जाते आणि त्यानुसार संशोधन करता आपल्या सोयीनुसार नमुना निवडतो. नमुनेची निवड ही वेळ, पैसा, एककांशी संपर्क, साधन सूची किंवा उद्गमसूची उपलब्ध इत्यादीवर अवलंबून असते. या पद्धतीत नमुना निवडताना पक्षपात होण्याची शक्यता अधिक असते. कारण नमुना निवडण्याची पूर्ण स्वातंत्र्य संशोधनकर्त्याला दिले असते. या पद्धतीत नमुना निवडताना पक्षपात होण्याची शक्यता अधिक असते. ज्याच्यावर कोणत्याही प्रकारचे बंधन नसते म्हणून ही पद्धत अवैज्ञानिक आहे. ही पद्धत अवैज्ञानिक असली तरीही संशोधनात ही पद्धत अतिशय उपयुक्त असते. जेव्हा संशोधकाला समग्रांतील संपूर्ण एककांची माहिती नसते तसेच ज्या

एककांची माहिती आहे त्यांच्याशी संपर्क स्थापन करणे अशक्य असते. अशावेळी श्रम आणि पैसा या गोष्टीचा विचार करून संशोधन करता सोयीस्कर नमुना निवड पद्धतीचा अवलंब करतो.

## २. सहेतुक किंवा उद्देश पूर्ण नमुना

जेव्हा संशोधन करता एखादे विशिष्ट उद्देश समोर ठेवून जाणीवपूर्वक समग्रातील काही एककांची निवड करतो तेव्हा त्या नमुन्यास सहेतुक किंवा उद्देश पूर्ण नमुना असे म्हणतात. या प्रकारच्या नमुना निवडीचा मुख्य आधार म्हणजे संशोधन करता हा समग्रातील सर्व एककांच्या गुणवैशिष्ट्ये यांची माहिती प्राप्त करतो. त्यानंतर तो नमुन्याची निवड करतो. संशोधनकर्ता आपल्या उद्देशानुसार संपूर्ण समग्रातून प्रातिनिधिक स्वरूपाच्या एककाची निवड करतो. अशाप्रकारे अध्ययनाच्या उद्देशाने लक्षात ठेवून संशोधनकरता त्या उद्देशाची पूर्ती करण्यासाठी उपयुक्त एककाची निवड करतो. सहेतुक किंवा उद्देशपूर्ण नमुन्याची पुढील वैशिष्ट्ये आहेत.

i) संशोधनकरत्याला सर्व एककांचे आणि त्यांच्या वैशिष्ट्याचे ज्ञान असते. त्यामुळे कोणत्या एककाची निवड केल्यास संशोधनाचा उद्देश पूर्ण होईल याची त्याला पूर्ण माहिती असते.

ii) संशोधन करता कोणते तरी विशिष्ट उद्देश समोर ठेवूनच नमुन्याची निवड करतो.

iii) या पद्धतीमध्ये संशोधन करता आपल्या इच्छेनुसार नमुनेची निवड करतो त्यामुळे पक्षपात होण्याची शक्यता अधिक असते.

## ३. कोटा नमुना

या पद्धतीमध्ये सर्वप्रथम संशोधनकर्त्याला समस्येच्या ज्या वैशिष्ट्यांचे अध्ययन करायचे असेल, त्या वैशिष्ट्यांच्या संबंधात किंवा त्या वैशिष्ट्याच्या दृष्टीने जे महत्वपूर्ण वाटतात अशा गुणधर्माच्या आधारे समग्राचे वेगवेगळे गट पाडले जातात. प्रत्येक वर्गात एककांचे किती प्रमाण राहील हे त्या वर्गाच्या एककाचे समग्रात असलेल्या प्रमाणावरून ठरवले जाते. प्रत्येक निरीक्षणास किंवा मुलाखतदारास उत्तरदात्याचा निश्चित संख्येचा कोटा दिला जातो. कोटानमुना निवड पद्धतीचा उपयोग व्यापारी क्षेत्रात किंवा सार्वजनिक निवडणुकीमध्ये मतदानावरील अध्ययनाच्या संदर्भात केला जातो. समग्रांबाबत काही सामान्य विधाने किंवा निष्कर्ष आपणास मांडायचे आहे. त्या समग्राचे प्रतिरूप ठरेल असा नमुना निवडणे हे कोटा नमुना निवड पद्धतीचे मुख्य उद्दिष्ट आहे.

## गैरसंभाव्यता नमुना निवड पद्धतीचे गुण आणि दोष

### गुण

**१. उपयुक्त पद्धती :** सर्वच विषयाच्या संदर्भात संभाव्यता नमुना निवड पद्धतीने एककाची निवड करणे शक्य नसते. अशावेळी गैरसंभाव्यता नमुना निवड पद्धत अतिशय उपयुक्त आहे. अनवेशनात्मक किंवा

परिचयात्मक अध्ययनात गृहीतकृत्याच्या मांडणी करता कामचलाऊ विधान शोधण्यासाठी ही नमुना निवड पद्धत उपयुक्त आहे.

**२. पूर्व ज्ञानाची आवश्यकता नसते :** संभाव्यता नमुना निवड पद्धतीतील समग्रातील संपूर्ण एककांची सूची तयार करावी लागते किंवा उपलब्ध असलेल्या सूचीचा शोध घ्यावा लागतो. म्हणून समग्राचे ज्ञान संशोधनकर्त्याला असणे आवश्यक असते. परंतु गैरसंभाव्यता नमुना निवड पद्धतीत समग्रा विषयीचे विस्तृत असे पूर्वज्ञान असण्याची आवश्यकता नाही.

**३. सोयीची पद्धत :** गैरसंभाव्यता पद्धत ही संशोधनकर्त्याला वेळ, श्रम आणि पैशाच्या दृष्टीने विशेष सोयीची आहे. संशोधनकरता आपल्या सोयीनुसार एककाची निवड करतो आपल्या सोयीनुसार एककाची निवड करतो.

**दोष** Demerit :

**१. प्रातीनिधिकतेचा अभाव :** गैरसंभाव्यता नमुना निवड पद्धतीद्वारे निवडलेला नमुना समग्राचा प्रतिनिधी राहीलच याची खात्री नसते. समग्रातील प्रत्येक एक कला नमुन्यात निवडण्याची शक्यता नसते.

**२. पूर्वग्रहदूषित :** संशोधनकर्ता स्वतःच्या इच्छेनुसार पाहिजे त्या एककाची निवड करतो. त्याच्यावर कोणतेही नियंत्रण नसते. त्यामुळे संशोधनकर्ता पूर्वग्रहदूषित दृष्टिकोन ठेवून एककाची निवड करू शकतो. अशा पूर्वग्रह दूषित नमुन्याच्या अध्ययनाचे निष्कर्ष हे वस्तुनिष्ठ राहू शकत नाही.

**३. अवैज्ञानिक पद्धती :** गैरसंभव्याता नमुना निवड पद्धत ही संशोधनाच्या दृष्टीने अवैज्ञानिक पद्धत आहे. ही गोष्ट न करता येत नाही. जी गोष्ट वैज्ञानिक आहे.त्या गोष्टीचा उपयोग वैज्ञानिक अध्ययनात करता येणार नाही.

**नमुना निवडीच्या समस्या नमुना निवडीच्या समस्या:**

नमुना निवड पद्धतीच्या संदर्भात आपण सविस्तर विचार केला आहे त्यानंतर नमुना निवडीच्या काही प्रमुख समस्यांचा विचार करणार आहोत. नमुनेच्या आकाराची समस्या पक्षपात पूर्ण नमुन्याची समस्या, विश्वसनीयता परीक्षणाची समस्या इत्यादी काही नमुना निवडीच्या समस्या आहेत.

**१. नमुन्याच्या आकाराची समस्या**

नमुना निवड पद्धतीमध्ये सर्वात महत्त्वाची समस्या ही नमुन्याच्या आकाराची आहे. नमुना तंत्रामध्ये नमुन्याच्या आकारास विशेष महत्त्व आहे. कारण नमुन्याच्या आकारासोबत शुद्धता, वेळ, संघटन, पैसा या गोष्टींचा सरळ संबंध असतो. जर नमुन्याचा आकार हा खूपच लहान असेल तर नमुना हा प्रातिनिधिक स्वरूपाचा आहे किंवा नाही याबाबत शंका निर्माण होते. वेळ, श्रम, पैसा आणि संघटनेच्या दृष्टीने कोणती समस्या राहणार नाही असा नमुनाचा आकार असावा. त्याचप्रमाणे नमुना हा विश्वसनीय आणि प्रातिनिधिक राहील असाच त्याचा आकार असला पाहिजे. त्यामुळे नमन्याचा आकार निश्चित करणे सोपे कार्य नाही

कारण नमुनेच्या आकारास प्रभावित करणारे एकापेक्षा जास्त घटक आहेत. नमुन्याच्या आकारास प्रभावित करणारी घटक पुढीलप्रमाणे.

i) **समग्राचे स्वरूप :** जर समग्रच्या एककामध्ये पुरेषा प्रमाणात एकरूपता असेल तर लहान आकाराचा नमुना देखील प्रातिनिधिक आणि विश्वसनीय असू शकतो. परंतु जर एक काम मध्ये अनेक भिन्नता असतील तर नमुन्याचा आकार हा मोठा असला पाहिजे.

ii) **वर्गाची संख्या :** समग्रात विविध प्रकारच्या वर्गाचा समावेश होतो आणि त्यामध्ये अनेक भिन्नता असेल तर नमुन्याचा आकार मोठा ठेवावा लागतो. परंतु जर वर्गाची संख्या कमी आहे आणि एककामध्ये एकरूपता आहे. तर अशावेळी लहान नमुना असल्यास हरकत नाही.

iii) **संशोधनाचे स्वरूप :** विभिन्न एककांचे अधिक काळपर्यंत सखोल अध्ययन करणे असे संशोधनाचे स्वरूप असेल तर नमुन्याचा आकार हा लहान असला पाहिजे. कारण त्यामुळे वेळ, श्रम, संघटन, पैसा इत्यादी गोष्टींची समस्या निर्माण होणार नाही. याउलट विस्तृत अध्ययन करणे हा संशोधनाचा उद्देश असेल तर नमुन्याचा आकार मोठा ठेवला जाईल.

iv) **साधनांची उपलब्धता :** नमुन्याचा आकार हा साधनांच्या उपलब्धतेवर देखील अवलंबून असतो. साधने, वेळ, प्रशिक्षित कार्यकर्त्यांची संख्या इत्यादी गोष्टी लक्षात घेऊन नमुन्याचा आकार ठरवला जातो. जर साधनांची कमतरता असेल तर लहान आकाराचा नमुना योग्य राहील.

v) **शुद्धतेची मात्रा :** नमुनेचा आकार जितका मोठा असेल तितक्या प्रमाणात निष्कर्ष शुद्ध असतात. अशी काही लोकांची मान्यता असते. परंतु ही मान्यता चुकीची आहे. योग्य पद्धतीच्या सहाय्याने सावधानपूर्वक निवडलेला लहान आकाराचा नमुना सुद्धा विश्वसनीय राहू शकतो. तरी देखील नमुनेचा आकार हा खूप लहान किंवा खूप मोठा देखील ठेवता कामा नये.

vi) **निवडलेले एककाचे स्वरूप :** जर एकत्र अत्याधिक प्रमाणात विखुरलेले असतील तर त्यांच्याशी संपर्क साधणे कठीण असते. तसेच आर्थिक दृष्ट्या अधिक खर्चाचे असते. अशा परिस्थितीत लहान नमुना घेणे योग्य असते. या विरुद्ध असलेल्या परिस्थितीत नवन्याचा आकार मोठा असू शकतो.

vii) **प्रश्नावली व अनुसूचीचा प्रकार :** प्रश्नावली अनुसूचीचा प्रभाव आकारावर पडतो. प्रश्नावली किंवा अनुसूचित आकार जितका मोठा असेल तितकाच नमुन्याचा आकार हा लहान ठेवावा लागेल. कारण मोठी प्रश्नावली भरण्याकरता अधिक वेळ आणि श्रमाची आवश्यकता असते.

viii) **नमुना पद्धतीचा आकार :** नमुना निवड पद्धती देखील नमुन्याच्या आकाराला प्रभावित करते. जर यादृच्छिक नमुना निवड पद्धतीने नमुना निवडायचे असेल तर नमुन्याचा आकार मोठा ठेवणे योग्य राहील. याउलट स्तरीत यादृच्छिक नमुना पद्धतीत नमुन्याचा आकार लहान असू शकतो. नमुनेचा आकार निश्चित करताना सर्वप्रथम वरील सर्व घटनांच्या संदर्भात अतिशय सावधानपूर्वक विचार केला पाहिजे. Parrten या

संदर्भात यांची विधान मार्गदर्शन करणारे आहे. त्यांच्या मते, ''अनावश्यक खर्चाची बचत करण्यासाठी नमुना फारच लहान आणि असह्य चुकापासून बचाव करण्यासाठी नमुना हा पुरेशा प्रमाणात मोठा असला पाहिजे.''

**२. पूर्वग्रह दूषित नमुन्याची समस्या**

नमुना निवड पक्षपात किंवा पूर्वग्रहाचा प्रभाव पडल्यास नमुना हा प्रतिनिधीक स्वरूपाचा राहू शकत नाही. अशा नमुन्यास पूर्वग्रहदूषित नमुना असे देखील म्हणतात. पुढील काही कारणामुळे नमुन्यावर पूर्वग्रहाचा प्रभाव पडतो.

i) **नमुन्याचा आकार लहान :** जर नमुन्याचा आकार खूपच लहान असेल तर त्या नमुने अंतर्गत काही महत्त्वपूर्ण एककांचा समावेश होण्याची शक्यता नसते. अशा परिस्थितीत नमुना हा प्रतिनिधीक राहू शकत नाही.

ii) **दोषपूर्ण वर्गीकरण :** स्तरीत यादृच्छिक नमुना निवड पद्धतीचा उपयोग करण्यात आला आणि नमुन्यात असमान, अस्पष्ट अशा प्रकारचे वर्ग काढण्यात आले असेल तर तो नमुना पक्षपात पूर्ण असतो. त्याचप्रमाणे जर प्रत्येक वर्गात एककांची संख्या आसमान असून देखील नमुन्यात सर्व वर्गांना समान प्रतिनिधित्व दिले असेल तरी देखील नमुना असंतुलित व दोषपूर्ण होतो.

iii) **उद्देशपूर्ण नमुना :** उद्देश पूर्ण नमुना निवड पद्धतीत संशोधन करता आपल्या इच्छेनुसार नमुन्याची निवड करतो. त्यामुळे पक्षपात होण्याची शक्यता अधिक असते. ज्या एककांशी सहजपणे संपर्क स्थापन करणे सुलभ होते त्याच एककांना संशोधन करता आपल्या नमन्यात स्थान देतो. तर ज्या एकांशी संपर्क स्थापन करणे कठीण असते, त्या एककांना संशोधन करता सोडून देतो अशा वेळी देखील पक्षपात होतो.

iv) **साधनसूची अपूर्ण असणे :** एककांची साधनसूची ही जर अपूर्ण जुनी असेल किंवा अनुपयुक्त असेल तर अशावेळी संशोधन करता हा आपल्या इच्छेनुसार एकाची निवड करतो. म्हणून एककाची निवड ही पूर्वग्रहदूषित असण्याची शक्यता असते.

v) **कार्यकर्त्यांची निवड :** जेव्हा नमुना निवडण्याचे कार्य हे कार्यकर्त्यांसोबत जाते तेव्हा ती सावधानीपूर्वक नमुन्याची निवड करत नाहीत. समग्रामध्ये एकरूपता असते तेव्हा नमुना निवडताना पक्षपात होण्याची शक्यता कमी असते. परंतु जर समग्र विजातीय असेल तेव्हा मात्र नमुना निवडताना कार्यकर्ते पक्ष करतात. कारण ते आपल्या सोयीनुसार एककांची निवड करतात.

vi) **दोषपूर्ण यादृच्छिक नमुना :** दोषपूर्ण यादृच्छिक नमुना निवड पद्धतीमध्ये समग्रातील प्रत्येक एककाला निवडून जाण्याची समान संधी असते. तरीदेखील या पद्धतीचा अवलंब करताना थोडी त्रुटी राहिली तरी त्याचा परिणाम नमुनेच्या निवडीवर पडण्याची शक्यता असते.

vii) **अध्ययन विषयाचे जटिल स्वरूप :** अनेकदा अध्ययन विषय हा इतका जटील असणार आणि विविधता पूर्ण असतो की त्यामुळे प्रतिनिधीक नमुन्यांची निवड करणे कठीण होते. अशावेळी जे एकक

सहजपणे उपलब्ध असतात. अशाच एककांची संशोधन करता निवड करतो अशा प्रकारे नमुनाच्या आकाराची समस्या आणि पूर्वग्रहदूषित नमुन्याची समस्या या दोन प्रकारांच्या नमुना निवडी संदर्भात अतिशय महत्त्वाच्या समस्या आहेत.

**नमुना निवडीच्या विश्वासनीतीचे मापन**

नमुना निवडीच्या संदर्भातील काही प्रमुख समस्यांचा विचार केल्यानंतर या समस्या दूर करणे आवश्यक आहे काही विशेष प्रयत्नद्वारे नमुन्याच्या विश्वासनेतेची परीक्षण केले पाहिजे. नमुना निवडीच्या विश्वसनियतेचे मापन करण्यासाठी काही निवडीचे महत्त्वपूर्ण उपाय पुढील प्रमाणे.

**१. समांतर नमुना निवड :** संशोधनकर्त्याने निवडलेल्या नमुना हा विश्वसनीय आहे किंवा नाही याची परीक्षण करण्यासाठी समांतर अर्थात त्याच आकाराचा नमुना निवडला जातो. त्यानंतर या दोन्ही नमुन्याची संख्याकीय पद्धतीने तुलना केली जाते. जर दोन नमुन्यात पुरेशा प्रमाणात समानता असेल तर तो नमुना विश्वसनीय आहे असे मानले जाते. दोन्ही नमन्यात पूर्णपणे साम्य आढळणे शक्य नाही. जर समांतर नमुन्याच्या अंतर्गत समावेश होणाऱ्या एककांची वैशिष्ट्ये आणि मुख्य नमुन्याशी संबंधित एककांची वैशिष्ट्ये ही जर माहिती जुळती असतील तर तो नमुना विश्वसनीय मानला जातो.

**२. समग्रांशी तुलना :** समग्रांतील विभिन्न एककांची सूची तयार करताना संशोधन करतात समग्राची वैशिष्ट्ये माहीत करून घेतो. समग्र आणि नमुना यांच्या तुलना करून दोन्हींच्या परिणामाच्या दृष्टीने पर्याप्त समानता असल्यास तो नमुना विश्वासने समाजाला जातो.

**३. परिणामाशी तुलना :** संशोधनकर्त्याच्या अध्ययन विषयासंदर्भात पूर्वी अध्ययन करण्यात आले असेल तर या अध्ययनाच्या निष्कर्षाशी आपल्या अध्ययनाच्या निष्कर्षाशी तुलना केली जाते. त्यावरून अध्ययनातील नमुना किती प्रमाणात विश्वसनिय आहे हे ठरवले जाते. ही पद्धत विशेष उपयुक्त नाही. परंतु काही विशिष्ट परिस्थितीत या पद्धतीचा उपयोग होतो.

**४. नमुन्यातून दुसऱ्या नमुन्याची निवड :** या पद्धतीत मूळ नमुन्यात पुन्हा काही एककांची निवड यादृच्छिक पद्धतीने केली जाते. या दुसऱ्या निवडलेल्या नमुन्याची तुलना मूळ नमुन्याशी केली जाते. या उपनमुन्यात मूळ नमुन्याची काही आधारभूत लक्षणे आढळले तर मूळ नमुना हा विश्वासनीय मानला जातो. अलीकडे नमुना निवडीच्या विश्वसनीतीचे मापन करण्याकरता या पद्धतीचा विशेष उपयोग केला जातो.

## ४.३ सारांश

सामाजिक संशोधनात नमुना निवड पद्धती एक महत्वाची पद्धत आहे. आधुनिक काळात सामाजिक संशोधनात नमुना निवड पद्धतीचा अवलंब फार मोठ्या प्रमाणात केला जातो. जनगणना पद्धत हि वेळ,श्रम,आणि पैसा या दृष्टीने परवडणारी नाही. म्हणून अनेक संशोधक मोठ्याप्रमाणात नमुना निवड तंत्राचा उपयोग करतात. प्रस्तुत प्रकरणात सविस्तर नमुना निवड पद्धती विषयी काळजी पूर्वक आणि सविस्तर चर्चा करण्यात आली आहे.

## ४.४ सरावासाठी स्वाध्याय

अ) सरावासाठीचे प्रश्न आणि उत्तरे (सविस्तर उत्तरे द्या)

१. नमुना निवडीचा अर्थ उद्देश, तत्वे आणि फायदे विशद करा.

२. संभाव्यता नमुना निवडीच्या प्रकारची चर्चा करा.

३. गैरसंभाव्यता नमुना निवडीच्या प्रकारची चर्चा करा

ब) टीपा लिहा

१. सहेतुक नमुना निवड किंवा निर्णयात्मक नमुना, स्नोबॉल नमुना निवड.

२. स्नोबॉल नमुना निवड, आणि कोटा नमुना निवड

३. साधा नमुना, लॉटरी पद्धत, टीपेस्ट पद्धत

४. स्तरित, व्यवस्थाबद्ध, पुंज नमुना, बहुस्तरीय नमुना निवड.

५. पुंज नमुना, बहुस्तरीय नमुना निवड, बहुव्यवस्थिय नमुना निवड

क) सरावासाठीचे प्रश्न आणि उत्तरे (एका वाक्यात उत्तरे द्या)

१. वेळ, श्रम आणि पैसा याची बचत कोणत्या तंत्रामुळे होते.

२. नमुना निवडी बाबत कोणताही एक फायदा सांगा.

३. सोयीस्कर नमुना निवड पद्धती हि कोणत्या नमुना निवडीच्या प्रकारामध्ये समाविष्ट होते.

४. साध्या यादृच्छिक प्रकारातील कोणत्याही दोन पद्धती सांगा.

५. ग्रीड पद्धत ही कोणत्या नमुन्यामध्ये समाविष्ट होते.

६. कोटा पद्धत ही कोणत्या नमुना प्रकारा मध्ये समावेश होतो?

७. नमुना निवड पद्धतीच्या समस्या ?

८. नमुना निवडीचे मुख्य दोन प्रकार कोणते?

९. नमुना निवडीच्या कोणत्याही दोन पायऱ्या सांगा?

१०. नमुना निवड पद्धतीची कोणतीही दोन आधारभूत तत्वे?

११. ''नमुना त्यातील नावाप्रमाणेच एक विस्तृत समूहाचा लघु प्रतिनिधी आहे हि व्याख्या कोणी केली आहे''?

१२. सामाजिक विज्ञानात लोकसंख्येच्या अध्ययनाच्या बाबत कोणती पद्धती वापरली जाते?

१३. समाजशास्त्र अभ्यासात सांख्यिकीय नमुना चाचणी पद्धतीचे जनक म्हणून कोण आहेत?

१४. टीप्पेट पद्धती १९२७ मध्ये गणिती पद्धतीच्या आधारावर कोणी निर्माण केली?

क) सरावासाठीच्या प्रश्नाची एका वाक्यात उत्तरे

१. नमुना

२. वेळ श्रम आणि पैसा यांची बचत होते, अधिक सखोल अध्ययनाची शक्यता, विश्वसनीय निष्कर्ष, अनुभव जन्य तथ्य, सुलभ प्रशासन.

३. सोयीस्कर नमुना निवड पद्धती हि गैरसंभाव्यता नमुना निवडीच्या प्रकारामध्ये समाविष्ट होते.

४. साध्या यादृच्छिक प्रकारातील  दोन पद्धती लॉटरी पद्धत, कार्ड किंवा तिकीट, ग्रीड पद्धत.

५. ग्रीड पद्धत ही साधा यादृच्छिक नमुना नमुन्यामध्ये समाविष्ट होते.

६. कोटा पद्धत ही गैरसंभाव्यता नमुना प्रकारा मध्ये समावेश होतो?

७. नमुना निवड पद्धतीच्या नमन्याच्या आकाराची समस्या, पूर्वग्रह दूषित नमुनेची समस्या.

८. नमुना निवडीचे मुख्य दोन प्रकार संभाव्यता आणि गैरसंभाव्यता

९. नमुना निवडीच्या पायऱ्यांमध्ये समग्र निश्चित करणे, नमुन्याच्या एककाचे निर्धारण करणे, नमुन्याचा आकार निश्चित करणे, नमुना निवड पद्धती ठरवणे.

१०. नमुना निवड पद्धतीची  समग्रांची एकरूपता, प्रतिनिधी निवडण्याची शक्यता, जवळपास अचूकता असणे, नमुना प्रातीनिधिक असावा ही आधारभूत तत्वे होय.

११. ''नमुना त्यातील नावाप्रमाणेच एक विस्तृत समूहाचा लघु प्रतिनिधी आहे हि व्याख्या गुड आणि हॉट याणी केली आहे''.

१२. सामाजिक विज्ञानात लोकसंख्येच्या अध्ययनाच्या बाबत नॉनपॅरामेट्रीक पद्धती पद्धती वापरली जाते.

१३. ए एल बाऊले A.L.Bowle हे आहेत.

१४. प्रोफेसर टीप्पेट यांनीही टीप्पेट पद्धती १९२७ मध्ये गणिती पद्धतीच्या आधारावर तयार कोणी निर्माण केली.

## ४.६ अधिक वाचनासाठी पुस्तके.


१. Goode, William J.And Hatt, Paul K: Method in Social Research, McGraw -Hill Book company, 1981, P-209.

२. Young, Pauline V:Scientific Social Survey and Research,P/302

३. Fairchild: Dictionary of Sociology, P.548.

४. Lundberg, George A: Social Research, Longmans Green and co. New York. P.135.

५. Aggarwal, Y. P., Better Sampling, New Delhi, 1998.

६. Best, J.; Kahn, J., Research in Education, New Delhi, 1992.


❑❑❑